# आयर्लंडच्या स्वातंत्र्याची कथा



# डॅन ब्रीन
## यांचे आत्मवृत्त

आयरिश स्वातंत्र्याच्या संग्रामातील ही कथा आहे. साध्या स्वयंसैनिकापासून ब्रिगेड कमांडन्ट आणि पुढे स्वतंत्र आयर्लंडच्या पार्लमेंटचा सभासद झालेल्या एका सामान्य आयरिश तरुणाने, स्वातंत्र्यासाठी काय काय कसे कसे केले आणि घडले, ते सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

१७७६ पासून आयर्लंडचे राजकारण सनदशीर पद्धतीतून रंगत होते. पार्नेल व त्या नंतरचे पुढारी अट्टाहासाने सनदशीर राजकारणाचा पुरस्कार करीत होते. त्यांचा पार्लमेंटरी पद्धतीवर, ब्रिटिशांच्या सद्भावनेवर विश्वास होता.पण स्वातंत्र्य हे समरांगणावर जिंकायचे असते हे तत्व ओळखणाऱ्या तरुणांनी १८५८ साली 'आयरिश रिपब्लिकन ब्रदरहूड' ही संस्था स्थापन करून आयर्लंडला युद्धोन्मुख करण्याचा निश्चय केला. १९१२च्या सुमारास त्यांनी आयरिश स्वयंसेवकांची संघटना उभी केली. त्यांच्या समोरचे आदर्श, त्यांच्या समोरची परंपरा आयर्लंडमध्ये सशस्त्र क्रांती घडविण्याचा प्रयत्न करणाऱ्या हुतात्म्यांची होती.

पारतंत्र्याचा बीमोड करण्यासाठी दधीचीप्रमाणे अनेकांना आपल्या अस्थी द्याव्या लागतात. अशा अनेक यज्ञाहुतींनी पारतंत्र्यावर आघात करणाऱ्या वज्रात सामर्थ्य येते. सामान्य सैनिकांतील डॅन ब्रीनने १९२१ पर्यंत स्वातंत्र्यासाठी काय केले, हे आत्मवृत्त सांगते.

आमच्या देशात नवनव्याने स्वातंत्र्याचे मार्ग चोखाळीत आहोत. अशा वेळी वयाने, अनुभवाने आपल्या तरुणांसारखेच असलेल्या आयरिश तरुणांनी काय केले ते पाहणे बोधप्रद होईल. स्वातंत्र्य हे मागून मिळत नाही, ते हिसकावून घ्यावे लागते, स्वातंत्र्य का पारतंत्र्य या प्रश्नाचा निकाल समरांगणावरच लागावयाचा असतो हे अगदी अलीकडेच आमच्या राष्ट्राला पटू लागले आहे. आयर्लंडच्या स्वातंत्र्याच्या इतिहासातून आपल्यास त्यासंबंधी मार्गदर्शन होईल.

*मूळच्या पुस्तकात डेमी आकाराची २२२ पृष्ठे आहेत. त्यास प्रस्तावना उपोद्घात अथवा किंमत वगैरे नोंद नाही. पुस्तक थेट आरंभ होते, आणि तत्कालीन स्वातंत्र्योत्सुक वाचकांस जे हवे ते त्यातून मिळण्यासारखे होते... आजही मिळेल!*

| प्रकरण | पृष्ठ |
|---|---|
| १. लोकसत्ताक राज्यातील सैनिकशिक्षण | १८ |
| २. नव्या उठावणीची तयारी | २२ |
| ३. दारूगोळ्याचा कारखाना | २३ |
| ४. कारखान्यात स्फोट | २५ |
| ५. निवडणुकी; स्वतंत्र लोकसत्ताक राज्याची घोषणा | २७ |
| ६. सोलोहेडबेग | २९ |
| ७. अज्ञातवासात उडी | ३१ |
| ८. अमेरिकेत जावे काय? | ३५ |
| ९. परत सोलोहेडबेग; नव्या मोहिमेची तयारी | ४० |
| १०. सीन हॉगनला पकडले | ४३ |
| ११. सीन हॉगनची सुटका; नॉकलाँग स्टेशनवरील द्वंद | ४६ |
| १२. नॉकलाँगहून कूच; मी वैद्यकीय कल्पनेवर मरण्याचे नाकारले. | ४९ |
| १३. मुख्य केंद्रात आमचा प्रवेश | ५१ |
| १४. फितुरांना देशभक्ती कशी शिकवावी? लॉर्ड फ्रेंच याच्या मागावर | ५३ |
| १५. ॲशटाऊनची लढाई | ५७ |
| १६. मार्टिन सॅव्हेजचा अंत्यसंस्कार. | ६० |
| १७. गुन्हेगार कोण? आम्ही की परकीय सरकार? | ६४ |
| १८. प्रत्यक्ष युद्धाला सुरुवात; पोलीस ठाण्यावर हल्ले | ६६ |
| १९. सरकारी डाकेवर हल्ले | ६९ |
| २०. लोकसत्ताक सैन्याची उभारणी; डिनी लेसीचा परिचय | ७२ |
| २१. ब्रिटिश हेरांबरोबर झटापटी; जिवावरचे प्रसंग | ७५ |
| २२. ड्रमकॉन्ड्रा येथील प्रत्यक्ष मृत्यूशी झुंज | ७८ |
| २३. 'ड्रमकॉन्ड्रा' नंतर | ८३ |
| २४. सीन ट्रेसीचे निर्याण | ८६ |
| २५. रक्तलांच्छित रविवार | ८९ |
| २६. पुन्हा एकवार आघाडीवर | ९१ |
| २७. युद्धाच्या धामधुमीतील विवाह | ९३ |




# डॅन ब्रीन

## १. लोकसत्ताक राज्यातील सैनिकशिक्षण

एकोणीसशे चौदा सालची गोष्ट. टिप्परेरीपासून सुमारे चार मैलांवर असलेल्या डोनोहिल गावी मी प्रथमत: आयरिश स्वयंसेवकांत प्रवेश केला. त्यावेळी माझे वय विशीच्या सुमारास होते. थोड्याच दिवसांत गावच्या पोलिसांकडून मी सिनफेनर म्हणून ओळखला जाऊ लागलो. सिनफेनर्स हे त्यावेळी दुर्मीळच होते. पण माझ्या नंतरच्या आयुष्यात यापेक्षा श्रेष्ठ अशी 'राजनैतिक मारेकऱ्यांचा सूत्रकर्ता' ही पदवी पोलिसांनी मला अर्पण केली. त्यासंबंधी फिरून सांगेन. गेल्या महायुद्धाच्या प्रारंभीचे वर्षी आयर्लंडमध्ये काय स्थिती होती ते सांगतो.

आयरिश होमरूल बिल हे पार्लमेंटने नुकतेच मान्य केले होते. (उत्तर आयर्लंडमधील) अल्स्टरमधील ऑरेंज पक्षाचा त्याला विरोध होता. हे बिल प्रत्यक्ष व्यवहारात आणणे, किंवा डब्लिनमध्ये सर्व आयर्लंडचे पार्लमेंट भरविणे अशाबद्दलच्या कोठल्याही प्रयत्नाला तीव्रतर विरोध करण्याचे त्यांनी प्रगट केले होते. इंग्लिश टोरी पक्षातील धनाढ्य भांडवलवाल्यांच्या नैतिक व आर्थिक पाठिंब्याच्या बळावर ब्रिटिश पार्लमेंटला या बाबतीत धुडकावून देण्यासाठी, ऑरेंज पक्षाने सुसज्ज, सशस्त्र आणि कवायती स्वयंसेवकांचे सैन्य उभारले.

यावेळी 'सिनफेन' -आमचे आम्ही- या राजकीय मतप्रणालीस डब्लीन शहरापलीकडे कोणी ओळखत नसे. आयरिश जनतेतील बहुमताच्या वतीने म्हणून बोलणारे जे होते ते विधिमंडळांतर्गत राजकारणी मनोवृत्तीचे होते. त्यांचा पुढारी जॉन रेडमंड होता. बुद्धिमान व कर्तबगार पुढाऱ्यांपैकी पर्सी, मॅकवेल यांसारख्या काहींच्या मनांत निराळेच विचार येत. पण त्यांचे राजकारणातील स्थान अत्यंत सामान्य होते. ऑरेंज पक्षाच्या संघटनेतून त्यांना एक उत्कृष्ट मार्ग सुचला. आयर्लंडभर स्वयंसैनिकांच्या संघटना उभारण्याबद्दल त्यांनी राष्ट्रीय लोकपक्षास आवाहन केले. जुन्या पिढीतील फेनियन पक्षाची विचारसरणी कोठे कोठे तग धरून होती. होमरूल बिलाचे फुसकेपण ज्यांना उमगले होते त्यांना ही सुवर्णसंधी वाटली. फार दिवस असे काही व्हावे अशी त्यांची इच्छा होती. आयर्लंडच्या कोनाकोपऱ्यांत या आवाहनाचे स्वागत झाले; त्याचा स्वीकार झाला आणि पहिल्या महायुद्धाच्या सुरुवातीला आयरिश स्वयंसैनिकांची पथके दिसू लागली. आयर्लंडमध्ये त्यावेळी तीन निरनिराळ्या सैनिक संघटना होत्या. मात्र त्या सैन्यांची तयारी सुसज्जता आणि दिमाख या बाबतींत परस्परांमध्ये दोन ध्रुवांइतके अंतर होते. आयर्लंडवर सत्ता गाजवणारे ब्रिटिश सैन्य, दुसरे उत्तरेकडील ऑरेंज स्वयंसेवकांचे सैन्य आणि तिसरे हे लोकपक्षाचे आयरिश स्वयंसेवक दल. महायुद्धाला प्रारंभ झाल्याबरोबर रेडमंड व त्याचे पार्लमेंटरी अनुयायी यांनी आपले बळ ब्रिटिशांच्या पदरात टाकले आणि उघडउघडपणे सैन्य भरतीला प्रारंभ

केला. ऑरेंज स्वयंसेवक तर मनापासूनच ब्रिटिशांच्या बाजूला होते. खुद्द आयरिश स्वयंसेवकांमध्ये काही काळ दुफळी पडली. त्यापैकी हजारोंनी ब्रिटिश सैन्यात नावे दाखल केली. काही थोडे मात्र निश्चयाने आणि चिकटपणाने केवळ आयर्लंडशी एकनिष्ठ राहिले. 'लहान राष्ट्रांच्या स्वातंत्र्यासाठी', 'तहनाम्यातील वचनांच्या पूर्ततेसाठी', इत्यादि इंग्लंडच्या भूलथापांनी ते फसले नाहीत. आयर्लंडच्या 'स्वातंत्र्या'वर अढळ विश्वास ठेवणारे ते होते. त्यांचे पुढारी 'सीनफेन'च्या राजकीय कार्यक्रमाशी सहमत होते. हळू हळू असे सर्व 'सिनफेन स्वयंसेवक' म्हणून ओळखले जाऊ लागले.

डोनोहिल येथील आमचे छोटे मित्रमंडळ राष्ट्रातील या अल्पसंख्य लोकसेनेचा दुवा होते. रेडमंडच्या सैन्यभरतीच्या आदेशाला आम्ही कवडीचीही किंमत दिली नाही. उघडपणे आमच्या कवायती, सैनिकशिक्षण आम्ही चालू ठेवले होते. मनात आम्ही बेत रचीत होतो की, असा एक काळ फिरेल, की ते दिवस आमच्या भाग्याचे असतील, आमच्या एकमेव शत्रूला जबरदस्त तडाखा आम्ही देऊ, त्यांची धूळधाण करू, त्यांना हाकून देऊ; आणि हा शत्रू अन्य कोणी नाही, खुद्द इंग्लंडच.

लढाई जसजशी भरात येऊ लागली तसतशी आमच्या हालचालींवर पोलिसांची तीक्ष्ण दृष्टी राहू लागली. आम्हाला जर्मनप्रेमी म्हणून समजण्यात येऊ लागले. वर्तमानपत्रांतून येणारी निर्ढावलेली असत्ये, थापा, दडपादडपी यांमुळे सामान्य लोकमत जर्मनीच्या विरोधी व इंग्लंडच्या बाजूचे झाले होते. खंदकांतून लढाया खेळणाऱ्या ब्रिटिश सैन्याच्या सुखसोयीसाठी फंड उभारले गेले की जुना सरदार वर्ग, धनिक व्यापारी आणि शेतकरी या सर्वांचाच त्यांना पाठिंबा मिळे. आम्ही आयरिश स्वयंसेवक -अर्थात युद्धात इंग्लंडची बाजू घेतली नाही त्यांनाच मी या नावाने संबोधत आहे- मात्र त्यापासून अलिप्त राहिलो. त्या फंडगुंडीला हातभार लावण्याचे नाकारल्यामुळे यावेळी मी पोलिसांच्या प्रथम दृष्टीस पडलो. या सुमारास मी सदर्न ॲण्ड वेस्टर्न कंपनीत नोकरीस होतो. आमच्या या अराजक मनोवृत्तीबद्दल आमच्या वरिष्ठांकडे आमचे नाव कळवण्याचे महत्कार्य पोलिसांनी केले असल्याची माझी खात्री आहे.

या पोलिस खात्याचे स्वरूप इतर देशांतून असते तसे नव्हते. 'रॉयल आयरिश कॉन्स्टाबुलरी' हे त्याचे नाव. काळाच्या जबड्यात आता त्याचा मागमूसही आढळणार नाही. हे पोलिस दल म्हणजे बहुतांशी लष्करी सैन्यच होते. शस्त्रे वापरण्याचे शिक्षण त्यांना मिळे. बंदुका, रायफल्स यांनी ते सुसज्ज होते. व्यवहारात गुन्हेगार म्हणून ज्याला म्हणतात, अशा तऱ्हेच्या प्रवृत्तीची कल्पनाही आयरिश जनतेत कधीच नव्हती. तेव्हा या पोलिसांचे मुख्य कर्तव्य म्हणजे गुप्तपणे सरकारला बातम्या पुरवणे हे असे. आयरिश स्वयंसेवक आणि आयर्लंडच्या स्वातंत्र्यासाठी जे जे प्रयत्न करीत त्यांची बित्तंबातमी लगोलग दुसऱ्या कानाला कळविली जाई. प्रार्थनामंदिरांतील आयरिश धर्मोपदेशकांच्या प्रार्थनांची हकिकतसुद्धा सरकारात जाई. असे एकूण दहा हजार पोलिस सर्व देशभर पसरले होते. त्या त्या खेड्याच्या किंवा शहराच्या वस्तीनुरूप कुठे दोन, तर कुठे दहा, तर कुठे वीस अशा गटांनी त्या त्या ठिकाणी नेमले होते, ही सर्व भरती स्वदेशभक्त समजल्या जाणाऱ्या कुटुंबांतून झालेली असल्याने, त्यांना लोक माहीत असत.

इंग्रजांच्या पारतंत्र्याविरुद्ध लढणाऱ्या आयर्लंडमधील क्रांतिकारकाचे -डॅन ब्रीन याचे हे आत्मवृत्त. आपल्या देशातल्या सशस्त्र चळवळीशी मिळतेजुळतेच आहे. ते भारतीय इच्छुक स्वातंत्र्यसैनिकांना प्रेरक ठरणारे होते म्हणून त्याचा अनुवाद दत्त आपटे यांनी करून ते पुस्तक प्रसिद्ध केले -आणि म्हणूनच ते तत्कालीन ब्रिटिश सरकारने जप्त केले होते. सावरकर लिखित जोसेफ मॅझिनीच्या चरित्राशी तेवढ्या बाबतीत या पुस्तकाचे साम्य आहे.

अर्थातच त्या पुस्तकाची प्रत या ग्रंथासाठी मिळणे दुरापास्तच होती. उत्तरकालात दत्तोपंतांनी त्यांच्या इतर व्यवधानांत या पुस्तकाबद्दल कुठे उल्लेख केला नसावा. अनंत उर्फ मुनी क्षीरसागर यांनी लिहिलेल्या आठवणीत या पुस्तकाचा स्पष्ट नावनिशिवार उल्लेख आहे. त्यावरून बराच शोध घेतल्यानंतर एक छायांकित प्रत मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय (दादर) येथून उपलब्ध झाली. पुस्तकावर लेखक, प्रकाशक,मुद्रकाचे नाव अर्थातच नाही.

या पुस्तकाचे शेवटचे (उपसंहार) प्रकरण दत्त आपटे यांनी लिहिल्याचे जाणवेलच, शिवाय त्यांचा हेतू आणि विचारसूत्र यांवर प्रकाश पडेल.

आपल्या देशबांधवांची खडान्‌खडा माहिती त्यांचेकडून पुरविली जाई. त्यामुळे हे लोक आयर्लंडमधील ब्रिटिश सैन्याचे नाक होऊन बसले. या माहितीविना या ४०हजार ब्रिटिश शिपायांचे -ना त्यांना देशाची माहिती, ना इतिहासाची, ना लोकांची- काय चालते?

मी पुन्हा मूळ गोष्टीकडे वळतो. महायुद्धाला सुरुवात झाली, तरी मी अजून माझ्या दैनंदिन आयुष्यक्रमातच गुंतलेला होतो. साधारण स्वयंसेवकापेक्षा अधिक मी काही करीत नसे. आठवड्यातून काही वेळा जमावे, संचलन करावे, हा कार्यक्रम. आमचेजवळ त्यावेळी शस्त्रास्त्रे फारच थोडी होती. तेव्हा कोठे एखादे रिव्हॉलव्हर तर केव्हा एखादी रायफल पळविण्याच्या नादात आम्ही नेहमी असू.

असेच कार्यक्रम करता करता १९१५ साल संपले. १९१६चा एप्रिल महिना आला. १९१६च्या बंडाचा अधिक ऊहापोह मी येथे करीत नाही. येणाऱ्या आज्ञा आणि प्रतिआज्ञा यांच्या गोंधळात टिप्परेरीमधील तरुणांना आपला कस जोखण्याची संधी मिळाली नाही. तथापि आम्हाला सांगितलेल्या एका कामगिरीचे, आम्ही थोडक्याच दिवसांनी अनुभवलेल्या प्रसंगाशी असलेले साम्य सांगितल्याविना राहवत नाही. आमच्याकडे दिलेल्या कामगिरीपैकी तेथील एका महत्वाच्या लोहमार्गाचा नाश करणे हा एक भाग होता. याकरिता जवळच्याच दगडाच्या खाणीसाठी जमविलेली सुरुंगाची दारू हस्तगत करणे अवश्य होते. ही खाण म्हणजे सोलोहेडबेग येथील होय. तीन वर्षांनी येथेच मी आणि माझ्या सवंगड्यांनी गोळीबाराचा प्रथम ओनामा केला.

१९१६च्या उठावणीने आमच्याबद्दलचा दृष्टिकोण बदलला. इतके दिवस सिनफेनांची हेटाळणी आणि तिरस्कार ज्यांनी केला ते आमच्याबद्दल चांगले बोलू लागले. पण आमची सैनिक संघटना मात्र विस्कळीत झाली. सर्व देशभर आमच्या हजारो तरुणांची धरपकड करून त्यांना इंग्लंडमध्ये हद्दपार करण्यात आले. आमची हत्यारे ब्रिटिशांनी जप्त केली. संचलन करणे आणि प्रकटरित्या लष्करी कार्यक्रम करणे यावर बंदी पडली. आमची संघटना ब्रिटिशांकडून अवैध -अराजक-ठरविण्यात आली. काही काळ आम्ही सर्व आत्यन्तिक निराशा आणि विमनस्कतेत बुडून गेलो - हे काही काळच टिकले. बंडानंतर काही महिन्यांनीच ब्रिटिश लष्कराच्या जाळ्यातून जे कोणी निसटले, त्यांनी डब्लिन येथे दोन गुप्त सभा बोलाविल्या आणि त्यांत आयरिश स्वयंसेवकांची पुनर्रचना -संघटना करण्याचा निश्चय झाला.

अशा रितीने आम्ही फिरून कामाला लागलो. माझा मित्र सीन ट्रेसी व मी -आम्ही दोघांनी नव्याने कामास प्रारंभ केला. आमच्या तुकडीला जोमाने कामाला लावले. या खेपेस आम्हास उघड काहीच करता येत नसे. गुप्तपणे आणि सावधानतेने आम्ही आमच्या उद्योगाला सुरुवात केली, आयरिश स्वयंसेवकांशी संबंध ठेवणे धोक्याचे झाल्यामुळे आमचेकडे थोडेच लोक येत. पण ते येणारे थोडे, निश्चयाचे बळकट आणि धीराचे होते. आरंभी तर आम्ही केवळ तिघेच होतो.

जवळच्या झाडीत दिवसाचे नित्याचे कार्यक्रम आटोपल्यावर आठवड्यातून दोन वेळा आम्ही जमत असू. अशी धडपड १९१७च्या मे महिन्यापर्यंत चालू होती. तोपावेतो आम्ही तेराजण झालो. आमच्यापैकी एकालाही युद्धशास्त्राचे ज्ञान नव्हते. ज्यांच्यापासून हे शास्त्र ज्यांच्यापासून हे शास्त्र शिकावे असे जे काही थोडे आसपासच्या भागात होते, ते एक तर ब्रिटिश लष्करात दाखल झाले होते किंवा त्यांच्यावर विश्वास टाकणे धोक्याचे ठरणार होते. तरी फिजिकल ड्रिल सिग्नलिंग, स्काउटिंग, रिव्हॉलव्हरचा नेम धरणे, संचलन इत्यादि लष्करी कार्यक्रमांत आम्ही उत्तम प्रगती केली. आम्हाला पुष्कळसे पुस्तकांवर अवलंबून राहावे लागे, आणि योगायोग तरी असा की, ज्या ब्रिटिश सैनिकांशी आम्हाला लढावयाचे होते, त्यांच्यासाठी लिहिलेली या विषयावरील पुस्तकेच सहज सुलभतेने आम्हाला मिळत. साहजिकच आमच्या हातून वारंवार अनेक चुका घडत. तथापि शिकण्याच्या तीव्र इच्छेमुळे अशा अडचणी दूर सारता आल्या. आसपासच्या प्रदेशात होणारे ब्रिटिशांचे लष्करी कार्यक्रम आणि सैनिकांच्या हालचाली आम्ही मुद्दाम जाऊन पाहात असू. त्यांतूनही कित्येकदा काहीतरी शिकावयास मिळे. एखादे रिव्हॉलव्हर मिळविण्याची संधी आलीच तर कोठूनही पैसा जमवून आमच्या लहानग्या संग्रहात त्याची

भर टाकीत असू.

असे आम्ही लष्करी शिक्षणात पारंगत होत गेलो. ब्रिटिश सरकारच्या अधिकाऱ्यांनी आम्हाला पुढे आयरिश रिपब्लिकन आर्मीचे (I R A) तुफान सैनिक म्हणून संबोधिले. यापेक्षा त्या शिक्षणाचा अधिक गौरव तो काय हवा?

१९१७च्या ऑगस्ट महिन्यात आम्ही प्रथम उघडपणे लोकांसमोर संचलन केले. या वेळपावेतो, गतवर्षी ईस्टरच्या उठावणीवेळी हद्दपार केलेले लोक सुटून परत येत होते. गेले वर्षभर जे आम्ही आमच्या मनाने करीत होतो त्याला त्यांनी सर्व देशभर ठिकठिकाणी सुरुवात केली. रॉसकॉमन आणि लाँगफर्ड येथील पोटनिवडणुकीत आमच्या उमेदवारांना प्रचंड बहुमत मिळाले. आणखी काही महिन्यांनी तुरुंगातून नुकतेच सुटलेले 'इमॉन डी व्हॅलेरा' यांना ईस्ट क्लेअर परगण्यातील इंग्लिश पार्लमेंटच्या एका रिकाम्या जागेसाठी आयरिश प्रजासत्तेतर्फे उभे करण्यात आले. इंग्लिश पार्लमेंटमध्ये पाऊल टाकायचे नाही या प्रतिज्ञेवर ते मोठ्या बहुमताने निवडून आले. आयरिश लोकसत्ताक राज्याचे अध्यक्ष म्हणून पुढे काही दिवसांनी त्यांचा सन्मान झाला. निवडणुकीनंतर थोड्याच दिवसांनी टिप्परेरी शहरात एक प्रगट भाषण त्यांनी केले. त्यावेळी आम्ही आयरिश स्वयंसेवकांच्या गडद हिरव्या गणवेशात त्यांचे संरक्षक सैनिक म्हणून काम केले. एक हजार ब्रिटिश सैनिक त्यावेळी टिप्परेरीत आणले होते. त्यांच्या राहत्या घरासमोरच ही आमची सभा होती, म्हणून आम्ही आमच्याबरोबर रायफल्स नेल्या नाहीत. त्याऐवजी 'हर्लिंग'च्या काठ्या नेल्या होत्या. शांतताप्रिय - सदाचरणी नागरिकांच्या दृष्टीने तीन प्रकारचे गुन्हे आम्ही यात केले. लष्करी पद्धतीने वागणे हा पहिला, त्यापेक्षा गंभीर म्हणजे लष्करी पद्धतीचा गणवेश घालणे हा दुसरा, आणि तिसरा म्हणजे 'हर्लिंग'च्या काठ्या वापरणे.

हर्लिंगच्या काठ्या वापरणे हासुद्धा गुन्हा ठरविण्यात आला होता. त्यासाठी विशेष वटहुकूम काढला होता. त्यालाही कारण मजेचे झाले. इंग्लंडमधील आयरिश कैद्यांना देण्यात येणाऱ्या वागणुकीचा निषेध करण्यासाठी डब्लिनमध्ये ब्रेसफर्ड येथे एक सभा भरली होती. पोलिसांना ते पाहवले नाही. त्यांनी ती सभा उधळण्याचा आणि वक्त्यांना पकडण्याचा प्रयत्न केला. सभा उधळणे सोपे नव्हते. हर्लिंग खेळून परत येणारे किंवा खेळण्यास जाणारे अनेक तरुण सभेत होते. पोलिसांच्या या प्रयत्नाने जो गोंधळ माजला त्यात इन्स्पेक्टर मिल्सला या काठ्यांचा इतका भरपूर प्रसाद मिळाला की त्यात त्याचे मरण ओढवले. तेव्हा आयर्लंडमधील ब्रिटिश सरसेनापती सर बॉयरन मेहॉन यांनी विशेष वटहुकुमाने हर्लिंगच्या काठ्या सार्वजनिक ठिकाणी नेण्यास बंदी केली. साध्या फिरण्याच्या काठीलाही बंदी करावी इतक्या शहाणपणाचा हा वटहुकूम होता. आयरिश लोकांवर याचा काय परिणाम होणार ते स्पष्टच होते. कुठेही बाहेर पडताना जेथे नको तेथेही हर्लिंगच्या काठ्या घेतल्याशिवाय जायचेच नाही हीच जिकडेतिकडे टूम होऊन बसली. अशा रितीने हा वटहुकूम आणि ब्रिटिश सरकार दोन्हीही उपहास आणि चेष्टा यांचा विषय झाले.

टिप्परेरीमधील सार्वजनिक रितीने केलेल्या आमच्या लष्करी शिक्षणाच्या प्रयोगाने आमच्या शत्रूला धक्का बसलाच, पण स्थानिक सिनफेनर्सना त्यापेक्षाही अधिक हादरा बसला. या वेळेपर्यंत सार्वजनिक मत हे सिनफेनांच्या बाजूस संपूर्ण झुकले होते. हजारो तरुणांची आमच्याकडे भारुडभरती होत होती. नुसते ठराव करण्यापलीकडे कोणता उद्योग करण्याची त्याची इच्छा नव्हती. हे संचलन करताना असे करू का म्हणून आम्ही कोणाशी गंभीर चर्चा केली नाही, की कोठल्या सभेत सूचना मांडली नाही, किंवा लांबलचक आडवळणी शब्दांनी एखादा ठराव केला नाही. आमच्या या धिटाईने त्यांना चांगलाच धक्का बसला. या गरीब प्राण्यांचा आम्हांस पुढे पुढे चिमटे काढण्याचा प्रयत्न असे. पण आमचे तिकडे लक्ष नसे. सिनफेनातल्या राजकारण करणाऱ्या लोकांनीही आमच्यावर कडक टीका केली. आम्ही ते सर्व ऐकले. त्याला प्रत्युत्तर केले नाही. मनात मात्र एकमेकाच्या कर्तृत्वाची पारख करीत होतो.

●●●

## २. नव्या उठावणीची तयारी

आमच्या या बंडखोर वर्तनाची हकिकत पोलिसांकडून वरच्या अधिकाऱ्यांना कळविण्यात आली. त्यावर गुन्हेगारांना पकडण्याची आज्ञा त्यांना मिळाली. ब्रिटनच्या बादशहाचा पाहुणचार स्वीकारण्याची आमची यत्किंचितही इच्छा नसल्याने मी आणि सीन ट्रेसीने फरारी होण्याचे ठरविले. आम्ही आमची घरे सोडली. पाठलागावर असणाऱ्या पोलिसांना हुलकावणी देण्यासाठी, आमच्या विश्वासू आणि प्रेमळ मित्रांच्या घरांतून मुक्काम करीत करीत भटकू लागलो. पण दोन-चार दिवसांतच 'पीलर्स'नी सीन ट्रेसीला पकडले. हे 'पीलर्स' म्हणजे १९ व्या शतकाच्या प्रारंभी सर रॉबर्ट पील याने ज्या रॉयल आयरिश कोअरची स्थापना केली ते होत. त्यांनाच पुढे लोकांनी तिरस्काराने पीलर्स हे नाव पाडिले. ट्रेसीला प्रथम कॉर्कच्या तुरुंगात नेण्यात आले. तेथे त्याची मिलीक तेथील ब्रेमन बंधूंशी ओळख झाली. हे तिघे बंधूसुद्धा नाइलाजाने सरकारी पाहुणचार भोगीत होते. पुढे हे दोघेही आयरिश रिपब्लिकन आर्मीचे सदर्न कमांडचे मुख्य अधिकारी झाले. आणि आज स्वतंत्र आणि लोकसत्ताक आयरिश देशाच्या सैन्यातील मोठ्या बहुमानाच्या अधिकारावर ते आहेत. अनेकांना अशा रितीने तुरुंगात एकत्र डांबून ठेवण्यात सरकारचा हेतू काय असेल तो असो. पण ते एकत्र आल्याने सहजच गप्पा गोष्टी करणे, राजकारणाची चर्चा करणे हे घडे. तुरुंग म्हणजे आमच्या राजकीय मतप्रचाराच्या शाळाच झाल्या. बंडखोरांची ही महाविद्यालयेच होती. आमच्यातील कित्येकांनी सैनिक शिक्षणाचे पुढचे पुढचे धडे तेथेच घेतले. निरनिराळ्या स्फोटक द्रव्ये तयार करण्याच्या खुब्या त्यांना तेथेच समजल्या. तुरुंगाबाहेर यांतले काय शक्य झाले असते?

ट्रेसीची लष्करी कोर्टाकडून चौकशी होऊन त्याला दोन वर्षांची शिक्षा झाली. पुढे यातील १६ महिन्यांची शिक्षा कमी करण्यात आली. अशा तऱ्हेच्या चौकशीचे नुसते सोंग असे. आमचे मित्र आपल्या बचावाचा प्रयत्नही करीत नसत. आमची चौकशी करण्याचा कोणत्याही ब्रिटिश न्यायालयाला हक्कच नाही असे आमचे म्हणणे होते. प्रारंभी प्रारंभी साक्षीपुरावे चालले असताना कुणी गाणी गात गात हेटाळणी करीत, किंवा वर्तमानपत्रे वाचून वेळ घालवीत.

लवकरच ट्रेसीने आपल्या मित्रांसमवेत तुरुंगात मिळणाऱ्या वागणुकीचा निषेध म्हणून अन्नसत्याग्रहाला सुरुवात केली. आयरिश राजबंद्यांनी या शस्त्राचा असा प्रथमच उपयोग यावेळी केला. पण पुढे हे नित्याचेच झाले. त्यावरून राजबंद्यांना डब्लीनच्या तुरुंगात हलविण्यात आले. पण तेथेही अन्नसत्याग्रह चालू राहिलाच. तुरुंगाचे अधिकारी आणि डॉक्टर्स यांनी बळजबरीने अन्न घालण्याचा प्रयत्न केला. राजबंद्यांनी त्याचा प्रतिकार केला, त्यात कमाण्डण्ट टॉम ॲश याचा मृत्यू झाला. टॉम ॲशने १९१६च्या उठावणीत प्रामुख्याने भाग घेतला होता. त्याच्या मृत्यूने सर्व राष्ट्रभर त्वेषाची, संतापाची, एकच लाट उसळली. त्यावेळी प्रथम ब्रिटिशांच्या ध्यानात आले की हे लोक निकराचे आहेत. यांची अंत:करणे पेटलेली आहेत! तत्वासाठी ते मरणही पत्करतील!! आयरिश देशभक्तांना यापुढे राजबंदी म्हणून किंवा युद्धकैदी या सन्मानाने वागविले जाईल असा सरकारने करार केला. तेव्हा अन्नसत्याग्रह थांबला. बळजबरीने अन्न घालण्याचे प्रयत्न यापुढे केव्हाही करण्यात आले नाहीत.

ट्रेसी तुरुंगात होता तरी माझा उद्योग चालूच होता. जवळच्या खेड्यापाड्यांतून आठ आठ जणांच्या तुकड्या तयार करण्यास मी आरंभ केला. असे प्रयत्न हळूहळू सर्व देशभर घडू लागले. थोड्क्याच काळात १९१६ सालापेक्षा अधिक बळकट लष्करी संघटना आम्ही केली. इकडे ब्रिटिश सरकारने त्यांच्या नेहमीच्या परंपरेप्रमाणे राजबंद्यांशी केलेले वचन मोडले. ट्रेसी आणि त्याच्या मित्रांना डंडॉकच्या तुरुंगात हलविण्यात आले होते. त्यांनी फिरून अन्नसत्याग्रहाला सुरुवात केली. त्याचा परिणाम होऊन त्यांची सुटका करण्यात आली.

या वेळपावेतो आमची संघटना आणि सैनिक शिक्षण हे गुप्तपणे चाले. मध्येच कोठेतरी ब्रिटिश सैनिक अचानकपणे छापा घालून स्वयंसेवकांना पकडीत. ट्रेसी सुटून आल्यावर त्याच्याकडून समजले की, येथून पुढे या सर्व गोष्टी अगदी उघडपणे करावयाच्या. मग प्रत्येक स्वयंसेवक ब्रिटिशांकडून पकडला गेला तरी बेहेत्तर. इंग्लंडने असे प्रत्येकाला पकडण्याचे धोरण पत्करले तर आमची खात्री होती की लवकरच आयरिश स्वदेशभक्त हजारोंनी सर्व तुरुंग भरून टाकतील. आणि पुन्हा

एकदा सर्व राष्ट्रांमध्ये इंग्लंडच्या फजितीला पारावार उरणार नाही.

वरील प्रकार १९१८च्या सुरुवातीस होत होते. आता आम्हास दारूगोळा व शस्त्रास्त्रेही बरीच मिळू लागली. ती कोठून हे उघड करणे आज इष्ट नाही. गेली कित्येक वर्षे आयर्लंडमध्ये बंदुकी इत्यादि कोणतीच शस्त्रे आणण्यास बंदी होती. एखाद्या दुकानात मागची शिल्लक असलीच तर ती विकण्यास बंदी होती. शिकारीला काडतुसे घ्यायची झाली तरीसुद्धा ती ब्रिटिश लष्करी अधिकाऱ्याच्या खास अनुमतीनेच मिळायची, अशी स्थिती होती.

तथापि आमच्या शत्रूला नव्या बंडाचा वास येऊ लागला. ते अधिक जागरूक झाले. पुन्हा एकवार सीन ट्रेसीला पकडण्यात आले. त्याने पकडल्या क्षणापासून अन्नसत्याग्रह आरंभिला. ट्रेसीच्या पहिल्या तुरुंगवासाच्या वेळी मला 'कंपनी कॅप्टन' म्हणून निवडण्यात आले. या दुसऱ्या खेपेस 'बटॅलियन कमाण्डण्ट' ही मला बढती मिळाली. काही थोड्या दिवसांनी मी 'ब्रिगेड कमाण्डण्ट' म्हणून निवडला गेलो. त्यावेळी प्रत्येक कंपनीतील सैनिक आपला अधिकारी निवडीत. प्रत्येकाला एक मत असे. आणि या जागेसाठी कोणासही उभे राहण्याचा अधिकार असे. त्या त्या भागातील बटॅलिअनचे असे कंपनी कॅप्टन एकत्र येत आणि आपला बटॅलिअन कमांडंट निवडीत-तसेच पुढे ब्रिगेडचे निवडीत. अशी ही आमची संघटना खरोखरीच लोकसेना होती.

यावेळी युद्धामध्ये इंग्लंडचा पडता काळ येऊ लागला होता. मार्च १९१८ मध्ये जर्मनीची सुप्रसिद्ध सार्वत्रिक चढाई सुरू झाली. ब्रिटिश आघाडीला ठिकठिकाणी भगदाडे पडली. चिरडीला गेलेल्या इंग्लिशांनी आयर्लंडसाठी सक्तीच्या भरतीची मागणी केली. पार्लमेंटने त्यासाठी अवश्य तो कायदाही केला. आयरिश लोकांना सक्तीने इंग्लिशांच्यासाठी लढायला लावण्याची सर्व तयारी तर झाली. आयर्लंडच्या भूमीत जन्म पावलेला असा सर जॉन फ्रेंच याला व्हाइसरॉय नेमण्यात आले.

या धोरणाला सक्रिय विरोध करण्यास आयरिश लोक तयार झाले. ब्रिटिशांना विरोधण्याचा एवढा गंभीर कृतनिश्चय पूर्वी कधी झाला नव्हता. धर्मोपदेशक - धर्माधिकारी, भिन्नभिन्न मतमतांचे, मवाळापासून जहालापर्यंतचे राजकीय पुढारी एकत्र आले. या धमकीला विरोधण्यासाठी त्यांनी कंबर कसली. या संकटात सर्वांचेच डोळे आयरिश स्वयंसेवकांच्याकडे लागले. प्रगट विरोध जर कोठून शक्य होता तर तो येथूनच. एकही मनुष्य सक्तीने सैन्यात कोंबला जाण्यापूर्वी आयरिश स्वयंसेवकांतल्या अगदी शेवटच्या सैनिकापर्यंत प्रत्येकजण कामी आलेला असणार ही खात्री इंग्लंड आणि आयर्लंड दोन्हीमध्ये चांगली होती. शस्त्रास्त्रांचा पुरवठा हीच आमची अडचण होती. आता स्वयंसेवक भरपूर मिळत. मी त्या वेळी ब्रिगेड कमांडंट होतो. आम्ही शस्त्रास्त्रांसाठी ठिकठिकाणी छापे घालण्याचे ठरविले. ठिकठिकाणी खाजगी घरांतून लहान बंदुका, रिव्हॉलव्हर्स , बेयोनेट्स, तलवारी, क्वचित कोठे रायफल्सही असत. ब्रिटिश राजनिष्ठाच्या घरी तर काहीना काही असेच. ही शस्त्रे जमा करण्यास आम्हाला काही त्रास पडला नाही. आमच्या लोकांनी प्रत्येक जिल्ह्यात कोठे काय काय आहे याची यादी तयार केली. त्या त्या घराची खडान् खडा माहिती मिळविली. बहुधा रात्रीच्या वेळी जाऊन आम्ही शस्त्रांची मागणी करीत असू. नाकारण्याची कोणाची छाती नव्हती, पण कित्येक सहजसंतोषाने आपली शस्त्रे देत, तर कित्येक आम्हास निरोप पाठवून बोलावून घेत. हे काम काही आठवडे चालले. तथापि कधी एक गोळीसुद्धा झाडावी लागली नाही. ही बातमी सरकारच्या कानी पोचली. आणि त्यांनी सर्व शस्त्रे सरकारकडे आणून द्यावीत असा वटहुकूम काढला. आणि अशी शस्त्रे एकत्र करण्यासाठी पोलिस हिंडू लागले. तथापि बहुतेक करून आम्हीच प्रथम जात असू. आणि अनेकदा तर आमच्या आणि पोलीसच्या अशा भेटींत काही क्षणांचेच अंतर असे.

●●●

## ३. दारूगोळ्यांचा कारखाना

१९१८च्या त्या उन्हाळ्यात देशभर सक्तीच्या लष्करभरतीच्या कायद्याची कृष्णछाया पसरली होती. आमच्या संघटनेत तरुण आणि प्रौढ यांची एकच रीघ लागून राहिली होती. धडधाकट शरीराचा असा आयरिश तरुण - मग तो १६ वर्षांचा असो किंवा त्याची पन्नाशी उलटलेली असो - प्रत्येकजण या किंवा त्या रूपाने आयरिश

स्वयंसेवकांत होताच. दहामध्ये एखादाचा क्वचित नसेल, पण बाकीचे नऊ हटकून स्वयंसेवक झालेले होते. स्त्रियांची ''कुमान्न ना म् बान'' नावाची संस्था होती तर लहान मोठ्या मुलांच्यासाठी ''कायन्ना'' नावाचे दल चालू झाले होते. या दोहींचे आमच्याशी सहकार्य असे. यावेळी आमचे बरेचसे अधिकारी या ना त्या आरोपावरून तुरुंगात डांबून पडल्यामुळे, जे आम्ही मोकळे होतो त्यांना रात्रंदिवस खपावे लागे. माझ्या नसानसांतून उत्साह खेळत होता. आमचे सर्व राष्ट्र या प्रयत्नांत एकवटून उभे राहाणार हे मला दिसत होते. आमच्या जवळची साधने अत्यंत तोटकी होती तथापि लढाई देण्याचा आमचा निश्चय अढळ होता. या लढाईत आमची अमाप हानी होणार हे स्पष्ट होते. तथापि मला वाटे की तेही चालेल. विघटित आणि स्वार्थाने नाना चिरफळ्या पडलेल्या ५० लक्षाच्या आयरिश समाजापेक्षा आम्ही केवळ २० लक्षच राहिलो तरी परवडेल. पण जे राहू ते एक आचाराचे, एक विचाराचे, एका आज्ञेत वागणारे असे असू.

सक्तीच्या लष्करभरतीचा कायदा झाला तथापि सरकारला धीर वाटेना. आमचा दृढनिश्चय पाहून सरकारने कायदा काही दिवस स्थगित केला. वरवर म्हटले की, तुम्ही सैन्यात स्वखुशीने यावे यासाठी ही एकदा शेवटची सवलत दिली आहे. आम्ही आमची तयारी चालूच ठेवली. आणि दिवसेंदिवस अधिकाधिक धीट होऊ लागलो. लोक आमच्या लष्करी हालचाली आश्चर्यमिश्रित आपुलकीने पाहात असत. दोन-चार वेळा तर आम्ही पुढच्या प्रसंगाची रंगीत तालीम करण्यासाठी टिप्परेरी गावावर हल्ला करणे, किंवा गावचा बचाव आमच्याकडे घेणे असा उपक्रम केला. कित्येक वेळा तर काही काही रस्ते आणि पेठा, हा लष्करी टापू म्हणून त्यात कोणासही पाऊल टाकण्यास मज्जाव करीत असू. ब्रिटिश सैनिक पोलिस यांनाही तेथे येण्याचा प्रतिबंध असे. तीन-चारशे स्वयंसेवक अशा कार्यक्रमात भाग घेणारे असत. तर शहरात त्यावेळी हजारोंनी ब्रिटिश सैन्य असे. अशा प्रसंगी आम्ही उघडपणे कोणतीच शस्त्रे नेली नाहीत. तथापि काही थोड्यांच्याजवळ काही विशेष कारणास्तव पिस्तुले दिली जात.

सरकार लवकरच शहाणे झाले. सक्तीचे सैन्यभरतीचे धोरण त्यांनी सोडून दिले. पण तिकडे त्यांच्या धमक्या हळू हळू वितळल्या तर आमच्याकडे आमच्या सैन्यालाही गळती लागली. तथापि जे थोडे उरले तेच अधिक उपयोगी होते. स्वातंत्र्यार्थ युद्ध करण्याचा त्यांचा निश्चय ठाम होता. जे गळले ते फ्रान्सच्या खंदकात खितपत पडायला नको म्हणून आमच्यात आले होते. ते आमच्या जुन्या पुढाऱ्यांच्या मताचे असावेत. स्वत:चे रक्त सांडूनही संपादावे इतकी स्वदेशस्वातंत्र्याची किंमत त्यांना वाटत नसली पाहिजे.

या वेळी सीन ट्रेसी डॅण्डॉर्कच्या कारागृहात अन्नत्यागाचे सुख अनुभवीत होता. गेल्या १३ दिवसांत त्याने अन्नाचा कणही घेतला नव्हता. सरकारचा हेतू त्याला मरण पत्करण्यास लावण्याचा असावा, अशी साधार शंका येऊ लागली. यत्किंचितही उशीर न करता काहीतरी तडकाफडकीने करण्याची आवश्यकता तीव्रतेने वाटू लागली. माझ्या डोक्यात एक कल्पना चमकून गेली. चक्क एखाद्या पीलर्सच्या अधिकाऱ्याला पकडावे, कोठे एका गुप्त ठिकाणी ठेवावे, आणि त्यालाही उपोषणाचे पुण्य घडवावे. सीनची सुटका केली तर ठीक; नाहीतर..... हा आहेच- असे विचार थैमान घालू लागले. मी माझ्या मित्रांना विचारले. त्यांचे मत अनुकूल पडले. लिमरीक जंक्शनच्या लोहमार्गावर काही पोलिसांचा पाहारा असे. आम्ही ठरविले की, यातला एखादा ओलीस म्हणून पकडावयाचा. सर्व बेत आणि सिद्धता झाली. पकडल्यानंतर त्याला ठेवण्यासाठी लिमरीक टिप्परेरी या जिल्ह्यांच्या हद्दीवर डोंगराळ भागातले एक ठिकाणही निश्चित केले. एकूण ४० जणांनी हे काम पार पाडावे असे ठरविले होते. पण त्या दिवशी पोलिस पाहाऱ्यास आलेच नाहीत. पुढे ही कल्पना ''आयरिश रिपब्लिकन ब्रदरहूड'' (I.R.B.) यांच्याकडून अचानक निष्कारण बदलण्यात आली. I.R.B. ही एक गुप्त संघटना होती. अगदी विश्वासू स्वयंसेवक त्यात असत. आणि तेच सर्व आयरिश स्वयंसेवक सैन्यावर अधिकार चालवीत, या प्रसंगापासून मी माझे I.R.B.शी असलेले संबंध तोडून टाकले.

१९१८च्या जुलैमध्ये सीन ट्रेसीला मुक्त करण्यात आले. तो परत आला, तो नवनव्या कल्पना घेऊन आला. माझ्याही मनात शेकडो कल्पना घोळत होत्या. मला स्वानुभवावरून

वाटू लागले की, स्थिर स्वरूपाची संघटना आणि चिरकालीन काम असल्या भानगडीत न पडता प्रत्यक्ष कार्यास काही आरंभ करावा. ट्रेसीच्या मनात हे नव्हते. आमच्यात यावेळी असा मतभेद उद्‌भवला. 'पॅट्रिक के' नावाच्या माझ्या मित्राच्या मदतीने मी दारूगोळ्यांच्या कारखान्यास सुरुवात केली. त्यातही आमच्या दोघांत कित्येकदा अगदी क्षुल्लक तर काही वेळा महत्वाच्या कारणावरून कडाक्याची भांडणे होत. पण ट्रेसी येऊन ते सर्व शांत करी.

आमचा दारूगोळ्यांचा कारखाना टिप्परेरीतील एका खेडवळ झोपडीत होता. या झोपडीतील तीन खोल्या दुसऱ्याला भाड्याने दिल्या होत्या. जवळ यंत्रसामग्री नव्हतीच, जी साधने होती ती अगदी ओबड-धोबड. तथापि साधी बंदुकीची दारू करणे याला काही मोठा खटाटोप अवश्य नव्हता. काही हॅन्डग्रेनेड्‌स आम्ही करीत असू. त्यांची वात प्रथम काडी ओढून पेटवावी लागे. त्यामुळे वादळ्या रात्री किंवा पावसात त्याचा उपयोग करणे अशक्य होई. तसेच जेथून म्हणून काडतुसे मिळणे शक्य असे तेथून ती आम्ही मिळवू लागलो. शिकारीला लागणाऱ्या छऱ्याची काडतुसे मिळवून त्यात अधिक दारू आणि शिशाची गोळी भरून ती तयार करू लागलो. अशा काडतुसांचा आम्हास चांगलाच उपयोग होई.

आतापर्यंत बहुतेक ठिकाणची शस्त्रास्त्रे आम्ही मिळविली होती. पण क्वचित् अशी संधी एखादे वेळी पुन: येतही असे. शत्रूशी आमची चकमक झाली ती एकदा अशाच छाप्यावरून आम्ही परत आलो असताना घडली. आम्ही काही थोडेजण - सीन ट्रेसी त्यात होताच - टिप्परेरीहून दुचाकीवरून घरी चाललो होतो. तो मध्ये माझ्या दुचाकीचे चाक बसले. खाली उतरून हवा भरणे मला भाग पडले. इतरांना मी पुढे होण्यास सांगितले. हवा भरून लगेच त्यांना गाठावे ही कल्पना. जाताना ते जवळच्या पोलिस चौकीवरून गेले. त्याची चाहूल लागून ते पुढे जातात तो पोलिस बाहेर आले असावेत, किंवा प्रथमपासून ते रस्त्यावर असलेच तर त्यांच्या नेहमीच्या धाडसी आणि शूर स्वभावाप्रमाणे या सहाजणांना रोखण्याची हिम्मत त्यांनी केली नसावी. काय ते खरे असो; पण हवा भरीत असताना मला तसे ऐकू आले नाही. मी कोणाला पाहिले नाही. हवा भरून उठतो तो एका लठ्ठशा पोलिसाने मला मागे ओढले. माझ्या डाव्या हातात कुलपे तोडण्यासाठी म्हणून एक लोखंडी गज होता. मागेपुढे न पाहता त्याच्या डोक्यावर मी त्या गजाचा प्रयोग केला. तोंडाच्या शब्दापेक्षा या लोखंडी गजाचा शब्द त्या पोलिसाला आवडलासे दिसले. एव्हाना मी रिव्हॉलव्हर काढले, आणि ते सर्वांच्यावर रोखले. ''शरण ये नाहीतर गोळी झाडतो,'' त्याचा जमादार ओरडला. ''हात वर करा, नाही तर प्रत्येकाला मरावे लागेल,'' मी प्रत्युत्तर केले. त्या सर्वांनी निमूटपणे हात वर केले. दुचाकी तशीच मागे घेत - रिव्हॉल्व्हर त्यांच्यावर रोखलेले होतेच - मी मागे येत येत एका बोळाच्या तोंडाशी आलो. लगेच दुचाकीवर टांग मारून पाय भराभर मारीत क्षणार्धात त्यांना दिसेनासा झालो. पोलिसांनी पुढल्याच क्षणी सर्व रस्त्यांची नाकेबंदी केली, सर्व शहराला वेढा दिला. पण मी आमच्या कारखान्यात सुखरूप आलो होतो.

●●●

## ४. कारखान्यात स्फोट

तो माझ्या आयुष्यातील विलक्षण रोमांचकारी प्रसंग होता. आयुष्याची दोरी बळकट म्हणूनच मी वाचलो. तथापि माझा मित्र पॅडी के हा त्यापेक्षा विस्मयजनक रितीने या प्रसंगातून सुटला. हा स्फोट का झाला हे आम्हाला केव्हाच समजले नाही.

आमच्या झोपडीत स्वयंपाकपाणी-भांडी घासणे ही कामे आमची आम्हाला करणे भागच होते. त्यासाठी पाण्याची बादली भरून आणावी म्हणून विहिरीवर गेलो. पॅडी के हा खोलीतच होता. बादली भरून मी परत निघालो. दारापासून सुमारे ५० पावलांवर येतो तो छप्पर उडून जाताना पाहिले. लगोलग बॉम्बसूचे भयंकर स्फोट ऐकू आले. सर्व घराने पेट घेतला. काळ वेळ विलक्षण आली होती. माझ्या

मित्राला, अजून वेळ गेली नसेल तोच वाटेल ते करून वाचवावा एवढाच विचार मनात आला.

मी बादली टाकली आणि घराकडे धावलो. खोलीत पॅडी मरणोन्मुख स्थितीत पडला होता. जड मनाने मी त्याला दोन्ही हातावर उचलले. इतस्तत: पसरलेल्या बॉम्बस्च्या तुकड्यांताकड्यांतून वाट काढीत बाहेर आलो. आणि जवळच्या ओढ्याच्या काठी त्याला घेऊन गेलो. त्याला खाली ठेवले तो मला अगदी भडभडून आले. बादलीतले पाणी त्याच्या अंगावर शिंपडले. आणखी पाणी आणण्यासाठी परत ओढ्याकाठी गेलो. बादली भरून परत फिरतो तो काय आश्चर्य! पॅडी ताठपणे माझ्याकडेच येत होता.

''ए शहाण्या, मला पाण्यात बुडवायचा विचार आहे काय?'' त्याने रागाने आणखी किती प्रलाप काढले - पण त्याचे आता काय?

आमच्या कारखान्याचा हा नाश, हा तडाखा आम्हाला जाणवला. किंचित् काल आम्हास सर्वच शून्यवत् वाटू लागले. थोडेफार भांडवल, सामग्री, जे होते ते सर्व संपुष्टात आले. घराची भरपाई करून देणे हेही आवश्यक होतेच. आमच्या स्वयंसेवकांतले जे माझे व्यापारी मित्र होते त्यांची यावेळी मदत घेतली. थोडक्याच दिवसांत झोपडी पूर्ववत् बांधून काढली. पुढे काही दिवसांनी आमच्या बॉम्बस्च्या स्फोटानेही जे नुकसान झाले नाही इतकी 'ब्लॅक ॲण्ड टॅन्स'नी (आयरिश क्रांतिकारकांना समूळ उखडण्यासाठी निर्माण केलेले सरकारी दल) सूडाच्या वेडात त्या झोपडीची मोडतोड आणि लूट केली. ही झोपडी पुन्हा वापरण्याचा आता प्रश्नच नव्हता. पण थोडक्याच दिवसांत आम्ही एक नवीन घर मिळविले. मी अत्यंत काळजीपूर्वक प्रयत्न केले. पुन्हा स्फोट होऊ नये म्हणून सर्व तऱ्हेची सावधगिरी घेतली. येथे आमच्या उद्योगाला यशही बरे आले. पण काही महिन्यांतच आम्हाला हेही घर सोडावे लागले. भोवतालची परिस्थितीच अशी चमत्कारिक झाली होती.

या घरात सामान्य सुखसोयीचीसुद्धा आमची काडीमोड होती. येथे अंथरूण नव्हते की पांघरूण नव्हते आणि त्यात सोय इतकीच की, काही विकत घ्यायचे म्हटले तर खिशात कधी कवडी असायची नाही. शेजाऱ्यांच्याकडून दोन काम्बळी उसनी आणली आणि शेजारच्या शेतातून मोठ्या हिकमतीने गवताच्या चांगल्या दोन पेंढ्या मारल्या. प्रथम खाली गवत पसरावयाचे; त्यावर एक काम्बळे अंथरून आम्ही झोपायचे. अंगावर वर्तमानपत्रांची रद्दी पसरावयाची आणि त्यावरून दुसरे काम्बळे घ्यायचे. इतके झाल्यावर साधारणत: इकडे तिकडे कोठे हललो नाही तर तीन तासांची झोप आम्हास मिळे. रद्दीमुळे ऊब बरी राहात असे. पण जर का पाय लांब जवळ झाले तर कागद फाटायचे, विस्कटायचे आणि थंडी आमच्या पांघरुणातून शिरायची. रात्री उंदरांची मोहीम सुरू झाली म्हणजे मग झोपेचा प्रश्नच उरत नसे. उंदरांची सेना मोठी धाडसी होती. रात्ररात्र येऊन आमचे केस कुरतडणे हा त्यांचा उद्योग चालायचा. मी त्रासून काही बोललो, एखाद्या उंदरामागे लागलो की सीन ट्रेसीला त्यांची दया येई. तो म्हणे, ''अरे, आपल्याला नाही तर नाही, पण त्यांच्या सुखात का अडथळा? डोक्यावर थोडे टक्कल दिसेलना, दिसूदे.'' मी म्हणे, ''पीलर्सचा - पोलिसांचा मागे ससेमिरा आहे तेवढा पुरे की. आम्हास अशा वेळी त्रास देऊ नये इतका शहाणपणा उंदरांना वास्तविक पाहिजे.''

थोडे दिवस सर्व काही सुरळीत चालले होते. आमच्या कामातही उत्तम यश येऊ लागले. पण इतक्यात पॅडीस दूर जावे लागले. त्याच वेळी एक नवीन मित्र आम्हास मिळाला. या पुढची पाच वर्षे सीन हॉगनचे, या आमच्या नव्या मित्राचे आणि माझे आयुष्य दैवाने जणू एकत्रच गुंफले होते.

सीन हॉगन, सीन ट्रेसी आणि मी; आम्ही तिघे मनाने अगदी एकरूप झालो होतो. सीन हॉगनशी आजच्या दिवसापर्यंत कधीच मतभेद उत्पन्न झाला नाही. आमच्या लाडक्या ट्रेसीच्या बाबतीतसुद्धा त्याच्या अंतापर्यंत परस्परात कधी उणा शब्द निघाला नाही. याच दिवसांत सीमस रॉबिन्सनची ओळख झाली. आम्ही चौघे - ट्रेसी, हॉगन, रॉबिन्सन आणि मी - वय, रूप, कल्पना, आशा, अपेक्षा या सर्वांनी एकसारखे होतो. मोठमोठ्या आकांक्षा आम्ही मनाशी धरल्या. नाना धाडसी बेत केले. स्वप्नातसुद्धा

हा स्वदेश स्वतंत्र कसा करावा याचा विचार आम्ही केला. आणि खरोखरी आमचे सर्व जीवन त्या स्वातंत्र्यार्थच वाहिलेले नव्हते काय?

आमच्या नव्या घरमालकाने आम्हास घर सोडून जाण्याची सूचना दिली. भाडेकरूंना असणारे कोणतेच अधिकार आम्हास नव्हतेच. तेव्हा कोणत्याही कायद्याचा आश्रय घेणे आम्हास शक्य नव्हते. घर सोडल्याविना उपाय राहिला नाही. पैसा असता तरी सहज कोणतेही घर भाड्याने घ्यावे, अशी स्थिती नव्हती. कारण अज्ञातवासी जिणे आमच्या सुदैवात होते. देशातल्या कोनाकोपऱ्यांची पोलिसांना माहिती होती. आणि इंग्लिशांबद्दल ज्या सज्जन आयरिशांना प्रेम नसेल त्यांच्या मार्गावर हे सापासारखे असत.

परंतु आमच्या सुदैवाने आम्हास हात दिला. हॉगनच्या कोण्या भाच्याने त्याची पडवी म्हणा किंवा गोठा म्हणा आम्हास उपयोगासाठी दिला. येथे अंथरूण पांघरुणाची गैरसोय नव्हती, पण जेवणाखाण्याची वानवाच होती. एकदा तर तांदुळाच्या उकडहंडीवर दोन आठवडे मला स्वत:ला काढावे लागले. साखर नाही की दूध नाही. ही उपासमार मला काही अगदीच नवीन नव्हती. मागे स्वयंसेवक जमविताना दिवस दिवस उपास घडले होते आणि अंग टाकण्यासाठी म्हणून, तर क्वचित् केवळ निवाऱ्यासाठी म्हणून रातोरात वीस वीस मैल चालण्याचा अनुभव मला होता. ही नवी जागाही पोलिसांच्या ध्यानात आली. पुढे त्यांनी या आमच्या गोठ्याला 'टिनहाऊस' हे नाव दिले.

आम्हाला पैसा अतिशय नडायचा. आमच्या व्यक्तिगत सुखसोयीसाठी म्हणून म्हणत नाही, पण इतर उद्योग कमी का असतात? एके प्रसंगी काही हत्यारे मिळविण्यासाठी मी व ट्रेसी डब्लिनला गेलो. आगगाडीच्या भाड्याला पैसा कोठून आणायचा? डब्लिनला त्या सोमवारी संध्याकाळी ६च्या आत पोचणे अवश्यच होते. इकडे आदल्या रात्री रविवारी ब्रिगेड अधिकाऱ्यांची टिप्परेरीला बैठक होती आणि आम्ही त्यावेळी तेथे असणे अवश्य होते. थोडक्यात सोमवारी सकाळी ८पर्यंत आम्हाला टिप्परेरीतून हलणे शक्य नव्हते. डब्लिनला वेळेवर पोचलो, पण पोटात भुकेने काहूर उठले. नंतर तेथे आम्ही आमचा टिप्परेरीतील जुना मित्र फिल शॉन्हॉन याच्याकडे गेलो. त्याने आमचे उत्कृष्ट आगतस्वागत केले. पुढेसुद्धा फिल असल्यानंतर आम्हास काहीच कमी पडत नसे. डब्लिनला आमचे काम आटपेपर्यंत पुढचा शनिवार उजाडला.अधिकाऱ्यांच्या एका बैठकीसाठी त्याच दिवशी सायंकाळी ६ च्या सुमारास टिप्परेरी गाठणे अवश्यच होते. फिलच्या घरून सकाळी ८।। ला आम्ही निघालो. बरोबर ६ रिव्हॉलव्हर्स, ३०३ क्रमांकाच्या रायफली, ५०० काडतुसे, आणि ६ बॉम्बज् एवढे सामान बरोबर होते. आम्ही टिप्परेरीला पोचलो आणि लगेच बैठकीला गेलो. उशीर झालाच नव्हता. केवळ बैठकीस ठरल्यावेळी आलेले आम्ही दोघेच होतो.

●●●

## ५. निवडणुकी : स्वतंत्र लोकसत्ताक राज्याची घोषणा

१९१८ चा डिसेंबर महिना आला. आमच्या प्रगट विरोधास जेथून सुरुवात झाली, जिच्या यशामुळे आम्ही धैर्याने उठावणी केली, ती संधी आली - सर्वत्र एवढेच ऐकू येऊ लागले- ''सार्वत्रिक निवडणूक.''

गेल्या काही काळात परिस्थितीची पाऊले इकडेच वळत होती. मागील सात वर्षांत सार्वत्रिक निवडणूक झाली नव्हती. या काळात लोकमताचा रंग अजिबात पालटला होता. लोकांचा इंग्लंडवरील विश्वास उडून गेला होता. इंग्लिश पार्लमेंटमध्ये आयर्लंडचे शंभर प्रतिनिधी निवडून देण्याच्या कल्पनांचा फोलपणा त्यांच्या ध्यानात आला होता. त्या पार्लमेंटमध्ये हे उघड उघड अल्पसंख्य असत, आणि तेथे त्यांचा आवाजही उमटू दिला जात नसे. होमरूल देण्याच्या बाबतीत इंग्लंडने आयर्लंडचा केलेला विश्वासघात आणि सक्तीच्या लष्करभरतीचा प्रयत्न या गोष्टी विसरल्या

जाणे शक्य नव्हते. तथापि या सर्वांपेक्षा १९१६ च्या उठावणीने सर्वांच्या अंत:करणात स्वदेशभक्तीचे नवचैतन्य जागे झाले! नवनव्या आकांक्षाचे वारे वाहू लागले. आणि श्वासांनिश्वासांतून स्वतंत्रतेचा अभिमान उमटू लागला. या बंडाने राष्ट्रास नवजीवनच दिले. मध्यंतरी झालेल्या पोटनिवडणुकींनी या वाढत्या प्रक्षोभाचे वारे कसे वाहतात याची दिशा दाखविली. स्वातंत्र्य, -संपूर्ण आणि निष्कलंक स्वातंत्र्य हीच या राष्ट्रीय जीवनाची एकमेव आस होती.

११ नोव्हेंबर १९१८ ला शस्त्रसंधीने पहिल्या महायुद्धाचा शेवट झाला. एका आठवड्याने प्रगट करण्यात आले की, १४ डिसेंबरला सार्वत्रिक निवडणुकी होतील. वयात आलेल्या प्रत्येक पुरुषाला यावेळी मत होते. अशा मतदान पद्धतीची ही निवडणूक पहिलीच होती. आम्हा सिनफेनर्सना ही सुवर्णसंधी वाटली असल्यास नवल नाही. आयर्लंडमधील तरुण आम्हास बहुमताने -प्रचंड बहुमताने निवडून देतील याविषयी संशय नव्हता.

तथापि राजकीय विचारांचे शिक्षण देणे, आणि सामुदायिक एक मन घडविणे या गोष्टी सतत करणे अवश्यच होते. सिनफेन हा राजकीय पक्ष आणि आयरिश स्वयंसेवकांची लष्करी संघटना यातील भेद जाणण्याची कल्पना लोकांना अजून आलेली नव्हती. १९१६ च्या बंडाला सामान्यत: 'सीनफेनांचे बंड' या नावाने ओळखले जाई. आमच्या स्वयंसेवकांना सीनफेन स्वयंसेवक म्हणून ओळखले जाई. आयरिश लोकसत्ताक राष्ट्राचा झेंडा हा सीनफेनांचा झेंडा म्हणून वंदिला जाई. तथापि नावात काय आहे? नावे चुकेनात का? त्याचा फारसा अडथळा राहिला नाही. कारण सीनफेनांनी आपल्या विचारांची धाव आयरिश स्वयंसेवकांच्या विचारानुरूप आखली. आणि प्रत्येक खेड्यात सिनफेन पक्षाच्या शाखा स्थापन होऊ लागल्या. तेथील स्वयंसेवकांचा अधिकारी हाच त्या शाखेचा अध्यक्ष अथवा कार्यवाह असावयाचा, हे सहजच होते. सीनफेनातील बहुश: सर्व तरुण आमचे स्वयंसेवक होते आणि आमचे स्वयंसेवकही सीनफेन पक्षाचे सभासद असत.

निवडणुकीच्या त्या दिवसांत सर्व वातावरण सीनफेनमय होऊन गेले. लोक सीनफेन विचाराने वेडे झाले होते. बहुतेक धर्मोपदेशक आमच्या मताचे होते. आमच्या प्रवक्त्यांनी आणि प्रचारकांनी आपल्या तळमळीच्या आणि ओजस्वी भाषणांनी सारा देश भारून टाकला. एखाद्या वणव्याप्रमाणे स्वतंत्र लोकसत्ताक राष्ट्राबद्दलचे हे विचार भराभर पसरत होते. आमच्या सैनिकव्यवस्थेची चौकट थोडी ढिली पडत असल्याचे दिसले तरीही निवडणुकीत प्रचंड बहुमत मिळण्याची आवश्यकता दृष्टीसमोर स्पष्ट होती. निवडणुकीनंतर पुनरपि ही चौकट बळकट करता येईल असा विश्वास आम्हाला होता. म्हणून या निवडणुकीत आम्ही तन-मन-धन वेचीत होतो. आयरिश लोकसत्तेचे इच्छुक निवडले जावेत म्हणून रात्रंदिवस आटोकाट परिश्रम आम्ही घेत होतो. गल्लोगल्लीतील भिंतींवर चौकाचौकांतून, खेड्याखेड्यांतून 'सीन फेन बना!' 'आयरिश लोकसत्तेला मते द्या!!' '१९१६ च्या क्रांतिकारकांना निवडून द्या!!!' असे फलक लावले होते. अशा प्रक्षोभक आरोळ्यांनी वातावरण दुमदुमून टाकिले. आमचे धोरणही आम्ही स्पष्ट केले होते. लोकसत्तेसाठी उभे राहिलेल्या प्रत्येकाची प्रतिज्ञाच ही होती की, इंग्लिश पार्लमेंटमध्ये पाऊलही टाकावयाचे नाही. आयरिश लोकसत्ताक राज्याशीच एकनिष्ठ राहावयाचे आणि त्याचेच काम अंगिकारावयाचे.

निवडणुकीतील एकेक प्रसंग आठवले म्हणजे मौज वाटते. तथापि त्या धामधुमीच्या काळात ज्यांनी आत्यंतिक परिश्रम केले असे कित्येक मित्र आज काळाच्या उदरात अदृश्य झाले आहेत. काही ब्रिटिशांशी लढताना कामाला आले, काहींच्या नशिबी फाशी जाणे होते, तर काहींच्या भविष्यात पुढे वाढून ठेवलेल्या यादवीस बळी पडणे होते. इतके उत्कृष्ट मित्र आम्हाला लाभले, आज मात्र ते नाहीत या जाणिवेने हृदय भरून येते. मन्स्टरमधील वॉटरफोर्ड शहराशिवाय प्रत्येक जागा आम्ही जिंकली. लीनस्टर व कॅनॉटमध्ये असेच यश लाभले. अलस्टरमध्येही बऱ्याच जागा आम्ही मिळवल्या. १०५ पैकी ७३ जणांनी ब्रिटिश स्वामित्वाचा धिक्कार केला आणि आयरिश लोकसत्तेची ध्वजा उभारली.

यानंतर एका महिन्याच्या आतच आयरिश जनमताच्या या लाडक्या प्रतिनिधींनी डब्लिनमध्ये प्रगट अधिवेशन बोलाविले आणि समारंभाने आयरिश

लोकसत्ताक राज्याची घोषणा केली. सरकार स्थापन केले. अगदी त्याच दिवशी, त्याच वेळी आमच्या मूठभर स्वयंसेवकांनी ब्रिटिशांबरोबर पहिली झुंज घेतली. लोकमताने एकमुखाने ब्रिटिश राजसत्ता झुगारून दिल्यानंतरची ही पहिलीच चकमक होती. हे कसे घडले ते नंतर सांगतो.

निवडणुकीनंतर सिंहावलोकन करण्यास भरपूर अवसर सापडला. निवडणुकीतील यशाचा अर्थ स्पष्ट होता. लोकांनी या प्रचंड मतदानाने ब्रिटिश सैन्यास आयर्लंडमधून हाकून देण्याचे काम आमच्याकडे सोपवले होते. आम्हास त्यांनी ही जणू अलिखित सनद दिली. तथापि निवडणुकीच्या या प्रचाराने आमची सैनिकव्यवस्था ढासळल्यागत झाली होती. सैनिकवृत्ती नाहीशी होऊन कित्येक राजकारणी बनू पाहात होते. हे संकट महाभयंकर होते. ध्येयाचा विसर पडणे, ध्येयमार्गावरील विश्वास दुरावणे यासारखे दुसरे दु:ख नव्हते. लष्करभरतीच्या प्रकरणानंतर अशी स्वसामर्थ्याची हेळसांड होऊ लागली होती. मला पक्केपणी वाटू लागले की, आता प्रत्यक्ष कृतीची, उदाहरणाची, युद्धाचीच आवश्यकता आहे. सीन-ट्रेसीबरोबर पुन्हा पुन्हा मी याबद्दल विचार केला. मला खात्री होती की, एकदा का काय करावयास पाहिजे हे प्रत्यक्ष दाखवले गेले तर शेकडो कर्तृत्ववान तरुण असे होते की, त्यांच्यासंबंधी नि:शंक विश्वास बाळगावा.

सोलोहेडबेगच्या चकमकीचे सत्य असे वृत्त वाचकांच्यापुढे मी मांडीत आहे. वृत्तपत्रांतून याचे वर्णन 'सोलोहेडबेग येथील खुनी अत्याचार' इत्यादि शब्दांत आले आहे. आयर्लंडमधील प्रत्येक वृत्तपत्र आमच्या विचारांच्या संपूर्ण विरोधी होते, आणि तसे ते बराच काळ विरोधीच राहिले. पुन्हा सरकारी निर्बंध होतेच. महायुद्ध संपून एक वर्ष होईतो हे प्रसिद्धीवरील निर्बंध तसेच ठेविले होते. त्यामुळे खरी हकिकत छापली जाणे दुरापास्त होते. आमची मोहीम जसजशी अधिक प्रखर होऊ लागली तसतसा वृत्तपत्रांनी याबद्दलचा कडवटपणा सोडून दिला.

●●●

## ६. सोलोहेडबेग

नव्या वर्षाचे आरंभी जानेवारी १९१९ मध्ये आम्हाला बातमी आली की सोलोहेडबेग येथील खाणीकरता लागणारी सुरुंगाची दारू लवकरच तेथे पोहोचवण्यात येणार आहे. सशस्त्र पोलिसांचा पाहारा त्याबरोबर नेहमीच्या पद्धतीनुसार असणारच, याचीही आम्हाला कल्पना होती.

मी ट्रेसीशी याबद्दल बोललो, ''आता संधी आली आहे. वेळ न गमावता प्रत्यक्ष चकमकींना आरंभ केला पाहिजे. नाहीतर आमच्या सैन्याचा आवेश टिकू शकणार नाही.'' मला माहीत होते की, आमच्याजवळ अशा चकमकींना लागणाऱ्या निर्धाराचे लोक फार थोडे आहेत. पण प्रारंभी ते थोडे असावयाचेच. प्रत्यक्ष कामास एकदा प्रारंभ झाला की त्यांची संख्या वाढू लागेल. आणि फार मोठ्या संख्येविना आज कोठे अडले होते? गनिमी काव्याच्या युद्धपद्धतीत थोडेही चालतात. मात्र ते निर्धाराचे आणि विश्वासू हवेत.

बरेच दिवस याविषयीच्या विचारात गेले. अखेरीस आम्ही निश्चय केला. आम्हास शस्त्रे आणि दारुगोळा एवढीच हवी असल्याने, बरोबरीच्या रक्षकांना केवळ नि:शस्त्र करावयाचे आणि या गोष्टी हस्तगत करावयाच्या असे ठरले. आम्ही खाणीची आणि आसपासच्या जागेची बारकाईने पाहाणी केली व आमच्या या पहिल्या छाप्याची जागा ठरविली. तेथील तसूनतसू जागा आम्हास माहीत होती. त्याच ठिकाणचे आमचे जन्म, आणि सीन ट्रेसीचे शेत तर तेथून हाकेच्या अंतरावर होते. सोलोहेडबेग हे लहान खेडे टिप्परेरीपासून अडीच मैलांवर, तर लिमरीकपासून मैलाच्या आतच असे वसलेले आहे. प्रत्यक्ष खाण उपरस्त्याच्या काठी अशी उंचवट्यापाशी आहे. आसपास तुरळक झोपड्या आणि पडळी असून मैल दीड मैलाच्या

अंतरात डोनोहिलशिवाय दुसरे खेडेगाव नव्हते. याच ठिकाणी इ.स.९६८ मध्ये ब्रीनने डेन्स लोकांचा पराभव करून त्या परकीय लोकांना आयर्लंडमधून हाकलले होते. उपरस्त्यावर ही खाण आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूस शेताचे उंच बांध आहेत. आणि रस्त्याच्या कडेला लागून सहज आश्रय घेता येण्याजोगी काटेरी झुडपे आहेत.

हा दारुगोळा येण्याचा नेमका दिवस आम्हाला समजला नव्हता. आमची कल्पना होती की जानेवारीच्या १६ दिनांकाला येईल. पण  आणिक पाच दिवसपर्यंतही त्याचे ठिकाण नव्हते. या पाच दिवसांत छापा घालण्याच्या पूर्ण सिद्धतेनेच आम्हास वावरावे लागे. घरी सुगावाही लागू न देता आमचे लोक आले होते. तीन दिवसांनी बाकीच्यांना मी घरी पाठविले. आठजणांना तेवढे मागे ठेवले. कारण पोटाच्या प्रश्नाचे काय करणार? जवळ पैसा ना अडका, ना दुसरी काही शक्यता.

असे आम्ही नऊजण मागे राहिलो. त्यात ट्रेसी, हॉगन, आणि रॉबिनसन हे होतेच. आमच्याकडे कोणाचे लक्ष जाणार नाही ही काळजी आम्हास प्रथम घ्यावी लागे. भोवतालच्या कोणाच्याही दृष्टीस पडणे धोक्याचेच होते. भोवतालचे बहुतेक शेतकरी खाणीत कामाला होते. परिस्थिती अशी चमत्कारिक की कोणी उपरे आसपास संशयितरित्या घोटाळत आहेत अशी कल्पनाही येती तर आमचे बेत फसते. प्रत्येक दिवशी पहाट होण्यापूर्वी आम्ही थोडाही आवाज न करता आमच्या लपण्याच्या जागी जात असू. तेथे कोणाच्याही दृष्टीस न येता आम्हास मात्र सावध आणि लक्ष देऊन राहावे लागे. आमच्यापैकी एक टेहळणीचे काम करी. असे दुपारी दोन वाजेपर्यंत आम्ही लपून बसत असू. दुपारनंतर ही तुकडी येण्याची शक्यता नव्हती. रात्र पडावयाच्या आत शहरात परत जाणे पोलिसांना सोयीचे पडे म्हणून दुपारी दोनच्या आत खाणीवर येणे त्यास अवश्य होते. रात्री आम्ही माझ्या घरी येत असू. माझी आई पहाटे चार वाजता आमची न्याहारी बांधून देई. पाचव्या दिवशी पहाटे ती म्हणाली, ''आज तुम्ही काय तुमचे आहे ते केलेत तर ठीक, नाहीतर उद्या काही न्याहारी मिळणार नाही.''

अखेर तो चिरस्मरणीय दिवस आला. एकवीस दिनांक! स्वतंत्र आयर्लंडच्या विधिमंडळाची पहिली बैठक त्या दिवशी होती! लोकसत्तेच्या सरकारची स्थापना त्या दिवशी होती. पहिल्या ''डेल आयरेन''चा तो पहिला दिवस. स्वतंत्र आयर्लंडचा जयघोष प्रत्येक स्वतंत्र राष्ट्राप्रत पोहोचविण्याचा तो दिवस होता.

आमचा टेहळ्या टिप्परेरीच्या रस्त्यावर नजर लावून उभा होता. आम्ही आमच्या निवाऱ्याच्या ठिकाणी होतो. लक्ष ठेवण्यात तासामागे तास कंटाळवाण्या रितीने जात होते. शेवट आम्ही शांतपणे डब्लीन येथे घडणाऱ्या घडामोडीबद्दल बोलू लागलो. एवढ्यात आमचा टेहळ्या आपल्या जागेवरून धावत आला. त्याच्या डोळ्यात वीरश्रीची विलक्षण चमक होती. त्याच्या चेहऱ्यावर काहीसे निश्चयी हास्य पसरले होते. तो जवळ येऊन कुजबुजला, 'ते येत आहेत! ते जवळ आले!! ते आले!!'

प्रत्येकजण आपापल्या जागी गेला. कित्येक दिवसांपूर्वीच कोणी कोठली जागा घ्यावयाची हे ठरून गेले होते. मनात कोणी दचकला किंवा थोडा घाबरला तर न कळे. बाहेरून यत्किंचितही त्याचा मागमूस नव्हता. क्षणार्धात कसलेल्या सैनिकाप्रमाणे प्रत्येकजण मोठ्या उत्साहाने आपापल्या जागी गेला. आमच्या परीक्षेची वेळ येऊन ठेपली होती. शत्रूशी समोरासमोर अशी पहिलीच गाठभेट होती. यश किंवा मृत्यू यांवाचून तिसरे पत्करणे शक्य नव्हते. स्वदेशस्वातंत्र्याच्या महायुद्धातील अखेरच्या लढाईचा आरंभ आम्ही करीत होतो. नव्या युगाच्या स्वागतार्थ पहिली फैर झाडण्याचा सन्मान आम्हास मिळावयाचा होता.

टेहळ्याचे टेहळणीचे काम चालूच होते. पुन्हा तो धावत आला. आता ते किती अंतरावर आहेत व त्यांची संख्या किती ते त्याने अचूक सांगितले. ते जवळ जवळ येत चालले. त्या शांत वातावरणात घोड्याच्या टापांचे आवाज ऐकू येऊ लागले. डोंगराळ आणि खडकाळ रस्त्यावर चालणाऱ्या त्या भरलेल्या गाडीच्या चाकांचा खडखडाट स्पष्ट जाणवू लागला.

नंतरच्या आयुष्यात कमावलेल्या वृत्तीचा शांतपणा, ते स्थैर्य हे त्या दिवशी मुळीच नव्हते. मनावर विलक्षण ताण आला होता. आम्ही काय करीत आहोत त्याचे स्वरूप उमगले, आणि आपल्या यशापयशाचे काय परिणाम होणार

त्यांचे भविष्य स्पष्टपणे दिसू लागले.

आम्ही कसलेल्या सैनिकांशी झुंज घेत होतो. अशा प्रसंगासाठी मुद्दाम त्यांना शिकविलेले होते. बॉम्ब फेकण्याच्या शास्त्राचे त्यांनी नुकतेच धडे घेतले असणार हे उघड होते. कारण पीलर्सच्या शिक्षणक्रमात याची भर नुकतीच घालण्यात आली होती. बंदुकीसारखी शस्त्रे वापरण्याचा प्रत्यक्ष अनुभव आमच्या छोट्या तुकडीत तर कोणालाच नव्हता. आतापर्यंत शिकण्यासाठीसुद्धा एकही गोळी झाडण्याची संधी कोणास मिळाली नव्हती. या नवशिकेपणाबद्दल एकमेकांची अनेकदा आम्ही टिंगलही करावी आणि थट्टेने ऐनवेळी मन खचलेच तर कशी गंमत होईल याबद्दल परस्परांना टोचावे. तथापि असल्या नेभळ्या कल्पना तेव्हाच दूर करून, आम्ही आयरिश रक्ताचे आहोत आणि जन्मत: उत्कृष्ट लढवय्ये आहोत या अभिमानाने आनंदित होत असू.

आता तो प्रसंग येऊन ठेपला होता. मी होतो तेथून येणाऱ्या गाडीकडे मी पाहिले. गाडीवान व एक कारकून असे दोघे गाडीच्या जवळून चालले होते. काळ्या गणवेशातील दोन पोलीस हातात बंदुका घेऊन येत होते. ते गाडीच्या थोडे मागे होते.

एका क्षणापूर्वी शरीरातील सर्व रक्त तोंडाकडे धावले पण त्यांना एका हातावर आलेले पाहाताच मनातील खळबळ थांबली. अशा पाच पंधरांनाही मी एकटा तोंड देऊ शकेन असा विश्वास वाटू लागला. कारण समोरून येणाऱ्यांनी स्वदेशकर्तव्याला लाथाडले होते. ते शत्रूचे पोटभरू हेर होते.

ते जवळ येतच होते, हलक्या आवाजात त्यांचे परस्परांत बोलणे चालू होते. होता होता ते बरोबर आमच्या रिव्हॉलव्हर्सच्या माऱ्यात येऊन ठेपले. 'हात वर करा' आम्ही सर्व एकदम ओरडलो. 'हात वर करा,' पण व्यर्थ! नित्याच्या शिस्तीस अनुसरून त्यांनी चट्‌कन बंदुका उचलल्या.

पुन्हा पुन्हा आम्ही ओरडून सांगितले. त्यांनी शरण यावे, उगाच रक्त सांडले जाऊ नये असे आम्हाला वाटे. पण ते नाठाळ व हट्टी होते. आणि आता त्यांचे मरण किंवा आमचे मरण एवढाच प्रश्न उरला. बंदुकीच्या घोड्यांवर त्यांची बोटे जाऊ लागली, आणीक सूचना देणे निष्फळ होते. कदाचित् आम्हीच फसले जातो.

फाड्! फाड ऽ!! फाड ऽऽ!!! फाड ऽऽऽ!!!! पिस्तुलांचे आवाज झाले. नेम अचूक होते. त्या दोघां पोलिसांचे मरणच ओढवलेले होते.

●●●

## ७. अज्ञातवासात उडी

आता मात्र आमच्या साहसी जीवनाचा प्रारंभ झाला. आम्ही एकही गोळी न झाडता पोलिसांना निशस्त्र करू शकतो तर या गोष्टीस गंभीर स्वरूप आले नसते. पण आता तसे नव्हते.

रिव्हॉलव्हर्सच्या आवाजांनी आजूबाजूचे लोक सावध झालेले असणार आणि आजूबाजूच्या प्रत्येक घरादारातून बायकामुले मोठी माणसेही डोकावणार. रस्त्यावर गाडीवान आणि कारकून भीतीने थरथर कापत होते. एका तासाभरात शेकडो पोलिस आणि सरकारी सैनिक आम्हाला पकडण्यासाठी शेजारचा सर्व प्रदेश धुंडू लागणार. माझ्या ध्यानात आले की, पकडण्यासाठी मोठमोठी बक्षिसे लावलेल्या फरारी क्रांतिकारकांचे जीवन हेच आमचे आयुष्याचे कार्य ठरणार.

तथापि ही वेळ विचार करीत बसण्याची नव्हती. आम्ही त्या पोलिसांच्या रायफल्स व बाकीचे सामान घेतले, गाडीवर चढलो आणि मिळालेल्या लुटीसह गाडी भरधाव हाकली. गाडीमध्ये एक हंड्रेडवेट वजनाची स्फोटक दारू होती. त्याविना त्या कारकुनाच्या खिशात ३० इलेक्ट्रिक डीटोनेटर्स होते. त्याला आम्ही मुकलो हे वेगळे. ही गोष्ट आम्हाला एका आठवड्यानंतर कळली.

त्या घोड्याला आम्ही दामटीत चाललो. स्वत:चा जीव आणि स्वातंत्र्य या गोष्टी पणाला लागल्या होत्या. म्हणून आम्ही त्याला तुफान वेगाने पळवला. हॉगनच्या हातात लगाम होते. मी आणि ट्रेसी मागे बसलो होतो. उरलेल्यांना मी निरनिराळ्या दिशांस नाहीसे होण्यास सांगितले होते आणि त्याप्रमाणे सर्व सुखरूप निसटलेही.

त्या गरीब जनावराला जणू वायुवेगाने आम्ही पळावयास लावले. शेतांतली कामे करणारी माणसे आश्चर्याने आ वासून पाहात राहिली. आम्ही आता डोनोस्की खेड्याकडे चाललो होतो. प्रवासातला बराच काळ परस्परांशी न बोलण्यात गेला. या शांततेत प्रथम बोलणारा ट्रेसी निघाला. घरी थंडीच्या दिवसात शेगडीच्या उबेत बसून पत्ते खेळता खेळता बोलावे अशा शांत आवाजात त्याचे बोलणे होते, ''तुला आठवते का डॅन, आपण त्या पुस्तकात वाचले ते? त्यात म्हटले होते की, जर स्फोटक द्रव्ये थंडीत गारठली किंवा त्याला धक्के बसले तर त्यांचे स्फोट होतात.'' ही आठवण मोठीशी सुखावह नव्हती. कारण आमच्या गाडीतील या मालाला कितीतरी दणके बसले होते. सारखी तर गाडी थडथडत होती. रस्ता अगदी खडबडीत आणि वेडावाकडा होता. मोठेमोठे दगडही इतस्तत: पसरले होते. गाडी मजबूत पण शेतकीच्या कामासाठी घडवलेली होती. म्हणून तिला ताणांचा आधार नव्हता.

तथापि ही लूट जेथे लपवायची असे ठरविले होते तिथपर्यंत असेच धडधडत जाणे भाग होते. सरतेशेवटी ते ठिकाण आले. तेथे आम्ही तो दारूगोळा नीट पण वेळ न घालवता ठेवून दिला. पोलिसांना फसवता यावे यासाठी आमिष म्हणून गेलिगनाइटच्या दोन मोठ्या काड्या स्वत:जवळ ठेवल्या. त्या आम्ही पुढे जाऊन घोडागाडी जेथे सोडून दिली तेथे रस्त्याच्या जवळच टाकून दिल्या. पोलीस या आमिषाला बरोबर बळी पडले. आम्ही जेथे दारूगोळा पुरला, त्या जागेवरून लष्करी सैनिक व पोलिस हजार पाचशे वेळा गेले असतील तथापि त्यांना शंकाही आली नाही. मात्र जेथे त्या दोन कांड्या टाकल्या तो प्रदेश त्यांनी खणून खणून खंदकमय करून टाकला. पण दारूगोळा सापडण्याची कल्पना व्यर्थ होती.

दारूगोळ्याची व्यवस्था लावून आम्ही निघालो आणि आमच्या हालअपेष्टांना सुरुवात झाली. त्या म्हाताऱ्या घोड्याच्याने पुढे पाऊल टाकवेना. आम्हालाही त्याची मोठी आवश्यकता नव्हती. त्याला जवळ बाळगणे म्हणजे शत्रूला आमचा माग आम्हीच सांगण्यासारखे होते. आम्ही त्याला काही अंतर पुढे चालून रस्त्यावर सोडून दिले. त्या संध्याकाळी हा घोडा पोलिसांना टिप्परेरी थर्ल्स या रस्त्यावर टिप्परेरीपासून चार मैलांवर एका पुलापाशी आढळला. थोडक्याच अवकाशात पुलाच्या आसपासचा सर्व प्रदेश खाकी कपड्यांनी फुलून गेला.

एका पाठोपाठ एक असे अडचणींचे डोंगर आमच्यासमोर उभे राहिले. टिप्परेरीला लगोलग परत जाण्याची कल्पना वेडगळ ठरली असती. तिथले सर्वच वातावरण आमच्या विरोधी असणार. गेल्या चार-पाच दिवसांच्या अस्थिरतेत आजच्या घडामोडीची भर पडून मन अगदी थकून गेले होते. तथापि विश्रांतीचा नुसता विचार सुचणे शक्य नव्हते. भोवताली कडाक्याची थंडी पडली होती. आणि तितकेही पुरेना म्हणून बर्फ पडण्यास आरंभ झाला. अशा अडचणी वाढत चालल्या. एखादा बर्फाचा थर जमिनीवर बसला की मग आमचा माग काढणे पोलिसांना अवघड पडले नसते.

रॉयनच्या चौकात घोडा सोडून आम्ही उजव्या हातास वळलो. प्रथम आम्ही उत्तरेकडे काही काळ चाललो. पण नंतर आग्नेयीस जात जात शेवटी दक्षिणेस वळून गॅलेटी डोंगराच्या दिशेने चालू लागलो. या दऱ्याखोऱ्यांतून आणि डोंगराच्या वळणावळणांतून अनेक हालअपेष्टा सहन करीत सुमारे चाळीस मैल अंतर आम्ही तुडवले. आजपर्यंत आमच्यासारख्या अनेकांना या डोंगराने प्रेमाने आसरा दिला आहे. ज्याचे डोके मारण्यासाठी मोठमोठ्या रकमा प्रसिद्ध करण्यात आल्या होत्या, त्या पराक्रमी जिआफ्रेकीटिंगपासून तो तहत आजपर्यंतच्या टिप्परेरीतील बंडखोरांना गॅलिटी डोंगर आणि अहर्लोची दरी ही आश्रयाची माहेरघरे होऊन राहिली आहेत. मग आम्हीही त्यांचा आश्रय घेण्यास धावलो यात नवल ते काय?

घोड्याला सोडून देऊन आम्ही सुमारे चार मैलांवर मिसेस फिल्ट झेरॉल्ड या बाईच्याकडे थांबलो. आईने सकाळी जे थोडे खायला दिले होते तेव्हापासून पोटात

काहीच नव्हते. आमच्या यजमानीण बाईने आमच्यापुढे उत्तम शिजवलेले मांस आणून ठेवले. अंडी व चहा याच्यासमवेत आम्हीही त्याचा आनंदाने सत्कार केला. याच घरात आमच्या स्वदेशाचे आवडते संत फादर मॅथ्यू यांचा जन्म झाला होता.

तेथे अधिक वेळ घोटाळलो नाही. सोलोहेडबेगपासून अधिकाधिक लांब जाणे अत्यंत अवश्य होते. आम्ही डोंगरांतून चालू लागलो. थंडीचा कडाका विलक्षण होता, आणि वारा म्हणजे मी म्हणत होता. दृष्टीस चिटपाखरूही पडत नव्हते. मध्येच कोठे दोन रानबोकड दृष्टीस पडले तेवढेच. अनेक वेळा रस्ते चुकून भलतीकडेच गेलो. दूर अंतरावर तुरळक झोपड्या दिसत. पण तिथल्या शेतकऱ्यांना जाऊन रस्ता विचारावा तर तशी सोय नाही. अजून आपली तोंडे बंद ठेवायला आमचे लोक शिकले नव्हते. मध्येच ट्रेसी वीस फूट खोल अशा ओघळीत कोसळून पडला. आम्हाला वाटले की, हा जिवंत वर येत नाही. त्याला वर उचलून आणले, तो त्याला ढिम्मसुद्धा झाले नव्हते. तो म्हणाला 'येवढ्याने कोठे संपले आहे? अजून कित्येक गोळ्या झाडावयाच्या आहेत.' आम्ही परत डोंगराच्या शिखराकडे वळून चालू लागलो. ती प्रसिद्ध दरीही ओलांडली. आणि वरचे गॅलिटीमोरचे शिखर गाठले. पण पुढे रस्ता समजेना, दिशा ओळखता येईनात. प्रखर उन्हाळ्यात या शिखरावर गारवा वाटतो, तिथे ऐन थंडीच्या झपाट्यात आमची काय स्थिती झाली असेल! तीन तास हा डोंगर चढत होतो. पण व्यर्थ! हिंडून हिंडून गाडी मूळ जागेवरच आली. आम्ही परत त्या बोकडापाशीच आलो. शेवटी निराशा होऊन डोंगर ओलांडण्याची आशा सोडून दिली. सीनहॉगन म्हणाला, 'दुरून डोंगर साजिरे; घरी आरामखुर्चीवर बसून खुशाल पर्वतराजींची वर्णने आणि कौतुके करावीत. आमच्यासारखे भुकेले आणि गारव्यात ते चढण्याचा थोडा अनुभव पहावा. म्हणजे काय सुख आहे ते कळेल.'

आम्ही आता वाटेतला रस्ता ओलांडून रेल्वेच्या कडेकडेने काहीरकडे जाण्याचे ठरविले. ही कल्पना सुचली हे सुदैवच. रेल्वेकडेने एकदोन मैल जात असू नसू तोच आमच्या शोधार्थ हिंडणाऱ्या लष्करी मोटारगाड्यांचा उजेड त्या रस्त्याने दिसला. आम्ही रस्त्यावर असतो तर? त्या मोटार गाड्यांना चुकवणे अशक्यच होते.

भरदिवसा रेल्वेकडेने प्रवास करणे अतिशय त्रासदायक असते. आमच्या या प्रवासात, अशा मन:स्थितीत आणि रात्रीच्या वेळी तर ते भयंकर कष्टप्रद झाले. तरीही पुढे जाणे हे होतेच. मध्येच आमच्यापासून काही पावलांवर काळोखामध्ये एक काळी आकृती मला दिसली. मी त्या वेळी सर्वांच्या पुढे होतो. झट्कन पिस्तुल काढले अन् रोखले. ''हात वर कर'' मी ओरडलो. ती आकृती जणू थांबल्यागत दिसली. मी पिस्तुल तसेच रोखून ठेवून पुढे गेलो. पण काय! Tress-passers will be prosecuted या रेल्वेच्या काळ्या पाटीवर जाऊन आदळलो. या दोघा पोरांच्या हसण्याला पारावर उरला नाही. आणि मलाही त्यांच्याबरोबर हसणे भाग पडले. आणखी थोडे गेल्यावर हॉगनने त्याचा बूट सैल झाल्यामुळे आम्हाला थांबण्यास सांगितले. ट्रेसीने त्याचा बूट नीट बांधला. परंतु आणखी थोडे पुढे जातो न जातो तोच पुन्हा बूट सैल झाल्याची तक्रार त्याने केली. ट्रेसीने थांबून काय आहे म्हणून पाहिले, तो डोंगरातल्या खडबडीतून आणि राड्यारोड्यातून चालल्यामुळे बुटाचे तळवे पार खलास झाले होते. बुटाची फीत बांधण्याचा भाग आणि थोडासा टाचेचा भाग एवढेच शिल्लक राहिले होते.

सर्व वेळ ट्रेसी आमचा धीर कायम ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न करीत होता. आम्ही किती तरी वेळा त्यास विचारावे 'काहीर अजून आहे तरी किती दूर?' त्याचेकडून शांतपणे उत्तर यावे, 'आलेच! पलीकडचे वळण वळलो की, आलेच.' आणि हे त्याचे म्हणणे खरेही होते. केवळ रस्ता अगदी सरळ होता आणि पलीकडील वळण उगाच कुठे चार-तीन मैलांवर होते! अधून मधून इतका थकवा येई की, दोन-पाच मिनिटे रस्त्याच्या कडेच्या बांधाला डोके टेकून उभ्या उभ्याच आम्ही -झोप कसली म्हणा ग्लानीच ती, अशी झोप घेत असू. सरते शेवटी आम्ही, एकदा काहीरला जाऊन पोहोचलो. सामान्य सहनशक्तीच्या पलीकडे आम्ही एव्हाना दमलो होतो. एकेक पाऊल उचलून टाकावे लागे. बाहेरून मोठा शांतपणा धारण करण्याचा आमचा प्रयत्न चालला होता. हे आज आम्ही प्रथमच केले. पण हे पुढे

रोजचेच झाले. रोज मरे त्याला कोण रडे? काहीर हे सोलोहेडबेगपासून पंधरा मैलांवर आहे. इथेही लष्कराचा बंदोबस्त होता. तथापि तो धोका पत्करून गावातून आम्ही तसेच पुढे गेलो. रक्त गोठून जाण्याची वेळ आली. भुकेने तर काहूर मांडले होते, आणि पायांत यत्किंचितही त्राण उरले नव्हते. पण जवळच रात्रभर आश्रय मिळेल असे खात्रीचे घर आम्हास माहीत होते. काहीरजवळ टिन्क्युरी येथील मिसेस टॉबिन यांची चांगली ओळख होती. मिसेस टॉबिन यांनी अत्यंत आपुलकीने आमचे आगत-स्वागत केले. त्यांची त्या रात्रीची आपुलकी आणि आगत-स्वागत मी जन्मात विसरणार नाही. पुढेही आमच्या अनेक मित्रांना तेथे निर्धास्त आश्रय मिळे. ब्रिटिश सैनिकांनी पुढे डिस्ट्रीक्ट इन्स्पेक्टर पॉटर याच्या वधाबद्दल सरकारी सूड म्हणून भर दिवसा याच घरावर बॉंब टाकले आणि धूळधाण केली. याविषयी प्रसंग येईल तेव्हा सांगेन.

गेल्या सबंध आठवड्यात अंथरुणाला आम्ही प्रथमच पाठ लावीत होतो. आमच्या तिघांचीही दशा एकच होती. मन थकलेले, शरीर थकलेले, आणि त्यात थंडी, यामुळे झोपही येईना. डोक्यात काही काही भिरभिरे. तथापि तसेच चार तास गुंगीत पडल्यासारखे काढले. आणि तेवढ्याने थकल्याभागल्या शरीराला विश्रांती मिळून आम्ही परत ताजेतवाने झालो.

आम्ही जेव्हा जागे झालो तेव्हा, पुढे काय झाले, कशा स्वरूपात ही बातमी येते, याबद्दलची तीव्र उत्कंठा प्रत्येकाचे मनात होती. सोलोहेडबेग सोडल्यापासून आम्ही कोणाशीही बोललो नव्हतो, किंवा त्या दिवशीच्या संध्याकाळचे वर्तमानपत्रही आम्हास पहावयास सापडले नव्हते. येथे सकाळची वर्तमानपत्रे हाती आली. आम्हाला वाटले तसेच सर्व त्यात होते. ''टिप्परेरीजवळील भयंकर अत्याचार!'' ''दोन पोलिसांचे खून!!'' ''सरकारी दारूगोळ्यावर भ्याड खुनी हल्ला!!!'' आणि अशाच मोठमोठ्या शब्दांनी सर्व वृत्तपत्रांचे रकाने भरून गेले होते. मयत पोलिसांच्या प्रेताची चौकशी छापून आली होती. एकंदरीत सर्व हकीकत चुकीची आणि विकृत अशी दिलेली होती. पुढच्या निरनिराळ्या प्रसंगी असलाच प्रकार वृत्तपत्रांकडून होई. दोघा तरुणांना संशयावरून पकडलेले होते. पैकी कोणाचाच या प्रसंगाशी संबंध नव्हता. पुढे काही दिवसांनी त्यांना सोडून देण्यात आले. दोघा शाळकरी मुलांनाही पकडण्यात आले. त्यांनी आम्हाला पाहिले हा त्यांच्यावर संशय होता. मॅथ्यु हॉगन वय १५ वर्षे. सीन हॉगनचा धाकटा भाऊ आणि टिमॉथी कोनर्स, वय ११ वर्षे. टिमॉथीचा बाप सीन ट्रेसीच्या आईच्या शेतावर कामाला होता. दोघांही मुलांना कित्येक महिने अटकावून ठेवले होते. त्यांच्याकडून माहिती काढण्याचा प्रयत्न चालला होता. टिमॉथीच्या बाबतीत यावरून मोठाच कायद्याचा प्रश्न निघाला आणि न्यायालयाकडून त्याला निष्कारण डांबून ठेवल्याबद्दल पोलिसांचे कान पिरगाळण्यात आले.

मध्यंतरीच्या काळात सोलोहेडबेग येथील आमच्या चकमकीचे परिणाम दिसू लागले. टिप्परेरी परगण्याचा दक्षिणेकडचा म्हणजे जवळ जवळ निम्मा भाग लष्करी टापू म्हणून प्रसिद्ध करण्यात आला. लष्करी टापू याचा व्यवहारत: अर्थ 'मार्शल लॉ' पुकारण्याचाच होता. बाजार-जत्रा-सभांना बंदी करण्यात आली होती. ठिकठिकाणी चौक्या पहारे बसविण्यात आले. लष्करी सैनिकांचा जिकडे तिकडे संचार सुरू झाला. जिथे कधी दिसली नव्हती अशा ठिकाणी ब्रिटीश शिपायांची तोंडे दिसू लागली. रात्रंदिवस रस्त्यांवरून त्यांची पायपीट चाले. वेळी अवेळी शेतांतून घुसून पिकाचा नाश ते करू लागले. आमच्या कामाच्या यशाची ही चिन्हे होती. आमच्या तुकडीने इंग्लंडच्या तोंडावरचा बुरखा फाडून काढला. त्यांच्या गोड बोलण्यामागे पाशवी जुलूमजबरदस्ती आहे हे नागवे सत्य जगाच्या ध्यानी आले. आयर्लंडवर जुलमाचे आणि जुलमाचेच राज्य आहे ही गोष्ट सर्वत्र सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट झाली.

आम्हाला पकडून देणाऱ्यास अथवा त्याबद्दलची उपयुक्त माहिती पुरवणाऱ्यास १००० पौंडांचे बक्षीस लावण्यात आले होते. काही महिन्यांत ही रक्कम १०,००० पौंडापर्यंत वाढवण्यात आली. बक्षिस मिळविणे कुणाच्याही भाग्यात नव्हते. कोणी त्यासाठी प्रयत्नही केला नाही. नाही म्हणायला चार-दोन जणांनी थोडी हालचाल केली पण त्यांना असा धडा मिळाला की, बस्स! फिरून दुसऱ्यांदा त्याच्यासाठी प्रयत्न करावा हे त्यांच्या डोक्यात येणेही


POLICE NOTICE.

£1000 REWARD

WANTED FOR MURDER IN IRELAND.

DANIEL BREEN

(calls himself Commandant of the Third Tipperary Brigade).

Age 27, 5 feet 7 inches in height, bronzed complexion, dark hair (long in front), grey eyes, short cocked nose, stout build, weight about 12 stone, clean shaven ; sulky bulldog appearance : looks rather like a blacksmith coming from work ; wears cap pulled well down over face.

The above reward will be paid by the Irish Authorities to any person not in the Public Service who may give information resulting in his arrest.

Information to be given at any Police Station.

अशक्य. १९१६ च्या बंडानंतर प्रथमच जी चकमक उडाली, तिची साधी सरळ हकीकत वरीलप्रमाणे आहे. ही म्हणजे केवळ सुरुवात होती. त्या वेळच्या झालेल्या पिस्तुलाच्या आवाजांनी सर्व खडबडून जागे झाले. पुन्हा एकदा आयर्लंडचे नाव दुमदुमू लागले. स्वदेशातील व परदेशातील प्रत्येकजण स्वातंत्र्याच्या या लढाईकडे अत्यंत कौतुकाने लक्ष देऊ लागला.

●●●

## ८. अमेरिकेत जावे काय?

मिसेस टॉबिन यांच्या घरी आम्ही दोन दिवस काढले. एक दिवस नेड मॅक्ग्रेथ याच्याकडे राहिलो. तेथून नेडने आम्हाला बर्नकोर्ट कॅसल येथील गॉर्मनकडे नेले. येथून ट्यूब्रिड येथील रायन याच्याकडे जाण्याचा विचार होता. तशा अर्थाचा निरोपही आम्ही पाठविला. पण नंतर सुदैवाने विचार बदलला. सुदैव आमचे का दुसऱ्यांचे हा प्रश्न वेगळा. कारण ज्या वेळेला आम्ही त्या घरी जाणार त्याच वेळी रायनच्या घरावर आठ पोलिसांनी छापा घातला आणि त्याला पकडून नेले.

कॉर्क परगण्यातील मिचेल्स टाऊन येथे आम्ही नंतर गेलो. तेथे एक रात्र ओब्रायनकडे झोपलो. तेथे मोठा गमतीदार प्रसंग घडला. आम्ही माडीवर झोपलेलो होतो. मध्येच अनोळखी आवाजांनी आम्ही जागे झालो. बाहेर डोकावून पाहिले तो बरेच पोलिस घरात शिरत होते. आम्ही लगेच त्यांच्याशी सामना देण्यास सिद्ध झालो. म्हटले की हे आता नक्कीच वर येणार. तथापि ते वर आले नाहीत. काही वेळाने ते घर सोडून गेले. चौकशी केल्यावर कळून आले की, कुत्र्यावरील कर घराच्या मालकाने दिला किंवा नाही याची खात्री करून घेण्यासाठी ते आले होते.

मिचेल्स टाऊन येथे ख्रिस्टी रायनने आमचे मनापासून आगतस्वागत करून आपल्या घरी नेले. तेथे असताना दारावरून आठ हत्यारी पोलिस गेले. सुरूंगाची दारू कोठे पोचवावयची होती. त्याबरोबर पहारा म्हणून ते जात होते. सोलोहेडबेगच्या प्रकाराने सरकार चांगलाच धडा शिकलेले दिसले. कारण त्या वेळच्या चौपट लोक आता पहाऱ्यासाठी देऊ लागले होते.

पुढे पूर्व लिमरिकमध्ये आम्ही शिरलो. मित्रांच्याकडे राहात राहात लॅकेली येथे मॅलोने कुटुंबाकडे आम्ही गेलो. तेथे आम्ही आठवडाभर मुक्काम केला.

असे निरनिराळ्या ठिकाणी आम्ही जात असलो तरी सोलोहेडबेगपासून दहाच मैलांच्या आत नेहमी आम्ही होतो. सरकारचे लष्कर आणि पोलिस शिकारी कुत्र्याप्रमाणे आमच्या मागावर होते. घरे शोधली जात होती, शेतांतून रानावनांतून हुडकणे चाललेच होते. डोंगरांतून धुंडाळले जात होते, अगदी कसून शोध चालला होता. धर्मोपदेशक, बहुजनसमाज, आणि

वर्तमानपत्रे आमचा उघड उघड धिक्कार करीत होते. १८९८च्या क्रांतिकारकांचा, १८६७च्या फेनिअन्सचा, -फार दूर कशाला १९१५च्या बंडातील तरुण देशभक्तांचा असाच धिक्कार त्यांच्या त्यांच्या दिवसात झाला ना? आम्हाला समाधान एवढेच होते की, त्यांच्या सत्कार्याचा गौरव झाला. आमच्याही बाबतीत तसे होईल; लोकांचा भ्रम नाहीसा होईल ही आशा होती. तथापि ते होईल ते निराळे. आज मात्र एक शब्दही आमच्या साहाय्यार्थ बोलण्याची कोणाची हिंमत नव्हती. यामागे काय विचारसरणी आहे ती नुसती ऐकण्याचीही त्यांची इच्छा नव्हती. आयरिश लोकसत्तेला लोकांनी मते दिली खरी, पण ती समाजआज्ञा खरी समजून जे ती लोकसत्ता स्थापू पाहात होते त्यांची त्यांनी वावडी केली. त्यांची पाठ राखणे त्यांनी सोडून दिले.

आमचे पूर्वीचे मित्र आम्हास टाळू लागले. लढाईपेक्षा चुलीपासच्या गप्पा त्यांना प्रिय होत्या. पिस्तुलापेक्षा राजकीय ठराव हे अधिक प्रभावी शस्त्र त्यांना वाटे. स्वातंत्र्यसंदेश आम्हाला शिकविला. आम्ही शिकलो. आम्ही त्यावर निष्ठा ठेवली. स्वतंत्र होण्याचा निश्चय केला. आणि त्याचे साधनार्थ स्वतःच्या प्राणाची आहुती देण्यास आम्ही सिद्ध झालो... पण ज्यांनी या ऋचा आम्हास शिकविल्या, ते मात्र त्या ऋच्यांप्रमाणे स्वत: आचरण करण्यास धजावत नव्हते.

आणि काय आश्चर्य! आयरिश स्वयंसेवक किंवा आता म्हणतात त्याप्रमाणे आयरिश रिपब्लिकन आर्मीकडूनही आम्हास पाठिंबा मिळू नये! दोघे चौघे एकनिष्ठेने पाठिंबा देणारे निघाले पण अपवाद म्हणून.

सोलोहेडबेगचे प्रकरण असे प्रसिद्धीस येत असताना वास्तविक जो आमचा मित्र असायचा अशा एकाने टिप्परेरीमध्ये प्रगट सभासुद्धा बोलाविली. त्यात हेतू असा की, सीनफेनांचा या कृत्याशी काहीही संबंध नाही हे सांगावे आणि आमचा धिक्कार करावा. पण दुसऱ्या एका विचारी पुढाऱ्याने ही सभा रद्द केली. एका धर्मोपदेशकाने प्रार्थनेच्या प्रसंगी बोलताना खुनी या शेलक्या शब्दाने आमची संभावना केली. आणखी तो असेही म्हणाला की, ''टिप्परेरीने प्रारंभ करावा व सर्व आयर्लंडने तो कित्ता गिरवावा अशी नित्याचीच रूढी आहे. पण या बाबतीत तसे होता कामा नये. या कृत्याच्या मुळाशी जे लोक आहेत त्यांच्या कपाळी 'खुनी' 'अत्याचारी' हे शब्द कायमचे कोरले गेलेले आहेत. त्यांच्या मृत्यूनेही ते शब्द पुसले जाणार नाहीत.''

असल्या गोष्टी आमच्याबद्दलच्या ऐकणे हे आता आम्हाला नित्याचेच होऊन बसले. आम्ही मार्ग अनुसरीत होतो. कुत्रा भुंकतो पण राजा पुढेच चालतो.

या भुंकणाऱ्या कुत्र्यालासुद्धा कोणी बाहेर घालविणार नाही अशाही रात्री आम्हाला आश्रय नाकारण्यात आलेला आहे. एकदा आम्ही शेतावरचे घरात विस्तवाजवळ बसून गप्पा मारीत होतो; तो मध्येच दारावर जोरजोराने ठोठावले गेले. वेळ रात्रीची होती. आमचे घरमालकांनी कोण आहे ते समजल्याविना दार उघडावयाचे नाकारले.

''कोण आहे?'' त्याने जोराने विचारले.

''पोलीस'' स्पष्ट उत्तर आले.

शब्द ऐकल्याक्षणीच आम्ही रिव्हॉल्व्हर्स काढली. मालकाने दार उघडले आणि शेजारचा तरणाबांड शेतकरी आपण केलेल्या चेष्टेने मनमोकळेपणाने हसत हसत आला. आम्ही रिव्हॉल्व्हर्स खिशात ठेवली. पण घरमालकाचे दृष्टीतून काही ती सुटली नाहीत. लगेच आमच्याशी होणारी त्याची वागणूक पालटली. त्याने स्पष्ट शब्दात आम्हास बाहेर जाण्यास सांगितले. बाहेर थंडीने रक्त गोठण्याची वेळ आली होती. तशाही थंडीत बाहेर शेतातल्या पडक्या झोपडीत जावे लागले. आम्ही इतके गारठलो की, काही तरी करून ऊब आणावी म्हणून शेवटी शेतातल्या गाई हाकून त्या झोपडीत आणल्या. त्यांच्यामुळे थंडी कमी झाली.

जवळ एक पैसा नाही आणि या खेड्यातून त्या खेड्याला सारखे भटकावे लागे. कपडे फाटले, बूट झिजून गेले. दुसरे कपडे जवळ नाहीत. अशा स्थितीत ज्यांच्यावर विश्वास टाकावा अशा कित्येकांनी बाहेरच्या गोठ्यातही झोपू देण्याचे नाकारले.

आम्ही लिमरिक परगण्यातील डोनो या गावी आलो. सोलोहेडबेगपासून ते केवळ सात मैलांवर आहे. येथे आल्यावर रॉबिन्सनची गाठ पडली. त्याला पाहून आनंदाने आम्ही वेडे झालो. सोलोहेडबेगच्या चकमकीत आम्ही त्याला सोडले या गोष्टीला काही आठवडेच झाले होते. पण आम्हाला यावेळी असे वाटले की, जणू कित्येक वर्षांच्या वियोगानंतर पाठचे भाऊच एकमेकांना भेटताहेत. हातात हात घालून जोडीजोडीने आम्ही आमचे रात्रीचे प्रवास करू लागलो.

येथेच जवळपास हिंडत असताना पॅडी रायन याचे मोठेच साहाय्य लाभले. पॅडी रायन म्हणजे येथील एक किरकोळ

व्यापारी आणि स्वातंत्र्य लढ्यातील जुना खंदा शिपाईगडी. खऱ्या मित्राप्रमाणेच त्याची वागणूक होती. रॉबिन्सन आमच्याबरोबर होताच. लोकांना या आमच्या जुन्या शत्रूशी फिरून एकवार लढण्यास कसे उद्युक्त करावे याबद्दल आम्ही चौघांनी परस्परांत खूप चर्चा केली. त्यावरून एक पत्रक लिहून काढले. त्यात सर्व शत्रू-सैनिकांनी ताबडतोब दक्षिण टिप्परेरीचा भाग सोडून जावे ही आज्ञा होती. पत्रक लिहून संमतीसाठी आम्ही ते डब्लिनला पाठविले. पण तिकडून स्पष्ट नकार आला. त्याची कारणे आम्हाला समजू शकली नाहीत. आम्ही योग्य विचार करूनच हे पाऊल टाकू इच्छित होतो, परंतु..!!!

परंतु.... त्यांनी पाठिंबा देण्याचे नाकारले. हे वाईट होतेच; जे आम्हास भयंकर वाटले ते आणिक निराळेच होते. कोण्या एकाने आमची आयर्लंडमधून उचलबांगडी करून आम्हाला अमेरिकेत पाठविण्याचा घाट घातला. आम्हाला शब्दानेही याबद्दल विचारले गेले नाही. आणि शांतपणे दोन दिवसांत या समुद्रप्रवासास सिद्ध व्हा असे सांगण्यात आले. चांगला उपाय शोधला होता!!!

एक प्रकारे हद्दपारीचीच आज्ञा होती ती म्हणाना! आणि कोणाकडून? तर लढाईत ज्यांनी खांद्याला खांदा देऊन उभे राहावे म्हणून ज्यांची आम्ही अपेक्षा करावी त्यांचेकडून! आम्ही आयर्लंड सोडण्याचे स्वच्छ नाकारले. आम्ही त्यांना निरोप पाठविला की, आम्ही मरणाला भीत नाही, पण आयर्लंडसाठी जगण्याचा आमचा निर्धार आहे. आयर्लंड सोडणे म्हणजे एक तर आम्ही खुनी गुन्हेगार आहोत असे आपल्याच तोंडाने मान्य करणे. किंवा मग स्वत: भ्याड आहोत हे तरी मान्य करणे .आम्ही त्यांना पुन: पुन्हा: सांगितले की, आयर्लंड हेच आमचे जग, इथेच आम्ही राहाणार; जगणार; कष्ट, हालअपेष्टा सोसणार. आयर्लंडच्या स्वातंत्र्याचे युद्ध आयरिश लोकांनीच आपल्या स्वदेशातील दऱ्या-खोऱ्यांतून आणि कडेकपारींतून लढविले पाहिजे. अमेरिकेत राहून दोन लेख छापल्याने किंवा चार पत्रके काढल्याने देश स्वतंत्र होत नसतो. आमच्या या नकाराचा अर्थ आज्ञाभंग असा करण्यात येऊ लागला. आम्ही एका संघटनेचे घटक होतो आणि वरिष्ठांचे ऐकणे हे आमचे कर्तव्य होते. त्यांनी आम्हाला अमेरिकेत पाठविण्याचा वारंवार आग्रह धरला. आम्हीही तितक्याच निग्रहाने आयर्लंड सोडण्याचे पुन: पुन्हा: नाकारले. शेवट आम्ही जिंकले. देशाच्या दूरच्या कोठल्या तरी कोपऱ्यात राहावे या अटीवर येथेच राहाण्याचे ठरले. ही अटही आम्हास फार वाटत होती. पण थोडक्याच दिवसांत ती बदलून घेण्याचा आमचा विचार होता.

वरिष्ठ अधिकारी आणि आमच्यात कुरबूर चालली होती आणि इकडे आमच्या हालअपेष्टांना अंत नव्हता. कडाक्याची थंडी, कंटाळवाण्या अनिश्चित मन:स्थितीत रातोरात भटकणे, या गोष्टी आमचा जीव खात होत्या. काही मैल असे रेटावे म्हणून घोडा मिळेल तर पाहावा, तर तेही मुष्कील. या शेतातून त्या शेतात, कधी या दिशेने तर कधी उरफाट्या दिशेने रान तुडवीत जाणे हेच जिणे होऊ लागले. किती दिवस मनुष्य हे सहन करील? काय म्हणून आम्हाला असली वागणूक मिळावी?

डूनहून आम्ही अपरचर्च येथे पेट्रिक किबॅन याचेकडे काही दिवस राहिलो. तेथून ॲनफील्ड येथील मेघॅर यांचेकडे आम्ही येत असल्याचा निरोप पाठविला. चांगला अंधार पडल्यावर ७।।ला येतो असे कळविले होते. आम्ही चौघे आणि पेट्रिक किबॅन संध्याकाळच्या मोकळ्या हवेत मौजेने गप्पा मारीत निघालो. सावकाश चालता चालता वेळेचे भान राहिले नाही. ट्रेसीने घड्याळात पाहिले तो आठ वाजलेले. आम्ही घाई करणार तोच अंधारात समोर काही पांढरे फडफडते असे वाटले. आम्ही थांबलो. कोणी तरुण मुलगी आम्हाला सूचना देत होती. आम्ही चौघे लगेच जवळच्या दाट झुडुपांच्या पाठीमागे लपलो. तिनेही ते पाहिले आणि पुढे येऊन आमच्या समोरून जाता जाता पुटपुटली, ''घरावर पोलिसांचा छापा आला आहे!'' मेघॅर याचीच ती मुलगी होती. पोलिस आले म्हटल्यावर शिताफीने पोलिसांची दृष्टी चुकवून ती निघाली. आम्ही या वाटेने येणार म्हणून आम्हाला सावध करण्याचे धाडस तिने पत्करले होते.

ब्रिटिशांची शांतता, सुव्यवस्था आणि कायद्याचे संरक्षण करणारे ते आधारस्तंभ आमच्या समोरून आपल्या खुराड्यात गेल्यावर ज्या घरात काही क्षणांपूर्वीच त्यांनी धुडगूस घातला होता त्या घरात आम्ही आलो. आणि शांतपणे मेघॅर याच्याकडील मधुर चहाची गोडी चाखली.

मध्ये एक-दोन ठिकाणी जाऊन वेड्स टाऊन येथे आलो. तेथे रविवार पाहून आमच्या ब्रिगेड कौन्सिलची सभा बोलाविली. आणि आम्ही प्रत्यक्ष लढ्याबद्दल या सर्व सहकाऱ्यांबरोबर विचारविनिमय केला. प्रत्येक ब्रिटिश सैनिकाने दक्षिण टिप्परेरी

सोडून जावे, नाहीतर देहान्ताची शिक्षा मिळेल, या पत्रकावर विचार झाला. जरी डब्लिनच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी यास संमती दिली नव्हती, तरीही आम्ही ते पत्रक प्रसिद्ध करण्याचे ठरविले. फेब्रुवारीचे अखेरीस अनेक ठिकाणी ही पत्रके चिकटविण्यात आली. उपहासगर्भ उद्गारचिन्हांनी वर्तमानपत्रांतून मोठ्या अक्षरात त्यांना प्रसिद्धी मिळाली. त्या क्षणाला लोकांना असे वाटले की, हा बाष्कळपणा आहे. तथापि वर्तमानपत्रे काय किंवा आमचेच डब्लिनचे कार्यालय काय यांच्यापेक्षा परिस्थितीची नस जाणण्याची दूरदृष्टी आम्हासच अधिक होती हे लगतच्या महिन्यात घडलेल्या प्रसंगावरून सहज ध्यानात येईल.

या सभेनंतर आम्ही उत्तरेच्या बाजूला क्रीनीला जाण्याचे ठरविले. आधी निरोप पाठविले आणि पेट्रीक किबॅनला मोटार घेऊन येण्याबाबत कळविले. चांदण्या रात्री आम्ही प्रवासास सुरुवात केली. पहाटे तीन वाजता क्रीनी येथील मर्फी यांच्याकडे जाऊन पोहोचलो. वाटेत अत्यंत हाल झाले. हवेत गारठा कल्पनातीत होता. आधीच फेब्रुवारी महिना आणिक त्यात बर्फासारखे गार वारे वाहात होते. रस्ता वळणावळणाने जात होता. आणि दोन्ही बाजूला दाट झाडी होती.

मर्फी हे मोठे प्रतिष्ठित गृहस्थ आहेत. जवळपास पंचक्रोशीत 'स्टेशनमास्तर' हे त्यांचे नाव प्रसिद्ध होते. का न कळे, वास्तविक जवळचे रेल्वे स्टेशनदेखील त्यांच्या घरापासून १५ मैलांवर होते. मर्फी यांच्याकडे आम्ही पोहोचलो तेव्हा भुकेने जीव कासावीस झाले होते. त्यांनी मेजवानीचा बेत केला होता. चुलीवर पदार्थ भाजले जात होते. पण हॉगनला भूक इतकी अनावर झाली की, त्याने सरळ कच्चेच मांस खाण्यास आरंभ केला. ते मानवते थोडेच! काही क्षणातच तो गडबडा लोळू लागला. आम्हाला वाटले की, हा आटोपणार इथेच. पण नाही. वाचला तो. थोड्याच वेळात त्याचे पोट दुखणे कमी झाले. पण पुढे कित्येक आठवडे त्याचा आजार टिकून राहिला.

मात्र हे त्याचे आजारीपण आम्हाला फार नडले. कारण बाहेर राहाण्याची आमच्या वरिष्ठांची आज्ञा असूनही आम्ही डब्लिनला जाण्याचा निश्चय केला होता. बाहेर राहून होणारे हाल आता असह्य झाले. चौघांना जाता येत नाही तर दोघांनी डब्लिनला जावे आणि मी हॉगनबरोबर राहावे असे ठरले. त्याप्रमाणे ट्रेसी आणि रॉबिन्सन डब्लिनला जाण्यासाठी निघाले. डब्लिनला जाणे काही सोपे नव्हते. तेथे गेल्यावर शहरात हिंडणे तर दूरच, पण राहणे हेही कठीणच होते. 'ह्यू अॅण्ड क्राय' या सरकारी पोलिस गॅझेटमध्ये आमची अगदी बिनचूक वर्णने देऊन आम्हास पकडण्याविषयी मोठमोठी बक्षिसे लावल्याची प्रगटणे प्रत्येक आठवड्यास नव्याने झळकत होती. तरी ट्रेसी आणि रॉबिन्सन तेथे सुखरूप पोहोचले. आमच्या काही मित्रांनी त्यांचे मनापासून स्वागत केले.

इकडे आम्हासही एके ठिकाणी फार दिवस राहता येण्यासारखे नव्हते. टिमरॉयनचा पश्चिम लिमरिकमध्ये एक धर्मोपदेशक मित्र होता. तो आमचे स्वागत करील ही खात्री होतीच, आणि तसे झालेही. या आमच्या मित्राबद्दल किती लिहू! अत्यंत जिवलग मित्र पण स्वत:चे नावही कोठे येऊ द्यावयाचे नाही हा त्याचा अत्याग्रह असल्याने अधिक उल्लेख न करण्यावाचून उपाय नाही. त्याच्याकडे आम्ही मोटारीत बसून निघालो. हॉगन आणि आमचा एक जुना क्रांतिकारक मित्र पुढे बसले होते. मी आणि टिमरॉयन मागे बसलो होतो. बराच काल लिमरिक शहर येईपर्यंत आमचा प्रवास साधा सरळ झाला. लिमरिक शहराजवळ येतो तोच आमच्या विरुद्ध दिशेने टिप्परेरीकडे सैनिकांनी भरलेली एक लॉरी आमच्याजवळून सपाट्याने गेली. कोणता तरी मोठा छापा घालण्याला हे मंडळ निघाले असणार ही आमची खात्री होतीच. तथापि त्यावेळी कल्पना आली नाही. पण पुढे समजले की आम्ही अमुक ठिकाणी लपलो आहोत अशी बातमी लागून आम्हालाच पकडण्यासाठी म्हणून सैनिकांनी भरलेल्या पाच पन्नास चिलखती मोटारी तेथे घाईघाईने पाठविण्यात येत होत्या.

सोलोहेडबेगनंतर इतक्या धोक्याचा कठिण प्रसंग आजचाच. त्या एवढ्या सैन्यातल्या एकाही अधिकाऱ्याच्या डोक्यात संशय येता तर आम्हाला तेथेच राम म्हणण्याची पाळी आली असती. आम्हाला पकडावे आणि बक्षिस मिळवावे म्हणून ब्रिटिश शिपाई नुसते हपापले होते. कित्येकांनी तर आमची वर्णने तोंडपाठ केली होती.

एकामागून एक मोटारींची लांबलचक रांग लागली होती. जणू तिला अंतच नव्हता. प्रत्येकीत शस्त्रास्त्रांनी सुसज्ज शिपाई भरलेले, त्यांच्याबरोबर एकएक मशिनगन. किंचितही भीतीचे किंवा अस्वस्थतेचे चिन्ह आम्ही दाखविणे म्हणजे मृत्यूला आमंत्रण करणे होते. परत माघारी वळण्याची गोष्टच नको. तसा नुसता प्रयत्नही करणे म्हणजे त्या पाच-सातशेंना सरळ

अंगावर घेणे झाले असते. थंड डोके आणि बेफिकिर चेहरा यावर निसटून जाण्याला काय ती आशा होती. डोळ्याची पापणीही न हलवता पहिल्या वीस मोटारी आम्ही ओलांडल्या. एखाद्या राजनिष्ठ नागरिकाप्रमाणे मायबाप सरकारच्या शूर सैनिकांकडे कुतुहलाने आणि कौतुकाने बघत बघत आम्ही पुढे जात होतो. आम्ही बरेच पुढे आलो आणि निभावले म्हणून मनावरील दडपण कमी होतेसे वाटू लागले. इतक्यात कोपऱ्यावर वळताना Halt म्हणून कर्णकटू आवाज आला. पुढे संगीन रोखून एक सैनिक उभा होता. आमच्या ड्रायव्हरने ब्रेक लावले, गाडी ताबडतोब थांबली.

आता ध्यानात आले की एवढ्या पुढे आम्हाला का जाऊ देण्यात आले! मोटारींच्या रांगेच्या मध्ये आणून आम्हास सापळ्यात पकडावयाचे होते. कुत्र्याच्या मोतीने आम्हास मारावे हा हेतू होता. मोठे डोक्याचे काम होते नि:संशय! पण आयरिश लोक शरण जात नाहीत. शूराचे मरण ते पत्करतील. आम्हीही ठरविले की, जिवावर बेतलेच आहे! अधिकाधिक शत्रूचे बळी घ्यायचे, मग होईल ते होईल.

मी रिव्हॉल्व्हर काढले. थंडीसाठी पांघरूण खांद्यावरून घेतले होते. आतल्या आत रिव्हॉल्व्हरच्या घोड्यावर बोट फिरू लागले. विचार करू लागलो की, पहिली गोळी नेमकी कोठे मारावी. रिव्हॉल्व्हर उचलणार तोच एक अधिकारी भरभर पावले टाकीत आला. ''आय एम सॉरी. तुमची खोटी होते आहे खरी, पण माझा इलाज नाही.''

आम्हाला घेरण्याचा डाव असावा असे दिसेना. मी रिव्हॉल्व्हर खाली केले आणि ऐकू लागलो. त्या सैनिकांच्या तुकडीचा तो कॅप्टन होता. ''काय करावे, दोन मोटारी वाटेतच मोडून पडल्या असल्याने रहदारी चालू राहणे अशक्य झाले आहे. तुमचा खोळंबा होतो आहे हे खरे, पण उपाय नाही. तुम्हाला उतरून पायी चालावे लागेल. मोटारही ढकलत न्यावी लागेल.''

हे तो बोलत होता तेवढ्यात मी स्वत:ला सावरले. मी त्याला गोड भाषेत पण स्पष्ट सांगितले, ''आम्हाला फार महत्वाचे काम आहे, त्याची वेळ टळता कामा नये. आणखी उशीर होण्याने फार नुकसान होईल. फार दूरवरून आलो आहोत. मी संधिवाताने आजारी असूनही कामाच्या महत्वामुळे हा प्रवास पत्करला. या लांबच्या प्रवासाने थकून गेलो. हाडन् हाड खिळखिळे झाले आहे. यापुढे चालणे शक्य नाही.''

माझ्या या सभ्यपणाच्या बोलण्याने त्याच्यावर बरा परिणाम झालेला दिसला. मोटारीतून प्रवास करणारा आयरिश गृहस्थ म्हणजे कोणी बडा असामी आहे असे ब्रिटिश अधिकाऱ्यांना त्यावेळी वाटे. जर त्याच्याशी उद्धटपणे वागले तर लगेच त्याचे प्रतिध्वनी पार्लमेंटात नावनिशीने उठतील ही त्यांना भीती असे. तो सैनिकांकडे वळला. तीन-चार सैनिकांस त्याने रायफल्स खाली ठेवून मोटार ढकलण्यास सांगितले. त्या मोडलेल्या मोटारींना वळसा घालून परत मोठ्या रस्त्यावर येईतो सुमारे २०० यार्डापर्यंत त्यांनी आम्हास ढकलीत नेले.

ते आम्हास ढकलीत असताना मला अशी भीती वाटत होती की, माझे तोंडून हसे फुटते की काय. विलक्षण हसू येत होते मला त्या वेळी. चक्क ब्रिटिश सैनिकांची तुकडी मदत करीत होती आम्हाला! आम्हाला म्हणजे कुणाला? तर ज्यांना हुडकण्यासाठी, पकडण्यासाठी रात्रंदिवस जीवाचे रान हेच ब्रिटिश सैन्य करीत होते त्यांना! या अधिकाऱ्याला नंतर याबद्दल विचारले असते तर त्याचे तोंड पाहाण्यालायक झाले असते. मॉर्निंग पोस्टसारख्या वर्तमानपत्रात हा मथळा किती शोभला असता! ''पाहिजेत! पाहिजेत! ब्रिटिश सैनिकांनी ज्यांना निसटून जाण्यात नुकतीच मदत केली ते फरारी क्रांतिकारक पाहिजेत!!!''

त्या सैनिकांचे आम्ही भरपूर आभार मानले. ''आणिक मोटार ढकलण्याची आवश्यकता नाही. तुम्हाला उगाचच त्रास पडला. आम्हाला त्याबद्दल मनापासून वाईट वाटते'' असेही वर म्हटले. ''अच्छा! नमस्ते!'' करून फोयनेसच्या दिशेने मोटार भरधाव सोडली. नंतरच्या पंधरा मिनिटांत सपाटून वेगाने मोटार हाणली. न जाणो, फिरून त्या वेड्यांच्या डोक्यात संशय यावयाचा आणि कदाचित् आमच्या मागे ते लागायचे. त्यांना मागे टाकल्यावर आम्ही पोटभर हसून घेतले. ही पहिली वेळ, फरारी झाल्यापासून ब्रिटिशांची मदत मिळाल्याची ही पहिलीच वेळ. पण काही शेवटची नाही. आणखी अनेकदा त्यांच्या बिनडोकपणाने अशा अडचणींतून सुटून त्यांचे कृतज्ञ होण्याचे प्रसंग आमच्यावर आलेले आहेत.

●●●

## ९. परत सोलोहेडबेग; नव्या मोहिमेचा विचार

त्या संध्याकाळी आम्ही आमच्या इच्छित स्थळी, धर्मोपदेशक मित्राकडे येऊन पोचलो. त्याने आमचे मन:पूर्वक स्वागत केले. आम्ही सुखी, आनंदी असावे यासाठी त्याची एकसारखी धडपड चाललेली असे. घरकाम पाहणारी मोली हिचीसुद्धा आमच्यावर आईसारखी जपणूक असे. ती म्हणजे काहीशी हुकुमशहाच होती म्हणाना. तिची हुकुमत अर्थात आमच्या भल्यासाठीच असे. पोटभर जेवूखाऊ घालून ती आम्हाला लगेच झोपण्यास पाठवी. दोन दिवस आमचा जेवणे आणि झोपणे आणि जेवणे एवढाच कार्यक्रम. वर्तमानपत्रे पांघरावयाची आणि घाणेरड्या कडब्यावर तर कधी कधी ओल्या गवतावर झोप घ्यावयाची, आणि मग दंवाने सकाळी अंग ओले व्हावयाचे अशा सगळ्या आठवणी अगदी ताज्या असल्याने, आमचे मित्राचे घरी आल्यावर जे आम्ही पलंगावर अंग टाकून मऊ मऊ गादीत अगदी गुरगटून पडायचे ते एरव्ही उठतोच कशाला!

दोन दिवसांच्या विश्रांतीनंतर मला पुन्हा हुशारी आली. पण हॉगनची स्थिती काळजी करण्यासारखीच होती. मोलीच्या आपुलकीचे व प्रेमळपणाचे वर्णन काय करावे? आमची व्यवस्था नीट असावी, आम्हास गोड वाटावे यासाठी सारखे काहीना काही तिचे चाललेले असे. तिच्या हातच्या स्वयंपाकाची गोडी काही विशेषच होती. तिच्या हातचे अन्न आणि तिचा प्रेमळपणा यामुळेच आम्ही ठीकठाक झालो. ती सदैव हसतमुख असे. आणि तिच्या बोलण्यात एकप्रकारे विनोदाचा खटका असे. बोलता बोलता ती असे चिमटे काढी आणि मग स्वत:च हसू लागे आणि आम्हालाही पोटभर हसायला लावी. तिचे बोलणे, हसणे हेच आम्हाला औषध होते. गेले काही महिने जी वागणूक आम्हाला मिळाली होती त्यापेक्षा येथील वागणूक किती निराळी! इतके दिवस लोक आमच्याशी बोलायला आलेच तर कुजबुजण्यापलीकडे त्यांचा आवाज जायचा नाही. आम्हाला ओळखण्याची काही खूण करण्यासाठी त्यांच्या जिवाची जी घालमेल होई ती पाहून आम्हाला हसू कोसळे. रस्त्यात आमची गाठ पडली तर आम्हाला नमस्कार करण्यापूर्वी ते मागे पुढे, उजवीकडे-डावीकडे, खाली-वर, एकदा सगळीकडे बघून घेत. जवळ कोणी नाही ना, मग नमस्कार! पुष्कळ घाबरायचेच, न जाणो त्यांनी आम्हाला नमस्कार केला आणि आम्ही लगेच पकडले गेलो तर? त्यांचेवर संशय येणार!! त्यात थोडे हेही असे की, आपला संशय आला, आपण धरले गेलो, आपल्याला टिकून राहता आले नाही, मग? मग पोलिसांना आपण बातमी सांगणार, फितुरी पदरात येणार, त्यापेक्षा नमस्कार नको. फितुरीचा तिरस्कार प्रत्येक आयरिश माणसाच्या रोमरोमी भरलेला आहे.

आम्हाला ओळखल्यावर काहींच्या डोक्यात जी भीतीची छटा दिसे ती फारच गमतीदार असे. हे खरे की, आमचाही अवतार तसाच असे. केस वाढलेले आणि दाढीचा वस्तऱ्याशी कित्येक आठवड्यांत संबंध आलेला नसायचा! आम्ही तरी कसे करणार? मागे सरकारची सेना लागलेली, वर दहा हजार पौंडाच्या बक्षिसाची लालूच. कुठे जाणार, कुठे धडपडणार आणि त्यातही चेहरा तुकतुकीत दिसावा म्हणून कुठे काळजी करणार?

अशा स्थितीत मोलीचा प्रेमळ स्वभाव आणि विनोदाने खळखळणारे भाषण आम्हाला अमृताप्रमाणे वाटले तर नवल काय? आणि ती जशी प्रेमळ तशीच धीराची बाई होती. निराशेने मन क्वचित खचून जाई तेव्हा ती धीर देई, मनातील आशेला फुलवी. तिच्या मनाचा ठाम विश्वास की आम्हाला कशाचीही भीती नाही आणि परमेश्वर आमच्या शत्रूपासून आमचे रक्षण करील. ख्रिस्ताच्या मूर्तीसमोर आमच्यासाठी ती नंदादीप ठेवीत असे. त्याला नवस करीत असे. आणि देवाची प्रार्थना प्रत्येक दिवशी करीत असे.

पण आमचे धर्मोपदेशक मित्र? मोली एकपट धीराची तर ते दसपट धीराचे होते. फरारी बंडखोरांना आपल्या घरी ठेवून घेण्यात जो व्यय होई त्याची त्यांनी कधीच पर्वा केली नाही. आम्ही हवे तितके दिवस त्यांचे घरी राहावे, काय मीठभाकरी असेल ती खावी, त्याचा कुठलाच प्रतिबंध नव्हता. त्यांच्याकडे जे होते, जे त्यांना मिळण्यासारखे होते ते सर्व आमच्या दिमतीस दिलेले होते. या सर्व

सुखसोयी आम्ही अनुभवल्या आणि वाटले की इथेच आणि काही दिवस राहावे. पण एकाच ठिकाणी, एकाच परगण्यात फार काळ राहणे धोक्याचे होते. शिवाय ऊस गोड झाला म्हणून मुळासकट का खायचा असतो? आमच्या मित्रावर भार तरी किती टाकायचा? त्याशिवाय ठिकठिकाणी हिंडून काही चेतना उत्पन्न झाली तर पाहावी हाही प्रयत्न आम्हास करावयाचा होता. म्हणून येथे काही आठवडे राहून आम्ही रॅथकील येथे गेलो.

येथेच माझा सीन फिनशी प्रथम परिचय झाला. अत्यंत शूर धीरोदत्त, उदार! आयरिश तरुणाचे तो जणू प्रतीक होता. या वेळी नुकतीच मिसरूड त्याला फुटत होती तोच, बटॅलियनचा कमान्डन्ट म्हणून त्याची निवड झाली होती. रोमरोमी एकच एक तीव्र उन्मेषक इच्छा की या आपल्या पुरातन राष्ट्राच्या स्वातंत्र्यार्थ समरांगण गाठावे. या तीव्र इच्छेमुळे त्याचा आवेश कित्येकदा पराकोटीस जाई. अवघ्या दीड वर्षांनी शत्रूशी झालेल्या पहिल्याच लढाईत स्वदेशाच्या कारणी झुंजताना जो कामास आला! अशा शूर सैनिकांना आमचे शतशः नम्र प्रणाम असोत.

रॅथकील येथे फार काळ राहिलो नाही. मनात अस्वस्थता फार होई. वाटे की नवीन चकमक घडवावी. तिकडे सीन ट्रेसी आणि रॉबिन्सन यांची डब्लिनला काय स्थिती होते याची काळजी होती. आम्ही वर्तमानपत्रे पाहात असू आणि आजच्या दिवसापर्यंत ते सुखरूप आहेत असे समाधान मानीत असू. शेवट त्यांच्याकडून पत्र येण्याजाण्याचे जमले आणि चौघांनी एकत्र येण्याचे ठरले. त्यानुसार सीन हॉगन व मी दक्षिण टिप्परेरीच्या कड्यावर पुन्हा एकदा सोलोहेडबेगपासून ६-७ मैलाच्या अंतरावर लॅकेली येथे मेघॅर यांच्या घरी आलो. थोडक्याच दिवसांत, आणखी पंधरवड्याने येथून थोड्याच मैलांवर नॉक लॉंग येथे विलक्षण रोमहर्षक प्रसंग अनुभवण्याचा योगायोग होता.

लॅकेली येथे ट्रेसी आणि रॉबिन्सन यांची पुन्हा भेट झाली. शाळकरी मुले सुट्टीत उंडारायला निघाली असावीत असा धांगडधिंगा आम्ही एकमेकांना भेटल्यावर घातला. आम्ही चौघे एकत्र आल्यावर निराशेची अभ्रे पार कोठच्या कोठे पळून गेली. आम्ही फरारी क्रांतिकारक; आम्हाला पकडण्यासाठी हजारो पौंडाचे बक्षीस लावलेले, सरकार आमची पारध करण्यास टपून बसले आहे, या साऱ्या गोष्टी आम्ही विसरलो. रात्रभर बोलण्यास खीळ नव्हती. काय काय प्रसंगांतून कसेकसे एकमेक निभावलो ते एकमेकांना सांगितले. रॉबिन्सन आणि ट्रेसी अगदी उघडपणे डब्लिनला गेले होते. तेथे किती मौजेत वेळ घालविला याचे वर्णन त्यांनी केले. आम्हीही आमच्या धर्मोपदेशक मित्राकडे कसा पाहुणचार घेतला याची हकीकत तिखटमीठ लावून सांगितली. ती हकीगत ऐकून त्यांना आमचा हेवा वाटू लागला. शिवाय ब्रिटिश शिपायांच्याकडून आम्ही मोटार कशी ढकलून घेतली याचे रसभरीत वर्णन आम्ही केले. ते ऐकून रॉबिन्सनला स्फुरण चढले. आणि असाच एक प्रसंग त्यांच्यावर गुदरला होता, त्याची हकीगत त्याने सांगितली. टिप्परेरीहून ते डब्लिनला मोटारीतून जात असताना मेरीबरोच्या तुरुंगापाशी त्याची मोटार बंद पडली. लगेच जवळचे शिपाई तेथे धावत आले आणि त्यांनी साहाय्य करून पुन्हा मोटार चालू केली. डब्लिनमध्येही पुष्कळ निरनिराळ्या प्रसंगांतून ते बचावले होते.

मध्यंतरीच्या काळात पोलीस व लष्कर आम्हाला पकडण्यासाठी सर्व टिप्परेरी परगणा धुंडीत होते. पळवून नेलेला दारूगोळा कुठे पुरला आहे हे शोधण्यासाठी ठिकठिकाणच्या बागांना त्यांनी खणती लावली. आमच्या घरांवर व नातेवाईकांच्या घरांवर सदैव गुप्त पोलिसांचा पहारा होता. आणि आम्ही ज्या मित्रांकडे जात असू त्यांच्या घरांची वारंवार झडती घेतली जाई. असे भोवती वातावरण असतानाही आम्ही ठरविले की असेच निष्क्रीय राहणे फुकट आहे. सोलोहेडबेगच्या चकमकीने खळबळ उत्पन्न झाली, आयरिश स्वयंसेवकांनी काय करावे हे सूचित केले गेले खरे; पण आम्ही असेच गुप्त राहिलो तर सर्वच परिणाम वाया जाईल. त्या वेळेपासून आजपर्यंत तीन महिने व्यर्थ गेले असे मनास खाऊ लागले. आयरिश रिपब्लिकन आर्मी -आर्मी हे नुसते नाव होते कागदावर -बोलायला संघटना भली मजबूत होती. प्रत्येक परगण्यात त्याची ब्रिगेड व बटालियन्स होत्या -शस्त्रास्त्रे नव्हती असेही नाही. पण याचा काय उपयोग? नावाचे सैनिक खूप आहेत पण त्यांचा सैनिक म्हणून उपयोग मात्र नाही. तेल लावून घासून पुसून ठेवलेल्या बंदुका आहेत पण त्यातून गोळी तेवढी

सुटावयाची नाही. त्याचे करावयाचे काय? आमचे लोक धैर्यात किंवा पराक्रमात कमी होते असे नव्हे, तर त्यांना पुरेशी चालना -गती मिळणे अवश्य होते. जास्तीत जास्त ते काय करीत? -तर तुरुंगात जात. देशाच्या कोना-कोपऱ्यांतूनही लोक स्वखुशीने सैनिकशिक्षणासाठी आणि शस्त्रे जवळ बाळगण्यासाठी तुरुंगात जात होते. पण त्यांच्या हे ध्यानात येत नव्हते की तुरुंगात जाण्यापेक्षा शस्त्रांचा प्रत्यक्ष उपयोग करणेच श्रेयस्कर आहे.

तुरुंगात जाऊन स्वस्तात देशभक्ती साधण्याचे हे पुण्यकर्म थांबलेच पाहिजे असे आमच्या मनाने घेतले. आम्हाला खरेखुरे सैनिक हवे होते. तेथे बाजारबुणग्यांच्या थापेबाजीचा काय उपयोग? शे-पाचशेच पण निवडक असे लोक असल्या संघटनेपेक्षा परवडले की! आम्हाला वाटले की सोलोहेडबेगच्या चकमकीचे अनुकरण सर्व देशभर आपोआप होईल, पण अनुभवाला त्याची कोठे पुसट आठवण आढळे इतकेच.

या मन:स्थितीत एक प्रकारे निश्चयी विचाराने चार दुचाक्या मिळवून आम्ही सरळ सोलोहेडबेगवरून डोनेहिलकडे निघालो. परत जेथे पहिली लढाई आम्ही खेळलो त्याच रस्त्यावरून निघालो. शत्रूच्या ऐन जाळ्यात आम्ही शिरत होतो. सोलोहेडबेगच्या खाणीजवळ थोडा वेळ थांबलो. जानेवारीच्या एकवीस दिनांकानंतर प्रथमच त्या जागी आज येत होतो. किती कल्पना मनात आल्या! ती टेकडी, -ज्या वाकणावर प्रथम पोलिस दिसले ते वाकण, अनंत विचारांच्या लहरी उमटून जात होत्या! या ठिकाणी आम्ही पुन्हा दिसू असे भोवतालच्या लोकांच्या स्वप्नातही न येणे साहजिक होते. कारण मागपासून पायंडा असा पडलेला होता की कोठे चकमक उडाली की त्यात भाग घेणाऱ्यांनी सरळ अमेरिकेला परागंदा व्हावयाचे. आमचे मुलुखावेगळे काम होते. आम्हाला एक प्रसंग घडवून थांबायचे नव्हते. जो हेतू मनात धरून हा उद्योग आरंभिला त्यात ''देहं वा पातयेत् कार्यं वा साधयेत्'' -नव्हे ''देहं वा पातयेत्'' हेसुद्धा नाही. हा उद्योग यशाला नेणे हेच करावयाचे होते.

डोनोहिल येथे होरन यांचे घरी आम्ही गेलो. आम्ही यमलोकातून परत येत असावे अशी त्यांची पहिली कल्पना झाली. नंतर आम्ही भूतपिशाच्च नाही याची खात्री पटल्यावर त्यांच्या घराण्याला शोभेल असे आदरातिथ्य त्यांनी केले. रात्रभर चेष्टा, मस्करी, खोड्या, दंगा यांत सर्व दंग होतो. सावधगिरी म्हणून घरचा कोणीतरी एकजण बाहेर ठेवला होता. दुसऱ्या दिवशी रात्रीपर्यंत आम्ही तेथे थांबलो.

माझे घर तेथून एका हाकेवर होते. साहजिकच आईचा आशीर्वाद घेण्याची संधी मी कशी दवडेन? मला आकस्मिक आलेले पाहून तिला आश्चर्याचा धक्काच बसला. आमच्या धावाधावीत मी तिला बोटभर चिठ्ठीसुद्धा पाठवू शकलो नाही -पाठविली नाही. पोस्टाने पत्र पाठविणे दूरच राहिले. कारण घरी जाणारे प्रत्येक पत्र पोलिसांच्या हातून जाणार. अशी चिठ्ठी त्यांच्या हाती येती तर आईचे त्यांनी काय केले असते याची कल्पनाही सहन होत नाही. पंचवीस वेळा घरावर छापे आले. घरच्या वस्तूंची नासाडी करून पोलिसांनी निघून जावे. काही वेळा तर रात्री अपरात्री, दिवसातून तीन तीन वेळा झडती येई, पण माझी आई अतिशय धीराची होती. तिच्या चेहेऱ्यावर चिंतेची छटाही उमटली नाही. तिला नमस्कार केल्याने व तिच्याशी बोलण्याने मला नवा उत्साह आला. घरी अधिक वेळ थांबणे धोक्याचे झाले असते. म्हणून काही वेळाने तिचा आशीर्वाद घेऊन निघालो.

आपल्या मुलाला स्वदेशप्रेम शिकविण्याच्या गुन्ह्याबद्दल तिला भरपूर शासन दिले जात होते. घर लुटले गेले, इतकेच नाही तर घराला आग लावण्यात आली. कोंबड्यांना आणि पिलांना बागनेटांनी भोसकण्यात आले; तथापि तिचे मन कधीच खचले नाही. शत्रूच्या अधिकाऱ्यांना समोरासमोर प्रत्युत्तर करून फजीत करण्यात तिने कधी मागे घेतले नाही. एकदा पोलिसांनी ''तुझा मुलगा घरी आहे वाटते.'' असे विचारले असताना ती म्हणाली, ''तो घरात असता तर तुम्ही उंबरठ्यात पाऊल टाकण्याचे धाडस केले असते का?'' दुसऱ्या एका प्रसंगी असाच प्रश्न विचारला असता ती म्हणाली ''हो; माडीवरून तो खाली येत आहे. आत या की.'' हे आमंत्रण देताच आलेल्यांची गाळण उडाली. जो तो काही तरी आडोसा शोधू लागला.

●●●

## १०. सीन हॉगनला पकडले

डोनोहिल येथून आम्ही रॉसमूरला आणि तेथून रॉसग्रीनवरून क्लोनमेल येथे आलो. आयरिश रिपब्लिकन आर्मीचे हे साऊथ टिप्परेरी परगण्याचे मुख्य ठिकाण होते. या परगण्यात आम्ही अनेक दिवस राहिलो. उद्योग चालू होता. आयरिश रिपब्लिकन आर्मीच्या ठिकठिकाणच्या अधिकाऱ्यांच्या भेटी घेतल्या. ते आमच्याच ब्रिगेडमधील होते. त्यांच्या कल्पना काय काय आहेत याची चौकशी केली, आमच्या कल्पना त्यांना सांगितल्या. प्रत्यक्ष उद्योगाला गती आणण्याचे काम निर्धाराने स्वीकारले पाहिजे हे पुन:पुन्हा सांगितले.

क्लोनमेलच्या आसपास असताना एके दिवशी सकाळी एक चमत्कारिक प्रसंग ओढवला. मध्यरात्री मी दुचाकीवरून एके ठिकाणी जात असता समोरून एक दुचाकीवाला जो वेगाने आला त्याने सरळ मला टक्कर दिली. दुचाकीचे हँडल छातीवर आदळले. मी दूर फेकला गेलो आणि रक्ताच्या गुळण्या येऊ लागल्या. मला वाटले की आता निभत नाही. ऐन युद्धात शत्रूच्या गोळीने मरण येते तर त्याला मी भीत नव्हतो, पण अपघाताने -दुचाकीच्या धक्क्याने मरण यावे काय? तशा स्थितीत पोलिसांनी ओळखावे आणि ठोकरावे, यात अब्रूचे पुरतेच धिंडवडे निघाले असते. पण हळूहळू मी भानावर आलो. अशा प्रसंगी स्वत:ला सावध ठेवून, स्वत:ला सावरण्याची सवय लागलेली होती त्याचा उपयोग झाला. थोडक्याच अवधीत पुन्हा दुचाकीवर बसून मी चालू लागलो.

१९१९ च्या १० मे ला आम्ही परत रॉसमूरला आलो. सोलोहेडबेगच्या प्रसंगाला सुमारे चार महिने होत आले होते. कसे तरी करून आम्ही दिवस निभावून नेत होतो. झोपले तर झोपले नाही तर नाही, जेवले तर जेवले नाहीतर फाक्या. मला वाटते प्रसंगांनी मन आणि शरीरही खंबीर होतात. आमच्या शरीराला हेही मानवू लागले. रॉसमूरला आलो तेव्हा ओळीने चार दिवस झोप नव्हती, पण आम्ही नित्याप्रमाणे आनंदी व उत्साही होतो. थोडी झोप मिळाली तरी पुढचे चार दिवस झोपेशिवाय चालेल. तो वाटेत कोणी म्हणाले की, जवळच इमॉन डुरकडे नृत्याचा कार्यक्रम आहे. आम्हाला मोह पडला की जावे नृत्याला. भोवतालची संकटे आम्ही विसरलो, श्रम विसरलो, सर्व विसरलो. धोका असला तर असला असे म्हणून आम्ही इमॉन डुरच्या घराकडे मोर्चा वळविला. गेल्या किती दिवसांत नृत्याचे सौख्य आम्ही अनुभवले नव्हते!

आमच्या मित्राचे घरी आम्ही पोचलो. उत्साहात, उल्हासात एका क्षणात आम्ही रंगून गेलो. जणू देहभान विसरलो. एका रात्रीपुरते का होईना, पण इतक्या दिवसांच्या लपाछपीनंतर अगदी मोकळेपणाने, उघडपणाने उमलत्या बागडत्या खेळत्या आनंदी मित्रांत स्वैरपणे नाचणे अननुभूत असे वाटले!

नादमधुर संगीत भावनांना थुईथुई नाचायला लावी, तर मधून मधून समोर येणाऱ्या स्वादिष्ट व रुचकर पदार्थांची माधुरी मनात रेंगाळत राही. मनावरचे दडपण अजिबात गेले. जेथे 'मार्शल लॉ' पुकारला त्याच्या गाभ्यात आम्ही होतो. पाचपंचवीस ब्रिटिश शिपायांच्या तुकड्या सारखा शोध घेत आहेत, छापे घालताहेत, घरे धुंडाळताहेत, आम्हाला पकडण्यासाठी ही आटापीट चालले! इकडे आमचे हसणे खिदळणे मनमुराद चाललेले! मित्रांच्या आणि मैत्रिणींच्या बरोबर मोठमोठ्याने बोलतो आहोत, हिंडतो आहोत, खेळतो आहोत! आम्ही काळजी विसरलो -सर्व काळजी विसरलो!

आम्ही कोण हे भोवतालच्या तरुणांनी किंवा मुलींनी ओळखले होते. त्यांनी मनात आणले असते तर मागच्या काही लोकांच्या पावलावर पाऊल टाकून, किंवा तशाच मनोवृत्तीचा पुढच्यांना धडा म्हणून, केवळ मागच्या दाराने मागेच सटकायचे. पोलिस दूर नव्हते. आम्ही इथे आहोत येवढेच म्हणायचे आणि खुशाल १०००च्या नोटा खिशात टाकायच्या. पण असला विचार यांपैकी एकाच्या मनातही आला नाही. आम्हालासुद्धा त्यापैकी कोणाबद्दल अंदेशा आला नाही. कोणालाच नाही. ते सर्व खऱ्याच आयरिश रक्ताचे होते. उदक सुटलेल्या त्या पैशाला स्पर्श करण्यापूर्वी प्रत्येकाने आपले हात कापून दिले असते. आयरिश लोकांत अनेक दोष असतील, क्वचित कोणी नासके

आढळतीलही... पण फितुरीची पैदास त्यांच्यात कधीच होत नाही.

रात्रभर नाचलो आणि पहाटेच्या सुमारास काही मित्रांना घेऊन मी रॉसमूरला आलो. बाकीचे तिघे माझेबरोबर न येता तेथेच काही वेळेकरिता राहिले. संकेत असा केला होता की, सर्वांनी ओकीफकडे यावयाचे आणि ताणून द्यावयाची. मी तेथे आल्यानंतर थोड्याच वेळात रॉबिन्सन आणि ट्रेसी यांनी प्रवेश केला. सीन हॉगन त्यांच्याबरोबर दिसला नाही. तथापि त्यात कोणालाच काळजीचे कारण दिसले नाही. दोनच दिवसांनी त्याचा वाढदिवस होता. १८वे वर्ष त्याला लागणार, पण स्वत:ला सांभाळण्याच्या , निभावून नेण्याच्या त्याच्या तयारीबद्दल प्रश्न नव्हता.

आम्ही तर पार थकून गेलो होतो. पाच दिवसांचे जागरण आणि या रात्रीचे नृत्य. ट्रेसीच्या भाषेत बोलावयाचे तर ताटीवरसुद्धा आम्हाला झोप लागली असती. येथे मऊ मऊ गाद्या आणि उश्या ठेवलेल्या. निमिषार्धात आम्ही झोपी गेलो.

मला असे वाटले की, फार दूर अंतरावरून कोणीतरी बोलते आहे. पॅट्रिक किनॅनचा आवाज असावा असे वाटले. किती दूरून येत होता आवाज. मी डोळे उघडले नाहीत. पण कोणीतरी मला गदगदून हलविले, जागे केले -मला ऐकू आले की, हॉगनला पकडले, पोलिसांनी पकडले. अं....मी खडबडून जागा झालो. किनॅन खरेच माझ्यासमोर उभा होता, आणि म्हणत होता, ''हॉगनला पोलिसांनी पकडले.''

काय, पकडले? तो गोळ्या लागून पडला यावर एकवेळ विश्वास बसता, पण त्याला पकडले? चेष्टा नव्हती ना ही? मी ट्रेसीकडे पाहिले -तोही उठून बसला होता. त्याच्याकडे पाहिले आणि ध्यानात आले की, ही चेष्टा नव्हे. झोप उडाली. पार उडाली. थकवा पळाला. एकच विचार, त्याला सोडवून आणले पाहिजे -मग त्या प्रयत्नात मृत्यू आला तरी बेहत्तर. हॉगनच्या जागी आमच्यातला कोणीही तेथे असता तरी राहिलेल्या तिघांचा हाच निश्चय झाला असता. आमच्या पाठोपाठच तो निघाला होता. थोडा वेळ चालतो न चालतो तोच १० पोलिसांनी त्याला एकाकी वेढले. त्याच्याजवळ नित्याप्रमाणे पिस्तूल होते, पण ते हातात घ्यायलाही अवसर मिळाला नाही. आमचे प्राक्तन खंबीर. हाती सापडलेल्याला ठार करून तो पळून जाण्याच्या प्रयत्नात गोळीने मृत्यूमुखी पडला असे प्रसिद्ध करण्याची युक्ती ब्रिटिशांना अजून उमगली नव्हती. या युक्तीने त्यांना कैद्यांना थंडपणे मारता येऊ लागले. हा खेळ करण्याची पद्धत आज असती तर हॉगन फिरून दिसला नसता. त्याला सोडविण्याचे बेत करण्याचीही आवश्यकता नव्हती.

आता त्याला पाहावयाचे कोठे? अजून रस्त्याने हिंडणाऱ्या कोणालाही गोळी घालण्याची प्रथा यावयाची असली तरी मार्शल लॉ होताच. त्यामुळे रात्री सहसा कोणी बाहेर पडत नसे. चुकून दृष्टीपथात पडलेच तर प्रश्न उपप्रश्न -तुरुंगाचे सौख्य वाट्यास यावयाचे हे ठरलेलेच होते. अशात बाहेर पडणेही मुष्कील, मग हॉगनला पकडल्यावर त्याला नेले कोठे हे पोलिसांच्या पातळीवर राहून पाहणार कोण? थर्लस -टिप्परेरी -कॅशेल कोणत्याही ठाण्यात त्यांनी हॉगनला नेले असेल, समजणार कसे? डोके फिरून जाण्याची वेळ आली. आम्हा तिघांपैकी कोणीही हॉगनच्या ऐवजी त्याची जागा आनंदाने घेतली असती. आम्हा चौघांत तोच धाकटा होता. तो आता जवळ नाही म्हटल्यावर त्याचे सर्व गुण एकदम आठवू लागले. तो असताना हे गुण कधी आमच्या ध्यानात आले नाहीत. त्याचे आम्ही कधी कौतुक केले नाही....पण आता त्या गोड मित्राला केव्हा पाहू असे झाले.

आम्ही सर्वत्र चौकशी, धावाधाव करू लागलो. दुचाकीवरून सर्व रस्त्यांनी लोक पाठविले कुठे माग लागतो का पाहावयाला. त्या उचल्यांना भरपूर अवधी मिळाला होता. निराश होण्याची वेळ आली. काही समजेना. तो अखेर निरोप आला की थर्लसच्या ठाण्यात त्याला नेले आहे म्हणून.

तेथून त्याला सोडवून आणणे म्हणजे मृत्यूच्या जबड्यातून आणण्यासारखे होते. थर्लस हे मोठे गाव आहे. पोलिस तेथे बरेच असतात आणि लष्करही मोठे होते. पोलिस ठाणे मजबूत होते, आणि पोलिसही दक्षपणे ते सांभाळीत असत. असे केल्याविना त्यांचे भागलेच नसते. ते अशा ठिकाणी होते की, जेथून लवकरच प्रचंड धुमश्चक्री

सुरू होणार. डब्लिन ते कार्क या मुख्य रस्त्यावर ठाणे आहे. सरळ जाऊन ठाण्यावर हल्ला करावा -तडाख्याने एकदम आत प्रवेश करावा -या कल्पना साध्य होतील असे तीळभर वाटेना. आधीच ठाणे मजबूत, त्यात सोलोहेडबेगच्या प्रकरणापैकी चौघांतील सीन हॉगन येथे पकडून ठेवलेला. मग बोट शिरकवणे कठीण अशी काळजी त्यांनी घेतली नाही तरच नवल.

त्यातूनही आशेला किंचित जागा होती. थर्लस येथेच त्याला फार काळ ठेवतील हे शक्य नव्हते. प्रारंभिक चौकशीपुरता आणि चौकशीसाठी मुदत मिळेपर्यंत एक दोन दिवस पोलिसठाण्यात कैद्यांना ठेवतात. त्यानंतर माउंट जॉय, कॉर्क किंवा दुसऱ्या कोणत्यातरी मोठ्या तुरुंगात लगेच पाठविण्यात येते. टिप्परेरीमधील किंबहुना मन्स्टरमधील बहुश: सर्वांचे- कॉर्कचा तुरुंग हे ठिकाण ठरलेले असे. शंभर टक्के कॉर्कचे तुरुंगात त्याला थर्लसहून आगगाडीने नेणार असे आम्हाला वाटू लागले.

त्यानुसार आमचे बेत निश्चित आखले. ठरवलेल्या वाटेतल्या एमली स्टेशनावर जायचे, गाडी रोखून धरायची, पहारेकऱ्यांचे अंगावर जाऊन आमच्या मित्राला सोडवून आणायचे. एमली हे आम्ही निवडले त्याचे कारण म्हणजे ते लहानसे आहे. पोलिसांचा विशेष प्रश्न नव्हता. मुख्यत: ब्रिटिश सैनिकांचे तेथे ठाणे नव्हते. आसपासचे खेड्यांतून आमचे अनेक मित्र होते. आमच्या ओळखी होत्या. त्याविना स्टेशन तीन परगण्यांचे सीमेवर होते. तीन ठिकाणी तेथून रस्ते जातात -साहजिकच आम्ही निसटल्यावर आम्ही डोंगराकडे गेलो का उत्तरकॉर्ककडे पळालो हा प्रश्न पाठलाग करणाऱ्यांना गोंधळात टाकण्यास होता. आणखी म्हणजे शेजारच्या गॅलबेलो खेड्यातली तरुण पोरं अगदी विश्वासातली होती.

तथापि आगगाडी रोखून धरणे आणि पोलिसांचे तावडीतून आणलेल्या आमच्या मित्राला दूर पळविणे, आम्ही स्वत: दूर जाणे ही कामे केवळ तिघांची नव्हती. त्यासाठी साहाय्य हवे. कुमक आणली पाहिजे. आम्ही लगेच निरोप्या स्वयंसेवक गाठला आणि त्याचेकरवी आमच्या बेताची संपूर्ण हकीगत टिप्परेरी शहराच्या तात्पुरते काम पाहणाऱ्या कमान्डटला कळविली; आणि तातडीने कुमक एमली येथे पाठविण्याबद्दल आज्ञा लिहिली. दूरध्वनिक्षेपक तारेने हे कळवायचे म्हटले म्हणजे आयतेच ब्रिटिशांना कळविणे होते. त्यासाठी निरोप नेण्याआणण्याची व्यवस्था आमची स्वतंत्र असे.

या व्यवस्था पुऱ्या करून, मनाशी नीट आखणी करून सकाळी आम्ही थर्लसहून एमलीला दुचाकीने निघालो. १२ मे १९३९ हा तो दिवस. आमची मने कष्टी होती, दु:खी होती, पण रक्त सळसळत होते, हात शिवशिवत होते. संतापाने डोके भणाणले होते. थर्लसहून सरळ रस्त्याने एमली ३० मैल आहे. पण आम्हाला तो रस्ता टाळून जाणे भाग होते. टिप्परेरी शहरही चुकवायला हवे. म्हणून आडरस्त्याने खाचखळग्यांतून, धुळीतून ५० मैल प्रवास आम्ही केला. आम्हाला डब्लिनचा ११० मैलांचा प्रवास त्रासाचा वाटला नाही. पण हा प्रवास पुरे म्हणण्याची वेळ आली. पाच दिवस झोप नाही. शरीर श्रांत झालेले. दुचाकीवरून जाता जाता झोप लागते की काय असे वाटत होते. पण आपल्या मित्राला सोडवायचे आहे एवढ्याच विचाराने डोळे ताणून पुढे जात होतो. जाता जाता मधेच रॉबिन्सन दुचाकीवरून पडलाही आणि पडला तरी झोपलेलाच होता. त्याला तसा उठविला, दुचाकीवर त्याला घातले आणि पुढे निघालो. डोनोहिलजवळ त्याच्या दुचाकीचे चाक अजिबात बसले, तेव्हा जवळच्या मित्राकडून दुसरी दुचाकी आणून प्रवास पुढे चालू केला.

वाटेत अनेक इतिहासातील आठवणी येत होत्या. ट्रेसी त्याची हकीगत सांगत होता. कोठे डचांचा पराभव केला होता तर कोठे ब्रिटिशांना हाकून दिले होते, कोठे तरी कोणी फरारी झाले होते तर कोठे बंडखोर बंड करून उठले होते. आम्हाला वाटले, त्या थोर पुरुषांच्या रांगेत नव्हे पण मागच्या कोठल्या तरी रांगेत आम्ही खास आहोत.

अशा रीतीने १ मे ला पहाटे ३।। वाजता एमली येथे आम्ही येऊन पोहोचलो. मधे दोन ठिकाणी आम्ही थांबलो. काही निरोप पाठविले. एकदा रॉबिन्सनच्या खिशातून बॉम्ब पडून मोठा आवाज झाला. आम्हाला वाटले की, आमच्यावर हल्ला आला की काय, पण तसे नव्हते. लॅकेली येथे आमच्या जुन्या मित्राकडे, मॅलोनेकडे थांबलो. त्याने मोठ्या प्रेमभराने स्वागत केले. तेथे फराळ झाला. तो हवाच

होता. त्याची बहीण मे मॅलोने हिने स्वत:च निरोप नेण्या-आणण्याचे काम अंगावर घेतले. तिचे साहाय्य बिनमोल झाले. थर्लसहून सीन हॉगनला केव्हा पाठवितात ही बातमी तिनेच थर्लसला जाऊन पाठविली. या धैर्याबद्दलचे बक्षीस ब्रिटिश सरकारने त्यांना लवकरच दिले. ब्लॅक ॲण्ड टॅन्सनी त्यांचे घर उध्वस्त केले आणि दोघांही भावंडांना उचलून तुरुंगात ठेवले.

दिनांक १३ मे सकाळी १० वाजता सीन हॉगनला सोडविण्याची सर्व सिद्धता झाली होती.

●●●

## ११. सीन हॉगनची सुटका, नॉकलाँग स्टेशनवरील द्वंद्व

पहाटे ३।। ला आम्ही एमली स्टेशनवर पोचलो. थर्लसवरून पहिलीच येऊ शकणारी गाडी दुपारी होती. त्याच्या आधी सर्व तयारी होऊन आम्ही टिप्परेरीहून येणाऱ्या लोकांची वाट पाहात राहिलो. जसजशी दुपार जवळ येऊ लागली तसतसा आमचा अधीरपणा वाढत चालला. क्षण तासाएवढे वाटू लागले. दुपारचे ११ वाजले. टिप्परेरीच्या रस्त्यावर डोळे लावून होतो. पण कोणाचेच ठिकाण नव्हते. काय झाले असावे? इतके थोडे लोक आम्ही मागितले ते मिळणे अशक्य होते?... ११।। वाजले; पण कोणाचा पत्ता नाही; गाडी तर दुपारी १२ वाजता यावयाची!

आम्ही तिघेच, पण प्रतिकार केल्याविना सीन हॉगनला हातचे जाऊ द्यावयाचे नाही, हा आमचा निश्चय झाला. त्याच्याबरोबर चार ते आठ पोलिस बंदुका, संगिन, रिव्हॉल्व्हर्स घेऊन असणार, ही खात्री होती; पण त्याशिवायही गाडीमध्ये इतर सशस्त्र पोलिस आणि सशस्त्र सैनिक असण्याची शक्यता होती. आमचा प्रयत्न फसेल ना? चालेल! अशा विचाराने १२ वाजता गाडी भकभक करीत स्टेशनात शिरली आणि आम्हीही आत घुसलो.

घाईघाईने मी एका म्हाताऱ्या बाईवर जाऊन आदळलो. ती पडू नये म्हणून मला दोन्ही हातांनी मिठी मारून तिला सावरून धरावे लागले. मी वेगात असल्याने तशाच स्थितीत दोन-तीन गिरक्या घेऊन जमिनीवर पडलो. पण अधिक बोलण्यास वेळ नव्हता. तसाच उठलो आणि खिशातल्या खिशात पिस्तुल हातात ठेवून प्लॅटफार्मवर धावत निघालो.

पण काय? गाडीत हॉगन नव्हता. आमची विलक्षण निराशा झाली, पण थोडे बरेही वाटले. कारण पुढची गाडी येण्यापूर्वी नवीन मदत आणविण्यास थोडा अवसर मिळाला. तशाच अधीऱ्या मन:स्थितीत आम्ही थांबून राहिलो. लढाई पत्करली पण हा ताण नको अशी स्थिती होऊन गेली. संशयकाल हा धुमश्चक्रीपेक्षा बिकट असतो.

मनाने खिन्न होऊन आम्ही परत आमच्या जागी आलो -सीन हॉगन तर नव्हताच आणि टिप्परेरीहून कोणी येऊ नये या विचाराने निराशेची कटुता वाढली. आणिक कोणास बोलवावे याचा विचार करू लागलो. विचार करता करता सुचले की गॅलटी डोंगरातील बटॅलियनचा काही उपयोग होऊ शकेल. डोंगराळ भागातील तरुण त्यात होते. नुकतेच आमच्या केंद्रकार्यालयाकडून ही बटॅलियन मोडून टाकल्याचे त्यांना कळविले होते, पण आम्हाला त्यांची ओळख होती. त्यांची निधडी वृत्ती, साहसप्रियता आणि उमेद आम्हास चांगली माहीत होती. आमच्या विनंतीला त्यांचा नकार यावयाचा नाही असे वाटले.

पुढची गाडी सायंकाळी ७ ला होती. गॅलटी बटॅलियनच्या मुलांना आम्ही निरोप पाठविला; आमचे काम, त्याचे महत्व, त्यातील संकट या सर्वांबद्दल त्यांना कल्पना दिली. तासाभराच्या आतच त्यांच्याकडून उत्तर आले ''त्यांची पाच मुले पाच वाजता आमच्याकडे येतील.'' इतक्या लगेच आणि होकारार्थी उत्तराचा आनंद हा प्रथमच होता.

त्यांच्या उत्तराप्रमाणे ते तरुणही खरे होते. ठरल्या वेळेच्या आधी म्हणजे ४।। लाच ते आले. नेड ओब्रायन, जेम्स स्कॅबलॉन, जे.जे. ओब्रायन, सीन लिंच, आणि मार्टिन फॉले. दुर्दैवाने मार्टिन फॉलेला दोन वर्षांनी माउंटजॉय या

तुरुंगात या प्रकरणात भाग घेतल्याबद्दल फाशी जावे लागले. त्याच्याबरोबर मेहेर यासही फाशी देण्यात आले. बिचाऱ्या मेहेरचा तर काहीच अपराध नव्हता -या प्रकरणाशी त्याचा किंचितही संबंध नव्हता. तथापि दोघेही मोठ्या आनंदाने फाशी गेले. मातृभूमीची श्रेष्ठतम सेवा करण्याची ही जणू संधीच आम्हाला आहे असे त्यांना वाटले. फासावर जाण्यापूर्वीचा शेवटचा त्यांचा निरोप हाच होता. आयरिश देशभक्तांचे मालिकेत त्यांची नावे कोरली गेलेली आहेत. प्रत्येक आयरिश मनुष्य त्यांचा कृतज्ञ आहे. त्यांचे स्मरण हे आम्हाला पुण्यप्रद आहे.

आम्ही आता आठजण होतो. पाचांच्या जवळ रिव्हॉल्व्हर्स आणि तिघांच्या जवळ शस्त्र नव्हते. परस्परांत थोडा विचार करून आम्ही बेत थोडासा बदलला. सीन ट्रेसी, सीन रॉबिन्सन, मी आणि नेड ओब्रायन अशा चौघांनी दुचाकीवरून नॉकलाँग या पलीकडच्या स्टेशनवर जावयाचे ठरले. नॉकलाँग स्टेशन एमलीसारखेच सुरक्षिततेचे होते. इथे प्रयत्न फसलाच तर मोटारने पुढे ब्लार्ने स्टेशनवर जाऊन पुन्हा प्रयत्न करायचा असाही बेत ठरला. बाकीच्या चौघांनी एमली स्टेशनवर चढून आमचा मित्र कोठे आहे हे हेरायचे आणि नॉकलाँग स्टेशनवर येताच तशी खूण करायची.

आम्ही नॉकलाँगला पोचलो तोच तेथे गाडी एमलीहून सुटण्याची घंटा झाली. आम्ही प्लॅटफॉर्मवरून अगदी शांतपणे आणि सहजतेने येरझारा घालीत होतो. पण खिशातील पिस्तुलावर पक्की पकड होती. काही वेळाने दूर अंतरावरून आगगाडीचा धूर दिसू लागला. थोडक्याच क्षणांनी गाडी प्लॅटफॉर्मवर आली. त्याच वेळेस विरुद्ध बाजूने पलीकडच्या प्लॅटफॉर्मवर दुसरी गाडी आली. दुसऱ्या दिवशी आम्हाला कळले की, ती गाडी सशस्त्र ब्रिटिश सैनिकांची होती. या ऐन चकमकीपासून ते केवळ १५-२० फुटांवर होते. या चकमकीत त्यांनी भाग का घेतला नाही हे  मला कळले नाही. त्यांच्या लक्षात काही येण्यापूर्वीच इकडला कारभार आटोपला असावा.

गाडी पुरतेपणी थांबली नव्हती तोच दोन ठिकाणांहून आम्हास खुणा मिळाल्या. आदल्या दिवशी ठरल्याप्रमाणे थर्लस येथे पोलिस हॉगनला घेऊन गाडीत चढताच आयरिश रिपब्लिकन सैन्यातला एक हेर गाडीत चढला. त्याने खूण केली. आमच्या मुलांनी खुणा केल्याच. एक क्षणही विसंबणे शक्य नव्हते. गाडी केवळ मिनिटभरच येथे थांबते. गाडीच्या सारथ्याला पिस्तुलाने रोखण्याच्या आमच्या बेतात नव्हते.

खुणेने जो डबा दाखविला त्यात सुमारे १२ लहान लहान भाग होते. हे भाग स्वतंत्र होते. सर्वांची दारे डब्याच्या कडेच्या बोळात उघडणारी होती. आमचे डोंगरी मित्र याच बोळात उभे होते. मधल्या एका भागात आम्ही सीन हॉगनला पाहिले. तो बाकाचे मध्यावर इंजिनकडे तोंड करून बसला होता. त्याच्या हातात बेड्या होत्या. एका बाजूस पोलिस जमादार, दुसऱ्या बाजूस एक शिपाई -समोरच्या बाकावर दोन शिपाई. चौघेही सशस्त्र. आता? सीन ट्रेसीकडे आधिपत्य होते. त्याने खुणेचा शब्द देताच गाडी पुरती थांबण्याचे आतच त्या डब्यात आम्ही शिरलो आणि पिस्तुले काढून हॉगनला ठेवले होते तेथे 'हात वर करा- हात वर करा' असे ओरडत आत घुसलो. निमिषार्धापूर्वीच जमादार वॅलेसने हॉगनला उपहासाने आता तुझे डॅन ब्रीन आणि ट्रेसी कोठे आहेत म्हणून विचारले होते. आम्ही त्या प्रश्नाला उत्तर देण्यासाठी स्वत:च दत्त म्हणून उभे राहिलो. ब्रीन आणि ट्रेसी हॉगनच्या हाताशीच होते.

आम्ही आत घुसताच पोलिसांच्या ध्यानात सर्व प्रकार येऊन चुकला. जवळ बसलेल्या शिपायाने -एन् राईट त्याचे नाव- त्याने चट्कन् रिव्हॉल्व्हर काढून ते हॉगनच्या कानाशी धरले. पोलिसांना सक्त आज्ञा होती की, थोडीही गडबड वाटली तर कैद्याला गोळी घालून ठार करायचे. एकच क्षण. आता केवळ हॉगनचे प्राण की एनराईटचे प्राण एवढाच प्रश्न राहिला. तो ट्रिगर ओढणार एवढ्यात त्याच्या छातीतून आरपार गोळ्या गेल्या -मृत्यू तत्क्षणीच आला.

आता हातघाई सुरू झाली. प्रवाशांच्या ध्यानात ही गडबड आली. त्यांची धावाधाव सुरू झाली. प्रवाशांमध्येच एक इंग्लिश सैन्याच्या गणवेशातील सैनिक होता. गणवेश इंग्लिश सैनिकाचा होता, पण हृदय आयरिश देशभक्ताचे होते. आम्हाला यश येतेसे पाहून त्याच्या चेहेऱ्यावर विजयाचे हास्य उमटले. मी त्याचा चेहरा कधी विसरणार नाही. डोक्यावरची हॅट हलवीत तो ओरडला, ''लोकसत्तेचा विजय असो!'' पहिल्या गोळीने कैद्याला गोळी घालून मारणे पोलिसांना अशक्य झाले. त्या गोळीबरोबर

जवळचा पोलिस इतका बावरला की, त्याने खिडकीतून उडी टाकली आणि उधळलेल्या घोड्याप्रमाणे तो पळत सुटला. तो वेडा झाला. एनराईट ठार झाला; दुसरा पळून गेला. जमादार वेलेस आणि रेली, तिसरा शिपाई एवढे तिघे राहिले. गोळीबार चालू झाला. रेली तक्तपोशीवर मेल्यागत पडला. आम्हाला वाटले तो मेला; पण त्याने सोंग केले होते. सार्जंट वेलेस शेवटपर्यंत लढला. असा शूर शिपाई शत्रूच्या सैन्यात आम्ही दुसरा पाहिला नाही. किती तरी वेळा शस्त्र खाली ठेवण्याबद्दल आम्ही त्याला सांगितले, पण तो शरण आला नाही. त्याचे शिपाई त्याला सोडून गेले तरी त्याचा धीर कायम होता. लहानशा जागेत आम्ही बरेचजण असल्यामुळे पोलिसांकडून गोळ्या येत होत्याच; पण आमच्यातीलच गोळ्यांनी आम्ही मरण्याचा संभव होता.

मधल्या वेळात हातकड्या घातलेल्या आमच्या मित्राला बाहेर आणले. आम्ही खाली उतरलो. सार्जंट वेलेस हाही धडपडत प्लॅटफार्मवर आला. मी सभोवार पाहिले, सर्वांनाच जखमा झाल्या होत्या. मलाही गोळ्या लागल्या होत्या. नेमके कुठे आणि किती हे समजले नव्हते, तथापि फुप्फुसात कोठे तरी गोळी शिरली होती इतके समजले. सर्वांगावरून रक्ताचे ओघळ वाहत होते. बाकीच्या तिघांची पिस्तुले चकमकीत पडली. माझे एकट्याच्या जवळ पिस्तुल होते. समोर सार्जंट वेलेस होताच आणि रेली -लुच्चा मरणाचे सोंग घेणारा -आता प्लॅटफार्मवर येऊन त्याच्या रायफलमधून सारखा गोळ्या झाडीत होता. आणिक एक गोळी अंगात शिरली.

या खेपेस ती बरोबर उजव्या खांद्यात घुसली. रेली जर सार्जंट वेलेसइतक्या थंड डोक्याचा असता तर आमच्यातील कोणी तरी तेथेच झोपला असता. माझ्या उजव्या हातातले रिव्हॉल्व्हर खाली गळलेले त्याने पाहिले, दुसऱ्या हाताने मला ते उचलतानाही त्याने पाहिले. असाच प्रसंग आला तर सवय असावी म्हणून डाव्या हातानेही उत्कृष्ट नेम मारण्याचा मी अभ्यास केला होता. मी गोळी झाडली, आणि फिरून गोळी झाडणार तो रेलीने पाठ फिरविली आणि तो प्लॅटफार्मवरून पळाला. इकडे सार्जंट वेलेसही कोसळला -आणि आम्हास कोणताच अडथळा उरला नाही. रेली तरी सुटला, कारण रक्तस्रावाने नेम अचूक मारता येईना म्हणून.

आम्ही त्यांना मागे टाकून हॉगनला सुरक्षितपणे घेऊन निघालो. प्लॅटफार्मवरून सर्व पळून गेले होते. कित्येक उतारूंनी आगगाडीतून उड्या घेतल्या. रात्री एनराईटचे शव किल्मेलॉकला गाडीने नेण्यात आले. सार्जंट वेलेसलाही तेथे नेले. तो दुसरे दिवशी दुपारपर्यंत जिवंत होता. मृतांचे चौकशीचे वेळी रेली तेवढा एकटाच साक्षीसाठी आला. त्याने त्याच्या मताने हकिगत सांगितली. एका पंचाने धिटाईने स्पष्टच म्हटले की ''स्वत:च काही तरी रचून तुम्ही सांगत आहात'' ते शरण येते तर आम्ही त्यांना गोळ्या घातल्या नसत्या असा अर्थ निघू शकेल, अशा प्रश्नांना उत्तरे देण्याची -वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी सरकारी साक्षीदारांना बंदी केली होती. ही चौकशी आणखी विशेष वैशिष्ट्याची झाली. पंचांनी खुनाचा आरोप तर नाकारलाच, पण स्पष्ट शब्दांत त्यांनी त्याचे दायित्व सरकारवर टाकले. त्याचा वृत्तपत्रातील उतारा देतो :- ''देशातल्या सज्जन नागरिकांना पकडणे- लोकांना धाक बसविणे -ह्या गोष्टी निषेधार्ह आहेत. त्याचा अर्थ एवढाच की, हा देश स्वतंत्र झाला पाहिजे. अशा प्रसंगांतून पोलिसांना इरेस घालून संकटात लोटणे याचे उत्तरदायित्व सरकारवरच आहे''.

मला वाटते आमच्या धडपडीचा परिणाम बोलू लागला असावा. सामान्य लोकांच्याही हे ध्यानात आले की आमची लढाई स्वदेश -स्वातंत्र्यासाठी आहे. आमचे पोलिसांशी वैर नाही की शत्रुत्वही नाही. पण जेव्हा ते ब्रिटिश सरकारचे हेर आणि पगारी सैनिक होतात तेव्हा त्यांना तसेच उत्तर मिळणे स्वाभाविकच क्रमप्राप्त होते. तेथे निरुपाय होता.

नॉकलाँगची ही अशी हकीगत आहे. धर्मगुरू, धर्मोपदेशक, वृत्तपत्रे -सर्वांनी त्यावेळी कडकडून धिक्कार केला -दोनच वर्षांनी त्याच लोकांनी आमचा शूर-वीर म्हणून गौरव केला -आणि आम्ही मिळविलेल्या स्वातंत्र्याच्या गोष्टी सांगत ते हिंडू लागले. कालाचा महिमा किती अगाध आहे!

●●●

## १२. नॉकलाँगहून कूच - मी वैद्यकीय कल्पनेवर मरण्याचे नाकारले

आम्ही सुरक्षित निघालो. भोवतालचे लोक भयचकित होऊन इकडे तिकडे लपले. काहींना लपण्याचेही भान राहिले नाही. ते डोळे विस्फारून आमच्याकडे पाहात राहिले. तिथल्या शांत आणि सुरक्षित वातावरणात हा प्रकार भयंकर न वाटला तरच नवल होते. आम्ही नऊ जण, बरोबर बेड्या घातलेला एकजण, त्यात आम्ही चौघे रक्तबंबाळ स्थितीत, अशा थाटाने बाहेर पडू लागलो.

बाकीचे बाहेर गेले. मी मागे राहिलो. पिस्तुलातील शेवटची गोळी झाडल्यावर मी मागे फिरलो. फिरून पिस्तुल भरण्याची आवश्यकता होती, पण उजवा हात अजिबात निकामी झाला होता. फिरून पिस्तुल भरता आले नाही. इमारतीच्या बाहेर एक मोटार कोणा तरी उतारूची वाट पाहात उभी होती. मी रिकामे पिस्तुल ड्रायव्हरवर रोखले. माझा एकंदर अवतारच भीतीप्रद होता. रक्तस्रावाने आणि जखमांमुळे मला धड चालता येईना. बाहेर पडत असता मध्येच भिंतीवर डोके आपटून तेथून रक्त वाहू लागले. धड चालताही येईना, -पडणार असे वाटू लागले. तोच कोणी तरी -खाकी पोशाखातील तो आयरिश -सैनिक मदतीला आला. मला वाटते, डब्यात 'लोकसत्तेचा विजय असो' म्हणून ओरडणारा तो सैनिक आताही आला असावा. मला निश्चित सांगता येत नाही. कारण नंतर कोणी म्हणाले की, खाकी पोशाखात आणखी एक अमेरिकन सैनिक त्या दिवशी स्टेशनवर होता. कोणी का असेना. पण हे त्याचे वाचनात आले तर त्याला समजेल की, मी त्याचा अत्यंत ऋणी आहे, कृतज्ञ आहे. त्यावेळी त्याच्याशी मला बोलता आले नाही, पण मी त्याचा निरंतरचा आभारी आहे.

त्याच्या हातावर भार देऊन लंगडत लंगडत, स्टेशनचे आवाराबाहेर रस्त्यावर मी आलो. त्या शिपायाने जवळ जवळ मला उचलून आणले म्हणाना! माझे भानही त्यावेळी नाहीसे झाले असावे. कारण इमारतीचे बाहेर रोखलेल्या त्या मोटारीचा उपयोग करण्याचे लक्षात राहिले नाही.

बाकी सर्वजण रस्त्यावर होते. जवळून कोण्या खाटकाचा सुरा आणून हॉगनचे हातातील बेड्या त्यांनी तोडल्या. हॉगन पुन्हा एकवार स्वतंत्र मनुष्य झाला. चकमकीत ज्यांना काही लागले नाही. ते त्याला बरोबर घेऊन सुरक्षित जागी गेले. आम्ही बाकीचे चौघे, नेड् ओब्रायन, ट्रेसी, स्कॅनलॅन आणि मी, सॅव्हॅन यांचे घराकडे निघालो. मला या प्रवासाची केवळ पुसट आठवण आहे. काळोख पडू लागला होता. रस्ता आम्हाला नीट माहीत नव्हता. माझे शरीरातून रक्तस्राव सारखा चालूच होता. आम्ही घरी पोचेपर्यंत कित्येक तास गेले असावेत. वाटेत शेतात काम करणाऱ्या मुलांना रस्ता विचारून आम्ही घरी पोचलो. पोचलो तो कोणाचेच अंगात त्राण राहिले नव्हते.

मला ताबडतोब निजविण्यात आले. धर्मोपदेशक आणि वैद्य यांना बोलाविणे पाठविले गेले. दोघेही लवकरच आले. वैद्य मोठे दयाळू होते; पण त्यांचे आणि धर्मोपदेशकाचे दोघांचेही एकमत पडले की, आशा नाही! गोळी फुप्फुसातून आरपार गेली होती आणि रक्तस्राव अतिशय झालेला होता. ''२४ तासांपेक्षा अधिक काळ नाही!'' असे दोघांनीही सांगितले. हे निदान नीरस होतेच. पण २४ तासांत येणारा हा मृत्यू शांतपणे यावयाचा नव्हता.

सॅव्हॅन्स यांच्या घरी आल्यावर हॉगनची सर्व हकीगत कळली, त्याला पकडून थर्लसला नेल्यावर तेथील एकाने त्याला ओळखले. मग पोलिसांनी त्याच्याकडून बातमी काढण्यासाठी शक्य तेवढ्या नीच मार्गाचा अवलंब केला. त्यांना वाटले हा लहान पोर आहे. प्रथम धमक्या दिल्या, त्याचा उपयोग होईना म्हणून धक्काबुक्की केली. नंतर भयंकर मारले. पण या कशाचाच परिणाम झाला नाही. कारण हॉगन हा वयाने पोरसवदा असेल पण नैतिक धैर्य आणि कामाबद्दलची निष्ठा यात कोणालाच हार जाणे शक्य नव्हते. त्यांनी त्याला यातना सोसावयास लावल्या, अत्यंत हाल केले. पण त्याने एक शब्दही तोंडावाटे काढला नाही; - ''नंतर डॅन-ब्रीन आणि ट्रेसी माफी मागून लंडनला पळून गेले. तुला त्यांनी विश्वासघाताने आमच्या ताब्यात दिले आहे'' असे सांगितले आणि त्यापुढे जाऊन ''तुही जर

आणखी गोष्टी सांगितल्यास तर तुलाही माफी मिळेल, वर तुला मोठे बक्षीसही मिळेल, तुलाही बाहेरच्या परदेशात पाठविता येईल.'' अशी लालूच दाखविली. हॉगनला त्याचे मित्र किती एकनिष्ठ आहेत हे माहीत होते; तो कशालाच बळी पडला नाही. पुढे त्याने त्यांचे बोलणे ऐकण्याचेही टाकून दिले. शेवटी १३ दिनांकाला संध्याकाळी त्याला कॉर्कला नेण्यासाठी आगगाडीत बसविण्यात आले. गाडी नॉकलाँगला येईतो सार्जंट वेलेस त्याची अत्यंत हलकट शब्दांनी निंदानिर्भत्सना करीतच होता. स्टेशनवर गाडी येत असताना त्याने उपहासाने विचारले, ''का, कुठे पळाला तुझा डॅन ब्रीन?'' पण नुसत्या शब्दांनी पुरेसे वाटेना म्हणून प्रत्येक प्रश्नाच्या वेळी तो फट्‌कन्‌ शरीरात संगीन खुपशीत असे. लोकांना या गोष्टी माहीत पडत नाहीत. कित्येक राजबंदी अशा शिक्षेच्या गोष्टी सांगू शकतील. लोकांना सार्जंट वेलेसचा मृत्यू दिसतो. पण हा सार्जंट वेलेस कोण आणि कसा होता हे समजत नाही. दुर्दैव आहे! हॉगनला सोडवून आणल्यावर त्याच्या अंगावरच्या जखमा आणि वळ पाहून आमचे अंगावर शहारे आले. भयंकर क्रोध आला. वाटले की,......

हॉगनची हकीगत ऐकत असताना मी अंथरुणावर पडलेला होतो. केव्हा कसा पाठलाग येतो याची कल्पना नाही. आमच्या इतर मित्रांनी ताबडतोब काही तरुणांची सशस्त्र तुकडी घराशी ठेवली. घराच्या सभोवार टेहळे ठेवले. मला ब्रिटिश पोलिसांच्या हातात जिवंत जाऊ द्यावयाचे नाही असेही ठरले. कारण थोडक्याच अवधीत सर्व प्रदेश ब्रिटिश सैनिकांनी भरून जाईल, घराघरांच्या झडत्या घेतल्या जातील ही कल्पना होती. आणि तसे झालेही. त्यानंतर कित्येक दिवस झडत्यांचे सत्र चालले होते. ठिकठिकाणी स्मशानभूमीतून नवीन थडगी उकरून प्रेतेसुद्धा पाहिली गेली. कारण अशी वार्ता प्रसिद्ध झाली होती की, बंडखोरांतील दोघांना अगदी प्राणांतिक जखमा झाल्या आहेत.

आणखी दोन तासातच टेहळ्यांनी बातमी आणली की, शत्रू आमच्या मागावर येत आहेत. म्हणून तातडीने युद्धमंडळाला बोलाविले गेले. माझ्या मित्रांनी ताबडतोब एक मोटार आणून मला त्यात घालून चालविले. याचा मृत्यू लगेच आहे असे जाणून प्रार्थनेला सवड ठेवावी यासाठीसुद्धा ते थांबले नाहीत. त्यांनी मला सरळ किलमेनॉक शहरातून नेले, हे मला दुसऱ्या दिवशी दुपारी समजले. त्यावेळी शहरातल्या पोलिसांच्या मुख्य ठाण्यावरून आम्ही गेलो. तेथेच एन राईटचे प्रेत आणि मरणोन्मुख जमादार वेलेस यांना आणले होते. त्यांच्या समोरून आम्ही गेलो. दुसरा मार्गच नव्हता. नॉकलाँगच्या भोवतालच्या जाळ्यातून सुटण्यासाठी दुसरा मार्ग नव्हता. आम्ही यांतून उडी घेतली. सुदैव आमच्या बाजूस होते. आम्ही निसटलो. माझ्या मित्रांना या गांभीर्याची पूर्ण कल्पना होती. मी स्वत: गुंगीत पडून होतो. मला इतकी कल्पना होती की, थोडक्याच अवधीत आपणास जग सोडावयाचे आहे. आमच्या मुलांना हे माहीत होते की, 'प्रारब्धस्य अंतगमनम्‌' घेतलेला उद्योग टोकाला न्यावयाचा. मागे फिरावयाचे नाही. पुढे, सतत पुढे! हे ब्रीदवाक्य होते. याच वृत्तीने आयर्लंड या लढाईत यशस्वी झाले. हीच वृत्ती यशवैभवाप्रत नेण्यास कारण होईल.

दुसऱ्या दिवशी मी उठलो तो वेस्ट लिमरिकमध्ये सीनक्रिनच्या घरात. सीनक्रिन म्हणजे मूर्तीमंत सज्जनता होती. मी आणि आमच्या मित्रांना उत्तम आश्रय मिळाला. काही दिवस अत्यंत आनंदात गेले. तो आमच्या गुप्तवार्ता खात्याकडून एक बातमी आली की, पोलिसांना माग लागत आहे. म्हणून आम्ही तेथून निघालो. केरी परगण्यात काही दिवस काढले. एव्हाना मी चांगला बरा होण्याच्या मार्गावर आलो होतो. वैद्यकीय अंदाजाप्रमाणे मी मेलो नाही. पुढेसुद्धा अशा एकदोन प्रसंगी आत्यंतिक जखमा झाल्या असताना मी वैद्यकीय मतावर मरण्याचे नाकारले. केरी येथे येईतो मी हळूहळू चालू शकत होतो. थोडा आधार लागे. केरीमध्ये काही दिवस काढले. वृत्तपत्रांतून ज्या विपर्यस्त आणि भीषण वार्ता नॉकलाँगबद्दल येत त्या वाचून आमची फार करमणूक व्हायची. साधारण प्रत्येक दिवशी कोणी धर्मोपदेशक म्हणा तर कोणी संपादक म्हणा तर कधी राजकारणी मुत्सद्दी म्हणा, आमच्या या भयंकर गुन्ह्याबद्दल (कोणता? तर मित्राला शत्रूच्या हातून सोडविणे) कडक निषेधात्मक वक्तव्य प्रसिद्ध करीत. मृत्यूमुखी पडलेल्या राजनिष्ठ नोकरांच्या नातेवाईकांना राजेसाहेबांचा सांत्वनपर आलेला संदेश आम्ही वाचला. व्हाईसरॉय लॉर्ड फ्रेंच यांनी ही

सहानुभूती प्रगट केली होती. केरीहून काही दिवसांनी परत लिमरिक परगण्यात आलो. शॅव्हॅन नदीचे काठाकाठाने आम्ही सरकत होतो. जखमा नीट भरून येत होत्या. पुन्हा अंगात शक्ती वाटू लागली. रोज नदीत डुंबावयास जात असू. कधी मासे मारण्याचा उद्योग असे. सीन ट्रेसी होताच -तो असे मार्मिक बोले की, हसता हसता पुरेवाट होई. अशा रीतीने हां हां म्हणता दिवस निघून गेले.

नॉकलाँगच्या या चकमकीत सर्व सुखरूप निसटले - फरारी झाले. सीन लिच आणि जे. ओब्रायन हे मात्र परत त्यांच्या व्यापारात पडले. थोड्या दिवसांनी त्यांनीही धंदा सोडून देऊन येणाऱ्या लढाईत सर्वस्वाने उत्कृष्ट भाग घेतला. एक वर्षाने स्कॅनलॉनच्या भावाला ब्रिटिशांनी तो कैदेत असताना ठार मारले. नॉकलाँगच्या प्रकरणाबद्दल अनेकांना संशयावरून अटक करण्यात आली. दोघांशिवाय सर्वांना हळूहळू सोडण्यात आले. मार्टिन फॉले आणि मॅहेर यांना दोन वर्षांच्या तुरुंगवासानंतर, तह होऊन लढाई थांबण्यापूर्वी केवळ एकच महिना आधी, ६ जून १९३१ ला डब्लिनमध्ये फाशी देण्यात आली.

●●●

## १३. मुख्य केंद्रात आमचा प्रवेश

आम्ही पश्चिम लिमरिकमध्ये आलो. पोलिसांचा ससेमिरा सतत होताच. फार मोठ्या संख्येने सैनिक आणून आम्हाला वेढण्याचा त्यांचा यत्न असे. नॉकलाँगचे प्रकरणानंतर असे सहा मोठे प्रयत्न त्यांनी केले. कित्येकदा केवळ सुदैवाने आम्ही त्यांच्या जाळ्यातून निसटलो. आम्हा चौघांना पकडण्यासाठी हजार हजार सैनिक ते उपयोगात आणीत असत. ही त्यांची खात्री होती की आमच्यापैकी प्रत्येक हातातल्या शस्त्राने अत्यंत प्रखर प्रतिकार करील आणि यदाकदाचित शकुनी फासा त्यांना अनुकूल पडला तरच आमच्यापैकी एखादा जिवंत किंवा मेलेला हाती लागायचा. मात्र तोपर्यंत त्यांचे कित्येक झोपी जातील ते कायमचेच! आमच्या हालचालीची बातमी देणारास आतून बक्षीस मिळे. पकडून देणाऱ्यांना मोठमोठ्या बक्षिसांची लालूच होती. आमची वर्णने वृत्तपत्रांतून प्रसिद्ध केली होती, नभोवाणीवरून सांगितली जात होती. त्याबद्दलची हस्तपत्रके विमानांतून टाकली जात होती. प्रत्येक ठिकाणी किंचितही माहिती देणाऱ्यावर पैशाची वृष्टी केली जाईल हे अभिवचन असे. आयर्लंडमधील प्रत्येक पोलिसाने आणि ब्रिटिश सैन्यातल्या व हेरखात्यातल्या अधिकाऱ्याने आमचे वर्णन तोंडपाठ केले पाहिजे ही शिस्त होती.

पण आम्ही या सर्वांना पुरून उरलो. आमच्या पाठलागावर येणाऱ्या सर्वांच्या हातावर दरएक वेळी तुरी देऊन आम्ही निसटत असू. कित्येकदा पोलिसांना समजे आम्ही साधारणपणे अमूक बाजूला आहोत म्हणून. तोपर्यंत आम्ही दुसऱ्या ठिकाणी गेलेले असू. जून १९१९ ला आम्ही पश्चिम लिमरिकमधून पूर्व क्लेअर परगण्यात -पण शॅनॉन नदीचे काठाशीच आलो. भरपूर व्यायाम घ्यावयाचा, सपाटून पोहायचे, मोकळ्या हवेत, उन्हात हिंडायचे, चांगले खावयाचे यांमुळे आम्ही तगडे झालो. पोलिस आम्हाला कोठे दगडाच्या मागे तर झाडाझुडपांत, खबदाडांतून शोधण्याचा प्रयत्न करीत -पण आम्ही अगदी उघडपणे मोकळ्याने अगदी निर्भयतेने वावरत असू. कित्येकदा त्यांच्या चाळीपासून एका हाकेच्या अंतरावर असू, तर कित्येकदा त्यांच्यात आणि आमच्यात एकविटी भिंत आड असे. आम्हाला तर इतकी गंमत वाटे, आमच्या समोरून -आम्ही खिडकीतून पाहात आहोत आणि मोठाल्या मोटारी भरभरून पोलिस निघालेले असत. कशाला? तर आम्हाला पकडायला. कित्येकदा पोलिसांची व आमची समोरासमोर गाठ पडे. ते ओळखीतही असत. त्यांनी आम्हास पकडावयास यावयाचे पण त्यांना मन:पूर्वक असे वाटे की, अशा प्रसंगी मुत्सद्दीपणाने माघार घेणे हेच खऱ्या पराक्रमाचे लक्षण आहे. कित्येकांची तर अशी दृढ समजूत असे की, आम्हाला पकडण्याचा प्रयत्न

केलाच तर स्वत:च्या बायकामुलांची आणि कुटुंबाची चाकरी एकनिष्ठपणे बजावता येणार नाही.

थोडक्याच दिवसांत क्लेअरमध्ये राहण्याचा त्रास वाटू लागला. तेथेही ब्रेनन बंधू बिचाऱ्या ब्रिटिश सरकारच्या जिवावर उठले होते. मार्शल लॉ तेथे जारी होण्याचा रंग दिसू लागला. मार्शल लॉचा आणि आमचा स्नेह फार जुन्या काळापासून, म्हणून क्लेअरमधून उत्तर टिप्परेरीमध्ये आम्ही आलो.

येथे अनेक मित्रांच्या गाठीभेटी झाल्या. पुढे काय करावे म्हणून विचार होऊ लागला. आम्हाला स्वस्थ राहावे असे वाटेना. आमच्या उदाहरणावरून काही करावे अशी प्रवृत्ती देशात होऊ लागल्याची चिन्हे होती -पण किती? फार थोडी; क्वचित् कोठे पोलिस ठाण्यावर हल्ला, कोठे तुरळक सैनिकांच्या बंदुका पळविल्याच्या वार्ता; संपले! आम्हाला वाटले की सार्वत्रिक उठावणी आणि धडाडीच्या चढाईची हीच वेळ आहे. नाही तरी आज कोठे आम्ही संकटापासून दूर होतो? पुन्हा पुन्हा आम्ही एकमेकांत बोललो. हे असले निरर्थक आयुष्य घालवायला आपली सिद्धता नाही. हा निश्चय होई. रानावनांतून हिंडायचा कंटाळा आला. पण डब्लिनला जाण्याची सोय नाही. कारण तेथे आमच्याच खांद्याला ज्यांनी खांदा लावून लढावे असे मित्र आम्हाला गुंडाळून अमेरिकेत टाकून देण्याच्या मागे होते. याला आमची यापुढे तयारी नव्हती. आम्हाला समजलेच पाहिजे की, खरोखरीच आमच्याविषयी काय मत आहे, लोकांची सिद्धता किती आहे, आमच्या पक्षाची निश्चित भूमिका काय आहे?

शेवट मनाशी निश्चय करून, रॉबिन्सन आणि हॉगन यांना मागे ठेवून मी आणि ट्रेसी दुचाकीवरून सरळ डब्लिनला निघालो. वाटेत काही भानगड उत्पन्न झाली नाही. मेलूथ येथे तीन दिवस थांबून डब्लिनला फिन शॅन्हॅन्सकडे उतरलो. काही दिवसांनी मिक कॉलिन्सची भेट घेतली. मिक कॉलिन्स हा आयरिश स्वयंसेवकांचा सर सेनापती होता. पुष्कळ वेळ आम्ही बोललो आणि अगदी मोकळेपणाने बोलणे झाले. आम्हाला काय वाटते हे स्पष्टपणे आम्ही सांगितले. अखेर मिक कॉलिन्सने आमचे डब्लिनमध्ये राहण्याबद्दलचे स्वत:कडे घेतले. इतके झाल्यावर आम्ही दुचाकीवरून परत जायला निघालो. मी त्यावेळी धर्मोपदेशकाच्या वेशात होतो. या दिवसापर्यंत धर्मोपदेशकांना धर्मश्रद्धेमुळे सहसा अडविले जात नसे. अजून ब्रिटिशांनी बायका-मुलांशी, धर्मोपदेशकांशी उघड लढाई पुकारली नव्हती. वर्षभराने त्यांनी तसेही केले. चोर सोडून संन्याशाला फाशी या न्यायाने पुढच्याच वर्षी तिघांना गोळी घालून ठार मारले. कित्येकांना तुरुंगात डांबले. मी दुचाकीवरून जात असताना मेऊथ येथे मागच्या चाकाला छिद्र पडून हवा गेली होती. जवळच्या दुचाकी नीट करणाऱ्या दुकानदाराकडे जाऊन म्हटले ''एवढे छिद्र दुरुस्त करता का?'' पण त्याला फुरसत नव्हती. शेजारच्या धर्मोपदेशकांच्या विद्यालयात मला जाण्याबद्दल तो सांगू लागला. तेथे जावे तर लॅटिन आणि ग्रीक कोणाला येत आहे? आमचे सर्वच सोंग फिसकटायचे. मग अखेर जवळच्या पोलिसांच्या चाळीशी वळलो. समोरून येणाऱ्या पोलिसाने लवून नमस्कार केला. मीही फार मोठ्या गंगीरपणे त्याचा स्वीकार केला आणि माझी अडचण त्याला सांगितली. त्या पोलिसाने लगेच आपल्या पोलिस मित्रांस बोलाविले. कोणाकडून काही तर कोणाकडून काही आणून दुचाकी दुरुस्त करून दिली. मला अशी गंमत वाटत होती! फरारी लोकांना पकडण्याबद्दलची चाळीच्या भिंतीवर अनेक मोठाली पत्रके लावलेली होती. माझ्याबद्दलचे मोठे पत्रक तेथे होतेच. आणि त्याच्यासमोर पोलिसांच्या घोळक्यात मी त्यांच्याकडून काम करून घेत होतो!

त्यांना अनेक आशीर्वाद व धन्यवाद देऊन मी निघालो. रात्री टिप्परेरीमध्ये इतर मित्रांना भेटलो. थोडक्याच दिवसांत आम्ही चौघेही डब्लिनमध्ये सुखरूपपणे आलो. आता डब्लिन हेच आमचे मुख्य ठिकाण होते. काही थोडे आठवडे जातात न जातात तोच सर्व जगाला धक्का देणाऱ्या बेताची आखणी करू लागलो. ब्रिटिश सरकारचे आयर्लंडमधील राजप्रतिनिधीला जगातून दूर करण्याच्या विचारांची जुळणी करू लागलो.

●●●

## १४. फितुरांना देशभक्ती कशी शिकवावी?
## लॉर्ड फ्रेंच याच्या मागावर

१९१९च्या हिवाळ्याच्या प्रारंभी बहुधा उघडपणे ब्रिटिशांच्या बरोबर युद्धाला सुरुवात होणार अशी चिन्हे दिसू लागली. भोवताली काय चालले आहे ते डोळे उघडे ठेवून पाहणाऱ्या कोणालाही हे समजले असते. पुढे दीड वर्ष सतत चाललेल्या गनिमी काव्याच्या लढाईची पावले अस्पष्टपणे ऐकू येऊ लागली होती. शस्त्रे मिळविण्यासाठी घातले जाणारे छापे ही नित्याचीच वार्ता होती. पोलिस आणि सैनिक साधारणत: कोठेही सुरक्षितपणे जा ये करू शकत होते.

ब्रिटिशांची तयारीही चालू होती. गेले कित्येक महिने सरकार आयर्लंडमधील गुप्त वार्ताखाते सुधारत होते. गेले कित्येक पिढ्या हवा तसा पैसा टाकून हे खाते चालू ठेवले होते. पण इतके दिवस त्यांचे काम सोपे, बिनधोक्याचे होते. उगाच कोठे कोठे व्याख्याने देणाऱ्या बोलभाट समजल्या जाणाऱ्या राजकारणी लोकांवर पाळत ठेवणे हे काम होते. पण आता या कामात त्यांना धोका उत्पन्न होऊ लागला होता. आमचेही गुप्तवार्ताखाते आता चांगले काम करू लागले होते. डब्लिन सरकारात अस्वस्थता उत्पन्न होऊ लागली. तेथून त्या त्या अधिकाऱ्यांचे कान उपटले जाऊ लागले. वारंवार ठपका येई; निर्भत्सना केली जाई की आम्हाला अजून का पकडता आले नाही. अधिकारी उत्तर देत की लोक माहिती नीट देत नाहीत, घरभेदी फारसे नव्हे, मिळतच नाहीत. येतात ते चाचरत येतात. गुप्त खात्याचे अधिकाऱ्यांनी शेवटी सुचविले की, इंग्लंडमधील स्कॉटलंड यार्डची मदत घ्यावी. आणि आयर्लंडमध्ये या खात्यात काम करायला कोणी धजावत नाही म्हणून इंग्लंडमध्ये जे काही आयरिश लोक आहेत त्यांना नोकरीत घ्यावे.

सरकारने या सूचनेवरून हे खाते सुधारले. ब्रिटिश सैन्याच्या जुन्या सैनिकांची त्यांनी या खात्यात भरती केली. आम्हीही लक्ष ठेवून होतोच. अशा प्रत्येकाला आम्ही शोधून काढला. पुढील दोन वर्षांत अशा विश्वासघात करणाऱ्यांना मिळालेल्या शिक्षेच्या वर्णनाने वृत्तपत्रांतील कित्येक रकाने भरून गेलेले आहेत. आयरिश लोकसत्तेच्या सैन्याच्या विजयाचे हे महत्वाचे कारण आहे. ब्रिटिशांच्या गुप्त खात्यावर आम्ही सणसणीत टोला हाणला. इतका की सरतेशेवट गुप्त हेरखाते म्हणून काहीही भानगड शिल्लक राहिली नाही. रस्तोरस्त्याने प्रेते पडू लागली. प्रेताच्या डोक्यावर चिठ्ठी ''फितुऱ्यांनो! तुमची बक्षिसी... आयरिश लोकसत्तेकडून शिक्षा'' कदाचित कोणाला वाटेल की अशी शिक्षा देताना कधी चूक होत नसेल का? पण मी विश्वासाने सांगतो की असे कधीही घडले नाही. पुरेसा पुरावा न मिळाला म्हणून कित्येकांना आम्ही तसेच सोडले; मग निरपराध्यांबद्दल काय सांगावे?

गुप्तवार्ता खात्याबरोबर सरकारने 'G' लोकांचा उपयोग करण्यास प्रारंभ केला 'G' लोक म्हणजे डब्लिनचे स्कॉटलंड यार्ड. 'G' लोकांचा उपयोग चोऱ्यामाऱ्या, दरोडेखोर यांना शोधून काढण्यासाठी होता. त्यांना त्याबद्दल शहराच्या कराच्या उत्पन्नातून पगार मिळे. पण नंतर सरकारने त्यांचा उपयोग राजकीय आणि लष्करी कामासाठी करण्याचे ठरविले. चोर, दरोडेखोर, मवाली यांना पकडणे दूरच राहिले. पण त्यांचीच प्रत्यक्षपणे माहिती काढण्यासाठी दलाल म्हणून उपयोग करून घेण्यात येऊ लागला. १९१९ च्या हिवाळ्याचे सुरुवातीला जे दोन-चारशे 'G' लोक होते ते अशा उद्योगांत गुंतलेले असत. सीनफेनर्सना पकडण्यासाठी जेव्हा ब्रिटिश सैनिक मध्यरात्री छापे घालण्यास जात, तेव्हा रस्ता दाखविण्याचे सत्कार्य हे करीत. सीनफेनांचे वाङ्मय जप्त करण्यास ते जात असत. आम्हा सीनफेनर्सच्या बैठकींना व संमेलनांतही ते यावयाचे. त्यांत होणाऱ्या भाषणांचे टिपण घेत आणि त्यांचे गुप्त वृत्त वरिष्ठांना कळवीत. डब्लिनमधील जवळ जवळ प्रत्येक तरुणाला या लोकांतील बरेचसे माहीत असत; पण 'G' लोकांना त्यांची भीती नव्हती. कारण जरी ते ओळखले गेले तरी त्यांना काय होणार होते? दोन दिवस ते तोंड लपवून असत इतकेच. पण यापेक्षा अधिक भीती त्यांना कधीच वाटली नाही. वर्तमानपत्रांतून साधारणपणे प्रत्येक दिवशी निरपराधी

माणसांच्यावर -आयुष्यात ज्यांनी पिस्तूल कसे ते पाहिलेले नसावे अशांचे घरांवर -छापे घातल्याची वार्ता वाचावी लागे. अशा तऱ्हेच्या जुलमामुळे मने त्रस्त होऊन गेली आणि याचा वचपा काढला पाहिजे अशी प्रबळ इच्छा मनात उत्पन्न होऊ लागली. मोठ्या माणसांचे काय, पण स्त्रिया, लहान लहान मुला-मुलींना देखील एक साधी कविता केल्याच्या आरोपावरून आत टाकले जाई. अशा गोष्टी वाचूनही डोके शांत ठेवणाऱ्या मनुष्याला मनुष्य म्हणता येईल का?

वर्षाचे अखेरी अखेरीला हलकटपणामुळे प्रसिद्ध झालेल्या कित्येक 'G' लोकांना भर रस्त्यात ठार मारण्यात अथवा जखमी करण्यात आले. बहुधा सर्व वेळी हल्ला करणाऱ्यांना सुखरूप निघून जाता आले. या माणसांच्या डोक्यात प्रकाश पडावा आणि त्यांनी असल्या नीच धंद्यापासून परावृत्त व्हावे यासाठी केलेले सर्व प्रयत्न आधी पाण्यात गेले होते. त्यांच्या हे लक्षात यावयाला हवे होते की, हा उद्योग देशाच्या फितुरीचा आहे. पण शब्दांनी ते त्यांच्या ध्यानात आले नाही. याचा परिणाम म्हणून जे असे दिसत त्यांच्यावर हल्ले करण्यात आले. त्यांना त्यांच्या घरात राहणे अशक्य केले, रस्त्यांतून त्यांना फिरणे कठीण केले, तेव्हा ते सर्व डब्लिनचे किल्ल्यात सरकारी संरक्षणात राहावयास गेले. तेथून ते छापे घालणाऱ्या सशस्त्र सैनिकांना सोबत करू लागले. या थराला गोष्टी आल्याने त्यांच्यातील पुष्कळांनी राजीनामे दिले. जे काही थोडे राहिले त्यांचा उद्योग चोर दरोडेखोर यांच्यावर लक्ष ठेवण्याचा होता. त्यांना आम्हीही त्रास दिला नाही. त्यांनी त्यांचे काम करावे पण राजकीय घडामोडींत लक्ष घालू नये, ब्रिटिश लष्कराला साहाय्य करू नये, मग आमच्याकडूनही त्यांना त्रास पोचू नये अशी परस्पर समजूत होती. त्यांतून आणखी थोडे जे राहिले त्यांनी आमच्या गुप्तवार्ता खात्याची नोकरी पत्करली. त्यांच्या डोळ्याखालून जाणाऱ्या गुप्तपत्रांची ते माहिती देत आणि त्याविनाही जी माहिती त्यांना मिळे ती ते पोचवीत असत. यापेक्षा अधिक स्पष्टपणे तूर्त तरी मला लिहिता येत नाही.

डब्लिनमध्ये आम्ही चौघे येऊन राहिल्यावर शहराची आम्ही नीट माहिती करून घेतली. आम्हाला काम सांगण्यात आले. आम्हाला तसे हवेच होते. मधून मधून 'G' लोक आमच्या मागावर येत. आम्ही त्यांचा यथोचित समाचार घेत असू. आमच्यावर लक्ष ठेवण्यासाठी टिप्परेरीहून माणसे भरती केली जात. पण त्या माणसांना थोडक्याच दिवसांत शहाणपण येई आणि नोकरी सोडून ती घरी परत जात. कारण आमच्या पाळतीवर राहणे त्यांच्या प्रकृतीला झेपण्यासारखे नसे. क्वचित कोणाच्या दृष्टीस आम्ही पडलोच तर आम्हाला न जाणण्याची अक्कल त्यांना आलेली होती.

डब्लिनमध्ये अनेक उत्कृष्ट मित्र आम्हाला मिळाले. फिल-शॅव्हॅन्स हा होताच. त्याचे घर हे आमचे होते. त्याच्याविना रॉयन आणि सीमन किवीन यांची घरे आम्हाला नेहमी मोकळी होती. रिकमॅकी-पीडर क्लॅन्सी, टॉम के यांच्यासारखे तडफदार, समविचाराचे तरुण मित्र भेटत असत. देशासाठी कोणत्याही संकटात उडी घेण्यास सिद्ध असलेले असे उत्तम नेम मारणारे तडफेचे तरुण त्यावेळी थोडेच होते. नंतर पुष्कळांचे शौर्य प्रकट झाले. तथापि त्यावेळी त्यांचे पाणी समजून आले नाही. याचे कारण प्रत्यक्ष चढाईचे धोरणास अनुकूल असे  लोक फारच थोडे आणि तेसुद्धा देशभर दूर दूर पसरलेले होते.

पोलिसांना आणि सैनिकांना ठार मारण्याच्या धोरणाबद्दल आमची या मित्रांच्या बरोबर नेहमी चर्चा होई. आम्हाला असे वाटे की, हे पुरेसे नाही. ती मरणारी माणसे म्हणजे काय, मोठ्या अधिकाऱ्यांच्या हातातील बाहुली होती. त्यांच्या मरणाने इंग्लंडला काही मोठा पेच पडणार नव्हता. कारण त्यांना आणखी तसे मूर्ख मिळण्यास अडचण नसे. मग आमच्या मनात येई की, आयर्लंडमधील राजसत्तेच्या मुळावरच घाव का न घाला? त्यामुळे सर्व जगाचे डोळे आयर्लंडकडे लागतील. त्यांची सहानुभूती इकडे खेचली जाईल. इंग्लिश मुत्सद्यांचे छातीत त्याची धडकी बसेल, ब्रिटिशांना सत्ता चालविणे कठिण होईल. काही पोलिस नसले तरी इंग्लंडचे चालेल, पण लॉर्ड लेफ्टनंटलाच उडविले तर त्याच्याशिवाय काम चालविणे कठिण पडेल. पोलिस हजारो असतात, मिळतात; पण लॉर्ड लेफ्टनंट होण्यासारखे थोडेच असतात. आणि त्यांतही रिव्हॉल्व्हरला बळी पडण्याची धास्ती असेल तर त्यांनाही

अशी जागा स्वीकारण्यापूर्वी दहा वेळा विचार करावा लागेल.

या चर्चेतून लॉर्ड फ्रेंच, लॉर्ड लेफ्टनंट यांच्यावर हल्ला करण्याची कल्पना निघाली. काही शूर आणि विश्वासू मित्रांना ही कल्पना सांगितली, त्यांनी ती आनंदाने मान्य केली. सारखे तीन महिने आम्ही लक्ष ठेवले, बेत आखले, ठिकठिकाणी दबून राहिलो; पण निराशा पदरी आली. लॉर्ड फ्रेंच क्वचितच बाहेर हिंडे. त्याच्या हालचालीबद्दल गुप्तता राखली जाई. तथापि आमच्या वार्ताखात्याकडून अगदी बरोबर माहिती आम्हाला कळत असे. मोठमोठ्या प्रगट समारंभास येऊन राजमान्यता दर्शविण्याची प्रथाही त्याने अलीकडे सोडली होती.

या तीन महिन्यात किती वेळा किती थोडक्याने तो वाचला हे त्यालाही माहीत नसेल. दोन-तीन वेळा आम्ही रस्त्यावर दबा धरून होतो, पण ऐनवेळी त्याने रस्ता बदललेला आढळला. प्रवासाचा रस्ता ऐनवेळी त्याने बदलणे ही त्याची नवी खुबी होती. पूर्वीच्या फुटलेल्या माहितीच्या आधारावर कोणाचा काही बेत असल्यास तो फसावा यासाठी ही युक्ती होती. यावरून त्यालाही आपल्या परिवारातील मंडळीबद्दल त्यांच्याकडून माहिती फुटते इतका विश्वास होता.

या तीन महिन्यांत -म्हणजे १९१९च्या शेवटच्या तीन महिन्यात, त्याला अडविण्यासाठी १२ वेळा आम्ही प्रयत्न केला. प्रत्येक खेपेस काही झाले. कधी तो आलाच नाही. कधी आला तर फार लवकर किंवा फार उशीरा. हे आमचे बेत जेव्हा तो शहरांतील समारंभांना, किंवा कोण्या संस्थेला भेट देताना, किंवा कोण्या व्यक्तीला तो भेट द्यावयास येई त्या वेळेस केलेले असत. अशा ठिकाणी एकसारखे फार वेळ घोटाळणे शक्य होत नसे. नाही तर संशय उत्पन्न व्हावयाचे हे लोक कोण म्हणून. आणि परिणामी लष्कराची धाड त्या मार्गावर यावयाची.

अगदी पहिल्या खेपेस तो यावयाच्या वाटेवर आम्ही दबा धरून होतो. तेव्हा मिक् कॉलिन्स आमच्याबरोबर होता. टॉमस मॅक कर्टिन हाही त्यावेळी बरोबर होता. टॉमस कॉर्कच्या शहर विभागातील पहिल्या ब्रिगेडचा कमांडर होता. पुढल्या वर्षीच्या मार्च महिन्यात कॉर्क शहराचा त्याला सन्मान्य नगराध्यक्ष निवडले असता ब्रिटिशांनी त्याला त्याच्या घरात शिरून ठार मारले. डिक मॅकी हाही आमच्या बरोबर होता. तो डब्लिन ब्रिगेडचा कमांडर होता. जे साहस स्वत:चे हातून होणार नाही ते तो आपल्या माणसांना घेण्यास कदापि सांगत नसे. डिक आणि पीडर क्लॅन्सीपुढे एक वर्षांने ब्रिटिशांच्या हातात पडले असता ब्रिटिशांनी त्यांचा कैदेत खून केला.

दुसऱ्या एका प्रसंगी पीडर क्लॅन्सीबरोबर दोन तास निरर्थकपणे एका डॉक्टराचे घराशी थांबण्यात गेले. या डॉक्टराला लॉर्ड फ्रेंच अधून मधून भेट देई. नोव्हेंबर ११ ला महायुद्धांच्या शस्त्रसंधीच्या वाढदिवशी लॉर्ड फ्रेंच याला ट्रिनिटी कॉलेजमधील एका मेजवानीस उपस्थित राहावयाचे होते. या रात्री आम्ही त्याला गाठणार अशी आम्हाला पक्की आशा वाटत होती. आमचा बेत काय होता की तो ग्रॅटन पुलावरून मोटारने जाऊ लागला की मोटारीवर बॉम्बस् टाकायचे. त्याच्या राजवाड्यापासून कॉलेजात जायला तो केव्हा निघणार याची नेमकी वेळ आम्हाला माहीत होती. हा बेत पूर्ण यशस्वी होणार ही खात्री होती. त्याप्रमाणे आमचे काही लोक पुलाच्या आसमंतात बॉम्बस् घेऊन उभे होते. बॉम्बसच्या सेफ्टिपिन्स काढून त्यांनी फेकूनही दिल्या होत्या. स्प्रिंग्ज बोटाने दाबून ते वाट पाहात थांबले. थंडी त्या रात्री चांगलीच होती. दोन तास वाट पाहिली, पण तो आलाच नाही. दोन तास काकडून गारठून गेल्यावर, सारख्या स्प्रिंग्ज हाताने दाबून ठेवल्याने हातांना कळ सोसवेना. तशाच स्थितीत तेथून निसटावे लागले.

एका पंधरवड्याने तो डब्लिन कॅसलमध्ये यावयाचा होता. येताना त्याच पुलावरून जाणे अशक्य होते. आम्हाला वेळा माहीत होत्या. आम्ही पुन्हा एकवार जागा घेऊन थांबलो. हवेत गारठा कडाक्याचा होता. दुपारची वेळ होती ती. एकाएकी बर्फ पडू लागले. आम्हाला बर्फाच्या त्रासाचे वाटत नव्हते. कारण आम्ही जे काम मनावर घेतले होते ते असल्या क्षुल्लक कारणाने सोडणारे आम्ही नव्हतो. आमच्यातील काही तशा बर्फाच्या माऱ्यात पुलावरून येरझारा घालत होते. मनात विचार चालला होता की, याही खेपेस निराशेची पाळी येते की काय? कारण ठरलेली वेळ केव्हाच होऊन गेली होती. आम्ही असे पुलावर असताना एक मित्र तेथून गेला. आम्हाला तो ओळखत

होता. आम्ही तेथे कशासाठी आलो असावे हे जाणून तो विनोदाने म्हणाला, ''चांगलीच निवाऱ्याची जागा शोधून काढली आहे. बर्फ पडते आहे.'' त्याच्या शब्दांनी आम्ही भानावर आलो. जवळपासच्या दुकानदारांपैकी कोणासही आमचा संशय येता. अधिक वेळ थांबणे इष्ट नव्हे, म्हणून आम्ही तेथून निघालो. आम्ही तेथून जातो तो पाचच मिनिटांत लष्करी सैनिकांनी पुलाचा ताबा घेतला; आणि तेथे असलेल्या प्रत्येकाची झडती घेतली; डब्लिन कॅसलच्या प्रवेशद्वारावर नेमलेल्या एका गुप्त पोलिसाने आम्हाला ओळखून व्हाईसरॉयच्या राजवाड्यामधे फोन केला. तत्क्षणी लॉर्ड फ्रेंच याचा बेत थंडावून त्याच्या ऐवजी लष्करी सैनिक आले. आम्ही थोड्याच क्षणांपूर्वी तेथून निघालो होतो. आमच्या सुदैवाचे हे आणखी प्रत्यंतर!

अशा सर्व प्रसंगी लॉर्ड फ्रेंचचे हालचालींबद्दल आम्हाला जी माहिती मिळे ती खात्रीची असे. तो आपले बेत ऐनवेळी बदलत असे. शेवटी आमची पूर्ण निराशा होण्याची वेळ आली. तोच आशेला फिरून पालवी फुटावी अशी माहिती आली. वृत्तपत्रांतून व्हाइसरॉयच्या हालचाली अगदी क्वचित येत. इंग्लंडला जाऊन तो परत आल्यावर इंग्लंडला जात असल्याची वार्ता प्रसिद्ध व्हावयाची. कित्येकदा खोट्याच बातम्या वृत्तपत्रांतून प्रसिद्ध करविल्या जात. लोकांची आणि आयरिश स्वयंसेवकांची दिशाभूल करण्याची कल्पना त्यांत असे. वृत्तपत्रांतून असेच लॉर्ड फ्रेंच उत्तर समुद्रात मासेमारीला गेले असताना आम्हाला समजले की, तो रॉसकॉमन या गावी त्याच्या फ्रेंचपार्क या निवासात आपल्या काही खाजगी मित्रांसह चार दिवस विश्रांतीत घालवीत होता. १९१९ चा डिसेंबर महिना होता तो. आम्हाला सर्व बित्तंबातमी होती. त्याच्या घरी कोणाकोणाला बोलाविले होते त्या प्रत्येक व्यक्तीचे नावसुद्धा आमच्याकडे आले होते.

फ्रेंचपार्क म्हणजे शहारापासून दूर भागात आहे. तेथे लॉर्ड फ्रेंच असताना भरपूर संरक्षण ठेविले होते. आम्हाला त्यांची भीती नव्हती. तिथल्या सैनिकांना आम्ही तेव्हाच जिंकले असते. योजलेला उद्योग करून डब्लिनला निसटून जाणेही सहज शक्य होते. पण आम्ही ती जागा नापसंत केली. आम्ही ठरविले की, तो जेव्हा डब्लिनला परत येईल त्या दिवशी त्याच्या राजवाड्यासमोर भर शहरात त्याला गाठायचे. लॉर्ड फ्रेंच या व्यक्तींशी आमचे काहीच वाकडे नव्हते. पण ज्या शक्तीची सूत्रे तो हलवीत होता त्या शक्तीने आमचा देश गुलाम करून टाकला होता. त्याला नाहीसे करण्याने सर्व जगाचे डोळे आमच्या स्वातंत्र्याच्या युद्धाकडे लागणार होते. अन्यत्र कुठेतरी हा प्रयत्न करण्यापेक्षा त्याच्या राजवाड्यासमोर, संरक्षकांचे ऐन गराड्यात, पाचच मिनिटांत २०,००० सैनिक जेथे गोळा होऊ शकतात, अशा ठिकाणी ही गोष्ट झाली तर? काय विलक्षण खळबळ उडेल? ब्रिटिश सैन्याचा एक फील्ड मार्शल ज्या देशावर तो सत्ता चालवीत होता म्हटले जाई, त्याच देशाच्या राजधानीत त्याच्या सैन्यासमोर मारला जाणे! किती रोमांचकारी घटना होईल! आमचे त्यात तुकडे झाले तरी फिकीर नव्हती. या कार्याने जो नैतिक विश्वास उत्पन्न झाला असता त्याची बरोबरी दुसऱ्या कशानेही होणारी नव्हती. सर्व जगात हेच होईल की, ही माणसे वेडी नव्हत. यांच्या देशाचा भयंकर गुन्हा त्याने केलेला असला पाहिजे.

या विचाराने ॲशटाउन येथील हल्ल्याची तयारी करण्यामागे आम्ही लागलो.

●●●

## १५. ॲशटाउनची लढाई,
## परकीय सरकारचे राजप्रतिनिधीवर चढाई-

१९ डिसेंबर १९१९ शुक्रवारी लॉर्ड फ्रेंच आपल्या डब्लिनमधील राजवाड्यात परत यावयाचे होते., सर्व व्यवस्था अत्यंत काळजीपूर्वक आणि अत्यंत गुप्त होती. राजवाड्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना आणि डब्लिनचे किल्ल्यातील वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनाही याची माहिती दिलेली नव्हती. तथापि आमच्याकडे आलेल्या माहितीत प्रत्येक बारीक गोष्टही स्पष्ट झालेली होती.

केवळ दिवसच नव्हे पण नेमकी वेळसुद्धा आम्हास माहीत होती. रेल्वेने डब्लिनच्या ब्राड स्टोन स्टेशनवर न उतरता व्हॉइसरॉयसाहेब अलीकडच्या ॲशटाउन या छोट्या स्टेशनवर उतरावयाचे होते. ॲशटाउन हे डब्लिनपासून ४ मैलांवर आहे. डब्लिनहून वायव्येकडे देशात जाणाऱ्या मोठ्या रस्त्याने डब्लिनची वस्ती सोडल्यावर ट्रामचा रस्ता संपतो, तेथपासून दोन अडीच मैलांवर रस्त्याच्या उजव्या हाताला ॲशटाउन हे स्टेशन आहे. स्टेशन खुद्द या मोठ्या रस्त्यावर नाही, मोठ्या रस्त्याच्या आत सुमारे २०० यार्डावर एका पोट- रस्त्यावर हे स्टेशन आहे. ॲशटाउन या नावाचे असे खेडे नाही. आणि भोवतालच्या प्रदेशात वस्तीही फारच तुरळक तुरळक अशी आहे.

मुख्य रस्त्याच्या उजव्या हाताला हा पोटरस्ता फुटतो -उजव्या हाताने या रस्त्यावर रेल्वेस्टेशन तर डाव्या हातास हा रस्ता तसाच पुढे फोनिक्स पार्ककडे जातो. या चौकापासून १०० यार्डांवर डावीकडे फोनिक्स पार्कची प्रवेशद्वाराजवळची चौकी होती. या चौकीत ३-४ लष्करी पोलिस नेहमी ठेवलेले असत. तथापि या प्रसंगाचे आधी थोडे दिवस ही चौकी बंद करण्यात आली होती. या प्रवेशद्वारापासून साधारणत: पाव मैलावर व्हाईसरॉयसाहेबांचा राजवाडा होता. मुख्य रस्त्याच्या चौकावर उजव्या बाजूला एक लहानसे उपहारगृह होते. याविना जवळपास दुसरी घरे नव्हती.

व्हाईसरॉयसाहेब खास गाडीने सकाळी ठीक ११-४० ला ॲशटाउन स्टेशनवर येणार. त्यांच्या आधी बरोबर अर्धा तास आम्ही या उपहारगृहात आलो. आम्ही चौघे, टॉम के, मार्टिन सॅव्हेज आणि आणिक पाचजण मिळून आम्ही एकंदर ११ जण होतो. आम्ही दुचाकीस्वार जोडीजोडीने काही काही अंतर टाकून या मुख्य रस्त्याने -काब्रा रस्त्याने -उपहारगृहापाशी आलो. जो तो जसा तेथे पोचला तसे दुचाकी बाहेर ठेवून त्याने आत जावे असा संकेत होता. १२-१५ दुचाक्या उपहारगृहाच्या बाहेर असणे हे तेथे नित्याचेच होते. आम्ही बाहेर रस्त्यावर थांबलो असतो तर मात्र संशयाला कारण झाले असते. आम्ही आत गेल्यावर अगदीच अचानकपणे परस्परांच्या गाठी पडत आहेत असे भासविले. आत आमच्या आधी काही मजूर व शेतकरी होते. आत जाऊन फराळास सुरुवात केली आणि गप्पा सुरू झाल्या. आत कोणालाच संशय आला नाही. कारणही नव्हते. व्हाइसरॉय त्या रस्त्याने जावयाचा आहे याची कल्पना त्या बिचाऱ्या कोणासही नव्हती. गप्पांमध्ये विषय म्हणजे पाऊसपाणी कसे झाले, पीक कसे आले आहे, दूधदुभते, गुरेढोरे, कोंबड्या-बदके असले सगळे विषय होते. राजकारणाचा शब्दही काढावयाचा नाही हे आधीचेच ठरलेले होते. तथापि हे विषय बोलतानाही आम्हाला काळजी घ्यावी लागत होती. कारण आमचे श्रोते त्या विषयातले तज्ज्ञ होते, तर आमच्यातल्या कित्येकांना त्या विषयाचे ओ का ठो माहीत नव्हते.

आमच्या श्रोत्यांच्या ज्ञानात भर पडावी अशासाठी हे आमचे बोलणे चालले असताना ठरलेली वेळ जवळ जवळ येत चालली. मनात अधीरता वाढू लागली. कोणी ना कोणीतरी क्षणाक्षणाला घड्याळाकडे पाही. दुसऱ्याच क्षणी रस्त्याकडे पाही. उपहारगृहात बसून दोन्हीही रस्ते अगदी स्पष्ट दिसत होते. एवढ्यांतच एक लष्करी पोलिस,जाडजूड असा, फोनिक्स पार्कचे बाजूने आला. त्याला कोण आता येणार हे माहीत असावेसे दिसले. कारण तो त्या चौकात मुख्य रस्त्यावरील रहदारी थांबविता यावी अशा बेताने उभा राहिला. त्याचा रुबाब भलताच होता. त्याच्या कमरेला पिस्तूल होते ते फुसके नसणार हीसुद्धा खात्री होती. तथापि असे आम्ही कित्येक गुंडाळले आहेत त्यामुळे त्याची दिक्कत वाटली नाही. गाडी स्टेशनात येण्याच्या पूर्वी काही थोडा वेळ, चार लष्करी मोटार लॉरीज सैनिकांनी भरलेल्या पार्कमधून निघून स्टेशनवर गेल्या. तिथे त्यांनी बंदोबस्त

केला. पार्कच्या चौकीपासून आत राजवाड्यापर्यंत लष्करी पोलिसांची रांगच उभी होती.

आमचा बेत फार दिवस आधीच पक्का झाला होता. आयत्या क्षणाला ठरवायला हवे असे काही बाकी ठेवले नव्हते. विचार असा होता की, दुसऱ्या मोटारवर हल्ल्याचा सर्व जोर करायचा. दुसऱ्या मोटारमध्येच लॉर्ड फ्रेंच नेहमी असे. उपहारगृहाच्या समोर एक मोठी आणि जड अशी बैलगाडी टेकवून ठेवलेली होती. बैल अर्थातच सोडून ठेवलेले होते. टॉम के, मार्टिन सॅव्हेज आणि मी, तिघांनी ही बैलगाडी आयत्या क्षणाला रस्त्याच्या मधोमध आणून ठेवायची आणि लॉर्ड फ्रेंचच्या मोटारीचा रस्ता बंद करायचा. रस्ता अरुंद होता. एका वेळेस एक मोटार दुसरीस ओलांडून जाणे काही शक्य नव्हते, इतका अरुंद होता. ती बैलगाडी मधे आली की, सहजच मोटारचा वेग कमी होईल. त्याच क्षणी बाकीच्या लोकांनी तातडी करून हातबॉम्ब्स्, मोठे बॉम्ब्स् मोटारवर टाकायचे. बरोबरीच्या सैनिकांच्या स्वागताला हातातील पिस्तुले होतीच.

गाडीची शिटी नेमक्या वेळेला ऐकू आली. गाडी त्यावेळी ॲशटाउन स्टेशनमध्ये शिरत होती. तथापि आम्ही यत्किंचितही चाळवाचाळव केली नाही. आणिक तीन मिनिटे अजून होती. उगाच अधिऱ्या मनाने एखादीच चूक होईल, पण सारा बेत फिसकटावयाचा. क्षणभराने मोटारच्या इंजिनाचे धडधडणे ऐकू आले. स्टेशनवरून लोक निघणार असे दिसले. मग आम्ही बाहेर पडलो. जो तो आपापल्या जागी गेला. टॉम के, मार्टिन सॅव्हेज आणि मी, त्या बैलगाडीजवळ उभे राहिलो. ती पुढे ढकलावयाची वेळ हीच होती.

मी बैलगाडीचे जूं धरले, आणि रस्त्यावर ती आणली. गाडी बरीच जड होती. आम्हाला कल्पना नव्हती इतकी जड होती. रस्त्यावरून उजव्या हाताने कोपऱ्यावर मी गाडी वळविणार एवढ्यात एक आवाज ऐकू आला. मघाचा पोलिस हाक मारीत होता.

''रस्ता आता बंद आहे,'' तो म्हणाला. ''व्हाइसरॉयसाहेब आता येथून जायचे आहेत. त्यासाठी काही वेळ येथून जाता येणार नाही.'' या शहाण्याला काय सांगायचे? -व्हाइसरॉय यावयाचा आहे हे त्याच्यापेक्षा मला अधिक कळत होते. पण त्याला हे कसे सांगायचे? वेळेची निकड होती. मी त्याच्याकडे दुर्लक्ष केले. त्याला वाटले, मी खेडवळ, डोक्याने बेताचाच आहे. तो मला पुन:पुन्हा समजावून सांगू लागला. आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे माझ्या हातात दोन पिस्तुले होती ती काही त्याला दिसली नाहीत; इतपत त्याचे पाहाणे होते. त्याने पाहिले असते तर खिशातून वही काढून माझे नाव आणि पत्ता त्याने नक्की विचारला असता; कारण हत्यारे अशा तऱ्हेने वापरणे हा गुन्हा होता.

मला माझ्या पिस्तुलाचा उपयोग करायचा नव्हता. त्या निरुपद्रवी माणसाला ठार करण्यात काय फायदा? पुन्हा असे काही केलेच तर आमच्यापासून १००-१२५ पावलांवर मोटारीतून येणाऱ्या सैनिकांचे लक्ष येथेच लागेल आणि मग सगळाच घोटाळा होईल. मी मग एक केले. त्याच्या अंगावर ओरडलो. त्याला धमकावले. त्याला सांगितले की मुकाट्याने वाटेतून दूर हो, नाहीतर उभ्याचा आडवा करीन. इतक्यानेही त्याच्या ध्यानी येईना; तो बोलतच राहिला.

एक एक क्षण मोठ्या मोलाचा होता. आमच्या मित्रांना समजेना की काय घोटाळा आहे. समोरच्या बाजूला असलेल्या एकाच्या ध्यानी आले. दुसरा-तिसरा विचार न करता त्याने हातातल्या बॉम्बची कळ काढली आणि सरळ पोलिसाच्या डोक्यावर तो फेकला. किती उतावीळपणा हा होता! आमचे जीव त्या बॉम्बमुळे धोक्यात आलेच, पण सर्व बेत त्यामुळे थंड झाला असता. बॉम्ब बरोबर पोलिसाच्या डोक्यावर लागला आणि माझ्या बाजूला पडून फुटला. आम्हाला फारशी दुखापत झाली नाही. धक्क्यामुळे आम्ही सपशेल जमिनीवर आपटलो इतकेच. पोलिसालाही फार मोठ्या जखमा झाल्या नाहीत. आम्ही तत्क्षणीच उठलो. पोलिसाचा विचार करायला वेळच नव्हता. कारण एक मोटार-सायकल स्वार, व्हाइसरॉयच्या स्वारीच्या समोर जाणारा स्काऊट स्टेशनकडून आमच्या समोरून सपाट्याने गेला. पन्नास पावलांवर मागे पहिली मोटार असणार. दुसऱ्याच क्षणाला पहिली मोटार विलक्षण वेगाने आली. आम्हीही धडाक्याने पुढे सरून मोटारीतील लोकांवर गोळीबार केला. त्याला लगेच प्रत्युत्तर मिळाले. आम्ही

इतके जवळ होतो की, माझ्या डोक्यावरची कोरी हॅट गोळीने फट्दिशी उडाली. जिवावरच बेतले होते. पण हॅटवर निभावले. पहिली मोटार तशीच वेगाने निघून गेली. आम्हाला त्यात कोण बसले आहे हेही पाहता आले नाही. आमचे तितकेसे लक्षही नव्हते. आमचा उद्देश हाच होता की घाबरून पहिल्या मोटारने अधिकाधिक वेगाने निसटून जावे, आणि इकडे आम्ही आमचा सर्व हल्ला दुसऱ्या मोटारवर एकवटावा. कारण, लॉर्ड फ्रेंच हा दुसऱ्या मोटारीत असणार.

आमची बैलगाडी रस्त्यावर पुरेशी आली नव्हती. तोच पहिली मोटार वेगाने निघून गेली. त्यानंतर लगेच आम्ही गाडी पुढे ढकलली आणि दुसरी मोटार आली. आपापल्या जागेवरून आमच्यापैकी प्रत्येकाने ताबडतोब गोळीबार करून बॉम्बफेकीला सुरुवात केली. क्षणार्धात पिस्तुलाच्या फाड्फाड् आवाजाने आणि बॉम्बस्च्या व हॅण्डग्रेनेट्सच्या स्फोटामुळे वातावरण धुंद होऊन गेले. प्रतिपक्षी यावर स्वस्थ बसले नाहीत. शत्रूकडून बंदुकी आणि मशिनगन्स यांचा मारा सुरू झाला. आम्ही त्यांच्या समोरच रस्त्यावर उघडे सापडलो होतो. तरीही आम्ही पिस्तुलांनी गोळ्यांच्या एकामागून एक फैरी दुसऱ्या मोटारीवर झाडल्या. आम्ही तिघेजण रस्त्यावर उभे राहिल्याने दुहेरी संकटात होतो. शत्रूच्या गोळ्या कानाजवळून सणसणत जात होत्या. शत्रूचे बॉम्ब पायापाशी फुटत होते. तर मोटारीपासून फार दूर नसल्याने आमच्याच मित्रांनी मोटारीवर फेकलेल्या बॉम्ब्सनी मरणाची भीती होती.

मोटारीमध्ये बसलेल्यांवर गोळ्या झाडीत झाडीत आम्ही तसेच गाडीच्या मागे आलो. शत्रूच्या माऱ्यापासून तितकाच आडोसा. दुसऱ्याच क्षणाला गाडीवर गोळ्यांचा असा वर्षाव झाला की, तिच्या लाकडी धपल्या आमच्या अंगावर येऊन पडू लागल्या. तथापि घेतलेले काम पूर्ण केलेच पाहिजे, तोपर्यंत लढाई तशांतूनही पुढे चालवावयाची! तेवढ्यात चमत्कार म्हणजे विरुद्ध बाजूने शत्रूची आणखी एक मोटार येऊ लागली. दोन्ही अंगांनी चालणाऱ्या गोळ्यांच्या अग्नीवर्षावात आम्ही हरपणार अशी चिन्हे दिसू लागली. एक गोळी माझ्या डाव्या पायातून गेली. पण किती जखम झाली आहे हे पाहायलाही वेळ नव्हता. मी एवढे ओळखले की, गोळी पायातून आरपार गेली. एव्हाना शत्रूकडून सुमारे बारा रायफल्स आणि एक मशिनगन्स कामात आल्या होत्या. तथापि त्या बंदुका चालविणाऱ्यांचा थरकाप उडालेला असला पाहिजे. नाहीपेक्षा इतका वेळ आम्ही तग धरू शकलो असतो? तेवढ्यात एकाने कोणीतरी किरण साधला आणि आमचा प्रियमित्र मार्टिन सॅव्हेज माझ्या हातात पडला. गोळी छातीतून आरपार गेली होती. अभागी मुलगा! सकाळी किती स्वच्छंदाने स्वदेशाच्या स्वातंत्र्याची कविता गुणगुणत आणि त्या प्रयत्नांत मृत्यूला वरणाऱ्यांच्या गौरवाची गीते गात गात आमच्या बरोबर ॲशटाउनला तो आला! तास काही त्या गोष्टीला अजून झाला नव्हता. आणि एवढ्यात तो माझ्या हाताच्या वेंगेत शेवटचा निश्वास घेत होता! वीराचे मरण त्याला आले होते. रणांगणावर त्याला मृत्यू येत होता. स्वदेशाच्या मुक्ततेच्या लढाईत ब्रिटिशांच्या विरुद्ध लढताना ब्रिटिशाच्या गोळीने त्याचा अंत झाला होता. त्याच्या मनाप्रमाणेच झाले!!

शत्रूच्या गोळ्यांचा वर्षाव चालूच होता. क्षणाक्षणाला त्यांची तीव्रता वाढत होती. मी आमच्या मरणोन्मुख मित्राला तसेच खाली ठेवले. त्याचे ओठ हलत होते. त्याला काही तरी बोलायचे होते. मी कान त्याच्या ओठाजवळ नेऊन ऐकू लागलो. अत्यंत खोल आवाजाने सावकाश पण स्पष्टपणे त्याचे शब्द ऐकू आले. ''मी वाचत नाही, डॅन. पण आपले काम पूर्ण करा.'' तो प्रसंग विसरणे शक्य नाही. मोठे वादळ व्हावे आणि गारांचा कडकडाट व्हावा त्याप्रमाणे गोळ्यांचा ऐन वर्षाव चालला होता, माझ्यावर योजलेल्या गोळ्या इतस्ततः सर्वत्र फुटत होत्या, आणि माझ्या हातात निष्प्राण होणारा, रक्तबंबाळ झालेला हा कोवळा लाडका मुलगा! ॲशटाउनची ती जागा आणि ती डिसेंबरची सकाळची वेळ!

तथापि शोक करीत बसण्याची ती वेळ नव्हती! मार्टिन सॅव्हेजने इतके दिवस ज्या कार्याचे चिंतन केले त्यासाठी आपले प्राण वेचले होते. ते काम की ज्यासाठी प्रथम १९०६च्या ईस्टरमध्ये अवघ्या १६ वर्षांचा असताना त्यावेळच्या उठावणीत खांद्यावर त्याने बंदूक चढविली. आमचे काम हे होते की, त्यासाठीच जगायचे. आयर्लंड

जिवंत ठेवावयाचे व घेतलेल्या कामाची पूर्तता करावयाची. टॉम के एका चांगल्या आडोशामागे आला. मी जवळ-पास तेथून निसटण्यासाठी जागा पाहू लागलो. अशी जागा आढळेना. पायाच्या जखमेतून रक्त वाहात होते. शत्रूचा मारा तीव्र वेगाने चालत होता, तर आमचा मारा कमी होऊ लागला. आमच्याकडील हॅण्डग्रेनेट संपुष्टात आले होते. रिव्हॉल्व्हर्स रिकामी झाली होती. आणि आमचा एक सोबती कामी आला होता! त्या तशा गोळ्यांच्या भयंकर वर्षावात उपहारगृहाकडे धावलो आणि तेथे सुखरूप पोचून आडोसा घेतला. तेथे पोहचल्यावर लगेच माझ्या पिस्तुलाने गोळ्या झाडल्या. शत्रूकडे आता सामसूम दिसू लागली. खाकी पोशाखांतील ते योद्धे एकाकी तेथून पळाले आणि त्यांच्याबरोबर व्हाइसरॉयसाहेबांचा इतर लवाजमा पळाला.

आम्ही त्या रणक्षेत्राचे विजेते तिथे उरलो, समोर ती मोटार मोडून पडली होती. मोटारचा ड्रायव्हर जखमी होऊन आमच्या हातात सापडला होता. तो जखमी पोलिस आमच्या ताब्यात आला होता. आणि आमच्या शूर मित्राचे शरीर तेथे होते.

१९१९च्या डिसेंबरच्या या दिवशी आम्ही यश मिळविले होते; जो उद्देश आमचा होता तो सफल झाला होता. लॉर्ड फ्रेंच याला ठार मारले होते. आमचे पुढचे आणि ताबडतोबीचे काम म्हणजे शहरात लागोलग परतणे. कारण अर्ध्या तासाच्या आतच आसपासच्या कित्येक मैलांचा टापू ब्रिटिश सैन्याच्या टोळधाडीने तुडविला जायचा होता.

●●●

## १६. काय, लॉर्ड फ्रेंच सुरक्षित? अडेल वृत्तपत्रांना काय म्हणावे? सॅव्हेजचा अंत्यसंस्कार

आम्ही दहाजणांनी लगेच युद्धमंडळाची बैठक घेतली. आमच्यापैकी नऊजणांचे अंगावर ओरखडाही उठला नव्हता. मार्टिन सॅव्हेज कामी आलेला. मी जखमी झालेलो आणि रक्ताळलेलो. शस्त्रास्त्रांनी सुसज्ज अशा ब्रिटिश सैन्याच्या तुकडीला त्यांच्या बंदुका, मशिनगन्स, चिलखती मोटारी असतानाही पळवून लावले होते, लॉर्ड फ्रेंचला ठार मारले होते.

दुर्भागी मार्टिन सॅव्हेजचे मृत शरीर आम्ही उपाहारगृहात नेले. एवढेच काय ते आम्ही करू शकत होतो. आम्हाला माहीत होते की, शत्रू पाठीशीच येऊन आमच्या शूर मित्राचे हे शेष पार्थिव शरीर आपल्या ताब्यात घेणार; पण निरुपाय होता. त्याला शहरात हलविण्याचा प्रयत्न करणे म्हणजे आत्मनाश करण्यासारखेच होते. उपाहारगृहात जे थोडे होते ते भीतीने आणि आश्चर्याने निस्तब्ध होऊन पाहात राहिले.

आमच्या मृत मित्राला शेवटचा प्रणाम करून, दुचाकीवर बसून आम्ही शहराकडे निघालो. आम्ही काहीसे पुढे जातो तोच रॉबिन्सनची दुचाकी मोडली. तो लगेच ट्रेसीचे दुचाकीमागे त्याच्या रुंद खांद्याच्या आधाराने उभा राहिला. पण वेग येईना. आणि घाई तर अत्यंत होती. आता काय करावे असा प्रश्न येतो तोच समोरून एक दुचाकीस्वार येताना आढळला. बंदुकीचे आवाज ऐकून तो दुचाकी हाती धरून पायीच येत होता. रॉबिन्सनच्या हातात पिस्तूल अजून तसेच होते, ते त्याने त्याच्यावर रोखले आणि दुचाकीची मागणी केली. मागणी तत्काळ पुरविली गेली. नागरिकांना निष्कारण त्रास द्यावा हे आम्हांस पसंत नव्हते. पण ऐन धकाधकीत काय करावे? रॉबिन्सनने तशातही ''दुसरे दिवशी दुपारी ग्रेहॅम उपाहारगृहात ही दुचाकी मिळेल'' असे सांगितले. त्या माणसाला त्याची

दुचाकी परत मिळाली असावी. तशा धोक्याच्या गडबडीत रॉबिन्सन दुसरे दिवशी ग्रेहॅम हॉटेलमध्ये दुचाकी ठेवण्यास विसरला नाही.

आम्ही शहरात सुखरूप आलो. रक्तस्त्रावामुळे मला अशक्तता आली होती. मी तसाच जवळच्याजवळ मिसेस टूमे यांच्या घरी गेलो. पोलिसांना माझा माग वाटेत ओघळलेल्या रक्तावरून क्राब्रा रस्त्याचे टोकापर्यंत लागला. पण शहरात जेथे आम्ही प्रथम वळलो तेथे मार्ग लागला नाही. मिसेस टूमे यांनी अत्यंत सौजन्याने वागविले. मला लगेच अंथरुणावर निजविण्यात आले आणि वैद्यांना बोलाविणे पाठविले. जे.एम. रायन आयर्लंडच्या हार्लिन संघाचे नेते होते. त्यांनी परीक्षा केली. मी ज्या घरी होतो तेथून काही थोड्या पावलांवर मेटर रुग्णालय होते. तेथील एक वैद्य आले होते. त्यांनीही परीक्षा केली.

तो सायंकाळी वृत्तपत्र विकणाऱ्या पोरांच्या आरोळ्यांनी सर्व डब्लिन दुमदुमून गेले. ''राजप्रतिनिधीवर हल्ला! ॲशटाउन येथील विस्मयजनक झटापट! हल्ला करणाऱ्यांपैकी एकजण ठार!'' आणि नंतर! नंतर काय? माझे डोके बधीर झाले. मला समजेचना. मन कुंठित झाले ''लॉर्ड फ्रेंच सुरक्षित!''

काय? लॉर्ड फ्रेंच सुरक्षित? होय, खरे होते! सुरक्षित काय पण त्याला एवढा धक्कासुद्धा लागला नव्हता! मग आमचे प्रयत्न फसले तर! फसले! अगदी याच वेळेला लॉर्ड फ्रेंच दुसऱ्याऐवजी पहिल्या मोटारीतून गेला. त्या मोटारीला आम्ही काहीच केले नव्हते. तिला ठीक पिटाळून लावले, या आनंदात आम्ही होतो. आणि त्याच मोटारीने लॉर्ड फ्रेंच अगदी सुखरूप गेला!

या वार्तेने माझी जखम अधिकच चिघळली. कोणतेही काम अर्धवट झालेले मला खपत नाही. पण तेथे तर आमचे काम अर्धेमुर्धेही झाले नव्हते. सीन ट्रेसीने कर्मयोग्याचे वृत्तीने ती वार्ता ऐकली. ही त्याची नेहमीचीच वृत्ती होती. माझे समाधान करताना तो म्हणाला ''चालायचेच! अरे प्रत्येक वेळी नॉकलॉंगचे यश लाभत नाही!''

यानंतर फिरून लॉर्ड फ्रेंचवर गोळी झाडण्याची संधी मिळाली नाही. सार्वजनिक आयुष्यापासून त्याने आपले अंग पुरते काढून घेतले. लोकांच्या समोर तो यापुढे अगदी क्वचित आला. त्याच्या हालचालीबद्दल आत्यंतिक गुप्तता ठेवली जाई. तो परत इंग्लंडला गेला तेव्हासुद्धा चिलखती मोटारींचा रस्त्यावर आगबोटीपर्यंत सारखा पहारा होता. साध्या पोशाखातील सशस्त्र अधिकारी त्याच्याभोवती सतत होते. -अगदी लंडनला पोचेपर्यंत ही सावधगिरी घेण्यात आली.

चर्च आणि वृत्तपत्रे यांनी नित्याप्रमाणे आमच्यावर झोड उठविली. पण लोकांच्याकडून या प्रकाराचा निषेध करण्यात पुष्कळच सावधानता बाळगली गेली होती. त्यांचे हळूहळू ध्यानात येऊ लागले होते की, आमचा दृढनिश्चय काय आहे. एक आमचा अजिबात नि:पात तरी होईल किंवा इंग्लंडला आम्ही वाकवू हा आमचा निर्धार त्यांना समजू लागला होता. चर्च आणि वृत्तपत्रे वाटेल ते शिंतोडे आमच्यावर उडवीत होते. तरी लोकांच्याकडून त्याबद्दल अवाक्षरही उच्चारले जात नव्हते. त्यांच्या मनांतून ते आमच्या विचाराकडे वळले होते. प्रगटपणे करणे शक्यच नव्हते पण खाजगी बोलण्यांतून कित्येक आमच्या उद्योगाचे समर्थन करीत असत, गौरव करीत असत.

अशा विलक्षण साहसाने त्यांना स्तंभित करून टाकले. त्यांना समजले की, आम्ही खरेच अखेरच्या लढाईच्या प्रतिज्ञेने उठलो आहोत आणि आमचा पाठपुरावा करणे त्यांचे कर्तव्य आहे.

हल्ल्याच्या दुसऱ्या दिवशी सकाळी वृत्तपत्रकेसरी म्हणण्यासारख्या 'आयरिश इंडिपेंडन्ट' या पत्राने आमच्यावर अग्रलेख लिहिला. त्यात आमचा उल्लेख 'खुनी' या शब्दाने करण्यात आला होता. सर्व लेखातूनच 'खुनी, मारेकरी, नादान, भ्याडपणा, अनैतिक कृत्य, नीच गुन्हा' इत्यादी नामी नामी शब्द इतस्तत: सढळ हाताने विखुरले होते. हे पत्र सर्वस्वी राष्ट्रीय, ज्यांनी मतदानाच्या प्रसंगी लोकसत्तेला मते दिली अशा लोकांच्या आधारावर चालले होते. सज्जनता प्रगट करणे दूरच राहो, पण सामान्य शिष्टाचार म्हणून तरी या पत्राने मार्टिन सॅव्हेजच्या शरीरास अंत्यसंस्कार मिळेपर्यंत आपली मते लिहायचे थांबायचे होते. डब्लिनमधील बाकीच्या पत्रांची आम्हाला पर्वा नव्हती. आयरिश टाइम्स तर उघडउघड सरकारी, ब्रिटिश तुणतुणे वाजवणारा होता. फ्री मेन्स जर्नलला तुच्छ म्हणून

झिडकारावे इतकीही योग्यता त्या पत्राची नव्हती. पण राष्ट्रीय म्हणवून घेणाऱ्या म्हणा किंवा ढोंग करणाऱ्या पत्राने आमच्या मृत मित्रावर आपल्या लेखातून हल्ला चढवावा, पाठमोहरा खंजीर खुपसल्यागत करावे, ही कल्पना मनाला बरी वाटेना. असे चालू देता कामा नये!

मी तर जखमांमुळे अंथरुणाला खिळलेलो होतो. त्यामुळे पुढे घडणाऱ्या प्रकारांत प्रत्यक्ष भाग घेण्याचा प्रश्न नव्हता. आमच्या कित्येक तरुणांच्या डोक्यात आले की, त्या संपादकाला गोळी घालून ठार मारावे. अखेर निराळे ठरले. ते पत्र बंद पाडायचे असा विचार झाला. रविवारी रात्री ९ वाजता आमची वीस-पंचवीस मुले पीडर क्लॅन्सीचे नेतृत्वाखाली त्या पत्राच्या इमारतीत शिरली. सर्व संपादकवर्ग, कामगारवर्ग, यांना पिस्तुलांनी रोखून धरले. छापखान्याची यंत्रे फोडून टाकावयाची आहेत असे संपादकाला कळवून ते छापखान्यात शिरले. त्यांनी तेथील यंत्रे मोडली, खिळे मोडले आणि पुढे कित्येक दिवस तेथे काहीही छापता येणार नाही अशी स्थिती केली, आणि तेथून परतले. डब्लिनमधील इतर छापखान्यांच्या मदतीने प्रतिदिनाप्रमाणे दुसऱ्या दिवशी 'इंडिपेन्डन्टचा' अंक निघाला. तथापि आम्ही त्यांना चांगलाच धडा शिकविला होता. छापखान्यातील कोणालाही घरी बसण्याची पाळी आली नाही. बरेच झाले! कारण छापखान्यातील कित्येक आमच्या आयरिश स्वयंसेवकाचे घटक होते. यानंतर पुन्हा इंडिपेन्डन्ट किंवा डब्लिनच्या कोणत्याच वृत्तपत्राने आयरिश रिपब्लिकन सैनिकांचा खुनी, मारेकरी असल्या शब्दांनी उल्लेख केला नाही. इंडिपेन्डन्ट पत्रानेही, जरी आमच्या लढाईचे धोरणाला त्यांचा पाठिंबा आला नाही तरी -नंतर ब्रिटिशांनी केलेले अत्याचार उघडकीला आणून काही बरी कामगिरी केली. या छाप्याने झालेल्या नासधुसीबद्दल पत्राचे व्यवस्थापकांना १६००० पौंड नुकसानभरपाई मिळाली.

मार्टिन सॅव्हेजच्या प्रेताची चौकशी झाल्यानंतर त्याच्या नातेवाईकांच्या हाती त्याचे शव देण्यात आले. डब्लिनमधील चर्चमध्ये हा अंत्यविधी करण्याचे डब्लिनच्या धर्मोपदेशकांनी नाकारले. तेव्हा बॅलिसोडर-स्लिगो, काउंटी या त्याच्या जन्मस्थळी ते नेण्याचे ठरले. आदल्या रात्रभर शव तसेच डब्लिनच्या ब्रॉडसाईड स्टेशनवर पडून होते. काही थोडी मंडळी भोवती होती. पण दुसऱ्या दिवशी प्रेतयात्रा अभूतपूर्व अशी निघाली. पश्चिम भागातील कोणत्याच आयरिश देशभक्ताला एवढा सन्मान पूर्वी लाभला नव्हता. प्रेतयात्रा कित्येक मैल लांब होती. दफनविधीचे वेळी आजूबाजूने संगिनी लावलेल्या बंदुका घेऊन पोलिसांच्या कित्येक तुकड्या उभ्या होत्या. आम्हाला आश्चर्य वाटले. मृताशीसुद्धा वैर अं! पण मला वाटते मार्टिन सॅव्हेजचा तो गौरव अशाच रीतीने करणे त्यांना शक्य होते. फार मोठा गौरव तो होता!

पण मग खुद्द डब्लिनमध्ये, लोकसत्तेच्या राजधानीत मार्टिन सॅव्हेजच्या मृत्यूचा गौरव, बहुमान का बरे झाला नाही हा प्रश्न येतोच. उत्तर साधे आहे. लोकसत्तेचे सरकार, डेल आयरेन या सर्व गोष्टींपासून स्वत:ला अलग ठेवीत होते. फार थोर, मोठमोठ्या मृत आणि जिवंत व्यक्तींची नावे घ्यायला लागायची एवढ्यासाठी स्पष्टीकरण करीत नाही. तथापि एवढे खास उघड म्हणता येईल की, यावेळेस नव्हे किंवा पुढच्या कोणत्याच प्रसंगी नव्हे, ब्रिटिशांबरोबर चाललेल्या युद्धाचे उत्तरदायित्व डेल आयरेनने कधीही स्वीकारले नाही. असे का, तर मला माहीत नाही. मी डेलच्या धोरणावर टीका करीतच नाही. पुढे डिसेंबर १९२३ मध्ये लोकांनाही समजले आणि लोकसत्तेच्या दुसऱ्या पार्लमेंटने आणि फ्री स्टेटला डेलने प्रगट सांगितले की, हे युद्ध आयरिश स्वयंसेवकांनी (Irish Republican Army) स्वत:च्या प्रेरणेने, धोरणाने, स्वत:च्या बळावर पत्करावे. लोकसत्तेच्या सरकारची याला संमती किंवा असंमती काहीच नाही.

ॲशटाउनच्या हल्ल्याची नंतर वृत्तपत्रांतून येणारी वर्णने पुढे कित्येक दिवस येत होती. ती वाचून आमची पोटभर करमणूक होई. मार्टिन सॅव्हेजच्या शवाचे चौकशीच्या वेळी असे सांगण्यात आले की, हल्ला करणाऱ्यांनी पळ काढला आणि त्यांचा पाठलाग करण्यात आला. मी हे जेव्हा वाचले तेव्हा माझ्यासमोर त्यावेळी ब्रिटिश शिपाई फोनिक्स पार्कच्या भिंतीचा आसरा घेण्यासाठी कसे धावले, पळाले याचे चित्र उभे राहिले. पळणाऱ्या आमचा पाठलाग होत होता तर जवळ बंदुका, रायफल्स आणि चिलखती मोटारी

असताना आम्ही निसटलो ही जादूच समजावयाची! दुसऱ्या एका प्रतिभासंपन्न लेखकाने तेथील एका झाडाचे वर्णन केले आहे. त्यावर चढून आमचा एक मनुष्य टेहळणी करीत होता म्हणे. सहज नेमकी गोळी मारता येईल अशा ठिकाणी रस्त्यावरून साध्या डोळ्यांनी दिसते ती आगगाडी पाहण्यासाठी झाडावर चढावयाची कल्पना करणाऱ्याच्या अगाध लष्करी ज्ञानाचे कौतुकच केले पाहिजे.

सहज म्हणून उल्लेख करतो. चौकशीच्या वेळी असे झाले की, लॉर्ड फ्रेंच यांच्याबरोबर कोणी बाई होत्या. त्यांचे नाव सांगण्याचे सरकारकडून नाकारण्यात आले. त्याच वेळी असेही उघडकीस आले की लॉर्ड फ्रेंच त्यावेळी साध्या पोशाखात होता. मला वाटते त्याचमुळे पहिल्या मोटारीतून तो जात असताना आम्ही त्यास ओळखू शकलो नाही.

मिसेस टूमी यांच्याकडे काही दिवस राहिल्यानंतर, शहराच्या दक्षिण भागात क्रमांक १३ ग्रहॅम रस्ता, येथे मिसेस मॅलोन यांच्या घरी मला नेण्यात आले. तीन महिन्यांपूर्वी या कुटुंबाची आमची ओळख झाली होती. मिसेस मॅलोन या मोठ्या धीराच्या बाई होत्या. त्यांच्यावर विश्वास टाकण्यात कधीच धोका नव्हता. त्याचा मुलगा मिचेल १९१६ च्या उठावणीत मारला गेला होता. त्यांच्या दोन मुली ब्रिगिड आणि ॲन याही हुशार होत्या. कुमान ना मबानच्या त्या प्रामुख्याने काम करणाऱ्यांत होत्या. आम्हाला मदत करण्यास त्या नेहमी उत्सुक असत, आमचे निरोप पोचविणे आणणे ही कामे त्या करीत असत. बाहेरगावी दारूगोळा, पिस्तुले, काडतुसे पाठवावी लागत. खोक्यावर चहाचा, दारूचा, पुस्तकांचा कशाचा तरी शिक्का मारून रेल्वेच्या नेहमीच्या ठिकाणच्या अडत्याच्या पत्त्यावर आम्ही असे जिन्नस पाठवीत असू. आमच्या माणसांना पोस्टाने संकेताची पत्रे जात असत. त्या पत्रानुरूप नेमके खोके शोधून आमचे मित्र आपला माल घेऊन जात. अडत्ये आयरिश स्वयंसेवकांतलेच असत. या उद्योगांतही आम्हास या मुलींचे साह्य मिळे.

ॲशटाउनच्या लढाईचे पूर्वी काहीच दिवस मी ॲनला विनोदाने म्हटले होते की, मी कोठे जखमी झालो तर तुम्हाला शुश्रूषा करावी लागेल. माझ्या स्वप्नातही आले नाही की हा विनोद एवढ्या लवकरच खरा ठरेल. खरेच, मॅलोन यांच्या घरी मला शुश्रूषेसाठी यावे लागले. पायाची जखम प्रथम वाटले त्यापेक्षा बरीच खोल होती आणि त्यामुळे डोके फार दुखत असे. तीन महिने केवळ मी पडून होतो. चार पावले चालणे काही शक्य नव्हते. तेथे पडण्याचा कंटाळा आला आणि लवकर तेथून निघावे असे मनात आले असे मात्र नव्हे. प्रत्येकजण अत्यंत गोडव्याने वागे. पीडर क्लॅन्सी प्रतिदिनी येऊन मला काय काय घडते याची वार्ता सांगत असे. तो आला म्हणजे बोले कसा, बसे कसा याच्या अत्यंत मधुर आणि दु:खकर आठवणी माझ्या मनात सदैव येत असतात. डिक मॅकी, सीन ट्रेसी, हॉगन हे सर्व माझ्यावर लोभ करीत. ते नेहमी येत. पीडर, डिक आणि ट्रेसी यांना तर पुढचा नाताळ पाहाण्याइतकेही आयुष्य नव्हते! असो. पण त्यांनी हसत हसत शूर वीराचे हौतात्म्य स्वीकारले हे मला माहीत आहे.

या प्रिय मित्रांचे बरोबरच आणिक एक यापेक्षाही प्रबल कारण होते; त्यामुळे माझ्या वेदनांचे आणि असे कोंडून पडल्याचे काही वाटले नाही. ते म्हणजे अत्यंत प्रेमळ, काळजीने घेणारी ब्रिगीड मॅलोन हिची शुश्रूषा. आज ती माझी गृहिणी आहे. आपल्या भावी पत्नीकडून आजारात वैद्यकीय शुश्रूषा करून घेण्याचे भाग्य फारच थोड्या लोकांना लाभत असेल. कसल्याही वैद्यकीय औषधांपेक्षाही या शुश्रूषेचा गुण शतपटीने असतो. तथापि या लग्नाची हकिगत अजून १ ।। वर्षानंतरची आहे. ते घडले तो प्रसंगही एखाद्या अद्भूत पौराणिक कथेत वर्णन करावा असा आहे. पण त्याबद्दल पुढे लिहीन.

●●●

## १७. गुन्हेगार कोण? आम्ही की परकी सरकार?

१९१९ मध्ये अशा रीतीने अनेक गोष्टी घडल्या. सोलोहेडबेगच्या प्रकाराची नोंद चांगल्या प्रकारे झाली होती व त्या प्रारंभास फळेही येऊ लागली होती. त्याचे उत्कृष्ट प्रत्यंतर सरकारी पत्रकांतच होते. सरकारी पत्रकात अशा प्रसंगांचे उल्लेख आता नित्याचेच होऊन बसले होते. आमच्या कार्याचा हा खरोखरी गौरव होता. ''आयर्लंडमधील गुन्हे'' म्हणून जरी सरकार त्यांना संबोधित असले तरी ब्लॅक ॲण्ड टेन्सच्या आगमनापूर्वी आयरिश जनतेला त्यांची माहिती नव्हती. हे गुन्हे म्हणजे इंग्रजांच्या या परस्थ सैन्याविरुद्ध आम्ही केलेल्या हालचाली होत. स्वातंत्र्याच्या लढाईला ब्रिटिशांच्या कोशात गुन्हेगारी हे नाव होते. म्हणून १९२० च्या सुरुवातीला जगाला असे सालसपणे सांगण्यात आले की, १९१९च्या वर्षात ब्रिटिश लष्कर व पोलीस यांच्यावर शेकडो हल्ले करण्यात आले, हत्यारे चोरण्यासाठी शेपाचशे छापे घालण्यात आले आणि बारा पोलिसांना(छुपे हत्यारी गुप्तहेर) गोळ्या घालून ठार मारण्यात आले. या पत्रकांच्या प्रसिद्धीने आम्हाला या 'गुन्ह्यांचा' पस्तावा वाटेल आणि आमच्या मनांतली स्वदेशभक्ती थोडी निवळेल अशी जर ब्रिटिशांची कल्पना असेल तर न कळे! उलटे, केले हे थोडेच केले, यंदाचे वर्षी अशा 'गुन्ह्यांचा' आपण विक्रम करावयाचा हा मात्र निश्चय आम्ही केला आणि तो पारही पाडला.

या सर्व आकडेवारीत शांतताप्रिय नागरी जनतेवर इंग्लंडने केलेल्या अत्याचारांचा मागमूसही सापडणार नाही अशी काळजी घेतली होती. आयरिश जनतेने बहुमताने निवडलेले डेल आयरेन हे अवैध ठरविण्यात आले होते. आणि डेल आयरेनने राष्ट्रातील उद्योगधंद्याच्या वाढीसाठी जे जे प्रयत्न केले ते सर्व गुन्ह्याच्या सदरात जमा केले. त्याचप्रमाणे गॅलीक लीग, कुमान न मबान, आयरिश स्वयंसेवक संघ, बॉय स्कॉउटस् या सर्व संघटना अवैध ठरवून त्यांच्या कार्याला बंदी करण्यात आली. ब्रि. सैन्याने निरपराधी जनतेच्या घरांवर रात्री अपरात्री घातलेले छापे आणि तेथे केलेली लूट यांचाही नामनिर्देश त्यांत तुम्हास सापडावयाचा नाही. ऑर्थर ग्रिफिथच्या शब्दांत सांगावयाचे तर इंग्लंडने सर्व आयरिश राष्ट्रच एक अवैध जमाव ठरविला होता.

त्यावेळच्या आयरिश घडामोडींशी संबंध नसलेल्यांना हे सारे जरा भडक वाटेल. म्हणून ब्रिटिशांनी तेथे अजून काय केले नव्हते हे सत्यतापूर्वक सांगावयास पाहिजे. नाहीतर त्यांच्यावर अन्याय केल्यासारखेच होईल! कितीतरी गोष्टी त्यांनी करावयाच्या ठेवल्या होत्या. त्यांनी कर्फ्यू ऑर्डर पुकारली नव्हती. झोपलेल्या नागरिकांचे त्यांच्या बिछान्यांतच त्यांनी खून पाडले नव्हते. बॉंबहल्ले करून आणि सरसहा आगी लावून गावेच्या गावे त्यांनी बेचिराख केली नव्हती. 'पळून जाण्याचा प्रयत्न' म्हणून तुरुंगातल्या कैद्यांना त्यांनी गोळ्या घातल्या नव्हत्या. युद्धकैद्यांना फाशी दिले नव्हते. आणि स्त्रियांची लाज वेशीवर टांगली नव्हती. खरेच, कितीतरी गोष्टी करावयाच्या त्यांनी अजून बाकी ठेवल्या होत्या.

१९१९ मध्ये यातले त्यांनी काही केले नव्हते. नव्या वर्षाच्या प्रारंभापासून मात्र यातला प्रत्येक गुन्हा करण्याचे व्रत त्यांनी स्वीकारले होते!

मॅलोन यांच्या घरी डब्लिनमध्ये मी असतानाच पहिली कर्फ्यू ऑर्डर जारी झाली. १९२०च्या फेब्रुवारीत स्वयंसेवकांच्या बरोबर झालेल्या एका मध्यरात्रीचे चकमकीत ग्रॅफ्टन रस्त्यावर एक पोलीस गोळी लागून मरण पावला. ब्रिटिशांनी लगेच रात्रीपासून पहाटे पाचपर्यंत घराबाहेर पडणे हा गुन्हा ठरविला. थोडक्याच महिन्यांत दक्षिण आयर्लंडमधील बहुतेक शहरांना आणि मोठ्या गावांना ही आज्ञा लागू करण्यात आली.

लिमरिकमध्ये एके वेळी सायंकाळी सात वाजल्यानंतर कोणालाही घर सोडता येत नसे. कॉर्कमध्ये ही वेळ दुपारी चारपर्यंत अलीकडे ओढण्यात आली होती. बंदुकीच्या फैरीवर फैरी झाडून रस्ते मोकळे करण्याची पद्धत नित्याचीच झाली होती. पुरुष, बायका, मुले, कित्येक या प्रकाराला बळी पडत होती. या कर्फ्यू ऑर्डर्सनी साहजिकच सरकारच्या रक्तपिपासू टोळ्यांना मुक्तहस्त मिळे. कारण जेव्हा अशा वेळात निरपराधी नागरिकांना ठार करीत, तेव्हा

ते पाप पाहाण्यास कोणी नागरिक तेथे असू शकत नसे.

१९२०च्या वसंत ऋतुत मी मॅलोन यांचे सुखद घर सोडून फिंगलच्या पठारावरून तारा या सुप्रसिद्ध किल्ल्याच्या पायथ्याशी मीथ या ठिकाणी आलो. एक महिना मी या ठिकाणी काढला. येथेही नवनवे मित्र मिळाले, सर्वांनी मोठे आदरातिथ्य केले. खरोखरी देवाचे आभार मानावयास हवेत. का की इंग्लंडने आम्हाला सर्वस्वी लुबाडले होते पण आमच्या लोकांतील आतिथ्य आणि सौजन्य ते हिरावून घेऊ शकले नाहीत.

उन्हाळा जवळ येत होता. मला पूर्ववत् शक्ती आल्यासारखे वाटू लागले. काही तरी करू लागावे असे विचार मनात वारंवार येऊ लागले. लढाईला हळूहळू रंग भरत होता. अशात मी आळसात बसणे शक्य नव्हते. वृत्तपत्रांतील काही बातम्या वाचून रागाने वेडे होण्याची पाळी आली. टॉम मॅक कर्टिन, कॉर्क शहराचे सन्मान्य नगराध्यक्ष, पाच-सहा महिन्यांपूर्वी तो- आम्ही लॉर्ड फ्रेंचवर पाळत ठेवली त्यावेळी, आमच्याबरोबर होता -त्याला त्याच्याच घरात पत्नीचे देखत गोळी घालून ठार मारण्यात आले. थर्लसमध्येही असेच तीन खून ब्रिटिशांनी केले. ही म्हणजे या वर्षी जे शेकडो असे खून व्हावयाचे होते त्याची नांदी होती. हे सर्व प्रकार वरिष्ठ ब्रिटिश अधिकाऱ्यांच्याकडून प्रत्यक्ष योजलेले किंवा उत्तेजन दिले गेलेले असे होते. हे सर्व पाहून संतापाने मनुष्य वेडा न होईल तर काय नवल? मी पुन्हा कामास लागण्याचा निश्चय केला.

मी डब्लिनला परत आलो. अनेक मित्रांना भेटलो. आणि गनिमी युद्धाला सुरुवात करावी असे बोललो. डिक मॅकी आणि पीडर क्लॅन्सी यांनी मला आनंदाने पाठिंबा दिला.

पण मागे म्हटल्याप्रमाणे आमची मते ही अनधिकृत होती. डेल आयरेन किंवा आयरीश रिपब्लिकन आर्मीचे केंद्र कार्यालय यांनी या मताला संमती दिली नव्हती, किंवा त्याचे उत्तरदायित्वही स्वीकारले नव्हते. मिक कॉलिन्सला आमचे विचार मान्य होते. 'योग्य ठिकाणी' ते विचार मांडण्याचे त्याने वचन दिले. मिक् कॉलिन्स हा केंद्र कार्यालयातील प्रमुख अधिकारी होता. मी त्याचा मागे एकदा लॉर्ड फ्रेंचच्या बाबतीत उल्लेख केलाच आहे.

थोडक्यात लढाई करण्याचे आमचे धोरण प्रिय कोणालाच नव्हते. लष्कराच्या वरिष्ठांना ते नको होते. राजकारणी लोकांना ते नकोच नको होते. एकाने खाजगी बोलताना तर या विचारांचा धिक्कार केला. नशीब आमचे की, आमच्यातले हे मतभेद आम्ही लढाई संपून तह होईपर्यंत शत्रूपासून लपवून ठेवू शकलो. वृत्तपत्रांनी नेहमीप्रमाणे या कल्पनेवर झोड उठविली होती. इन्डिपेंडन्ट पत्राला धडा दिल्यापासून इतर वृत्तपत्रेही थोडीफार शिकली होती. आणि विशेषत: ''खुनी, मारेकरी'' अशा शब्दप्रयोगाच्या वेळी मुत्सद्देगिरी हेच खऱ्या पराक्रमाचे लक्षण आहे असे त्यांना वाटे. गोळीबार, शोचनीय प्रकार इत्यादी शब्द अधिक लोकप्रिय झाले होते.

सर्वसामान्य लोकांना लढाई नको होती. ते विसरले होते की, निवडणुकीत मते देऊन त्यांनी आम्हाला निवडून दिल्याने लोकसत्ताक राज्याची स्थापना झाली आहे. त्यांना एवढे वाटे की, पोलिसांच्यावर हल्ले म्हणजे कडक लष्करी निर्बंध, कर्फ्यू ऑर्डर्स, अधिकाधिक झडत्या आणि अटक करण्याचे सत्र व पोलिसांच्या विधवांना नुकसान भरपाई. कित्येकांची कल्पना असावी की, स्वातंत्र्य परसातल्या भाजीप्रमाणे सुखासुखी मिळेल. तथापि हे विचार नंतर नंतर पालटले.जसजशी लढाई अधिक तीव्र होऊ लागली तसतसा १९२०च्या शेवटी व १९२१च्या सुरुवातीस आम्हाला बहुमताचा पाठिंबा मिळू लागला. लोक हालअपेष्टा भोगायला, साहस, धोका आणि कष्ट सोसायला तयार झाले.

डब्लिनमध्ये फार दिवस राहण्याचा माझा विचार नव्हता. मला टिप्परेरीत परत जावयाचे होते. तेथे सर्व शांत पडले होते. तिथली तरुण मुले ठीक होती; अगदी लाखातली होती; पण त्यांना काही तरी सांगणारा, करा म्हणून सांगणारा हवा होता. म्हणून सीन ट्रेसी व मी पुन्हा एकदा दुचाकीवरून शंभर मैल जाऊन, सुमारे बारा महिन्यांच्या वियोगानंतर टिप्परेरीत प्रवेश केला.

या खेपेस आम्ही नवीनच बेत रचिला. आम्ही अगदी नवीन अशा मोहिमेचा प्रारंभ करण्याचे ठरविले. जगाला असे स्पष्ट समजावे की, आयर्लंडने हे युद्धच पुकारले आहे. हा आमचा हेतु होता.

## १८.प्रत्यक्ष युद्धाला सुरुवात, पोलिस ठाण्यांवरील हल्ले

यानंतर ब्रिटिशांचे विरुद्ध अधिक जोराची मोहीम सुरू करून या युद्धात आणखी एक पाऊल पुढे टाकण्याचे आम्हीही ठरविले. संबंध देशभर ठिकठिकाणी विखुरलेल्या पोलिस ठाण्यांवर हल्ले करून ती नष्ट करावयाची ही आमची नवी योजना होती. आपल्या ठाण्यापासून दूरवर पहारे करण्यास जाण्याचे पीलर्सनी अलीकडे सोडलेच होते. ठाण्याच्या केवळ आसपास ते घुटमळत. त्यामुळे आमच्या माऱ्यात ते येईनात. त्यांची आमची समोरासमोर गाठ पडेना. शेवटी त्यांच्या बालेकिल्ल्यात जाऊन त्यांच्यावर हल्ले करावयाचे धोरण योजावे लागले. चढाईच्या लढाईची ही उघड सुरुवात होती.

त्यांनाही कल्पना आलेली असावी. वातावरणातले वारे त्यांना आगामी युद्धाची सूचना देत असावेत. कारण १९२०च्या वसंतामध्येच त्यांनी लहानसहान ठिकाणी असलेले चौक्यापहारे उठवून मोठ्या गावी आपली संख्या एकवटण्यास सुरुवात केली. केव्हा प्रसंग ओढवेल आणि आकस्मिक हल्ला येईल हे कोणी सांगावे? न जाणो, वेळप्रसंग पडला आणि असा आकस्मिक हल्ला आला तर अगदी लहानलहान तुकड्या अलग पडतील आणि मोठा दुर्धर प्रसंग त्यांच्यावर ओढवेल हीच भीती होती. शिवाय त्यांनी अशा मोठ्या ठिकाणी सैन्याची अधिक मदत पुरविली, ठाण्यांच्या इमारतींना पोलादी जाळ्या बसविल्या, भिंतीभोवती काटेरी तारांची वेटोळी घालून ठेवली, आणि अशाच विविध रीतीने स्वसंरक्षणासाठी पक्का बंदोबस्त केला. ठरल्याप्रमाणे आम्ही आयरिश लोकसत्तेच्या स्वयंसेवकांनी उसंत न घेता पोलीस ठाण्यांवरील भरारी छाप्यांना सुरुवात केली. एका रात्री थोड्या थोडक्या नाही तर एक हजार पोलीस ठाण्यांना आणि चौक्यांना आगी लावून आम्ही त्या भस्मसात करून टाकल्या. पुन्हा म्हणून कोणा शत्रूला त्यांचा उपयोग करता येऊ नये. ब्रिटिशांच्या लष्करी साखळीचे जणू हे हजार दुवेच अशा रीतीने निखळून गेले.

इतके दिवस 'पीलर्स' हे ढोंगासाठी म्हणून का होईना, पण पोलीसदल होते. पण आता त्यांनी तो बुरखा टाकून देऊन आपले सत्य-स्वरूप उघडे केले. पोलिसांची कर्तव्ये पार पाडण्याऐवजी कोणत्याही पाशवी शक्तीचा उपयोग करून इंग्रजांचे हातात हा देश पक्केपणी ठेवावयाचा असा यांचा निर्धार झालेला दिसला. पोलिसांची कामे करावयास हे पोलिस जाग्यावर ठरेनातच. आम्हीही याचा पुरेपूर उपयोग करून घेतला. पीलर्सचा खाकी पोषाख कोठून नाहीसा होतो न होतो तोच आमचे स्वयंसेवक पोलिसांचे काम पाहू लागत. आणि किती उत्कृष्ट रीतीने त्यांनी ती कामगिरी बजावली! चोर व घरमालक या दोघांनीही या खांदा बदलीचे कौतुक करून आमच्या नव्या राजवटीचे स्वागत केले.

सामान्यत: स्वतंत्र देशांतील नागरिकांचा विश्वासही बसावयाचा नाही पण पीलर्सचे हे पोलीसदल अगदी निर्लज्जपणे गुन्हेगारांना आणि त्यांच्या गुन्हेगारीला उत्तेजन देत असे. निर्लज्ज हाच शब्द येथे त्यांचे वर्णन बरोबर करील. चोरीच्या अगर तत्सम गुन्ह्याबद्दल गुन्हेगाराला पकडले असता हे पीलर्स त्यांना सोडवून पाठीशी घालीत आणि उलटे आमच्याच स्वयंसेवकांना पकडून त्यांच्यावर अभियोग भरीत. अशा स्वयंसेवकांवर लष्करी कोर्टासमोर चाललेल्या कामाचे हकिकतींनी त्यावेळच्या वर्तमानपत्रांचे रकाने नेहमी भरलेले असत. हे झाले उजेडात येणाऱ्या बातम्यांसंबंधी. वर्तमानपत्रांत न आलेले प्रकार तर याहीपेक्षा और असत. एका ब्रिटिश शिपायाने अगदी निर्दयीपणे एक खून केला. पुराव्याबद्दल संशय राहणार नाही इतका तो स्पष्ट होता. 'पीलर्स'नी त्याला पकडले. पण त्याची चौकशी करण्याच्या ऐवजी त्याला सोडून देऊन उलटा कानमंत्र काय दिला, तर 'लोकसत्ताक स्वयंसेवकांच्या हाती सापडण्याअगोदर तू येथून पोबारा कर कसा!' म्हणजे पकडण्याचा नुसता फार्स! दुर्दैव बिचाऱ्याचे!! पाच मिनिटे देखील त्याला मोकळीक मिळाली नाही. कारण सुटताच तो आमच्या हाती पडला, आणि त्याच्या पापाचे पुरेपूर प्रायश्चित त्याला मिळाले.

'पीलर्स'च्या दिमतीसाठी 'ब्लॅक ॲन्ड टॅन्स'चा अवतार यावेळी उत्पन्न करण्यात आला होता. अनेक आयरिश

पोलिसांना आपल्या या देशद्रोही नोकरीबद्दल लाज वाटू लागली आणि त्यांनी राजीनामे देऊन या तिरस्करणीय कामातून आपली मुक्तता करून घेतली. त्यांच्या जागी हरामीचे काम करण्यास आयर्लंडमधील कोणी आयरिश तयार होईना, त्यामुळे सर हॅमन ग्रीनवुड यांच्या मेंदूतून या नव्या दलाचा जन्म झाला. पण त्यातही आयर्लंडमधून भरती होईना. आयर्लंडमध्येच काय पण इंग्लंडमध्येसुद्धा सभ्य म्हणून गणलेले लोक या दलात येईनात. शेवटी लष्करातून निवृत्त झालेले खालच्या वर्गातील ब्रिटिश शिपाई त्यात शेकड्यांनी घेण्यात आले. आणि त्यांचे जोडीला पुष्कळसे गुन्हेगार अगर तुरुंगातून सुटलेले कैदी यांचेच भरताड जोडण्यात आले. इंग्लंडमधून आयर्लंडमध्ये येणाऱ्या या नवागतांची संख्या एकदम इतकी फुगू लागली की, त्यांना 'पीलर्स'चे लोकप्रसिद्ध निळेकाळे पोलिसी गणवेश तुटपुंजे पडले. काही थोड्या टोप्या, थोडे कोट, आणि तसेच काही पायजम्यांचे जोड सगळ्यांना कसे पुरणार? शेवटी लष्कराचे सामान उसनवारीने आणून सर्वांना खाकी पोशाखाने मढविले; व पोलिसांची काही तरी एक निशाणी हवी म्हणून गणवेषाचा काही काही भाग मात्र त्यांना देण्यात आला.

दक्षिण आयर्लंडमध्ये या पोलिसांनी जेव्हा आपल्या कामाला सुरुवात केली तेव्हा त्यांचा अवतार काय वर्णावा? खाकी पोषाखाखाली नुसते पायमोजेच निळे असत. एखाद्याचे सर्व काही खाकी, एक कोट मात्र निळा. अगोदरच आयरिश लोकांची टोपण नावे शोधून काढण्याबद्दल ख्याती आणि त्यात प्रत्यही दिसणारे हे नवे सोंग! मग कल्पकतेला कुठला तोटा? नॉकलॉंग लगतच्या जिल्ह्यात दक्षिण टिप्परेरीत 'ब्लॅक ॲण्ड टॅन्स' या नावाचा प्रथम उद्भव झाला. 'ब्लॅक ॲण्ड टॅन्स' नावाची शिकारी हाउंड कुत्र्यांची या जिल्ह्यात एक अवलाद आहे. आणि या नव्या पोलिसांचे या कुत्र्यांशी नुसत्या रंगातच नव्हे तर वृत्तीतही किती साम्य आहे, याचा प्रत्यय लोकांना लवकरच येऊ लागला.

आमच्या जिल्ह्यात या सर्व घडामोडींना आमच्या अनुपस्थितीतच सुरुवात झाली होती. आम्ही परत आल्यावर वेळ न गमावता पोलिस ठाण्यांवरील हल्ल्यांना अविरत प्रारंभ केला. लहानसहान चौक्या उध्वस्त करण्याचे काम दक्षिणेकडे अगोदरच सुरू होते. कॉर्क लिमरिकच्या सरहद्दीवर अरग्लेन येथे पहिली सलामी झडली. लिम लिंच हा त्यावेळी नायक होता. चांगला पुरा सहा फूट उंचीचा, आणि डोळ्यात तर चमक अशी की, वाटावे सेनानायक होण्यासाठीच याचा जन्म आहे. लहान मुलासारखा निर्व्याज, प्रेमळ, पण त्याची छाती निधड्या सैनिकाची होती. ब्रिटिशांबरोबरच्या साऱ्या चकमकींमध्ये उत्कृष्ट सेनानायक म्हणून त्याचे नाव गाजले होते. तो व त्याचे दोघे सहकारी -सीन मोलीन आणि टॉम बॅरी यांनी या पोलिस ठाण्यांवरील हल्ल्यांत अप्रतिम कामे केली. आदल्या वर्षी, म्हणजे १९१९च्या शरदऋतूत कॉर्क शहराचा स्वातंत्र्यप्रेमी लोकनियुक्त अध्यक्ष टॉम हन्टर याने त्याची माझी ओळख करून दिली. त्यावेळी ही स्वारी माझेसारखी अज्ञातवासात होती. पण फरमनी येथे ७ सप्टेंबर १९१९ला एक डझन ब्रिटिश शिपायांनी काही प्रमुख दुकानांवर निष्कारण हल्ला करून त्यांची लूट मारून बॉम्बच्या हल्ल्यांनी ती उध्वस्त केली. त्यावेळी त्यांच्यावर पहिला प्रतिटोला हाणून त्यांना नि:शस्त्र करण्यात लिम लिंचने यश मिळविले, आणि तेथून त्याच्या पराक्रमाला सुरुवात झाली.

या पोलिस वा सैनिकी ठाण्यांवरील हल्ल्यांचे तंत्र ठरलेले असे. रात्रीचे वेळी ३०-४० आयरिश स्वयंसेवक एकत्र करून भोवतालच्या पाच-दहा मैल घेऱ्यातली रस्त्यांची झाडे वगैरे तोडून, आडवी टाकून, नाकेबंदी करावयाची; म्हणजे मदत यायची झालीच तर खूप उशीरा यावी. टेलिफोनच्या किंवा टेलिग्राफच्या तारा तोडून टाकावयाच्या, आणि शांतचित्ताने त्या ठाण्यासमोरील, मागील वा बाजूकडील काही घरांत प्रवेश करून हल्ल्याला सुरुवात करावयाची. काहीजण पेट्रोलच्या साहाय्याने त्याच वेळी इमारत पेटवून देण्याच्या उद्योगात असत. हल्ल्याची पहिली इशारत, एखादा सुरुंगाचा वा डायनामाइटचा दाराशी किंवा भिंतीपाशी स्फोट करून दिली जाई. या स्फोटामुळे इमारत एकतर खाली तरी येई, अगर तिला चांगले मोठे भगदाड पडे.

ड्रेनगन येथील हल्ला चांगला लक्षात राहण्यासारखा आहे. पाच तासांच्या अविरत लढाईनंतर हे ठाणे शरण आले. टिप्परेरीच्या पूर्व टोकास किलनॉलपासून सात मैलांवर

असलेल्या या ठाण्यावर हल्ला करण्याचे आम्ही योजिले. १९२० सालच्या २० जूनची रात्र. माझ्याबरोबर आणखी सीन ट्रेसी, सॉमस रॉबिन्सन, ओटिन ओमेली, सीन हॉगन हेही होते. नेहमीच्या पद्धतीनुसार टेलीफोनच्या टेलिग्राफच्या तारा तोडल्यानंतर आणि रस्त्यांचा बंदोबस्त केल्यावर त्या ठाण्याच्या अगदी समोरच्या एका रिकाम्या घरात आम्ही ठाणे मांडले. पोलिसांनी त्या घरावर पहारा न ठेवण्याचा मूर्खपणा कसा केला, याचे अजूनही मला कोडे आहे. पण होतो त्यांच्याकडून असा बिनडोकपणा कधी कधी! आणि त्याचाच तर फायदा आपण घ्यायचा असतो. ठाण्याच्या आणि घराच्या मधील रस्त्यावर आडोशासाठी एक छोटीशी भिंतही आम्ही उभारली. आमच्यापैकी बऱ्याच जणांनी बाजूच्या आणि मागच्या जागा धरल्या, आणि मध्यरात्रीच्या सुमारास गोळीबारास सुरुवात केली. पहिली फैर झडल्यावर आतल्या सैनिकांस शरण येण्याची आम्ही सूचना दिली व त्यासाठी अवधी दिला. उगीच कशाला माणसांची हत्या करा! आणि आमच्याजवळच्या तुटपुंज्या दारुगोळ्याची आयती बचत झाली तर आम्हाला हवी असे. पण ते कसले हट्टी, त्यांनी शरण येण्याचे नाकारले. लगेच रायफल्स, बॉम्ब्स, रिव्हाल्व्हर्स, शॉर्टगन्स -आम्ही आमच्या सगळ्या प्रकारच्या शस्त्रांनी फिरून हल्ला चढविला. त्यांनीही आतून प्रत्युत्तर दिले. इतकेच नव्हे तर आकाशात उंचावर चंद्रज्योतीचे बाण पाजळून जवळपासच्या पोलिस ठाण्यांना मदतीला येण्यासाठी आदेश दिला. सगळे आकाश अगदी प्रकाशमय झाले. पण मधील अडथळे काढून टाकून ही मदत यावयाला वेळ लागणार हे आम्हाला माहीत होते. मागून पुढून आम्ही जोराने हल्ला केला. आमच्यापैकी काहींनी तर इमारतीवर चढून छपर उसकटून फेकून दिले. एवढा वेळ होईतो बॉम्बचा धडधडाट आणि बंदुकीचा कडकडाट चालू असताच उजाडण्यास सुरुवात होऊ लागली. इतक्यात शत्रूकडील गोळीबार अकस्मात थांबला. आणि एका खिडकीतून कर्कश्श शिटी ऐकू आली. आम्हीही गोळीबार थांबविला, आणि आपल्या जागा सोडून उघड्यावर येण्यास त्यांना ओरडून सांगितले. एका मिनिटात सर्वांना आम्ही नि:शस्त्र करून कैद केले. आणि सर्वांसकट तेथून निघण्याची तयारी केली. लष्कराची मदत येण्यापूर्वी तेथून नाहीसे होणे अवश्य होते. आम्ही आमची लूट आणि हे कैदी गावाच्या सीमेपर्यंत घेऊन गेलो. तेथे एकूण दोन सार्जंटस् आणि सहा पोलीस सोडून देऊन आम्ही आमचा मार्ग सुधारला. एवढ्या पाच तासांच्या झटापटीत आमच्यापैकी कोणास ओरखडादेखील गेला नव्हता.

त्याच रात्री कॅपव्हाइट पोलिस ठाण्यावर आमच्या दुसऱ्या तुकडीने हल्ला केला होता. प्रत्येक ठिकाणी यश येणार असे थोडेच आहे? त्या ठिकाणी ते ठाणे आम्ही हस्तगत करू शकलो नाही. रिअर-क्रॉसवरील हल्ल्याचेही असेच झाले. रिअर-क्रॉसच्या हल्ल्यात अगदी हातघाईचा आणि अटीतटीचा सामना द्यावा लागला. ईस्ट आणि नॉर्थ टिप्परेरी ब्रिगेडमधील आणि लिमरिक ब्रिगेडमधील सैनिकांचेही या हल्ल्यात आम्हाला साहाय्य होते. मुख्य भाग माझ्या आणि सीन ट्रेसीच्या हाताखालचे दक्षिण टिप्परेरीतील तरुणांनी पार पाडला. शत्रूने आपला बचाव फार चांगल्या रीतीने केला हे कबूल करावयास पाहिजे. विशेषत: त्यांनी वापरलेली हॅण्डग्रेनेडस् फार परिणामकारक ठरली. ओ, ओमेली, मेली, जिम गॉरमन, ट्रेसी, मी स्वत: -सारेजण शार्पनेलमुळे थोडेफार जखमी झालो. शत्रूला ते ठाणे सोडावयास आम्ही भाग पाडू शकलो नाही, तरी इमारत मात्र पेट्रोलने पेटवून दिली आणि त्या भडक्यात बरेच शत्रूसैनिक जळून ठार झाले. त्याविना दोघे गोळ्यांनी ठार झाले ते निराळे.

मागे सांगितल्याप्रमाणे लिम लिंचच्या अरग्लेन येथील ठाण्यावरील यशस्वी हल्ल्यानंतर क्लेअर येथे मिचेल ब्रेननेने सुंदर यश मिळविले. कॉन्स्टेबल बॅकले याच्या ताब्यात ते ठाणे होते. पण तिथल्या साऱ्या शस्त्रांनिशी आणि दारुगोळ्यानिशी त्याला शरण यावे लागले. पुढल्या यादवी युद्धात केरी येथील लढाईत हा मारला गेला. एप्रिल २८च्या दिवशी सीन मॅलॉनने बॅली लॅन्डर्सच्या ठाण्यावर हल्ला करून तेथील शस्त्रे ताब्यात घेतली. या झटापटीत तिघे पोलीस जखमी झाले.

आमच्या या वरच्या मित्राने दुसरीकडे अशीच मोठी लढाई दिली. २७ मे च्या दिवशी किल मॅलॉकला हा प्रसंग घडला आणि त्यामुळे साऱ्या देशात चांगली खळबळ उडाली. कारण किलमॅलॉक हे ठाणे प्रथमपासून मजबूत

म्हणून प्रसिद्ध, शहराचे अगदी मध्यभागी भरवस्तीत वसलेले, आणि तेथील बंदोबस्तही मातब्बर होता. दक्षिण भागातील सर्वांत मोठे पोलिसठाणे म्हणून सर्वांना ते माहीत होते. आणि ते अजिंक्य आहे अशी साऱ्यांची कल्पना. तसे म्हटले तर ते अजिंक्यच राहिले. आमच्यापैकी स्कली हा अधिकारी यात ठार झाला आणि मध्यरात्रीपासून चांगले सकाळचे सात वाजेपर्यंत झुंजूनही आम्हाला हे ठाणे घेता आले नाही. पण त्यांनाही हे ठाणे राखण्यासाठी मोठी किंमत द्यावी लागली. त्यांचे दोघे अधिकारी त्यात मारले गेले. सहा पोलिस प्राणांतिक जखमी झाले. दोघांनी शरण जाण्याचा सल्ला दिला, म्हणून त्यांना त्यांच्याच अधिकाऱ्यांनी एका कोठडीत कुलूपबंद केले असताना गरीब बिचारे नंतरच्या आगीत जळून मेले. यावेळी तिथल्या एका हॉटेलचा आणि भोवतालच्या कितीतरी घरांचा आश्रय घेऊन आयरिश सैनिकांनी हा हल्ला चढविला आणि आग लावण्यासाठी तर एका घरातून चक्क होजपाईपच्या साहाय्याने पेट्रोलचा मारा केला. हे ठाणे लढविणाऱ्या सार्जंटला त्याच्या मर्दुमकीबद्दल नंतर ब्रिटिशांनी जिल्हा इन्स्पेक्टर केले. पण काही दिवसांनी लिस्ट टॉवेल येथे त्याला गोळ्या घालून ठार मारण्यात आले.

वर्तमानपत्रांतून या हल्ल्यांच्या बातम्या वाचण्यात अनेकवेळा मौज वाटे. आमच्यापैकी कोणाची आणि या संपादक महाशयांची गाठ पडत नसे की, त्यांना सारी खरी हकीकत समजावी. त्यामुळे त्यांची सारी मदार पोलिसकडून कळलेल्या हकीकतीवरच असावयाची. वरिष्ठांच्या डोळ्यात धूळ फेकण्यासाठी पोलिस या सर्व हकीकतींना मीठ-मिरची लावून रंगवीत असत आणि त्यांच्याच नकला वर्तमानपत्रकारांना त्यांच्या पोलिसच्या गोटातील हस्तकांकडून मिळत. थोडे चुकून निराळे लिहिलेच तर रात्री अपरात्री केव्हा 'ब्लॅक ॲण्ड टॅन्स'ची भेट मिळेल याचा नेम कोणी सांगावा? साहजिकपणे जेव्हा ३०-४० जणांच्या साहाय्याने आणि उण्यापुऱ्या चार-पाच बंदुका घेऊन आम्ही एखाद्या ठाण्यावर हल्ला करू त्यावेळी पोलिसांच्या वर्णनात ३००-४०० माणसे आणि मशिनगनचा ताफा येई. तसेच आमच्यापैकी कोणाला ओरखडाही उठलेला नसताना पोलिस सांगत ''त्यांच्यापैकी 'बरेच' जखमी होऊन पडले आणि तिघे ठार झाले.'' आमचे नुकसान होत नसे असे नाही. लढाईच ती! पण ते किती याची त्यांना कधी नक्की कल्पना आली नाही.

यानंतरची प्रसिद्ध हातघाईची लढाई उला येथे झाली. त्यामध्ये ब्रिगेड जनरल ल्युकासने आमच्या हातावर तुरी देऊन पलायन केले. पण तो प्रसंग पुढील प्रकरणात सांगावयास हवा.

●●●

## १९. सरकारी डाकेवर हल्ले. जनरल ल्युकासला अटक व त्याचे पलायन

ब्रिगेडियर जनरल ल्युकास हा फर्माय जिल्ह्याचा प्रमुख अधिकारी असून त्याचे निवासस्थान फर्माय येथेच होते. तेथून ७-८ मैलांवर कोना गावी मासे मारण्यासाठी नदीकाठी एक लहानशी जागा त्याने विकत घेऊन ठेवली होती. २६ जून १९२०ला लिम लिंच, जॉर्ज पॉवर आणिक त्यांचे काही मित्र यांनी अचानक कोना येथे ल्युकासला घेरले. त्याच्याबरोबर त्यांचे दोघे ब्रिटिश सहकारी अधिकारी - कर्नल डॅनफॉर्ड आणि कर्नल टिरेल हेही होते. अगदी आकस्मिकपणे त्यांना लिमने उचलले आणि बरोबरच्या मोटारीत घालून ती लिमरिककडे सुरू केली.

आयरिश स्वयंसेवकांपैकी एक प्रमुख अधिकारी बॉब बॉर्टन यास राजद्रोह फैलावण्याच्या आरोपावरून १० वर्षांची शिक्षा झाली होती, आणि तो इंग्लिश तुरुंगात खितपत पडला होता. युद्धकैद्यांची अदलाबदल करतात

त्याप्रमाणे बॉर्टनसाठी ल्युकासला ओलीस म्हणून डांबून ठेवावे हा आमचा मूळचा विचार होता. मोटारीतून नेताना या तिघांचे अरबी भाषेमध्ये संभाषण चालले होते. अर्ध्या तासानंतर त्यांनी जेव्हा एकदम त्यांना पकडणाऱ्यांवर हल्ला चढविला तेव्हा त्यांच्या त्या अरबी भाषेमधील संभाषणाचा अर्थ स्पष्ट झाला. त्याला पकडणारेही पण काही बेसावध नव्हते. त्या वेळच्या छोट्याशा चकमकीत कर्नल डॅन्फोर्ड जखमी झाला. तेव्हा लिंचने फर्मायच्या दिशेला मोटार वळविली आणि टिरेलला बरोबर देऊन कर्नल डॅन्फोर्डला त्याच्या ठाण्याकडे परत पाठवून दिले. ब्रिटिश शिपायांनी या उदार वागणुकीची परतफेड फर्माय गाव उध्वस्त करून दुसऱ्याच दिवशी रात्री केली. लिम लिंचच्या यशस्वी कटाचे प्रायश्चित या गरीब गावाला आदले वर्षी असेच भोगावे लागले होते.

ल्युकास हा स्वत: चांगला सभ्य आणि दिलदार मनाचा शिपाई होता. आयरिश स्वयंसेवकांच्या ताब्यात एकूण तो पाच आठवडे होता. पण या कैदेत त्याच्या इतमामास साजेलसे त्याला वागविण्यात आले. त्याच्या नातेवाईकांबरोबर तो पत्रव्यवहार करू शकत असे आणि आमच्यासारख्या फरारी पळपुट्यांचे आयुष्यात त्याची जेवढी बरदास्त आम्हास राखता आली त्यात यत्किंचितही उणेपणा आम्ही येऊ दिला नाही. काही काळानंतर हे मोकळेपणी कबूल करण्यात ल्युकासनेही मनाचा मोठेपणा दाखविला आहे. आता ब्रिटिश युद्धसमितीकडून हे कबूल करण्याबद्दल त्याला ठपका देण्यात आला ही गोष्ट निराळी.

त्याला हलविले ते शेवटचे ठिकाण पूर्व लिमरिकमध्ये एका घरात होते. जुलैचे २९ला रात्री त्याने तेथून आपली शिताफीने सुटका करून घेतली. या परिस्थितीचे निवेदन माझे क्षेत्रात येत नसल्याने ते येथे लिहीत नाही,

३० जुलै १९२० ची गोष्ट. सीन ट्रेसी आणि आम्ही लिमरिक टिप्परेरी रस्त्यावर एक प्रसंग घडवून आणण्याच्या विचारात होतो. या दिवसांत अनेकवेळा मेलगाड्या आणि टपालमोटारी रस्त्यात अडवून त्यांतील पत्रे फोडून वाचण्याचा प्रघात आम्ही पाडला होता. कारण त्यांमधून अतिशय महत्वाची बातमी तर मिळेच, पण शिवाय अधूनमधून निरनिराळ्या स्थानिक हेरांची व गुप्तपोलिसांची हालचालही कळे. हे लष्करी खलिते आमचे हाती पडू नयेत म्हणून सरकारला फार काळजी घ्यावी लागे. प्रसंगी आपली निराळी व्यवस्थाही ते करीत. इतका जिव्हाळ्याचा त्यांना हा प्रश्न पडला होता. त्याला अनुसरून लिमरिक जंक्शनपासून लिमरिकपर्यंतच्या वीस मैलांच्या रस्त्यासाठी आपले सैनिक पाठवून हे टपाल स्वत:च मोटारने आणावयाचा प्रघात लिमरिकच्या अधिकाऱ्यांनी पाडला होता. या सैनिकांवर हल्ला करून हे टपाल पळवावयाचे असा आमचा धाडसी बेत होता. टिप्परेरीच्या बाजूस उला गावापासून एक अर्ध्या मैलावरची जागा आम्ही मुक्रर केली. या युद्धस्थळाचे मानचित्र सांगावयाचे म्हटले तर टिप्परेरीपासून ६मैल, लिमरिक शहरापासून १५ मैल, आणि सोलोहेडबेगपासून म्हणजे आमच्या खाणीवरील हल्ल्याच्या गावापासून ४ मैल असे सांगता येईल. म्हणजे आम्ही जरी हमररस्त्यावर असलो तरी दक्षिणेकडे सुटून जाण्यास अनेक रस्ते होते, आणि सारा रस्ताभर आडोशासाठी अनेक लहानमोठी पांढरी काटेरी झुडुपे उभी होती.

अपेक्षित लष्करी गाडी नेहमीप्रमाणे १० ।। ला यावयाची. तेव्हा अगोदर काही थोडी मिनिटे एक मोठे झाड तोडून रस्त्यावर आडवे टाकून आम्ही रस्ता बंद केला आणि प्रत्येकजण कोणाला दिसणार नाही अशी जागा शोधून हुशारीने बसला. कारण खुद्द उला गावातील पोलिस ठाण्यापासून ही जागा लांब नव्हती आणि दुसऱ्या बाजूस केवळ दोन मैलांवर लिमरिक जंक्शनचे सैनिकी ठाणे होते. अगदी ठीक वेळेवर ती गाडी भर वेगात येत होती. आता वळण घेऊन पोलीस ठाण्यात शिरणार तोच आमची फैर झडली. उत्कृष्ट कसलेले सैनिक ते, चपळाईने त्यांनी गाडीखाली उड्या टाकल्या, आडोसा घेतला, आणि आमच्या गोळीबाराला प्रत्त्युत्तर दिले! पण पहिल्याच झटक्यात दोघांच्या बंदुका हातातून गळल्या आणि ते खाली कोसळले. बाकीच्यांनी मात्र जिकडून गोळ्या सणसणत होत्या; त्या दिशेकडे फैरीमागून फैरी झाडण्यास सुरुवात केली. सुमारे अर्धा तास ही गोळागोळी चालू होती. आणि आम्हां एकूण सात जणांजवळ १० फैरी झाडण्याइतकाच गोळ्यांचा साठा होता. तितक्यात आमचे दुर्दैव ओढवले. लिमरिककडून एक लष्करी गाडी आली.

असे काही होईल ही आम्हाला कल्पना नव्हती. योगायोगच केवळ! पण हा योगायोग असला तरी तो दुर्दैवाचा होता! तुटपुंज्या सामग्रीवर आम्ही किती वेळ तोंड देणार? तेव्हा माघार घेण्याचे ठरवून एक एक पाऊल आम्ही मागे घेऊ लागलो. त्यांचेच मदतीला उलाचे ठाण्यातून आणखी बारा पोलीस बंदुका घेऊन धावले. आमचे जवळ थोडी अधिक संख्या असती, तर ते ठाण्यातून बाहेरच पडले नसते. कारण आम्ही दाराशीच त्यांना रोखून धरले असते. एकंदरीत आम्हाला या खेपेस अपयश यावयाचे होते. त्यातल्यात्यात समाधानाची गोष्ट की, आम्ही सातही जण सुरक्षित राहून शत्रूकडील तिघे ठार आणि तिघे जखमी केले होते.

दुसरे दिवशी सकाळी या हल्ल्याची आम्हास माहीत नसलेली दुसरी बाजू कळली. ब्रिगेडियर जनरल ल्युकास याने स्वत: या हल्ल्यात भाग घेतला होता. मागे सांगितल्याप्रमाणे आदल्या रात्रीच त्याने आपली सुटका करून घेतली होती. रस्ता माहीत नसल्याने आणि आमच्यापैकी कोणी पाठलागास आला तर त्याला चुकविण्यासाठी सारी रात्र त्याने शेताशेतांतून भटकण्यात घालविली. सकाळी पालास गावाजवळ त्या मागाहून आलेल्या मोटार लॉरीची व त्याची गाठ पडली. अर्थात आम्ही कोणी त्याला ओळखले नाही. तो पळाला असेल ही कल्पनाच नव्हती. कावळा बसायला आणि फांदी मोडायला अशी एक गाठ पडली. तरी इंग्लिश वर्तमानपत्रांनी मात्र या प्रसंगाचे मोठे रसभरीत वर्णन केले. 'जनरल ल्युकास यास पुन्हा पकडण्याचा अयशस्वी प्रयत्न' असे मोठमोठे मथळे देऊन त्यांनी आपापल्या परीने ही वास्तविक योगायोगाची गोष्ट खूप रंगविली. आता काय, तो प्रसंग पार पडला. ल्युकासला त्याच्या पुढील आयुष्यात यश यावे हीच आमची इच्छा. त्याच्यासारखी उमदी माणसे शत्रूपक्षात विरळी आहेत.

या चकमकीनंतर मी डब्लिनला परतलो व काही किरकोळ कामे उरकण्यात थोडे दिवस स्वस्थतेत घालविले. रिअर-क्रॉस येथील पोलीस ठाण्यावरील हल्ल्यात माझ्या अंगात शिरलेल्या शार्पनेलचे तुकडे आतापर्यंत अंगात तसेच होते. तेही या अवधीत शस्त्रवैद्याकडून काढून घेतले.

हे सारे पार पडेपर्यंत शरदऋतू आला. दीड वर्ष आमचे डोसके मारण्यास शत्रूने मोठी रक्कम लावली होती. पण माझीही बेफिकीरी अधिक वाढली होती. आणि आमच्या लढ्याला दिवसेंदिवस उग्र स्वरूप येऊ पाहात होते. आयरिश स्वातंत्र्याच्या लढ्याची उराशी बाळगलेली माझी स्वप्ने हळूहळू स्वरूप धारण करीत होती. ब्रिटिश सैनिक आणि पोलिस, त्यातल्या त्यात 'ब्लॅक ॲण्ड टॅन्स' व ऑक्झिलीयरी यांनी मन:पूत धुमाकूळ माजविला होता. ऑक्झिलिअरी म्हणजे सभ्य खुनींची टोळी. या दोघांनी खुशाल दुकाने लुटावीत, घरे पेटवून द्यावीत, कैद्यांचे खून पाडावेत आणि तरुणांना नाही नाही तसे छळावे. पण त्यांच्या या अनन्वित छळाचा आम्हाला एकप्रकारे उपयोग झाला. कारण छळाच्या नव्या पद्धतीबरोबर व बातमीबरोबर हा लढा शेवटपर्यंत नेऊन पोहोचविण्याचा निर्धार अधिकच दृढ होई. तसे पाहिले तर सारे आयर्लंड आमचे पाठीशी आता उभे होते. उपयुक्त बातमी, आश्रय, अन्न-पाणी, लागेल तेव्हा पैसा -जे त्यांना शक्य असेल ते आम्हाला देण्यात सर्वसाधारण लोकांना धन्यता वाटू लागली. प्रत्यक्ष समरप्रसंगी आमच्याबरोबर ते सहभागी होत नसत. साहजिक आहे. पण ऐन तारुण्यात घरादाराची आस सोडून, प्राण संकटात घालून स्वदेशाकरिता युद्ध चालवीत असलेल्या स्वयंसेवकांना पाहून त्यांच्या पोटात तुटल्याशिवाय राहात नसे. क्वचित् प्रसंगी आमच्या विलक्षण धाडसी चढाईने इतके दिवस स्वस्थ असलेल्या तरुणांचे डोळे दिपून जात आणि कित्येकांच्या अंगात देशभक्तीचे वारे भरभरू लागे; आणि स्वयंसेवक म्हणून नोंदणी करून हातातील पिस्तुलाला काम शोधण्यासाठी बाहेर पडण्यात त्यांना अभिमान वाटू लागे. नाहीतर एखादा तरुण दिसला धडधाकट आणि हा स्वयंसेवक म्हणून पोलिसांना संशय आला की त्याच्यावर केव्हा कशी गदा येईल हा नेम नसे. त्यापेक्षा युद्धातील हे उघड उघड सैनिकांचे जीवन कितीतरी अभिमानाचे होते.

●●●

## २०.लोकसत्ताक सैन्याची उभारणी. डिनी लेसीचा परिचय

निरनिराळ्या लहान-सहान चकमकी आणि पोलिस ठाण्यांवरील हल्ले यांमध्ये घेतलेल्या अनुभवांवरून भरारी पथकाची कल्पना माझ्या मनात सारखी घोळत होती. दिवसा कामधंदा करून रात्री शिकारीला बाहेर पडणाऱ्या स्वयंसेवकांवर आम्हाला आतापर्यंत अवलंबून राहावे लागे. रात्री देशभक्तीचा उद्योग करावा आणि दिवसा एखाद्या दुकानात, कारखान्यात किंवा अन्यत्र कोठे तरी पोटाची विवंचना करीत राहावे असे या स्वयंसेवकांचे होई. त्यांचे स्वातंत्र्यप्रेम त्यांना स्वस्थ बसू देत नसे हे खरे असले, तरी त्यांच्या व्यवसायामुळे त्यांच्या स्वातंत्र्यप्रेमात अनेक अडचणी उत्पन्न होत. या सर्वांचा उपयोग केवळ रात्रीचेच वेळी होत असे व कामधंद्यामुळे रात्रीही त्यांना हमखास येता येईलच असे सांगता येत नसे. नॉकलाँगच्या लढाईत टिप्परेरीच्या स्वयंसेवकांवर आम्ही विसंबलो आणि त्यामुळे मोठीच पंचाईत व्हावयाची वेळ आली होती. हे एक उदाहरण झाले. याचप्रमाणे अनेक वेळा काही योजावे म्हटले तर कामाचा विचार करण्यापूर्वी यांच्या अडचणींचाच विचार प्रथम करावा लागे. पंचक्रोशीपलीकडे त्यांचा संचार व्हावयाचा नाही. अर्थात् हा काही त्यांचा दोष नव्हता. शिवाय त्यांना आवश्यक ते लष्करी शिक्षण द्यावे, तर वेळ कुठला, हा प्रश्न पडत असे. युद्धाच्या ऐन धुमश्चक्रीत ते जर सदैव राहाते तर ते अधिक प्रभावी ठरले असते. पण सामान्यत: शांततेच्या ऐसपैस वातावरणातच त्यांना गुंतून पडणे भाग पडे.

पण आता लढाईची परिस्थिती झपाट्याने पालटत होती. तिचे स्वरूप अधिकाधिक उग्रता धारण करणार हे स्पष्ट दिसत होते. आणि त्यामुळे आम्हाला खऱ्याखुऱ्या सैनिकांची आवश्यकता फार भासू लागली. खडे सैन्य असले म्हणजे मग त्यांना व्यवस्थित शिक्षण देणे सुलभ होते. त्याचप्रमाणे शब्दाच्या सूचनेनुसार दिवसा-रात्री, जवळ-दूर, चार मैलांवर वा चाळीस मैलांवर, कोठेही जाणे आले तरी निर्धास्तपणे विसंबता येते. शत्रूला एका जिल्ह्यात धक्का देऊन तेथे तो सावरतो न सावरतो तोच, तीस चाळीस मैलांवर दुसऱ्या जिल्ह्यात तसाच धक्का देऊन त्यांच्यात गोंधळ उडविणे हे केवळ या खड्या सैन्यालाच शक्य असते. यापूर्वी, हे कसे घडवावे, याबद्दलच्या विचारांनी माझे मन बैचेन होत असे. पण आता ते प्रत्यक्षात दिसण्यासारखी परिस्थिती जमून येऊ पाहात होती. ब्रिटिशांच्या राजनीतीमुळे अज्ञातवासात वावरणाऱ्या देशभक्तांची संख्या वाढत होती आणि या देशभक्तांच्या जोडीला स्वातंत्र्यप्रेमाने भारलेले शेकडो तरुण स्वयंस्फूर्तीने सैनिकी पेशा पत्करण्यास सिद्ध होते.

आयरिश लोकसत्तेचे स्वयंसेवक म्हणून ज्यांचा ज्यांचा संशय येई, त्यांना त्यांना गोळ्या घालण्याच्या ब्रिटिशांच्या नव्या तंत्रामुळे, घरी राहणे किंवा दुकानावर रोजगार करणे, हे दिवसेंदिवस अवघड होत चालले होते. अशा रितीने फुकट मरण्यापेक्षा स्वदेशाकरिता दोन हात करण्याचे समाधान तरी लाभावे अशा विचारांनी आमच्या सैन्यात शेकड्यांनी नावे नोंदली जाऊ लागली. या सर्वांना योग्य ते सैनिकी शिक्षण देऊन त्यांच्यातील अगोदरच असलेल्या धाडशी स्वभावाला शिस्तीची जोड देणे आवश्यक होते.

असा सर्व बाजूने विचार करून केंद्रातल्या अधिकाऱ्यांना मी आपल्या कल्पनेची आवश्यकता पटवून दिली आणि लगेच आयर्लंडच्या स्वतंत्र लोकसत्ताक सैन्याची मुहूर्तमेढ रोवली गेली. या सैन्याच्या अनिरुद्ध आणि वाऱ्यासारख्या वेगामुळे त्यांना भरारी पथके ही संज्ञा आपोआप मिळाली. यापुढच्या बारचौदा महिन्यांत गनिमी लढ्याचे सारे दायित्व त्यांनी उचलले. या योजनेचा ठळकपणे डोळ्यांत भरण्यासारखा एक मोठा फायदा झाला. टिप्परेरी, कॉर्क, यांसारखे काही परगणे म्हणजे अगदी जळजळीत; तर किरकेनी, वॉटरफर्डसारख्या ठिकाणी सर्वस्वी सामसूम असावयाची. ब्रिटिशांना अशा ठिकाणी चांगली उसंत मिळे. भरारी पथकांच्या स्थापनेनंतर आम्हाला सर्व परगण्यांतून सारखा संचार करता येऊ लागला. त्यामुळे निरनिराळ्या चकमकींचा साऱ्या देशभर एकच डोंब उसळला.

भरारी पथकांच्या संघटनेमध्ये माझ्या इतर मित्रांप्रमाणे एका नवीन मित्राचा परिचय दिला पाहिजे. 'डिनी लेसी' हे त्याचे नाव. १९२० ते १९२२ पर्यंत डिनीचे नाव सर्वांच्या तोंडी होते. डब्लिनमधल्या आमच्या या वास्तव्यात डिनीने सावलीसारखी माझी पाठराखणी केली. सर्व प्रकारच्या धकाधकीत आम्ही एकत्र होतो. मग 'जी' दलातील हेरांना हुलकावण्या देण्याची वेळ असो वा प्रसंगी त्यांच्याबरोबर समोरासमोर हातघाई करण्याची पाळी असो. या डिनीचे गुणवर्णन किती करावे? गोल्डन-गार्डन येथे त्याचा जन्म झाला. गोल्डन-गार्डन म्हणजे आयर्लंडमधील स्वदेश भक्तीचे जन्मस्थान आहे. तिथल्या भूमीची कूस अनेक देशभक्तांनी आपल्या जन्मांनी पुनीत केलेली आहे. त्याला शिक्षण मिळाले तेसुद्धा त्याच्या या स्वदेशभक्तीच्या गुणाचा विकास करणारे मिळाले. फादर मॅटरिअन यांची शाळा आणि त्यांची शिकविण्याची हातोटी म्हणजे माणसात जिवंतपणात, स्वाभिमान, स्वदेशाभिमान ओतण्याची मूस होती. 'General of the land war' म्हणून त्यांची आयर्लंडात ख्याती होती, यांचे शाळेत डिनीचे शिक्षण झाले होते.

फूटबॉल खेळण्यात डिनी पटाईत होता. पळण्याच्या चढाओढीत त्याच्याबरोबर कोणी टिकत नसे. तसे म्हटले तर साऱ्याच खेळांत तो प्रवीण व अग्रगण्य होता. साधारणपणे विद्यार्थ्यांना धार्मिक आचारांचे, प्रार्थनेचे वावडे असते. पण डिनी या नियमाला अपवाद होता. लहानपणापासून त्याची प्रार्थना चुकली नाही. श्रद्धायुक्त अंत:करणाने तो सर्व धार्मिक आचार पाळी. पुढे शाळा सोडल्यावर टिप्परेरी येथे जेव्हा उद्योगाकरिता आला, तेव्हा तो पोरसवदाच होता. पण आपल्या गुणांनी मालकाचा विश्वास संपादन करून त्याने त्याच्या कोळशाच्या मोठ्या धंद्यात लवकरच भागीदारी मिळविली. वास्तविक या वयात हवे तसे मनमुराद वागायला मोकळीक व स्वातंत्र्य असले म्हणजे बुद्धी चळायला वेळ लागत नाही, इतके मोह भोवताली टपलेले असतात. डिनीने कधी विडी ओढली नाही की दारूची चव पाहिली नाही. उलट वेळात वेळ काढून त्याने आयरिश भाषेचा चांगला अभ्यास केला. देशातल्या घडामोडीकडे त्याचे नुसते बारकाईने लक्ष असे, एवढेच नव्हे, तर त्यात प्रत्यक्ष भाग घेतल्याशिवाय त्याचे मन स्वस्थ राहात नसे. टिप्परेरीमधील स्वयंसेवकांत डिनी फार उत्साही, मेहनती व निष्ठावंत स्वयंसेवक म्हणून गणला जाई. १९१६ चे ईस्टर आंदोलनात गॅलीबॅली येथे 'प्रत्यक्षाची' वेळ आली असता अनेक स्वयंसेवकांना तेथे पाचारण केले होते. त्यावेळी स्वयंस्फूर्तीने त्याने आपले नाव नोंदविले. पण त्यावेळी परत पाठविल्यामुळे या बाल देशभक्ताची मोठी निराशा झाली होती. आपल्या शत्रूला हात दाखविण्याची संधी आपणास लाभली नाही याची त्याला फार खंत वाटत असे.

त्यानंतर १९१६मध्ये आयरिश स्वयंसेवकांची जेव्हा पुनर्घटना करण्यात आली, तेव्हा डिनीचे नाव पुनर्घटना करणाऱ्यांच्यात अग्रगण्य होते. पण यामुळे त्याच्यातली मूळची विनयशीलता व सालसता अधिक वाढली. त्या वेळच्या काळात आम्हाप्रमाणेच तोही, कोठे एखादे रिव्हॉल्व्हर वा बंदूक मिळते का, याच्या शोधात सारखा असे. आपल्या जवळचा सारा पैसा त्याने असली खरेदी करण्यात घालवला. स्वातंत्र्याच्या संग्रामात उडी घेण्यासाठी त्याने कशाकडेही मागे पाहिले नाही. धन तर त्याने केव्हाच दिले होते. मनानेही तो सर्वस्वी याच कार्याला वाहिलेला होता. आणि शेवटी याच कामी देहही अर्पण करून त्याने चिरंजीवित्व जिंकले.

तो माझा अगदी बाळपणापासूनचा मित्र. माझ्या घरापासून केवळ मैलभराच्या अंतरावर त्याचे घर होते. आमच्या गाठीभेटी नेहमी पडत. अनेक गोष्टी आम्ही बोललो, कल्पना केल्या, भावी संग्रामाची रम्य चित्रे रेखाटली -आणि ती खरीही करून दाखविली. किलमॅलॉक येथे १९२० चे मे महिन्यात सबंध रात्रभर झालेल्या संस्मरणीय धुमश्चक्रीत डिनीने फार मोठा भाग उचलला होता. त्यानंतर त्याला लगेच अज्ञातवास पत्करावा लागला. उपजत असलेल्या त्याच्या धाडसी प्रवृत्तीत या नव्या जीवनाने फार मोठा बदल घडवून आणला. आणि अत्यंत धाडसी, तडफेचा, यशस्वी योद्धा म्हणून त्याने नाव कमावले. ब्लॅक ॲण्ड टॅन्स, त्याचा इतका राग व द्वेष करीत की, टिप्परेरीमध्ये जेथे जेथे तो होता म्हणून त्यांना कळले, ते घर त्यांनी आग लावून, पार जाळून पोळून भस्मसात् करून

टाकले. इंग्लिशांशी लढता लढता मृत्यू यावा ही या शूर वीराची मनीषा होती. पण तसे न होता आपल्याच देशबांधवांकडून मरण येणे त्याचे कपाळी लिहीले गेले होते. १९२३ चे यादवी युद्धात गोळ्या लागून हा मृत्यूमुखी पडला.

●●●



## २१. ब्रिटिश हेरांबरोबर झटापटी.
## डब्लीनमधील जिवावरचे प्रसंग.

डब्लिनमध्ये येण्याचे आमचे मुख्य काम आता पार पडले होते. आणि आमच्या कल्पनेप्रमाणे भरारी पथकाची योजना केंद्रकार्यालयाने मान्य केली होती. तेव्हा डब्लिनमध्ये राहण्याचे फारसे कारण उरले नाही. तेथे आमच्या जिवावर केव्हा बेतेल याचा मुळीच नेम नव्हता. ब्रिटिश हेर आणि टेहळे तेथेही शिकारी कुत्र्याप्रमाणे सारखे आमच्या वासावर होते. आमची माहिती देणाऱ्यास मोठमोठी बक्षिसे प्रकट केली जात होती. आणि त्याच वेळी त्यांचे हेरखाते अधिकाधिक कार्यक्षम करण्याकरिता त्यांची धडपड चालली होती. आम्हा आयरिश स्वयंसेवकांच्या हेरखात्यावर कशी मात करता येईल हा एक त्यांना घोर लागला होता. त्यांच्या मदतीला नव्हते काय काय? डब्लिनसारख्या राजधानीच्या रस्त्यांवर वारंवार दिसणारी दृश्ये शत्रूप्रदेशात होणाऱ्या सैन्याच्या हालचालींना साजेशी होती. केव्हाही पाहावे, लष्करी सैनिकांची आणि लष्करी मोटारगाड्यांची धावपळ सतत चालूच असावयाची. मध्येच कोठे या गाड्या थांबत, आतील शिपाई पटापट बाहेर उड्या टाकीत, रस्त्याने जाणाऱ्या येणाऱ्या पादचारी माणसाला अडवीत, त्यांची झडती घेत, आणि त्यांच्यावर प्रश्नांचा भडिमार करीत. दिवसातून सात-आठ वेळा तरी या शिपायांच्या अशा भेटीचे सद्भाग्य अनेकांच्या वाट्यास येत असे. रस्ते अडवून ट्रामगाड्या, मोटारी हे थांबवीत; आणि प्रत्येक उतारूची कसून झडती झाल्यावर मग पुन्हा वाहतूक सुरू करीत. कधीकधी तर शहराच्या एखाद्या सबंध भागावरच यांची धाड कोसळे आणि मग सारे रस्ते रोखून धरून प्रत्येक घराची अगदी तळघरापासून तो माळ्यापर्यंत झडती घेत. हे काम थोड्या तासांचे नव्हते. कित्येकदा हा वेढा दिवसन् दिवस त्या त्या भागावर तसाच पडलेला राहावयाचा. त्यामुळे दैनिक व्यवहार व उद्योगधंदे पार पडण्याची मोठी मुष्कील होई. अनेकांना या दिवसांत अचानक उचलबांगडी करून डब्लिनच्या किल्ल्यात डांबून ठेवले जाई. मग चार भिंतींच्या आत त्यांचा कसकसा छळ होई, त्यांना छळण्यासाठी कोणकोणत्या नवनव्या क्लृप्त्यांचा अवलंब करण्यात येई हे त्या चार भिंतींनाच माहीत! पोस्टामध्ये सरसकट सर्व पाकीटे फोडली जात असत. हॉटेलमधल्या नोकरांना सढळ हाताने लाच दिली जाई. टेलिफोनची स्वतंत्र संकेतबोली ठरवून देऊन ब्रिटिशांकडून तिचा उपयोगही मोठ्या प्रमाणावर केला जाई. हा सारा खटाटोप कशासाठी? तर आमच्या हेर खात्यावर काहीही करून मात करावी एवढ्यासाठी. तेव्हा एवढ्या जंजाळातून मी सहीसलामत सुटणे म्हणजे परमेश्वराची लीलाच होती. सावलीसारखा माझा पाठलाग चालला होता; आणि मीही पण हाताच्या बाहीत मनगटाच्या पट्ट्यात अडकविलेले पिस्तुल चाचपीत, येईल त्या प्रसंगाला तोंड देण्याच्या सिद्धतेने वावरत होतो.

आणि शेवटी असा प्रसंग आलाच. मला वाटले, माझ्या आयुष्याचा शेवटचा क्षण आला. एका शुक्रवारी रात्रीची गोष्ट. हेन्री स्ट्रीटवर नेल्सन पीलरच्या चौकात बसची वाट पाहात मी एकटाच उभा होतो. ड्रमकॉन्ड्रा व व्हाईट हॉल यांच्यामध्ये राहाणाऱ्या प्रो.कॅरोलॅन यांच्या घरी त्या दिवशीची रात्र घालविण्याचा माझा विचार होता. बस येताच चटदिशी उडी मारून मी तीत चढलो आणि तडक दुसऱ्या मजल्यावर गेलो. पाठोपाठच पाच जणांनी तितक्याच चपळाईने माझा पाठपुरावा केला आणि तेहि माझ्या मागे दुसऱ्या मजल्यावर आले. त्यांतील दोघांना मी पाहिल्याबरोबर ओळखले. ब्लॅक ॲण्ड टॅन्स, ऑक्झिलियरी यांच्या जोडीला जनरल ट्यूडरने इंग्लिश व आयरिश शिपायांतून काही लोक निवडून काढून एक खुनी (Castle Murder Gang) टोळी तयार केली होती. डब्लिनचा किल्ला त्यांचे निवासस्थान होते. त्यांतीलच हे दोघेजण होते. संधी सापडताच स्वयंसेवकांच्या कोणाही महत्वाच्या अधिकाऱ्याला गोळी घालण्याचे काम यांच्यावर सोपविण्यात आले होते. हे सारे लोक आणि यांचे कार्य गव्हर्नर सर हॅमर ग्रीनवूड यांना माहीत होते. इतकेच नव्हे तर असल्या प्रकारांना त्यांची संमती होती. मारेकऱ्यांच्या

या कामासाठी टोळीतील खुन्यांना मुद्दाम अधिक पगार मिळे आणि त्यांच्याविरुद्ध कोणी कितीही बळकट पुरावा दिला, तरी त्याची साधी चौकशीही न करण्याचे आतून आश्वासन दिलेले होते. पोलिस आणि सैन्य यांच्यापासून या खुनी टोळीचे अस्तित्व गुप्त ठेवले होते. आता आमच्या हेर खात्याला त्याची नावनिशीवार माहिती होती, कित्येकांचे फोटोही आम्हाला आमच्या केंद्राने पुरविले होते ही गोष्ट निराळी.

त्या पाच जणांतील दोघांची ओळख पटल्यावर उरलेल्या तिघांना त्यांचेच साथीदार म्हणून ओळखण्यास मला 'शेरलॉक होम्स' असण्याची आवश्यकता नव्हती. खरोखर प्रसंग अगदी गळ्याशी येऊन भिडला होता. त्या बसमधून परत खाली उतरावे, तर त्यांना लगेच गोळीबार करण्यास संधी देण्यासारखेच होते. अनंत विचारांनी माझ्या मनात गर्दी केली. कदाचित त्यांचे त्या बसमध्ये शिरणे हा योगायोगसुद्धा असावयाचा. आणि मला त्यांनी ओळखलेच असेसुद्धा समजण्याचे कारण नव्हते. दुसऱ्या एखाद्या कामाला कशावरून निघाले नसतील? शक्य आहे. म्हणून अस्वस्थतेचे अगर भीतीचे थोडेही चिन्ह तोंडावर दिसू न देता स्वस्थ राहणे योग्य होते. थंड राहणे, तोंडावरची रेषाही बदलू न देता थंड राहणे, हाच जुना उपाय यावेळीही मी कामी आणला. दुसऱ्या मजल्यावर आल्यावर मी इकडे तिकडे दृष्टी टाकली, आणि अगदी सहजपणे जिन्याच्या टोकाशीच तीन जागा असलेल्या एका बाकावर मी बसलो. खिशातून सिगारेट काढली आणि धूम्रवलये काढण्यास सुरुवात केली. त्यांपैकी दोघांनी माझ्या बाजूस जागा घेतली. तिसरा शेजारीच माझ्यामागे कठड्यास धरून उभा राहिला. आणि उरलेले दोघे अंगावरून पुढे जाऊन थांबले. जणू अगदी ठरवून-योजून माझ्या शिकारीसाठी सापळा मांडावा असे त्यांनी केले. उभ्या आयुष्यात मनाची इतकी अस्वस्थता मी अनुभविली नव्हती. संकट, संकट नव्हेच, प्रत्यक्ष मृत्यूच आ वासून उभा होता आणि त्यांतून सुटका होण्याचा मार्ग कोठेच दिसत नव्हता.

मी किंवा त्यांनी काही हालचाल केली नाही. बस पुढे चालू झाली. रात्रीचे ११ वाजून गेले होते, १२ वाजता कर्फ्यू सुरू व्हावयाची. गस्त घालणाऱ्या पोलिसांच्या बारा पंधरा गोळ्यांना बळी पडण्याची कोणाचीच इच्छा नसल्याने जो तो घरी जाण्याच्या गर्दीत होता. बसमध्ये खूप गर्दी होती. पण एकाला तरी त्याच्या शेजारी कसल्या 'नाट्यप्रसंगाची' गुंफण होत आहे याची कल्पना असेल का? अशाच स्थितीत पार्नल चौक गेला. मलाही थोडा धीर आला. गुप्तहेर व पोलिस यांच्यासह प्रवास करण्याचे प्रसंग पूर्वीही मजवर अनेक वेळा आले होते. वरून शांत पण अंतर्यामी छातीचे ठोके मोजत मोजत, केवळ त्यांनी न ओळखल्यामुळे, त्या त्या वेळी, त्या प्रसंगातून मी सहीसलामत सुटलोही होतो. कोणी सांगावे, या वेळीही सुदैव मजबरोबर असेल!

पण छे! आजची वेळ निराळी होती. माझ्या डाव्या-उजव्या बाजूच्या मित्रांनी एकदम हालचाल केली. त्यांचे हात विजारीत गेले. काहीतरी बाहेर काढण्याचा त्यांचा प्रयत्न होता. क्षणार्धही गेला नाही, माझे पिस्तूल बाहेर निघाले. त्यांचे बाहेर निघण्याचे अगोदर माझे पिस्तूल बाहेर निघाले. मी जिंकली हे त्यांच्या लक्षात आले. आणखी एकच क्षण, ते तिघेजण थांबते तर! जिन्यावरून धाडधाड उड्या टाकून त्यांनी रस्त्यावरून धूम ठोकली. मीही त्यांच्या पाठोपाठ जिना उतरून त्यांच्या पाठलागास सुरुवात केली. माझे पिस्तूल रोखलेले होतेच -पुन्हा विचार करण्याची वेळ आली. प्रथम गोळ्या कोणी झाडाव्या? ते तर गोळीबार करणार नाहीत ना? पिस्तुलाच्या द्वंद्वासाठी ते ठिकाण योग्य नव्हते. घाई-घाईने चाललेल्या पादचाऱ्यांनी रस्ता गजबजला होता. शिवाय सैनिक किंवा ऑक्झिलियरी केव्हा येतील याचा नेम नव्हता. त्या तिघांनी जर प्रथम गोळ्या झाडल्या तर? मला प्रत्युत्तर करण्याविना गत्यंतर नव्हते. पण तसे न झाले तर मी स्तब्ध राहणे इष्ट होते. तशात फार वेळ घालविणे इष्ट नव्हते. कारण, व्हाइट हॉलकडे जाणारी यानंतर शेवटचीच बस होती. ती एकदा गेली की मग कर्फ्यू ऑर्डरला मी बळी पडलोच.

या वेळी गार्डिनर स्ट्रीट चर्चच्या समोर डार्सेट रस्त्याचे मध्यावर आम्ही होतो. तेव्हा त्यांना फसविण्यासाठी मी एक युक्ती योजली. फूटपाथवर चढून सेंट टेरेसकडे मी एकदम धूम ठोकली. आणि तीन-चार पावले जाऊन जागच्याजागीच पाय वाजवीत उभा होतो. त्यांची

चांगलीच फसगत झाली. मी सेंट टेरेसकडे धूम ठोकली, तेव्हा मला अडविण्याकरिता विरुद्ध टोकाला असलेल्या झाडीच्या समांतर रस्त्याकडे ते पळाले. मी मात्र जागच्याजागी पाय वाजवीत उभा होतो. इतक्यात ती शेवटची बस आली. रस्त्याने ती चालली असताच मी तिच्यात चढलो. मला अडविण्यासाठी पळालेले ते तिघे त्या झाडीत माझा शोध घेत बसले असतील मागे! आदल्या बसमधील त्यांच्या उरलेल्या दोघां दोस्तांनी, माझा पाठलाग करून आपल्या मित्रांना मदत का केली नाही, हे मला अजून समजत नाही. संकटात आपल्या मित्रांचा पाठपुरावा करणे हे त्यांच्या नीतीत कदाचित बसत नसेल. ड्रमकॉन्ड्रा येथे पुढे झालेल्या मोठ्या चकमकीमध्ये याच पाच जणांपैकी एकाने आमचा फर्नसाइडपर्यंत पाठलाग केला होता. त्या दिवशी त्याला मी लगेच ओळखले.

दुसरे दिवशी ट्रेसीला मी माझ्या पराक्रमाची हकिकत सांगितली, आणि आम्ही पोटभर हसलो. प्रत्येक वेळी मी त्यांचे हातातून असा सुटेन असा विश्वास बाळगू नको म्हणून त्यानेही त्याच वेळी मला बजावले. शत्रू आमच्यावर असे टपून असल्यामुळे बाहेर जायचे तर दोघांनी जावे, नाही तर घरातील कामे पार पाडावीत, असे ठरले. शक्यतो एकट्याने बाहेर सापडू नये. परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत चालली होती. यानंतर डब्लिनमध्ये आम्ही थोडेच दिवस होतो. पण तेवढ्या अवधीत आमच्यावर जे जे प्रसंग ओढवले त्यावरून आम्ही तिथे जीवनमरणाची शिवाशिवीच खेळलो, असे स्पष्ट दिसून येते.

या प्रसंगानंतर एक दोन दिवस थोडे विश्रांतीत घालविले. रविवारचा दिवस साधारणत: आम्ही गॅलिक ॲथलेटिक असोसिएशनच्या क्रोक पार्कमध्ये घालवीत असू. असोसिएशनच्या ॲन्डी हॉर्टी, डी.पी. वॉल्श वगैरे अधिकाऱ्यांबरोबर पत्त्यांचे दोन तीन डाव टाकावेत, गप्पा माराव्यात, चर्चा करावी, असा उद्योग रविवारच्या संध्याकाळी आमचा व्हायचा. ते सगळेच आमचे चांगले मित्र झाले होते. कधी कधी त्या पत्त्यांच्या डावांत थोडे शिलिंगही या हातातून त्या हातात जात. ही पैजेची रक्कम कधी फुगली नाही. पण आमच्यासारख्या जन्मदरिद्र्यांना स्वत:च्या चैनीसाठी हे चार पाच शिलिंग म्हणजे मोठी रक्कम वाटे. नुकत्याच टळलेल्या जिवावरच्या प्रसंगानंतर सीन आणि मी दोघेही थोडे अधिक उत्साहात होतो. अभावितपणे खेळ रंगला. पैशांची चवडही उंच उंच होत चालली. मला त्या साऱ्या पैशांची अभिलाषा वाटू लागली. बोलून चालून जुगार तो, पण समरांगणावरच्या खेळाप्रमाणे या जुगाराच्या खेळातही दैव आमच्या बाजूस अनुकूल ठरले. त्या दिवशीची इतरांची सगळी मिळकत शेवटी अलगद माझ्या खिशात उतरली. मी औटघटकेपुरता श्रीमंत झालो. माझे नि ट्रेसीचे डोळे चमकू लागले. आम्हा दोघांना थोड्या चैनीसाठी हा पैसा उपयोगी पडला.

अर्थात ही आमची चैन नुसती जिवाची करमणूक ठरली नाही. करमणुकीसाठी कोठे जाणे म्हणजे जिवावर बेतणाऱ्या नव्या नव्या प्रसंगांना आमंत्रणच होते. बाहेर पडणे, थोडे फार फिरणे, सिनेमाला जाणे -प्रत्येक प्रसंगी जिवावर केव्हा बेतेल याचा नेम नसे. आमचा बेडरपणा वाढला होता. आणि हे नित्याचेच झाल्याने स्वत:संबंधी नाही म्हटले तरी आम्ही थोडेफार निष्काळजी राहात असू. शिवाय ट्रेसीसारखा मित्र खांद्याला खांदा लावून उभा असला म्हणजे मग जिवावरच्या प्रसंगातून जाणे म्हणजे अनिर्वाच्य आनंद असे. अशा प्रसंगातदेखील मनुष्य बेहोष होतो. एक प्रकारची डोळ्यांवर धुंदी चढते.

वास्तविक डब्लिनमध्ये राहण्याचे आमचे स्वत:चे फारसे प्रयोजन नव्हते. डिनी लेसी १५ दिवसांपूर्वीच टिप्परेरीला परत गेला होता आणि एका आठवड्यात त्याला तिकडे आम्ही मिळावयाचे असे ठरले होते. तरी आम्ही जाऊ शकलो नाही. सांगितलेली वेळ चुकली असे आतापर्यंत कधी झाले नव्हते. लढ्याच्या सुरुवातीपासूनच केंद्राचा आमच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोण निराळा होता. आमची ब्याद अमेरिकेला पाठवून द्यावी म्हणून तेथील अधिकाऱ्यांनी केलेला प्रयत्न मी मागेच सांगितला. सवतीच्या मुलाला मिळेल अशीच थोडीबहुत आम्हाला वागणूक मिळे. पण आता काळ बदलला होता. किंबहुना आम्ही बदलविला होता. आमच्या कल्पनेपेक्षा अधिक यश या स्वातंत्र्याच्या लढाईत आम्हाला मिळाले होते. दक्षिणेकडे जिथे तिथे ब्रिटिश पोलीस व सैन्य आमच्याकडून पराभूत होत होते, मार खात होते आणि तो तो भाग सोडून

देऊन डब्लिनकडे पळून येत होते. सारे जग कौतुकाने आमच्या लढाईकडे पाहू लागले. होणारे हाल, लूटालूट, जाळपोळ, कशाचीही कदर न बाळगता सर्वसामान्य लोक आमचे पाठीशी उभे राहू लागले. बंडखोराला एक रात्रदेखील आश्रय देणारास देहान्ताची शिक्षा मिळेल म्हणून इंग्लिशांनी बजावले होते. पण आमच्या भरारी पथकांना प्रत्येक रात्री शेकडो लोक आश्रय देत, निवारा देत. काळच बदलला होता. चार माणसांनी उठून ब्रिटिशांच्या चार शिपायांबरोबर घेतलेली ही झुंज नसून, ब्रिटिश सत्ता आणि आयरिश सैन्य यांचे हे युद्ध आहे, ही जाणीव दक्षिणेकडे तीव्रतेने झाली होती. ब्रिटिशांचे बगलबच्चे वर्तमानपत्रांतून कितीही भरमसाट प्रचार करीत असले तरी लोकांना हे समजत होते की, आमचे काम हे त्यांचेच काम आहे आणि ब्रिटिशांची या देशातून पुरी हकालपट्टी केल्याशिवाय आयर्लंडच्या नशिबी शांती समाधान -सुख आणि वैभव नाही. लोकांनी हे ओळखले असे दिसू लागल्याबरोबर आम्हाला अनंतपटीने स्फुरण चढले. प्रतिकार! प्रतिकार! प्रतिकार!! एका प्रतिकारामध्येच चैतन्य आहे, जीवन आहे, विकास आहे! या प्रतिकारामधूनच चढाईचे शिक्षण मिळे. प्रतिकार नि चढाई! आयर्लंडचा पराक्रम यांतून प्रकट झाला. आयर्लंडचे शौर्याचे, आयर्लंडचे लष्करी सामर्थ्याचे यांतून पुनरुज्जीवन झाले आणि आयरिश रिपब्लिकन आर्मी ही संघटना आपोआप पूर्णावस्थेत पोहोचली. तिने स्वत:चे असे स्वतंत्र तंत्र निर्माण केले.

देशात इतक्या झपाट्याने बदल होत होता, तरी डब्लिनचे केंद्रकार्यालयांतील घटक आणि डेल आयरेनमधील सभासद या परिस्थितीचा फायदा करून घ्यावयास कचरत होते. बारीकसारीक प्रसंगी पापपुण्य, आणि अखेरच्या यशापशाची चिकित्सा करीत, याला मान्यता द्यावी की त्याला मान्यता द्यावी असा काथ्याकूट करीत हे सर्व वरिष्ठ अधिकारी आपआपल्या जागी स्वस्थ बसले होते. आतापर्यंत आम्ही त्यांना फेटाळून लावले होतेच. कारण, दूरदर्शीपणाने विचार करावयास पाहिजे, या बुरख्याखाली स्वत:चा मवाळपणा लपवू पाहणाऱ्या या जुन्या अधिकाऱ्यांना स्वयंसेवकांची आणि समाजाची नाडी कशी समजावी? उंचावर विचार करीत बसल्यामुळे आणि दूर पूर्वेकडे, समुद्रापलीकडे इंग्लिश मंत्रिमंडळाकडे दृष्टी लावल्यामुळे, सारे स्वयंसैनिक व स्वयंसेवक स्वातंत्र्याच्या मार्गावर आगेकूच करीत पुढे गेले आहेत, हे त्यांना समजेना आणि आमच्या योजनांना एकदम होकार द्यावा असा धीर त्यांना होईना. पण आम्हास सूक्ष्म विचिकित्सा करण्यास वेळच नव्हता. शेवटी आमच्या अधीरपणास दोष देत देत त्यांनी आमच्यापुढे थोडे नमते घेतले, आणि डब्लिनमध्ये पार पाडण्यासाठी एक योजना आखली. टिप्परेरीत जाण्यासाठी आमचे मन ओढ घेत होते. पण या त्यांच्या योजनेसाठी आणखी काही दिवस डब्लिनमध्ये राहणे आम्हास भाग पडले. दुर्दैव, ती योजना प्रत्यक्षात कधीच आली नाही. उलट आमच्या या रेंगाळण्यामुळे आमच्यावर मात्र मोठा जिवावरचा प्रसंग ओढवला.

●●●

## २२. ड्रमकॉन्ड्रा येथील प्रत्यक्ष मृत्यूशी झुंज

डब्लिनमध्ये अधिक काळ राहावे लागले, तरी शत्रूच्या भीतीने घराच्या चार भिंतींच्या आत कोंडून घेणे आम्हाला कसे मानवावे? शिवाय, कधी नव्हता तो पैसा हाती आलेला! 'ला स्काल' चित्रमंदिरात चांगला चित्रपट लागला होता. तो पाहावा म्हणून मी व ट्रेसी तेथे गेलो. ड्रमकॉन्ड्रा येथील फ्लेमिंग बहिणी आणि ओब्रायनची बायको, या त्या दिवशी तेथे आल्या होत्या. नॉकलाँगच्या लढाईत ओब्रायनने आमची साथ केली होती. तेव्हापासून या कुटुंबात आमची चांगली ओळख झाली होती. आम्हाला तेथे पाहाताच त्यांना आश्चर्याचा धक्काच बसला. आयर्लंडमधल्या एकजात सगळ्या पोलिसांना व सैनिकांना, दिसताक्षणीच आम्हाला गोळ्या घालण्याच्या सक्त आज्ञा

दिल्या गेल्या होत्या, आमच्या शोधासाठी ते सर्व कानेकोपरे धुंडाळीत होते आणि आम्ही इकडे निर्वेध चित्ताने जिवाची चैन करण्यासाठी चित्रमंदिरात आलो होतो.

चित्र संपताच आम्ही सर्व बाहेर पडलो. रस्त्यावर पहिला माणूस जो दिसला तो म्हणजे, टाब्लोट स्ट्रीटवर दोन रात्रींपूर्वी ज्या पाचांबरोबर झडायची होती, त्यांच्यापैकी एक होता. त्या दिवशी बसमध्ये माझ्या उजव्या बाजूलाच तो बसला होता. मी त्याला तत्क्षणीच ओळखले. तो स्वत: मात्र जणू आपल्या कोणा मित्राला शोधत आहोत अशा आविर्भावात बाहेर पडणाऱ्या प्रेक्षकांकडे पाहात होता. वास्तविक त्याच्या या 'मित्राने' आणि त्याने दोघांनीही परस्परांना पाहिले होते. तिथल्या तेथे त्याला गोळी घालून आमच्या मैत्रीची ओळख पटवावी असा मला क्षणभर मोह झाला. पण माझ्याबरोबर या मुली होत्या. आणि मी तसे केले असते तर मजबरोबर त्यांचाही जीव धोक्यात घालण्यासारखे झाले असते. कारण तो काही एकटाच नसणार. त्याची भुतावळही त्याच्या आसपास असण्याची शक्यता होती. तेव्हा संयम करणे जरूर होते. कोणालाच मी यासंबंधी बोललो नाही. एवढ्यात ड्रमकॉन्ड्रा येथे जाणारी ट्रॅम आली. सर्वांना पुढे जाऊ देऊन मी किंचित मागे होतो तोच, किटी फ्लेमिंगने मला हळूच सुचविले, ''आपल्या मागावर आपले मित्र आहेत रे -जपून!'' मुलींची दृष्टीदेखील अलीकडे तयार झाली होती एकंदरीत!

सीन आणि त्या तिघी मुली ट्रॅममध्ये चढल्या. मी ट्रॅमच्या पायरीवर चढतानाच तीक्ष्ण नजरेने मागे वळून पाहिले. माझ्या दृष्टीतील तीव्रता त्याने ओळखल्यामुळे आमच्या पाठोपाठ येण्याचे धारिष्ट त्याच्याने करवले नाही. शांतपणे पाय मागे घेऊन तो गर्दीत नाहीसा झाला.

त्या दोघी मुलींना त्यांच्या घरी आम्ही पोचविले आणि तेथे ऊन-ऊन कॉफीचा कप घेऊन पाठीमागच्या दाराने आम्ही बाहेर पडलो. न जाणो कदाचित आमच्या मागावर पुढल्या दारी कोणी आमची वाट पाहात बसलेले असावयाचे. रात्रीचे अकरा वाजले होते. चांदणे - पिठासारखे शुभ्र चांदणे सर्वत्र पसरले होते. सीन व मी आजची रात्रीची पथारी कोठे टाकावी असा विचार करीत बोटॅनिकल गार्डनवरून पुढे जाऊन टोल्का नदीवरच्या पुलापाशी थोडे घुटमळलो. १२ वाजता म्हणजे आणखी अर्ध्या तासाने कर्फ्यू सुरू व्हावयाची होती. त्याची पूर्वसूचना म्हणूनच जणू सैनिकांच्या अवजड लॉऱ्यांची घरघर दूरवर ऐकू येत होती.

पुलापासून प्रो.कॅरलॉन यांचे घर सात-आठ मिनिटांच्या रस्त्यावर होते. बेलफास्टकडे जाणाऱ्या या हमरस्त्यावरील वस्ती सुखवस्तू लोकांची आहे. घराच्या डाव्या-उजव्या अंगाला 'ट्रेनिंग कॉलेज फॉर नॅशनल रिसर्च' आणि 'ऑल हॉलोज अॅक्लेसिॲस्टिकल कॉलेज' या मोठमोठ्या इमारती आहेत. 'फर्नसाइड' -प्रो.कॅरलॉन यांचे घर म्हणजे, शहराबाहेर फार दूर नाही नि फार जवळ नाही असे, सर्वसाधारण मध्यम वर्गातल्या माणसाने जवळची तुटपुंजी रोकड कामी लावून बांधावे असे होते. तांबड्या विटांनी बांधलेले दुमजली घर, पुढं लहानसे अंगण. त्याच्या कोपऱ्यातच नोकरांना मागील बाजूस एकदम जाता यावे म्हणून छोटा दरवाजा -कोणाही चपळ माणसाला त्या दरवाज्यावर चढून मागच्या मोकळ्या जागेत सहज उतरता यावे. ही मोकळी जागा म्हणजे एक लांबचलांब बाग आहे. शेजारचे घर आणि ही बाग यांमध्ये सात-आठ फूट उंचीची एक भिंत उभी आहे. प्रो.कॅरलॉन यांच्या घराला चिकटून आणि माडीवरील खिडकीच्या खालच्या बाजूस एक गोठेवजा पडवी आहे.

घराची एक किल्ली आमच्याजवळ होती. रात्री अपरात्री केव्हाही घरी येता यावे म्हणून अनेक मित्रांनी त्यांच्या घरांच्या किल्ल्या आमच्याजवळ देऊन ठेवल्या होत्या. म्हणजे त्यांना मुद्दाम उठण्याचा त्रास द्यावयास नको. पीटर फ्लमिंगने जेव्हा प्रथम आमची व प्रो.कॅरलॉन यांची ओळख करून दिली त्यावेळी मोठ्या प्रेमाने आणि अंत:करणपूर्वक त्यांनी आमचे स्वागत केले. त्यांच्या सगळ्या कुटुंबाने आमच्या आतिथ्यात काही उणेपणा राहू दिला नाही. ''आवो जावो, घर तुम्हारा!'' इतकेच नव्हे तर घराभोवतालून सर्व बाजूंनी हिंडवून आणून 'सर्व काही' त्यांनी आम्हास समजावून दिले. घरामागील बाग दाखविताना एक बुटकी भिंत दाखवून ते म्हणाले, ''तुम्हाला या जागेचा कधी उपयोग करावा लागेल असे मला वाटत नाही. पण न जाणो, कधीकाळी तुम्ही येथे असताना छापा आलाच तर निसटून

जाण्याचा हा मार्ग तुम्हांस माहीत असणे अधिक चांगले!'' मनुष्य मोठा प्रेमळ, दयाळू, आर्जवी! त्यांचे डोळे तर चटकन त्यांच्याबद्दल विश्वास उत्पन्न करीत.

नेहमी आम्ही त्यांच्या घरी जात असू, त्यापेक्षा आज पुष्कळ उशीर झाला होता. ११ ।। वाजून गेले होते. बाहेरच्याप्रमाणे घरात शुकशुकाट होता. सर्वत्र निजानीज झाली होती. पाय न वाजविता गोठ्याच्या वरच्याच खोलीकडे आम्ही गेलो आणि लगेच झोपण्याच्या तयारीला लागलो. आमची चाहूलही कोणाला लागली नाही आणि आम्ही त्या रात्री तेथे येणार वा असणार याची त्या घरातील कोणाला कल्पनाही नव्हती.

ट्रेसीने अंथरुणावर अंग टाकले. मीही त्याच्या शेजारीच लवंडलो. पण झोप लगेच यावयाची नव्हती. घडीघडी येणारे प्रसंग आणि आमच्या पुढले काम यांच्या विचारांनी मनात गर्दी केली. डब्लिनमध्ये माशा मारीत बसणे, नको वाटू लागले. थोडी चैन झाल्यानंतर येणारा कंटाळा हा या सर्व विचारांच्या मुळाशी असावा. टिप्परेरीला गेल्यानंतर काय काय करावे याबद्दलच्या गप्पा निघाल्या. पण अंधारात, पडल्या पडल्या, त्या फार वेळ चालणार नव्हत्या. त्या केव्हाच संपल्या; आणि इतर विषयावरचे उडत उडत चालणारे बोलणेही आम्हाला न कळत बंद पडू लागले. काय असेल ते असो, मन भारावल्यासारखे झाले होते. मी बोलत नव्हतो. ट्रेसी बोलत नव्हता. आम्ही शेजारी शेजारी झोपलो होतो; पण दोघेही जागे आहोत ही दोघांनाही कल्पना होती. तसाच स्तब्धतेत थोडा वेळ गेला. शेवटी मला राहावेना; मनावर येत असलेले चमत्कारिक दडपण सहन होईना. मी त्याला यासंबंधी बोलणार तोच, तो प्रथम म्हणाला-

''डॅन, तुला काही चमत्कारिक वाटत नाही का रे? धड सांगताही येत नाही. मला तर झोपच येत नाही बघ! का रे, तुला येते?'' त्याने नेमका माझाच प्रश्न विचारला होता. मी त्याला तसे सांगितले. तो हसला. मलाही हसू आले.

''सीन, आज रात्री आपणाला झटापट करावी लागणारसे दिसते.'' त्याचा हात दाबून मी म्हणालो, ''कुणास ठाऊक, आपण येथे येत असताना एखादे संकट तर आपला पाठलाग करीत येत नसेल ना?'' आणखी काही क्षण गेले. ''येथे जर आपणाला वेढले तर सहीसलामत सुटणे जरा अवघडच जाईल, नाही?''

सीनने काही वेळ उत्तर दिले नाही. ''खरे सांगू का डॅन, समजा, आपण आज मारले गेलो तर फारसे बिघडणार नाही. एकदा सुरू झालेला हा स्वातंत्र्यसंग्राम आता कोणाच्या मरणाने थांबणार नाही! -डॅन, आपण मारलेच जाणार असलो तर एकाच ठिकाणी एकदम मारले जावे असे मात्र मनात वारंवार येते!''

बोलताना तो थांबला. मी बोललो नाही. डोळे उघडून अंधारातच आम्ही पाहात होतो. थोडा वेळ शांततेत गेला. डोळ्यावर झापड येऊ लागली, -पण ती किती वेळ? काही मिनिटेच!

एकदम आम्ही ताडदिशी अंथरुणावर उठून बसलो. घराबाहेर रस्त्यावर सैनिकांच्या जड बुटांचा 'धबडक्' 'धबडक्' असा आवाज ऐकू आला. मागच्या बाजूनेही अगदी हलक्या आवाजात कोणी कुजबुजल्याचे स्पष्ट ऐकू येत होते. आमच्या खिडकीतून बॅटरीच्या प्रकाशाचा झोत आतल्या भिंतीवर पडला. रात्रीचा एक वाजला होता. आम्हाला या घरात येऊन एक तास होऊन गेला होता.

इतक्यात पुढल्या बाजूस दाराची काच खळ्दिशी फुटली. दरवाजाही करकरला. जिन्यावरून धडधड करीत कोणी तरी वर येत होते. अंथरुणातून उठून आम्ही दोघे एकदम बाहेर आलो. दोघांचेही हात अभावितपणे पिस्तुलाकडे गेले. आमच्या खोलीच्या दरवाजाबाहेर आत येण्यासाठी कोणीतरी धडपडत होता. मी एक चकारशब्द बोललो नाही. एक क्षणभरच सीनने माझा हात आपल्या हातात घेतला आणि तो किंचित् दाबून मला तो म्हणाला, ''डॅन, रामराम, आपली भेट आता एकदमच दुसऱ्या जगात!'' आमचा आवाज उमटताच 'फाड! फाड' दरवाजातून दोन गोळ्या सणसणतच आमचे रोखाने आत आल्या. 'फाड!' 'फाड!' माझ्या जर्मन मॉसर पिस्तुलाने लगेच प्रत्युत्तर दिले. पिस्तुलाच्या गोळीच्या जाळाव्यतिरिक्त त्या काळ्या अंधारात दुसरा उजेड नव्हता. बाहेर कोणीतरी इंग्लिशमध्ये विचारले, ''रीन, रीन, -रीन कोठे आहे?''

झाले, सुरुवात झाली. सर्व बाजूंनी गोळ्या सणसणू लागल्या. ते दारही अर्धवट उघडले गेले. मी बाहेर व्हरांड्यात घुसलो. एक गोळी माझ्या उजव्या अंगठ्याला चाटून गेली. रक्त ठिबकू लागले. पण तिथल्या संवेदना थांबल्याप्रमाणे झाल्या. इतक्यात बाहेर कोणी धाडदिशी कोसळल्याचा आवाज ऐकू आला. बाहेरून गोळ्या येतच होत्या. मी खिडकीपासून दूर -मागे होण्याबद्दल सीनला ओरडून सांगितले. तो सरकतो न सरकतो तोच आणखी गोळ्या आल्याच. पण त्या साऱ्या शेजारच्या कपाटात घुसल्या. आम्हीही प्रत्युत्तर दिले. जिन्याकडून होणारा गोळीबार थोडा वेळ थांबला. काहीजण खाली उतरून गेले वाटते. मी जिन्यापाशी आलो. पाच-सहा सैनिक वर येण्याचा दुसरा प्रयत्न करीत होते. त्यांच्या हातातील बॅटरीच्या झोतात एक क्षणभर नेमका मी सापडलो. पण 'फडाफड' एका पाठोपाठ एक, भराभर त्या खाकी घोळक्यात मी गोळ्या झाडल्या. आमचे घर सर्व बाजूंनी वेढले गेले होते. आणि आता जिवंत सुटण्याची शक्यता नव्हतीच. पण मी आता बेहोष झालो होतो. ''मरणारच ना मी आता -मग पुरी किंमत तरी का न घ्या!''

गोळयांच्या माऱ्याने त्यांची पांगापांग झाली. आडोशासाठी ते पळू लागले. त्यांचा पाठलाग करण्यासाठी मी जिन्याखाली धावलो. मी खाली पोहचेपर्यंत ते सारे पळाले होते. कोणी जवळच्या खोल्यांचा आश्रय घेतला. कोणी रस्त्यावर धूम ठोकली. मी इकडे तिकडे शोधले -माझ्या पिस्तुलास भक्ष्य दिसेना. अधूनमधून मागील बाजूस मात्र बंदुकीचा आवाज येई.

मी पुन्हा वर -आमच्या खोलीकडे धावलो. दरवाजापाशी दोन-तीन प्रेतांना मी अडखळलो. दरवाजा बंद करण्यासाठी ती प्रेते बाजूला ओढून काढली आणि धाडदिशी दरवाजा लावून घेतला. बोल्टही लावला, आणि खिडकीकडे धावलो. एक क्षणाचाही अवधी फुकट घालविणे इष्ट नव्हते. या झटापटीसाठी त्यांनी नक्कीच शेकड्यांनी सैनिक आणले असले पाहिजेत. आणि दुसरा हल्ला ते चढविणारच. मी खिडकीत चढलो. पुन्हा प्रकाशाचा झोत आला -आणि त्या पाठोपाठ बंदुकीच्या गोळ्याही दोन-तीन गोळ्या मला लागल्याही. पण चार जखमात आणखीही दोन जखमा अधिक, इतकेच.

खालची खिडकी उघडीच दिसली. सीन तेथूनच पसार झाला असला पाहिजे. त्या पडवीवजा गोठ्याच्या छपरावर मी अंग झोकून दिले. स्वच्छ चांदण्यात सर्व बाजूंना पोलादी शिरस्त्राणे चमकत होती. तेथून जाण्यापूर्वी मला फिरून एकदा मार्ग मोकळा करावा लागणार तर! मी खाली वाकून पिस्तुलानेच दोन तडाके हाणून छपरावरील कौले फोडली. छपराच्या वाश्याला लोंबकळण्यापूर्वी पलीकडे त्या शिपायांवर गोळ्या झाडल्या आणि लोंबकळून जमिनीवर उडी घेतली. एकही शिपाई तेथे शिल्लक नव्हता. माझा मार्ग मोकळा झाला. मी इकडे तिकडे पाहिले. माझ्या मित्राचा पत्ता नव्हता. ''सीन! सीन!'' मी हाका मारल्या, आणि जमिनीवर पालथा पडलो -न जाणो, आवाज ऐकून कोणी फिरून हल्ला करावयाचा. ''सीन! सीन! कोठे आहेस तू?'' त्याला हाका मारताना माझा सारा जीव गोळा होऊ लागला; मी सारख्या हाका मारू लागलो. पण कोठूनच उत्तर मिळेना. मी थोडा थोडा विचार करू लागलो. खिडकीतून उडी मारताना त्याला गोळी लागली नसेल ना? त्या पडवीत तर त्यांच्या हाती तो सापडला नसेल? पण छे! तो पळालाच असला पाहिजे. नाहीतर त्याने 'ओ' नसती का दिली! सैनिकांनी सारे घर वेढले होते. प्रत्येक ठिकाणी मला किती सक्त प्रतिकार करावा लागला हे मला आठवले, आणि तरी मी सीन जिवंत असेल, त्याला पळण्याची संधी मिळाली असेल असे मनाचे समाधान करून घेत होतो. -अशक्य! तो जिवंत असणे शक्य नाही. थोड्या वेळापूर्वीचे सीनचे शब्द मला आठवले. स्वत:च्या मृत्यूची कल्पना त्याने बोलून दाखविली होती. म्हणजे भवितव्यताच त्याच्या मुखाने बोलली तर! ...सीन मृत्यूमुखी पडला, सीन मारला गेला! -नाही, सीन धारातीर्थी मरण पावला. शत्रूशी झुंजताना सीनला मरण लाभले!

मला एकदम भडभडून आले. डोळ्यासमोर भिरभिरू लागले. मी सुन्न झालो -काही क्षण तसेच गेले. मला 'उठले पाहिजे. -मी वाचलो पाहिजे -मला जगले पाहिजे -मृत्यूला बाजूस सारून मला पुढे गेलेच पाहिजे' माझा निर्धार होऊ लागला. पण त्याच वेळी माझी शक्ती क्षीण होत चालल्याचे माझ्या लक्षात आले. 'हरकत नाही, मी प्रयत्न करीन!'

मजजवळ आता हॅट नव्हती, बूट नव्हते. ओव्हरकोटही नव्हता. पायात पायमोजेच होते. पाच-सहा ठिकाणी जखमा झाल्या होत्या, आणि मी नखशिखांत रक्ताने माखला गेलो होतो. तरी पण मला वाटले -यांतूनही मी जिवंत सुटेन!

कोणीकडून निसटावे? शत्रूचा दुसरा हल्ला कोणीकडून येण्याची शक्यता आहे, याचा मी विचार करू लागलो. इतक्यात त्या गोठ्यावर हॅन्डग्रेनेडस्‌चा मारा झाला. 'धडाधड्' -मी जोर केला आणि उठलो. जवळच ती बुटकी भिंत दिसली. ''निसटून जाण्याचा मार्ग केव्हा तरी उपयोगी पडेल.'' प्रो.कॅरोलनच्या दूरदर्शीपणाचे किती कौतुक करावे! मला एकदम उत्साह आला. मी भिंतीकडे पळत गेलो भिंतीजवळ पोहोचतो तोच एका सैनिकाचे डोके भिंतीपलीकडे दिसले. ''थांब! थांब'' मला पाहाताच तो ओरडला आणि त्याने बंदुकीचा नेम धरला -गोळी झाडली, पण त्याचा नेम चुकला. मीही गोळी झाडली आणि भिंतीवरून पलीकडे उडी घेतली. त्या शिपायाच्या शरीरावर मी कोलमडलो. कोण जाणे, तो मेला होता की जिवंत होता. शेजारून पुन्हा दुसऱ्या शिपायांनी गोळ्या झाडल्या, -पण तत्पूर्वी मी जवळच्या दुसऱ्या एका भिंतीचा आडोसा घेतला होता. मी रस्त्यावर पळालो. पण प्रदेश ओळखीचा वाटेना. आपण कोठे आहोत हेच कळेना. पळता पळता रस्त्यावरच्या एका चिलखती गाडीवर नेमका जाऊन आदळलो. तीमधील शिपायांना समजण्यापूर्वीच आणि त्यांनी बंदुका उचलण्यापूर्वीच एकावर मी गोळी झाडली आणि पुढे सटकलो. मी कोठे आहे हे आता माझ्या लक्षात आले. प्रो.कॅरलॉन यांचे घर आणि ड्रमकाँड्रा पूल यांच्या साधारण मध्यावर त्यावेळी मी होतो.

गावाकडे पळता पळता, उजवीकडे ट्रेनिंग कॉलेजच्या कंपाउंडची भिंत होती. ती माझे दृष्टोत्पत्तीस आली. एकदा का त्या भिंतीवरून पलीकडे कॉलेजच्या आवारात मी गेलो, म्हणजे सुटलो. पण-पण १८ फूट उंचीची ती भिंत! -आणि माझा उजवा पाय मोडला होता, त्यांतून असह्य कळा निघत होत्या, शरीराला पाच ठिकाणी भोके पडली होती, आणि शिवाय लहान सहान किती तरी जखमा झाल्या होत्या. पण माणसाच्या जिवावर बेतले म्हणजे नेहमीपेक्षा सहस्रपटीने त्याच्याजवळ शक्ती येते. प्रयत्न तर करून पाहू या -आणि मी चढलो की ती भिंत! सुटकेचा, समाधानाचा मी नि:श्वास सोडला. केली -परमेश्वराने कृपा केली. शरीर आशा सोडीत असले तरी मन धीर देत होते. -आज त्या रस्त्यावरून जाताना त्या भिंतीकडे पाहिले असता या भिंतीवर मी कसा चढलो याचे माझे मलाच आश्चर्य वाटते. आज हे अशक्य वाटते मला -क्षणार्ध हुश्श करून मी काळजीपूर्वक पलीकडे उतरलो आणि पश्चिमेकडे फिंग्लासच्या दिशेने खुरडत चाललो. माझे पाय लटपटत होते. अधूनमधून झोकेही जात होता. पण छे! 'फर्नसाईड'पासून जितके लांब जाता येईल तितके लांब गेलेच पाहिजे. तशीच पावले पुढे टाकली. कोठे जाऊ? अगतिकपणे मी इकडे तिकडे पाहात होतो, पण बोध होत नव्हता. वेळ नि अंतर समजत नव्हते -पाय मात्र कसे तरी पुढे पडत -अंतर्मन पायांना मार्ग दाखवी, नि मी पुढे जाई.

शेवटी नदीच्या तीरावर मी आलो. ती 'टोल्का' -असावी -पण सभोवार थांबायला जागा नव्हती. आणि थांबतो कसला? पाठलाग करणाऱ्यांपासून हे शरीर जितके दूर नेववेल तितके नेले पाहिजे. पुलाच्या शोधासाठी रस्त्यावरून जाणे अशक्य होते. शेवटी पाण्यात पाय टाकला. थंड -ते पाणी बर्फासारखे थंडगार असावे. पाण्याचा पहिला स्पर्श मला तसा वाटला, पण नंतर मला फारसे समजले नाही. पायाला झालेल्या जखमांपाशी ते पाणी मांसातून आरपार जाताना तेवढे समजे.

पैलतीरावर गेल्यानंतर पलीकडील घरे दिसू लागली. बोटॅनिकल अॅव्हेन्यूमधली ती घरे असावीत. मी त्या घरांच्या मागल्या दारी असलो पाहिजे. माझ्याच्याने अधिक दम निघेना. अजूनही रक्तस्राव अविरत चालू होता. शक्तिपाताने मरण्यापूर्वी कोठे तरी थोडा निवारा मला मिळेल का? एवढी एकच माझी इच्छा, आशा आता राहिली होती.

मला सांगता येत नाही की, कोणती अंत:प्रेरणा मला मार्गदर्शन करीत होती. पण त्यापैकी एका विशिष्ट घराकडेच जावे असे मला वाटले खरे. 'त्याच घरात जा' म्हणून जणू देवदूतानेच माझ्या कानात सांगितले. -नव्हे तोच तुझा एकमात्र आधार आहे असे मनात वाटू लागले. मी तिकडे वळलो, आणि दाराला धक्का दिला.

माझ्याकडे पाहाताच घरातील माणसे काय म्हणतील? माझी दृष्टी स्वत:कडे वळली. असाहायपणा, दुबळेपणा यांमुळे माझे डोळे भरून आले. पहाटे तीन-चार वाजण्याची वेळ. कपड्याच्या चिंध्या झालेल्या, रक्ताने अंग भरलेले, आणि धड उभेही राहता येत नाही, अशी स्थिती -पण आता, आता काय करणार?

दुसऱ्यांदा मी दाराला धक्का दिला. एका माणसाने दार उघडले. माझा अवतार सारे काही बोलतच होता. तरी मी चार शब्द पुटपुटलो -''मला मदत करता का?'' आणि मी खाली कोसळलो.

''या, आत या. आम्हाला जेवढे करता येईल तेवढे करू.'' अवाक्षरानेही चौकशी न करता त्याने आणि त्याच्या बायकोने मला आत नेले. ताबडतोब लॉग नावाच्या नर्सला त्यांनी बोलावणे पाठविले. माझ्या जखमांना तात्पुरती बँडेजे बांधली. उत्तेजक पेयेही दिली. येवढे सारे जमवीपर्यंत - करीपर्यंत त्या बाईंना उत्तररात्री शिपायाच्या पाहाऱ्यातून जीव मुठीत घेऊन दोनतीनदा धावपळ करावी लागली.

सकाळी मला माझ्या प्राणदात्याचे नाव कळले. त्याचे नाव मि.फ्रेड होम्स असे होते. आणि आमच्या विरुद्ध पक्षाकडे त्यांची सहानुभूती होती. पण त्या रात्री, आपल्या मुलाची वा भावाची काळजी घ्यावी, इतक्या प्रेमाने आणि कष्टपूर्वक त्यांनी माझी काळजी घेऊन मला जीवदान दिले होते. मी तिथे कसा आलो, कोठून आलो हे त्यांना स्वतंत्रपणे सांगण्याची आवश्यकता नव्हती. त्यांना सारे समजत होते. तरी त्यांनी मला आत घेतले व वाचविले. कोणत्या शब्दांनी त्यांचे उतराई व्हावे? छे! यावेळी आणि अशा वेळी, जगातले काहीही अपुरेच पडेल. दुसऱ्या दिवशी सकाळी मी कोण ते त्यांना सांगितले. पण त्यांनी मला विश्वास दिला. मला बरा होण्यास लागेल ते सर्व करण्याचे आणि अधिक सुरक्षित जागी पोहोचविण्याचे त्यांनी आश्वासन दिले.

●●●

## २३. 'ड्रमकॉन्ड्रा' नंतर!

सकाळीच मि. होम्सकडून डिक् मॅकीला निरोप पोहोचविण्यासाठी मी चिठ्ठी दिली. इतक्या जलदीने मला तेथून हलविता येणे शक्य होते तितके पाहिजे होते. शिवाय आदल्या रात्री झालेल्या चकमकीत सीन ट्रेसी मारला गेला, यासंबंधी केंद्रकार्यालयाला कळविणे अवश्य होते. दैवाची मजवर केवढी कृपादृष्टी होती हे मला मि.होम्सच्या घरच्या मंडळीकडून कळले. त्यांच्या दोन्ही बाजूस ब्लॅक ॲण्ड टॅन्स राहात होते. डब्लीन पोलिसांनी त्या लोकांची राहाण्याची व्यवस्था करण्यासाठी मुद्दाम आपल्या ताब्यात ती घरे घेतली होती.

माझा निरोप पोहोचला आणि थोड्याच वेळात जो लॉलेस, मॉरिस ब्रेनन आणि टॉम केली हे मोटार घेऊन आले. स्वत: डिक् मॅकी मेटर रुग्णालयात माझी व्यवस्था करण्याकरिता पुढे गेला होता. कसेतरी माझ्या अंगावर त्यांनी कपडे चढविले आणि मोटारमध्ये बसविले. कपडे अर्थात् माझे नव्हतेच. ते सगळे प्रो.कॅरोलनच्या घरीच गेले. कपडे गेल्याचे मला फारसे काही वाटले नाही, पण कोटाच्या खिशात आम्हांस मिळालेली, नव्हे पत्त्यांच्या डावात आम्ही मिळविलेली, पाच पौंडाची नोट आणि माझे एक घड्याळ होते ते गेले, त्याबद्दल थोडेसे खुपल्यासारखे वाटल्यावाचून राहिले नाही. ज्याला ते सापडले असेल त्या अधिकाऱ्याची चैन झाली. ब्रिटिशांशी आमचा तह झाल्यावर युद्धातील नुकसानभरपाई म्हणून त्या घड्याळाची वा पाच पौंडाच्या नोटेची भरपाई करून घेता येणे शक्य नव्हते.

होम्सच्या घरापासून तो रुग्णालयापर्यंतचा आमचा लहानसा प्रवास देखील सुखासुखी पार पडायचा नव्हता. बोटॅनिक रस्त्याने जात असताना फिब्सबरो चौकात एका लष्करी पोलिसाने आम्हाला थांबायला सांगितले. क्षणभर

सगळ्यांच्या अंत:करणात धडकी भरली. पण, 'पलीकडून लष्करी मोटारींचा तांडा जावयाचा असल्याने थोडे सावकाश जाण्याची सूचना' त्याला द्यावयाची होती. आम्ही सुटकेचा नि:श्वास टाकला.

एकलेस रस्त्यावर मेटर रुग्णालयाच्या दाराच्या अलीकडे फूटपाथवर डिक् मॅको हळूहळू चालला होता. चालता चालताच त्याने हाताने हळूच आत न जाता तसेच पुढे जाण्याची खूण केली. थोड्याच वेळात तो स्वत:ही आम्हाला येऊन मिळाला. आदल्या रात्री झालेल्या चकमकीत जखमी झालेले कोणी सापडतात का, हे पाहाण्यासाठी लष्करी सैनिकांच्या मदतीने पोलीस त्या रुग्णालयाची झडती घेत होते. तेव्हा त्याची झडती पुरी होईपर्यंत आम्हास अन्यत्र थांबणे हे क्रमप्राप्तच आले.

''डॅन,'' माझ्या पाठीवर थाप मारून डिक् मॅकी म्हणाला, ''केवढी कामगिरी बजावलीस तू काल रात्री! तू मारलेल्या अधिकाऱ्यांना आपल्या हाती सापडावयास कमीत कमी दोन वर्षे तरी लागली असती.'' आणि मग, त्या हल्ल्यांत कोणकोण मारले गेले त्यांची नावे त्याने सांगितली. आम्हाला वेढण्यासाठी आलेल्यात मेजर जनरल स्मिथ हा होता. आयर्लंडमध्ये येण्यापूर्वी इजिप्तमध्ये सैन्यात हा अधिकारी होता. डिव्हिजनल कमिशनर म्हणून आयर्लंडमध्ये काम करीत असलेल्या याच्या थोरल्या भावाला आयरिश स्वयंसेवकांनी कॉर्क शहरामध्ये गोळ्या घालून ठार मारले होते. या थोरल्या स्मिथने केरी येथे पोलीसांपुढे भाषण करताना त्यांना सांगितले होते की, 'सिनफेन म्हणून तुम्हाला ज्याचा ज्याचा संशय येईल, त्याला बेलाशक दिसतांक्षणीच गोळ्या घाला.' या त्याच्या भाषणानंतर एका महिन्याच्या आत त्याला देहांत शासन मिळाले. या आपल्या भावाच्या वधाचा सूड घेण्याच्या प्रतिज्ञेने त्याचे हे धाकटे बंधू आयर्लंडमध्ये स्वयंस्फूर्तीने बदलून आले होते. त्या रात्री पहिली गोळी यालाच लागली. दुसरा बळी पडलेला अधिकारी, कॅप्टन ए.डी. व्हाइट हा होता. शिवाय त्याच्याबरोबर एक कार्पोलरही जखमी झाला. अर्थात् ही यादी ब्रिटिशांनी प्रसिद्ध केलेली आहे. पण अन्य बरेचजण या रात्री मारले गेले आणि जखमी झाले असले पाहिजेत.

आमची मोटार डॉरसेट रस्त्यावरून माउंट जॉयकडे जात असताना डिक् मॅकी हे सारे सांगत होता. माझी विषण्णता थोडी कमी करावी असा त्याचा या नाही त्या उपायाने प्रयत्न चालला होता. पण सीनच्या मृत्यूमुळे सारे जग मला शून्य वाटत होते. -पण काय आश्चर्य! माझा माझ्या डोळ्यांवर विश्वासच बसेना. आमची मोटार चार्लस् स्ट्रीटवरील आमच्या मकाणापाशी येताच स्वत: सीन ट्रेसीच माझे स्वागत करण्यासाठी पुढे आला होता! सीन ट्रेसी! होय! अगदी चालता बोलता सीन माझ्यापुढे उभा होता. त्याच्या चेहऱ्यावरचे नेहमीचेच हसेही तसेच होते. त्याला कुठेही जखम झाली नव्हती. अगदी थोड्या वेळात त्याने त्याची हकिकत सांगितली. मी मारला गेलो असे वाटून त्याने निराशेने पाठीमागून मार्ग काढला. सर्व रात्रभर उघडा बोडका असा रानात भटक भटक भटकला. कारण, आपण कोठे आहोत हेच त्याला समजेना. शेवटी पहाटेच्या वेळी कोठे तरी आसरा घ्यायला हवाच म्हणून त्याने एका घरात हाक मारली. आणि त्याच्या स्वागतासाठी त्याचा मावसभाऊ 'फिल रिअन' हा अचानक पुढे आला. एकंदरीत त्या पहाटे दैव आमच्या बाजूस होते खरं!

आमच्या भेटीमध्ये काही वेळ मोठ्या आनंदाचा आणि सुखाचा गेला. यावेळी मेटर रुग्णालयाचा भोवतालचा भाग व डब्लिनमधील महत्वाचे रस्ते सैनिकांनी आमच्या तपासासाठी गजबजून गेले होते. सर्वत्र सारखे झडत्यांचे सत्र चालले होते. ते संपताच आणि पोलिस तेथून निघून गेल्याचा निरोप येताच आम्ही सर्व तिकडे गेलो. रुग्णालयामध्ये स्ट्रेचरवरून नेताना सीनने माझे हात हातात घेतले आणि मोठ्या प्रेमभराने दाबले -या नश्वर जगातील त्याची ही शेवटचीच भेट होती. माझ्या प्रिय मित्राची ही शेवटची भेट आहे असे कोणी त्यावेळी सांगितले असते तर मला खरे वाटले नसते. सीन भेटला, सीन जिवंत आहे, सीन माझ्याजवळ आहे -एवढ्या जाणिवेने माझ्या जखमांचे दु:ख मी विसरलो. माझे प्राण मला परत मिळाल्यासारखे वाटले -आणि हा माझा लाडका मित्र माझा हात हातात घेऊन उभा होता! पण त्याचा प्रेमळ स्पर्श शेवटचाच ठरण्याचे अदृष्टात लिहिलेले होते!

मी येताच सर्जन बॅर्नाव्हीलने माझी सर्व व्यवस्था

आपल्या हातात घेतली; स्वत: शस्त्रक्रिया करून माझ्या अंगातील गोळ्या बाहेर काढल्या. त्याच्या हाताला फार मोठे यश येत असे.

दुसऱ्या दिवशी ड्रमकॉन्ड्रा येथील लढाईची सविस्तर हकिकत मला कळली. वर्तमानपत्रांतून आणि आमच्या हेरांकडून बऱ्याच गमतीही ऐकावयास मिळाल्या. ज्या माणसाने आम्हास चित्रपटगृहाच्या बाहेर पाहिले, त्यानेच फ्लेमिंगच्या घरापर्यंत आमचा पाठलाग केला. तेथून प्रो.कॅरोलनच्या घरी आम्ही गेलो हेही त्यांना समजलेच. आपल्या शोधाचे वर्णन करताना त्याने ट्रेसीच्या ऐवजी डिनी लेसीचे नाव सांगितले. ब्रिटिश हेरखात्याला आमची इतकी चांगली ओळख होती! असो. पोलिसांनी लगेच आमची शिकार करण्याचा चंग बांधला आणि किल्ल्यामधील सगळ्या 'G' लोकांना उठवून त्यांना त्यांच्या कामाची कल्पना दिली. पण त्या सर्वांनी नि:संदिग्ध शब्दांत या शिकारीस जाण्यास एकदम नकार दिला. आपल्या खात्रीच्या लोकांचा हा भित्रेपणा पाहून, आणि त्यांनी केलेली अवज्ञा -नव्हे, बंड पाहून अधिकाऱ्यांचे पित्त खवळून गेले. पण करतात काय? आपलेच दात आणि आपलेच ओठ! गुप्त पोलिसांनी रात्री या हल्ल्याला जाण्याचे नाकारले, ही गोष्ट गुप्त ठेवण्याचा त्यांनी आटोकाट प्रयत्न केला. त्या सर्वांना चुचकारून त्यांच्या भित्रेपणावर सारवण घालण्यासाठी, दुसरे दिवशी सकाळी जे.जे.वॉल्श याच्या दुकानाची झडती घेण्याची कामगिरी त्या सर्वांकडून करून घेण्यात आली.

'G' लोकांकडून हे होणार नाही असे दिसून येताच मग सैन्याधिकाऱ्यांकडे निरोप गेले आणि 'फर्नसाइड'ची जागा त्यांना समजावून देण्यात आली. 'कसल्या प्रकारचे काम आहे?' अशी त्यांनी विचारणा केली असताना 'शिकारीचा खेळ आहे' म्हणून त्यांना सांगण्यात आले होते. सैन्यांतल्या लोकांकडून लगेच भराभर निवड करण्यात आली आणि मघां सांगितल्याप्रमाणे मेजर जनरल स्मिथने आपण होऊन या स्वारीचे आधिपत्य स्वीकारले.

पण या सर्वांपेक्षा अत्यंत दु:खदायक व संतापजनक घटना म्हणजे प्रो. कॅरोलन यांच्या बाबतीतली आहे. प्रो. कॅरोलन हे या हल्ल्यांत प्राणांतिक जखमी झाले आणि त्यातच त्यांचा शेवटी अत्यंत हृदयद्रावक स्थितीत अंत झाला. आमच्याकडून जी पहिली गोळी झाडली गेली तीमुळेच त्यांना ही जखम झाली असे सरकारी पत्रकात म्हटले होते. पण त्यांच्या मृत्यूनंतर सरकारने कॉरोनरला चौकशी करू दिली नाही, कारण ते पंच सरकारची ही खुनी मोहीम उजेडात आणतील ही सरकारला भीती वाटे.

जखमी झाल्यानंतर बरेच आठवडे प्रो.कॅरोलन मृत्यूबरोबर झगडत होते. मेटर रुग्णालयातच त्यांनाही ठेवले होते. पण निराळ्या भागात असल्यामुळे त्यांची माझी भेट झाली नाही. मधे मधे ते वाचतील अशी सर्वांना आशा वाटत होती. त्याच वेळी त्यांनी अनेक प्रतिष्ठित साक्षीदारांसमोर त्या दिवशीच्या प्रकाराची हकिकत सांगितली. १९ व २० ऑक्टोबर १९२० च्या डब्लिनच्या वर्तमानपत्रांत ही सर्व हकिकत सविस्तर छापलेली आहे. एका प्रामाणिक व पापभीरू माणसाने मृत्युशय्येवरून, परमेश्वराला स्मरून सांगितलेली ही हकिकत ब्रिटिशांच्या नीच रक्तलालसेबद्दल कोणालाही चीड आणील अशी आहे. ही हकिकत छापल्याबद्दल कोणत्याही वर्तमानपत्रावर सरकारने इलाज केला नाही हे लक्षात घेण्यासारखे आहे. त्या रात्री त्यांना ब्रिटिश शिपायांनी गोळी घातली त्यापूर्वीच अर्धा तास आम्ही त्यांच्या घरातून निसटून गेलेलो होतो. अपरात्री त्यांनी जेव्हा या सैनिकांना दार उघडले तेव्हा त्यांच्या कपाळावर पिस्तूल रोखून, घरात कोण कोण आहे म्हणून त्यांनी चौकशी केली. चकमक पार पडून सगळीकडे शांतता झाल्यावर आपला अधिकारी मारला गेला हे शिपायांच्या लक्षात आले. तेव्हा ते सारेजण चवताळून गेले. हातची शिकार निसटून गेली. उलट आपलीच माणसे मारली गेली, तेव्हा बदला घेण्यासाठी त्यांनी प्रो.कॅरोलन यांना भिंतीकडे तोंड करून उभे केले आणि त्यांच्यावर गोळ्या झाडल्या. या निरपराधी माणसाचा त्यांनी जाणून बुजून खून केला. प्रो.कॅरोलन व कॅरोलन कुटुंब, यांच्यासारखी देशाभिमानी आणि उदारहृदयी अंत:करणे क्वचितच आढळतात. त्यांना अशा प्रकारे मृत्यू यावा ही विधिघटना किती दुर्दैवी आहे!

फ्लेमिंग कुटुंबावर देखील असाच दुर्धर प्रसंग ओढवला. आम्हाला आश्रय देण्याचा गुन्हा त्यांनी केला होता.

ब्रिटिशांच्या दृष्टीने त्याचे प्रायश्चित त्यांना मिळावयास हवेच होते. त्यांच्या घरातील एकूण एक पुरुषमाणसांची पोलीसांनी दुसरे दिवशी धरपकड केली. आमच्याबद्दल माहिती पुरविण्याचे नाकारले म्हणून मायकेल फ्लेमिंगला सहा महिने सक्त कारावास त्यांनी ठोठावला.

१४ ऑक्टोबर १९२० हा माझा रुग्णालयातील तिसरा दिवस. माझ्या आयुष्यातल्या संस्मरणीय घटना ज्या दिवशी घडल्या आहेत त्यांपैकी या दिवसाचे विस्मरण मला कधीही घडणार नाही. दुपारचे वेळी, तिसऱ्या प्रहरीच एक परिचारिका धावतच माझ्या खोलीत आली. तिने काही सांगण्याच्या अगोदरच तिच्या मुद्रेवर प्रतीत झालेले भाव मी वाचले. थोड्या वेळापूर्वी गोळीबार झालेला मी ऐकला होता. जवळपास चकमक उडाली एवढे मी जाणले. त्यामुळे मी अस्वस्थ होतो. फिब्जबरोच्या कोपऱ्यावर एक चिलखती गाडी ताब्यात घेण्याचा अयशस्वी प्रयत्न आमच्या काही स्वयंसेवकांनी केला होता. आणि त्यात एकाला आपला प्राण गमवावा लागला होता, अशी हकिकत मला सांगण्यात आली. पण त्या परिचारिकेला दुसरेच सांगावयाचे होते. सर्व रुग्णालयाला पोलिसांनी आणि सैनिकांनी गराडा घातला होता. माझा पलंग खिडकीजवळ होता. कोपरावर रेलून मी बाहेर दृष्टी फेकली तो काय, रुग्णालयाचे सर्व आवार ठिकठिकाणी खाकी कपड्यांनी फुलून गेले होते!

'डॅन, आता मात्र तुझी शेवटची घटका भरली.' मी स्वत:शीच पुटपुटलो, 'आणि पिस्तूल घेऊन प्रतिकार करशील तर तेही आता शक्य नाही.'

पण यावेळी मी हताश झालो नाही. बंदुकीचे आणि पिस्तुलांचे संगीत थोड्या वेळापूर्वी मी ऐकले होते. 'स्वातंत्र्याची लढाई भर वेगाने प्रगत होत आहे,' हेच त्या संगीताचे सूर सांगत होते. आमचे कार्य झाले. आता मृत्यू आला तरी तो आनंदाने स्वीकारण्याची माझ्या मनाची तयारी होती.

तरीसुद्धा या वेळी मनात अस्वस्थता उत्पन्न झालीच. पुन्हा पुन्हा खालच्या बाजूची लष्करी मोटारगाड्यांची धडपड कानी येई. त्याच्याबरोबर माझ्या रक्तातही चलबिचल होई. सायंकाळ झाली असून त्यांचे काम संपले नव्हते. दुपारपासून सायंकाळपर्यंत चालले आहे तरी काय? असे विचार मनात सारखे येत होते. शेवटी रात्र पडली, आणि माझ्या खोलीकडे न येताच पोलीस परत गेले. ते निघून गेल्यानंतर 'हे असे कसे झाले' याचा खुलासा मला झाला. त्या दिवशी सकाळी शहरापासून दहा मैलांवर डनबॉयन येथे 'फर्लांग' या नावाचा एक स्वयंसेवक बॉम्बची चाचणी घेत असताना स्फोट होऊन जखमी झाला. त्याच्या मित्रांनी त्याला ताबडतोब मेटर रुग्णालयामध्ये आणले. आणीत असताना पोलिसांनाही कुणकुण लागली आणि त्यांनी रुग्णालयावर छापा घातला. फर्लांग म्हणे दिसण्यात थोडाफार माझ्यासारखा होता. छापा चालू असताच त्या बिचाऱ्याने इहलोकची यात्रा संपविली आणि पोलिस 'डॅन ब्रीन'च मेला असे समजून समाधानाने परत गेले.

पण या छाप्याने आणि याच छाप्याच्या वेळी माझ्या आयुष्यातील सर्वांत मोठी दुर्दैवी घटना घडून आली. मी बरा झाल्यानंतर मला ती हकिकत कळली आणि माझ्या त्या सायंकाळच्या विलक्षण अस्वस्थतेचे कारणही कळून आले.

●●●

## २४.सीन ट्रेसीचे निर्याण

मी बिछान्यावर असा अगतिक होऊन पडलो असताना माझा जिवलग मित्र स्वस्थ बसला नव्हता. मी रुग्णालयात असलो तरी माझ्या सुरक्षिततेसाठी डोळ्यात तेल घालून तो जपत होता.

गुरुवार १४ ऑक्टोबर या दिवशी दुपारीच पोलिसांनी रुग्णालयाला गराडा घातल्याचे त्याला समजले. मी आता सापडल्याशिवाय राहात नाही, माझा जीव धोक्यात आहे हे पाहून तो तडक केंद्राधिकाऱ्यांकडे गेला आणि मला सोडविण्यासाठी आवश्यक त्या मदतीची व स्वयंसैनिकांची त्याने मागणी केली. त्याला ताबडतोब होकार देण्यात

आला. त्याप्रमाणे तो आमचे इतर सहकाऱ्यांबरोबर आणखी तरुणांची जमवाजमव करण्यासाठी गेला. माझ्या रक्षणासाठी कसलाही धोका स्वीकारण्याची त्याची तयारी झाली होती. पण माझ्या जिवासाठी हे करीत असताना त्याने आपल्या जिवाची काळजी घेतली नाही. प्रमुख रस्त्यावरून देखील उघडपणे त्याने धावपळ करावयास सुरुवात केली. असे करीत असतानाच त्याला गुप्त पोलिसांनी हेरले व त्याच्या पाठलागास सुरुवात झाली.

अर्थात् माझ्यावरच्या संकटाने त्याला अनेक गोष्टींचा विसर पडला, त्यात आपला पाठलाग होत असेल हेही तो विसरला. इकडे रुग्णालयाला सैनिकांनी गराडा दिला होता आणि तिकडे मला सोडविण्याची सर्व सिद्धता त्याने केली होती. काही थोडा भाग, ठरविण्यासाठी तो टाल्बोट रस्त्यावर 'रिपब्लिकन आउटफिटर्स' नावाचे शिवण कामाचे दुकान होते तेथे गेला. पीडर क्लॅन्सी, टॉम हंटर वगैरे मित्रांनी रेशमी व लोकरीच्या सामानाचे हे दुकान मुद्दाम घातले होते. कारण त्यामुळे तेथे अनेक मित्रांच्या सहजासहजी गाठी पडत किंवा निरोप पोचविणे, आणणे वगैरे कामे पार पाडली जात.

सीन दुकानात पोचला त्यावेळी जॉर्ज व जॅक प्लंकेट आणि केंद्रकार्यालयाचे दोघे घटक इतके लोक तेथे होते. शिवाय डब्लिन ब्रिगेडचे विसे व अंडरसन हे दोघे अधिकारीही उपस्थित होते. घाईघाईने जरूरीच्या कामासाठी त्यांनी बैठक बोलाविली होती.

आपल्या एका मैत्रिणीला घेऊन पीडर क्लॅन्सी हा दुकानातून बाहेर पडून अर्धा-एक फर्लांग जातो न जातो तोच सैन्याने व पोलिसांनी भरलेल्या मोटारी भरवेगात टालबोट रस्त्याकडे येताना त्याला दिसल्या. दुकानाची झडती होणार हे त्याला तत्काळ कळून चुकले. आपल्या बैठकीतल्या मित्रांना सूचना द्यावी म्हणून तो परत फिरला. पण ते शक्य नव्हते. कारण मोटारी तोपर्यंत दुकानाशी येऊन धडकल्या देखील.

सीन अगदी दाराशीच उभा होता. शत्रू आपणाकडे येत आहे हे त्याने पाहिले. अशा वेळी आणखी एक-दोघांनी पुढे येऊन शत्रूचे लक्ष आपणाकडे वेधून घेणे अवश्य होते. त्याप्रमाणे मोटारी थांबताच दुकानातील एकजण धावतच बाहेर पडून रस्त्यावरून पळत सुटला. त्याला अडविण्यासाठी गाडीमधून एका ब्रिटिश शिपायाने उडी टाकली. पण गुप्त खात्यातला कोणी ख्रिश्चियन नावाचा साध्या पोषाखातला अधिकारी आघाडीवरच्या मोटारीत होता, तो मोठ्याने ओरडून म्हणाला, ''तो नव्हे, तो नव्हे,'' आणि ट्रेसीकडे बोट दाखवून त्याजकडे धावत येऊन त्याने सांगितले, ''हा पहा आपणाला हवा असलेला मनुष्य, हा इकडे!''

सायकलवर टांग टाकीत असताना सीनने हे ऐकले. आपणासाठी ही जय्यत तयारी आहे हे त्याने ओळखले व पिस्तुल बाहेर काढले. प्रथमपासूनच यावेळी फारशी आशादायक परिस्थिती नव्हती. 'शत्रूने सर्व बाजूने घेरले आहे आणि आपण आता त्यांच्या हातात एकाकी सापडलो आहोत' हे सीनला स्पष्ट दिसत होते. पण 'बेहत्तर मृत्यू आला तरी, शत्रूच्या हाती जिवंत सापडावयाचे नाही' हा त्याचा निर्धार होता.

''हा पहा आपणाला हवा असलेला'' हे शब्द ऐकताच त्या सर्व सैनिकांनी आपल्या बंदुका आणि बरोबर आणलेल्या मशिनगन्स सीनवर रोखल्या व त्या सर्वांनी एकसमयावच्छेदेकरून गोळीबारास सुरुवात केली. सीन आणि रस्त्यावरचे तिघे निरपराधी पादचारी या गोळीबारात बळी पडले. पण खाली पडण्यापूर्वी सीनने त्या ख्रिश्चियन नावाच्या अधिकाऱ्याला पहिल्याच गोळीला प्राणांतिक जखमी केले होते.

अशा रितीने गोळ्या लागून शरीराची चाळण झाली तेव्हा त्याचा प्रतिकार संपला. वीरोचित आणि धीरोदात्त मरण त्याने स्वीकारले. आमच्या पिढीतील सर्वांत श्रेष्ठ अशा आयरिश तरुणाची जीवितयात्रा अशा रीतीने संपली. आपल्या मित्रांना सोडविण्यासाठी त्याने आपले रक्त सांडले. त्याच्या आयुष्यातील असे करण्याची ही पहिलीच वेळ नव्हती.

सीन ट्रेसी हा आम्हा सर्व तरुणांत केवळ अग्रगण्य होता. त्याच्या अतुलनीय अशा राष्ट्रभक्तीस सैनिकी ज्ञानाची व डावपेचांच्या कौशल्याची जोड मिळाली होती. उण्यापुऱ्या अठ्ठावीस वर्षांच्या या युवकाने थोडक्याशा काळात जे यश मिळविले, आणि जी कामगिरी केली ती अद्भूत होती.

ज्यांच्याबरोबर त्याला समरप्रसंग करावे लागले. ते सर्व, लष्करी शाळांत शिक्षण घेतलेले होते. त्यांतले ते तज्ज्ञ समजले गेले होते. पण या कशाचाही गंध नसताना त्यांच्यावर या वीराने मात केली. आपल्या सवंगड्यांसह ब्रिटिश सत्तेशी झुंज खेळून तिची हाडे खिळखिळी करून टाकण्यात त्याची कल्पकता विलक्षण रितीने प्रकट झाली. आयरिश रिपब्लिकन आर्मीने गनिमी काव्याचे हे जे ब्रिटिशांविरुद्ध युद्ध पुकारले होते, त्याच्या ज्वाळा सर्व आयर्लंडभर दिसून येऊ लागल्या. आणि जेथे तेथे ब्रिटिश सत्ता त्यात होरपळून जाऊ लागली. आयरिश स्वयंसेवकांच्या या वीरत्वाबद्दल आणि त्यांनी योजलेल्या कल्पक डावपेचांबद्दल सारे जग मुक्तकंठाने स्तुतिस्तोत्रे गाऊ लागले. सीन ट्रेसीच्या कल्पक बुद्धीतून या सर्व योजनांचा उगम होता. त्याचा मृत्यू म्हणजे वीराचं मरण होय. त्याच्या मृत्यूचादेखील हेवा वाटावा! उत्कृष्ट देशभक्त, असामान्य धाडसी, शुद्धतेचा, पावित्र्याचा मूर्तिमंत आदर्श -माझ्या या मित्राचे काय काय म्हणून गुणगान करावे!

टालबोटच्या समरभूमीवरील या प्रसंगाची हकिकत कितीतरी दिवस मला माहीत नव्हती. पण १४ ऑक्टोबरचा हा गुरुवार चिरंतनचा माझ्या स्मरणात राहिला. लोक-भ्रमासारख्या वेडगळ कल्पनांवर माझा विश्वास नाही आणि कल्पनेच्या निष्कारण भराऱ्या मारण्याची मला सवय नाही. पण त्या गुरुवारी सायंकाळच्या सुमारास माझा हा लाडका मित्र माझ्या बिछान्याच्या पायथ्याशी शांत व सस्मित मुद्रेने माझ्याकडे पाहात उभा असलेला मला दिसला होता. आजही त्याची ती मूर्ती व त्याचे ते दर्शन माझ्या डोळ्यांसमोर जसेच्या तसे आहे.

सायंकाळी मिक् कॉलिन्स माझ्या भेटीला आला. मी त्याला पाहाताच ''सीन कोठे आहे?'' असा पहिलाच प्रश्न विचारला. माझी प्रकृती अजूनही काळजी घेण्यासारखी असल्यामुळे वस्तुस्थिती सांगायचा त्याला धीर झाला नाही. माझ्यावरून दृष्टी काढून दुसरीकडे पाहात त्याने उत्तर दिले; ''तो काही कामाकरिता बाहेर गावी गेला आहे.''

त्याचे उत्तर बरोबर होते. तो बाहेरगावी पण या जगाच्या बाहेर -फार लांब गेला होता. मात्र माझ्या अंत:करणात खोल अशी कोठेतरी चमत्कारिक हुरहुर लागली होती आणि सीनची शांत, हसरी मूर्ती डोळ्यांसमोर वारंवार येत होती.

दहा दिवसांनंतर मला सारी हकिकत समजली. जिवंतपणी ब्रिटिश त्याला ताब्यात घेऊ शकले नाहीत. त्याच्या मृत्यूनंतर ते समाधान त्यांना उपभोगावयास मिळाले. त्याचे कलेवर त्यांनी शिपस्ट्रीट येथील लष्करी ठाण्याकडे नेले, आणि तेथून त्याच्या जन्मस्थानी टिप्परेरीला ते -आमच्या स्वयंसेवकांनी पोहोचविले. एखाद्या राजाला मिळणार नाही इतकी त्याची प्रचंड पूजा तेथे बांधली गेली. लहानपणी सोलोहेडबेगच्या चर्चमध्ये तो प्रार्थनेसाठी येत असे. तेथपासून किलफेरकेल शहरापर्यंत फार मोठ्या प्रमाणात त्याची शवयात्रा निघाली. जनसमुदाय काही मैलच्या मैल लांब असा पसरला होता. त्याच्या मृत शरीराचीसुद्धा ब्रिटिशांना भीती वाटली असावी. कारण त्यांनी या प्रसंगीही सर्व रस्ताभर दोन्ही बाजूस सशस्त्र सैनिक हारीने उभे केले होते. दक्षिण टिप्परेरीत हा दिवस सार्वजनिक दु:खाचा म्हणून पाळला गेला. सीनच्या मृत्यूने अंत:करणात कालवाकालव झाली नाही आणि डोळ्यात अश्रू उभे राहिले नाहीत, असा आयरिश रक्ताचा मनुष्य विरळा.

समरांगणावर मृत्यू यावयास भाग्य लागते. सीनला ते सद्भाग्य लाभले. सुसरीने गिळलेले माणिक तिचे पोट फाडून हिसकावून घ्यावे त्याप्रमाणे इंग्रजांच्या मगरमिठीतून स्वदेशास स्वातंत्र्य मिळवून देण्याचे अलौकिक साहस पंचविशी अठ्ठाविशीच्या वयात तरुण सीनने करून दाखविले. तो अमर झाला! त्याचे जन्मस्थान आणि तो विश्रांती घेत असलेले त्याचे समाधिस्थान हे आमचे चिरंतनचे स्फूर्तिस्थान आहे.

●●●

## २५. रक्तलांछित रविवार

एका आठवड्याने ओ सुव्हिलन आणि ओ कोन्नुर यांनी मला मेटर रुग्णालयातून हलविले. हाच जिरोआईड ओ सुव्हिलन पुढे आयर्लंडमध्ये 'अॅडज्युटन्ट जनरल' या मोठ्या हुद्यापर्यंत चढला. रुग्णालय सोडताना मला अतिशय वाईट वाटले. तेथील डॉक्टर व परिचारिका यांचा निरोप घेताना माझे मन भरून आल्याशिवाय राहिले नाही. विशेषत: डॉ. बर्नव्हिले यांनी मजसाठी अतिशय श्रम घेतले होते. त्यांच्या देशभक्तीची उज्ज्वल बाजू अनेकांच्या सहजपणे लक्षात येण्यासारखी नाही! पण आपापले काम करीत असताना आपल्याच कामांतून स्वदेशाविषयी अत्युत्कटता दाखवून, स्वदेशाची कशी कशी सेवा करता येते याचे, मेटर रुग्णालयातील अधिकारी डॉक्टर आणि परिचारिका हे उत्कृष्ट उदाहरण आहे. बंदुकीची वा पिस्तुलाची गोळी लागलेला एकही मनुष्य जरी डॉक्टरांकडे आला तरी त्यांनी ती गोष्ट आपणहून डब्लिन किल्ल्यात कळविली पाहिजे अशी सक्त आज्ञा सर्व डॉक्टरांना सुटली होती. प्रो.कॅरोलन यांचे उदाहरण डोळ्यापुढे स्पष्ट होते. आयर्लंडची सेवा करण्यास प्रवृत्त होणे हाच मुळी ब्रिटिशांच्या मते गुन्हा होता आणि हा गुन्हा केल्याबद्दल त्याच रुग्णालयात प्रो.कॅरोलन मृत्यूशी झुंजत पडले होते. प्रतिष्ठित, सुसंस्कृत, विद्वान समाजाला ललामभूत असलेली नररत्ने, ब्रिटिशांच्या दृष्टीने, आपल्या मायभूमीवर त्यांनी प्रेम केले म्हणून कुत्र्यासारखी गोळ्या घालण्याच्या योग्यतेची होती. अशा स्थितीत डॉ.बर्नव्हिले यांनी आणि इतरही डॉक्टरांनी ब्रिटिशांच्या आज्ञा धुडकावून लावून देण्यात फार मोठे देशकार्य साधले होते यात शंका नाही.

रुग्णालयातून डब्लिनच्या दक्षिण भागात एका स्त्री डॉक्टरकडे मला हलविण्यात आले. सुमारे आठवडा दीड आठवडा मी तेथे होतो. माझ्या जखमाही भराभर भरून येऊ लागल्या होत्या. आणि बिछान्यावरून खाली उतरून खोलीतल्या खोलीत मी किंचित् चालू शकत होतो. मेटर रुग्णालयाप्रमाणेच येथेही झडतीचा प्रसंग आलाच होता, पण वेळ आली नव्हती. गेल्या खेपेस सीनने प्रसंग घडला तर मला सोडविण्याची सिद्धता ठेवली होती. यावेळी मायकेल कॉलिन्सने माझ्या संरक्षणाचा भाग उचलला होता. काही स्वयंसेवक घेऊन तो स्वत:च्या घराच्या जवळच उभा होता. पण दैवाने अनुग्रह केला आणि तो प्रसंग आला नाही. केंद्रकार्यालयातील केवळ मायकेल कॉलिन्सने आमची बाजू सततपणे मांडून आमचा आणि आमच्या या लढ्याचा पाठपुरावा केला होता.

येथूनही मला हलविणे भाग होते. एका ठिकाणी फार वेळ राहणे शक्य होत नसे, कारण पोलिसांना माझा माग केव्हा लागेल याचा नेम नव्हता. 'डनलोघेअर' येथे मिसेस बॅरी यांच्या घरी नोव्हेंबरमध्ये मला हलविण्यात आले.

'डनलोघेअर' येथे असताना २१ नोव्हेंबर १९२० चा 'रक्तलांच्छित रविवार' साजरा झाला. या दिवशी ब्रिटिश हेरखात्याच्या चौदा वरिष्ठ अधिकाऱ्यांना डब्लिनमध्ये प्रत्यक्ष त्यांच्या घरात घुसून आमच्या स्वयंसेवकांनी गोळ्या घालून यमसदनास पाठविले. हे चौदा अधिकारी मुद्दाम साध्या नागरिकांप्रमाणे सर्वसाधारण वस्तीमध्ये खाजगी घरे घेऊन राहात असत. आणि आयर्लंडमधील हेरखात्याची बहुतेक सर्व सूत्रे हीच माणसे हलवीत असत. यांच्या वधामुळे सबंध आयर्लंडमध्ये आणि इंग्लंडमध्ये अभूतपूर्व अशी खळबळ उडाली. ब्रिटिश अधिकाऱ्यांचा नुसता तडफडाट झाला. ब्रिटिशांनी केलेल्या अत्याचाराचा प्रश्न निघाला म्हणजे ब्रिटिश मंत्रीमंडळ, 'आम्ही आयर्लंडविरुद्ध युद्ध पुकारले आहे' असे उघडपणे सांगे आणि आपल्या रक्तपिपासू वृत्तीचे समर्थन करी. युद्ध्यमान राष्ट्रांमध्ये हेरांच्या कपाळी शत्रूपक्षाच्या हाती सापडले असता देहान्त शासन लिहिलेले असते. मग इंग्लंडचे हे चौदा हेर मारले गेले यात वावगे काही नाही.

डब्लिनमध्ये असताना शत्रूविरुद्ध आमच्या गनिमी युद्धात आखलेल्या योजनांतील ही एक मोठी योजना होती. हा प्रसंग प्रत्यक्ष घडत असताना फ्रँक रीलिंग हा त्या वेळी शत्रूच्या हाती सापडला व त्यास फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. मात्र ती शिक्षा अंमलात येण्यापूर्वीच त्याने किल मॅनहॅम तुरुंगातून पहारेकऱ्यांच्या हातावर तुरी

देऊन पलायन केले. पॅडी मोरान यासही नंतर पकडले आणि पुढे माउंटजॉय तुरुंगात त्यास फाशी देण्यात आले. मात्र त्या पहाटे हल्ल्याच्या वेळी तो त्या ठिकाणापासून चार मैलांवर निवांतपणे झोपलेला होता!!

पण या गोष्टी काहीच नाहीत. अशा भयंकर क्रूरपणे ब्रिटिशांनी या गोष्टीचा सूड त्या दिवशी सायंकाळी घेतला. इंग्लंडने केलेल्या या भयंकर गुन्ह्याला जगाच्या इतिहासात क्वचितच तोड सापडेल. सूड घेण्याला मर्यादा असते. पण अशा अनेक मर्यादा इंग्लंडने केव्हाच पार झुगारून दिल्या होत्या. आतापर्यंत ब्रिटिशांनी आयरिश स्वयंसेवकांवर केलेले अत्याचार रात्रीच्या अंधारात विरले गेले असतील. त्यांनी त्यांच्या छळाची केलेली परमावधी तुरुंगाच्या चार भिंतीनीच पाहिली असेल. पण या 'रक्तलांच्छित' रविवारी' निरपराधी जनतेवर भरदिवसा, सूर्यप्रकाशात, अगदी उघड्यावर केलेल्या अत्याचाराला कसलीही साक्ष नको आहे. या सूडाचे वर्णन करण्यास लेखणी रक्तात बुडवावी लागेल!!

२१ नोव्हेंबर १९२०च्या या कुप्रसिद्ध रविवारी क्रोक पार्कवर सुमारे १०,००० लोक डब्लिन व टिप्परेरी या दोन संघांमधील फूटबॉलचा चुरशीचा सामना पाहावयास जमले होते. ब्रिटिशांच्या चौदा हेरांच्या देहान्त शासनाबद्दल त्यांना अवाक्षरानेही माहिती नव्हती. पण आयरिश राष्ट्रात जन्म घेतला हा त्यांचा गुन्हा होता. आयरिश क्रांतिकारकांच्या देशबंधुत्वाचा मान त्यांना मिळाला होता. आणि तो नाकारण्याचे पाप त्यांनी केले नव्हते. शेकडो शिपाई आणि ब्लॅकटॅन्स यांनी त्या मैदानालाा गराडा दिला. कसलीही सूचना न देता या निरपराधी प्रेक्षकांवर निर्दयपणे गोळ्यांच्या फैरी झाडल्या. ध्यानी मनीही नसताना झालेल्या या हल्ल्यामुळे त्यांच्यात जो हाहाकार माजला त्यांचे काय वर्णन करावे?

या गोळीबारामुळे सतरा लोक जागच्या जागी ठार झाले आणि पन्नासच्या वर प्राणांतिक जखमी झाले. उघड्या मैदानात केलेल्या या प्रकाराने ब्रिटिशांचे समाधान झाले नाही. आयरिश रक्ताला चटावलेली त्यांची तृषा येवढ्याने शांत झाली नाही. काही दिवसांपूर्वी माझे दोघे मित्र आणि आयरिश स्वयंसेवकांचे प्राणच -पीडर क्लॅन्सी आणि डिक् मॅकी -हे दोघे त्यांचे हातात सापडले होते. आम्ही मारलेल्या हेरांच्या वधाचा बदला म्हणून या दोघांना त्याच दिवशी सायंकाळी डब्लिनच्या किल्ल्यात ब्रिटिशांनी गोळ्या घालून ठार मारले. जगाला सांगण्यासाठी मात्र, हे दोघे पहारेकऱ्यांवर हल्ला करून पळून जाण्याचा प्रयत्न करीत असताना मारले गेले -अशी गोष्ट बनविण्यात आली. या दोघांची मृत शरीरे जेव्हा आमच्या स्वाधीन करण्यात आली तेव्हा त्यांच्यावर केलेल्या भयानक मारहाणीची सर्व चिन्हे स्पष्ट दिसत होती. मिक कॉलिन्सने मुद्दाम स्वतंत्र डॉक्टरांची एक समिती नेमून या हुतात्म्यांच्या शरीरावरच्या जखमांची तपासणी केली. हा 'रक्तलांच्छित रविवार' आयर्लंडच्या इतिहासात चिरंतनचे स्फूर्तिस्थान होऊन राहील.

क्रोक पार्कवरील मैदान आणि डब्लीनच्या किल्ल्यातील भूमी आमच्या देशभक्तांच्या रक्ताने न्हाऊन गेली आहे. पण त्यामुळेच ती भूमी आता पवित्र झाली आहे. त्यांच्या रक्ताचा शिडकाव वाया गेला नाही. स्वातंत्र्याचे बीज देशवीरांच्या रक्तात एकदा का रुजले, की त्याचा नाश करण्यास समर्थ असा या भूमंडळात कोणीही नाही. डिक मॅकी आणि पीडर क्लॅन्सी, व असेच अनेक आयरिश देशभक्त ब्रिटिशांच्या गोळ्यांना बळी पडले असतील. आणखीही बळी पडतील. त्यांच्या रक्ताने आयर्लंडच्या स्वातंत्र्याचा इतिहास लिहिला गेला. त्यांच्या बलिदानामधून दिव्य आत्मे जन्माला आले. क्वचित् प्रसंगी आमच्या या मित्रांच्या नाहक हत्येमुळे मन पिसाळून जाते व दु:खाने, चिडीने आणि निर्धाराने ब्रिटिश सत्तेला बजावून सांगावेसे वाटते, की 'तुम्ही जुलूम करा, तुम्ही अत्याचार करा; अंधारात नव्हे, उजेडात देखिल निरपराध्यांचे तुम्ही खून पाडा. आमचा सारा देश सैन्याच्या आणि शस्त्रास्त्रांच्या जोरावर तुम्ही टाचेखाली चिरडण्याचा प्रयत्न करा! पण - पण तुम्ही कितीकांना माराल? किती गावे तुम्ही उजाड कराल? किती कुटुंबांचा तळतळाट घ्याल? करा! तुमची पराकाष्ठा करा! पण त्यायोगे आम्हा आयरिश देशभक्तांच्या अंत:करणातील स्वातंत्र्यप्रेम लवमात्रही कमी होणार नाही. सततच्या उपयोगाने तुमची शस्त्रे बोथट होतील. बंदुकींच्या गोळ्या अपुऱ्या पडतील. तुमच्या सर्व साम्राज्यातून उपलब्ध होणारी स्फोटक द्रव्ये संपून जातील -पण आमच्या

हृदयात उत्पन्न झालेले हे स्वातंत्र्यचैतन्य अणूमात्रही कमी न होता क्षणाक्षणाला वाढतच जाईल. आमच्या स्वदेशबांधवांच्या बलिदानाने राष्ट्रीय प्रेरणेला अधिकाधिक भरती येईल. वुल्फल्टोन, रॉबर्ट एमेट, टॉम क्लॉर्क यांच्या मृत्यूने, त्यांना दिलेल्या देहांताच्या शिक्षांनी तेच केवळ नव्हे तर सर्व देश चिरंजीव, अमर झाला आहे. तुमचे अत्याचार वाढू देत. त्यांतून अधिकाधिक बळ घेऊन अखेर तुमचा ग्रास करण्याची शक्ती आमच्यामध्ये उत्पन्न होत आहे हे नि:संशय. आयर्लंडच्या स्वातंत्र्याचा सर्व परतंत्र राष्ट्रांना हाच संदेश आहे की, तुमचे राज्यकर्ते तुमच्यावर अधिकाधिक जुलूम करतील, अत्याचार करतील, तुमच्या लाडक्या नेत्यांना ठार मारतील. तथापि त्यातूनच टिकाव धरा, मार्ग काढा. यांतील प्रत्येक अत्याचार त्यांच्यावर उलटेल. प्रतिक्षणी तुम्ही सामर्थ्यसंपन्न व्हाल, परकीय सत्तेला तुम्ही पराभूत कराल आणि आपल्या देशाला स्वातंत्र्य मंदिरात नेऊन वैभवस्थली अधिष्ठित कराल.''

●●●

## २६. पुन्हा एकवार आघाडीवर

'डन-लो-घेअर' येथे मी फार दिवस राहिलो नाही. दोन दिवस येथे तर तीन दिवस आणखी दुसरीकडे अशी सारखी धावपळ चालली होती. इमॉन फ्लेमिंग हा या प्रवासात सारखा माझ्याबरोबर होता. एकदा एका घरी माझी ओळख त्याने खोट्या नावाने करून दिली, तेव्हा घरमालक हसून म्हणाला, ''यांना मी चांगला ओळखतो. यांचे नाव डॅन ब्रीन हे मला माहीत आहे.'' विकलोसारख्या नयनरम्य, निसर्गसुंदर ठिकाणी काही दिवस राहिल्यानंतर मला माझ्या घरी दक्षिण टिप्परेरीत नेण्यात आले.

मृत्यूशी दोन हात करीत करीत मी विजयी होऊन परत आलो होतो. माझे सारे मित्र तेथे माझ्या स्वागतासाठी गोळा झाले होते. सॉमस रॉबिन्सन, डिनी लेसी, सीन होगन, सीन ओमिरा या सर्वांच्या घोळक्यात माझे दिवस फार आनंदात व सुखसमाधानात गेले आणि माझी प्रकृती भराभर सुधारत गेली.

प्रेमळ मित्रांच्या सुखद सहवासाच्या जोडीला मनाचे ध्येयपूर्तीचे समाधान मोठ्या प्रमाणावर लाभले होते. कारण आमचे गनिमी काव्याचे युद्ध आता कळसास पोहोचले होते. आमचे 'भरारी सैन्य' आता भर दिवसा खांद्यावर बंदुका टाकून अप्रतिहत संचार करू लागले होते. ब्रिटिश राजसत्तेची चौकट खिळखिळी होऊन गेली होती. ब्रिटिशांची न्यायालये ओस पडली होती. आणि आमच्या न्यायमंदिरात लोकांची रीघ लागलेली असे. सार्वभौम सर्वसत्ताधारी ब्रिटिश सरकारच्या आज्ञा लोक उघड उघड कस्पटाप्रमाणे लेखीत. एका वाक्यात सांगायचे तर इंग्लिशांचे राज्य म्हणजे खाकी पोषाखांनी सजविलेल्या त्यांच्या काही हजार पोलिस व सैनिक यांच्यापुरतेच मर्यादित झाले होते.

या सर्व धुमश्चक्रीत सोलोहेडबेग, काहीर, रोसेनग्रीन येथेच मी बहुतेक दिवस घालविले. माझी प्रकृतीही आता स्वत: कामास सुरुवात करण्याइतपत झाली होती. तेव्हा १९२१च्या एप्रिलमध्ये मी प्रथम आमच्या स्वयंसेवकांसह पुन्हा आघाडीवर गेलो. दर बुधवारी सकाळी ब्रिटिशांच्या सैन्याची 'जा-ये', मोटारी, हत्यारे दारूगोळा यांच्यासह क्लोधीन व काहीर यांच्यामधून होत असते अशी बातमी आमच्या टेहळ्या पथकांनी आणली. कॉम मोलोनीबरोबर मी तेथे जाऊन या नव्या रणक्षेत्राची पाहणी केली आणि आमच्या पथकांना जमवाजमव करण्याची आज्ञा दिली. या लढाईचा दिवस २२ एप्रिल हा ठरविला होता. पहाटे पाच वाजता सर्वजण जागे झाले आणि या हल्ल्याची तयारी करण्यात गुंग झाले. सकाळी १० वाजता ही शत्रूपथके येणार असा निरोप होता. त्याप्रमाणे ८।।-९ वाजता आमच्या सैनिकांनी आपआपल्या नियुक्त जागा घेतल्या आणि सक्त तयारीने सर्व सिद्ध राहिले. पण ११ वाजून गेले

तरी शत्रूचा पत्ता नाही. नेहमीचा रस्ता त्यांनी बदलला की काय अशी भीती आमच्या मनात येऊ लागली. १२ वाजले, १ वाजला तरी ते आले नव्हते. शेवटी परत फिरण्याचा विचार आम्ही केला, आणि मी निघालोही. तोच फिरून निरोप आला की शत्रू येत आहे. आम्ही तडक माघारी वळलो. आमच्या बंदुकीच्या टप्प्यात ते आल्याबरोबर आम्ही त्यांना शरण येण्यास सांगितले. थोडीशी चकमक झाली आणि त्यांच्यापैकी एक सैनिक ठार होऊन दोघे जखमी झाले. लगेच त्या सर्वांनी आपली हत्यारे खाली ठेवली. आणि ते आम्हाला शरण आले. म्हणण्यासारखी लढाई झालीच नाही.

आम्ही त्यांची हत्यारे व दारूगोळा ताब्यात घेतला व त्यांच्या मोटारींची मोडतोड करून युद्धकैद्यांस सोडून दिले. विजयी मुद्रेने संचलन करीत आम्ही तेथून निघालो. फार वेळ थांबणे बरे नव्हते. कारण जवळच क्लोधीन व काहीर या दोन्ही ठिकाणी ब्रिटिशांच्या सैन्याची मोठी ठाणी होती. झालेल्या गोळीबाराचे प्रतिध्वनी तेथपर्यंत पोहोचणे शक्य होते.

आमच्या लुटीसह आमची विजयी दौड चालली असताना कुरध कलुनीजवळ आमच्यामागून एक छोटी मोटार येऊन थडकली. साहजिकच ती थांबविण्यात आली. त्या मोटारीत काहीर परगण्याचा इन्स्पेक्टर पॉटर हा होता. ताबडतोब आम्ही त्याला कैद केले. त्याची मोटारही ताब्यात घेतली. त्याला घेऊन पुढे जातो न जातो तोच ब्रिटिशांच्या एका तुकडीशी आमची पुन्हा गाठ पडली. जरी ते संख्येने आमच्यापेक्षा जास्त होते तरीही आमच्या स्वयंसैनिकांनी त्यांना यशस्वीपणे तोंड दिले आणि आपला मातब्बर कैदी व लूट यांसह सुरक्षितपणे ते निसटून गेले. या चकमकीचे सारे श्रेय डिनी लेसी व सीन होगन यांच्या कौशल्याकडे आहे.

याच वेळी ट्रेनर नावाचा आमचा एक अधिकारी डब्लिनच्या किल्ल्यात डांबला गेला होता. आणि त्याला फाशीची शिक्षा ब्रिटिशांनी साांगितली होती. वास्तविक आंतरराष्ट्रीय निर्बंधाप्रमाणे युद्धकैद्यांना फाशी देता येत नाही. ब्रिटिशांच्या हाती आमचे सैनिक सापडले की, या नियमाला धाब्यावर बसवून ते अनेकांना फाशी देत असत. त्यांच्या या वागणुकीचा बदला आम्हाला घेता आला असता. कारण नि:शस्त्र केल्यावर अनेक वेळा ब्रिटिश शिपाई व आयरिश पोलीस आम्ही कैद करीत असू. इंग्लंडने जरी माणुसकी सोडली होती तरी आम्हाला माणुसकीला पारखे व्हावयाचे नव्हते. म्हणून या सर्व कैद्यांना त्यांनी आपली शस्त्रे आमच्या स्वाधीन केल्यानंतर व शरण आल्यानंतर आम्ही नेहमी सोडून देत असू.

पॉटरला देखील आम्ही सोडून दिले असते. पण या वेळी आमचा मनुष्य त्यांच्या हातात सापडला होता आणि त्याला सोडविण्याचे आमचे अन्य सारे उपाय खुंटले होते. ट्रेनरला कसा सोडवावा हा आमच्यापुढे मोठा प्रश्न होता. तो फाशी जाणार हे समजल्यापासून सर्व मनातल्या मनात हळहळत होते. त्याचे कुटुंब मोठे होते. घरातला तो एकमेव कर्ता नि मिळवता होता. त्याचे सारे कुटुंब उघडे पडणार होते. २५ एप्रिलला त्यास फाशी देण्याचे ठरले होते.

तेव्हा पॉटर हाती सापडल्याबरोबर आमच्या मनात कल्पना आली. युद्धकैद्यांची अदलाबदल करतात ना? तसे केले तर! आम्ही कदाचित ट्रेनरचा प्राण वाचवू शकू! लगेच आम्ही एक विशेष जासूद डब्लिनला पाठवून 'ट्रेनरला सोडीत असाल तर पॉटरला आम्ही सोडून देऊ.' असा निरोप पाठविला आणि तसे न झाल्यास पॉटरला ठार मारण्यात येईल हेही बजावण्यास विसरलो नाही.

डब्लिनच्या किल्ल्यातील अधिकाऱ्यांना हा निरोप २३ दिनांकाला म्हणजे फाशीच्या दिवसाच्या अगोदर दोन दिवस पोहोचला. आम्ही वाट पाहिली पण उत्तर आले नाही. आपल्या वरच्या अधिकाऱ्यांपर्यंत त्यांनी ही बातमी जाऊच दिली नसावी अशी माझी कल्पना आहे. किंवा कदाचित् त्यांच्या मते पॉटरची काय किंमत? कारण एक य:कश्चित आयरिश मनुष्य तो! त्याच्या जिवाची ती काय क्षिती बाळगायची! अशी कितीक आयरिश माणसे ब्रिटिशांनी बाहुले म्हणून वापरली होती.

२६ दिनांकाला, ट्रेनरला फाशी देण्यात आल्याचे वृत्त आम्हाला कळले. आता आमची पाळी होती. आमचा शब्द, आमचा निर्धार, आमची धमकी पाळतो की नाही, हे आता दिसणार होते. आम्ही तसे केले नसते तर आमची दुर्बलता दिसली असती. आणि या वेळी दिलेला धडा

कदाचित् भविष्यकाळी असे प्रसंग आले असता ब्रिटिशांना उपयोगी पडला असता. त्याशिवाय पॉटर हा ब्रिटिश सैनिक नसून एक आयरिश देशद्रोही होता हे निराळेच.

त्याला मृत्यूची शिक्षा देण्यात आली आहे हे आम्ही त्याला कळविले. त्याच्या बायकामुलांबरोबर पत्रव्यवहार करण्यास त्यांस अनुज्ञा दिली, आणि देता येण्यासारख्या सर्व सवलतीही दिल्या. असा दुर्भागी दिवस माझ्या आयुष्यात कधी उगविला नव्हता, हे काम करण्यास मला अतिशय वाईट वाटले. त्याला ठार न मारता दुसरा काही मार्ग निघतो का, म्हणून आम्ही सर्वजण बसलो. सर्व बाजूंनी विचार केला. सांगोपांग चर्चा केली. पण दुसरा उपाय नव्हता.

तसे म्हटले तर पॉटर हा सुसंस्कृत, दयाळू आणि शूरशिपाई होता. त्यानेही मोठ्या धीराने मरण स्वीकारले. मृत्यूपूर्वी त्याने आपली रोजनिशी, अंगठी आणि सोन्याचे घड्याळ आमच्याजवळ दिले. आणि या गोष्टी आपल्या पत्नीला पोचविण्याची विनंती केली. त्याच्या इच्छेप्रमाणे सर्व व्यवस्था करण्यात आली. पॉटरच्या मृत्यूचा अधिकृत सूड म्हणून ब्रिटिश अधिकाऱ्यांना दक्षिण टिप्परेरीतील दहा शेतकऱ्यांच्या मळ्यावर छापे घालून त्यांची घरे डायनामाइटने उडवून दिली.

●●●

## २७. युद्धाच्या धामधुमीतील विवाह

जून १९२१च्या १२व्या दिनांकास युद्धाच्या ऐन धुमश्चक्रीत माझा विवाह झाला; हे सांगून देखील खरे वाटणार नाही. माझी मलाच 'हा प्रसंग कसा साजरा होईल, आणि माझे सारे मित्र तो मोठ्या आनंदाने, प्रेमाने व उत्साहाने पार पाडतील' अशी कल्पना नव्हती.

कादंबरी वा गोष्ट म्हटली म्हणजे त्यात नायक, नायिका, त्यांच्या भेटीगाठी, जिवावरचे प्रसंग, नायक-नायिकेचे मीलन व लग्न हे असणारच. त्याशिवाय कादंबरी वा गोष्ट पूर्ण होत नाही. तशापैकी काही हा प्रकार आहे काय म्हणून कोणी मला विचारतील किंवा मनात म्हणतील. आणि यासाठी माझ्या लग्नाचा प्रसंग मी लिहू नये असे मला वाटत होते. पण आपला म्हणून म्हटल्यावर आमचे मित्र परस्परांसाठी किती हाल, कष्ट, त्रास सोशीत असत, हे या प्रसंगातून समजेल, तसेच समाजातील धर्मगुरू, स्त्रिया आणि एकंदर बहुजनसमाजदेखील क्रांतिकारकांसंबंधी काय विचार करू लागले होते हेही समजेल म्हणून हा प्रसंग सांगण्याचा धीर मी करीत आहे.

आयर्लंडचा गव्हर्नर जनरल लॉर्ड फ्रेंच यांजवर जेथे आम्ही हल्ला चढविला त्या ॲशटाऊनच्या लढाईत मी जखमी झालो होतो. त्यावेळी मॅलोन कुटुंबाने अतिशय काळजीपूर्वक माझी शुश्रूषा केली होती. आमच्याकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोण हल्ली जरी समंजसपणाचा असला तरी दोन वर्षांपूर्वी आम्हाला सहजपणे कोठे थारा मिळेल अशी स्थिती नव्हती. इतकेच नव्हे तर, उलट संभावना होण्याचेच प्रसंग अधिक यावयाचे. ब्रिगिड मॅलोन आणि तिची बहीण यांनी त्या दिवसांत माझी फार जपणूक केली. ब्रिगिडच्या प्रेमळ शुश्रूषेनेच मी त्यावेळी फार लवकर बरा झालो. त्याच वेळी आम्ही एकमेकांनी विवाहबद्ध व्हावयाचे असे मनाने ठरवून टाकले.

ड्रमकॉन्ड्रा येथील हातघाईनंतर ब्रिगिड मला वारंवार भेटण्यास येत असे. माझी भेट घेण्याचा प्रयत्नही त्या वेळेला करणे म्हणजे जाणूनबुजून आपला जीव धोक्यात घालणे होते. आणि आता तर प्रत्यक्ष आमचा विवाहच होणार होता. आम्हा क्रांतिकारकांचे मित्र म्हणून माहीत होण्यानेच ब्रिटिश कोणावर कसला प्रसंग आणतील याचा नेम नव्हता. तेव्हा माझे गृहिणीपद स्वीकारल्यानंतर त्या मुलीवर काय काय प्रसंग येतील याची कल्पनाच करणे बरे. आमच्या लग्नासंबंधी विचार करताना ब्रिगिडला मी

या साऱ्या गोष्टी फिरून सांगितल्या. पोलीस तिचा सावलीसारखा पाठलाग करतील, घरावर वारंवार छापे घालतील, तिचा वाटेल तसा अपमान करतील, व माहितीसाठी तिचा छळही करण्यास ते कमी करणार नाहीत. या सगळ्या गोष्टी निरनिराळी उदाहरणे देऊन मी तिला सांगितल्या; पण तिचा निश्चय ढळला नाही. उलट लग्नानंतर मला घरात गुंतून राहू देणार नाही, आणि माझ्या सैनिकी पेशात व्यत्यय येऊ देणार नाही वगैरे आश्वासने ती मला देऊ लागली.

ब्रिगिडला जूनमध्ये सुट्टी होती. तेव्हा ती त्या सुट्टीत कोठे बाहेरगावी गेली तर सुट्टीतील सहलीला गेली असेल या कल्पनेने तिच्या बाहेरगावी जाण्याकडे कोणी फारसे लक्ष देणार नाही अशा कल्पनेच्या अनुरोधाने आम्ही आमचा विवाहदिन जूनमध्ये ठरविला. मे महिन्याच्या शेवटी शेवटी या विवाहाची सर्व सिद्धता झाली. प्रकटपणे प्रार्थनामंदिरात हा विधी उरकणे अवघड होते. कारण अशा सर्व ठिकाणी पोलिसांची करडी नजर होती. आणि त्यांनी 'त्या मंदिराचे पावित्र्य राखलेच पाहिजे' असे त्यांच्यावर कोठलेही बंधन नव्हते. यासाठी मायकेल पर्सेल याच्या घरी हा समारंभ उरकण्याचे निश्चित झाले. पर्सेल यांचे 'ग्लेनगट हाऊस' हे काहीर, कॅशेल, फैदर्ड या ब्रिटिशांच्या सैन्याच्या ठाण्यापासून अगदी दोन-तीन मैलांवर होते आणि तेथून भोवताली वारंवार आमच्या बंदोबस्तासाठी सैन्याच्या तुकड्या पाठविल्या जात असत. पण आमचीही संख्या या भागात जरी उघडपणे डोळ्यात भरण्यासारखी नसली तरी अगदीच सामान्यही नव्हती. त्यामुळे हेच ठिकाण या समारंभासाठी आम्ही नियुक्त केले.

पर्सेल कुटुंब चांगले घरंदाज व मोठ्यांपैकी होते. देशसेवेचे त्यांच्या कुटुंबाने व्रतच घेतले होते; आयर्लंडच्या प्रत्येक लढ्यात त्या कुटुंबाचा काही भाग असेच. गेल्या पिढीमध्ये जमिनीबाबत झालेल्या चळवळीत या पर्सेल पती-पत्नीला तुरुंगवास भोगावा लागला होता. त्यांच्या शेतीवाडीवरून त्यांना जबरदस्तीने हाकून दिले गेले होते. त्यांच्या या देशभक्तीच्या परंपरेमुळे त्यांना आमच्याबद्दल विशेष प्रेम वाटणे साहजिकच होते. म्हणून त्यांनी अत्त्याग्रहाने त्यांच्या घरीच आमचा जानोसा ठेवविला.

१२ जूनला ही विवाहतिथी निश्चित झाली. त्याप्रमाणे आमच्या ब्रिगेडला सर्वत्र निरोप व आमंत्रणे पोहाचली. त्या दिवशी भल्या पहाटे दक्षिण टिप्परेरीतील आमच्या स्वयंसेवकांनी व भरारी पथकांनी ग्लेनगट हाऊसकडे येणारे सर्व रस्ते ठिकठिकाणी झाडे तोडून पार बंद करून टाकले होते. जेवढा म्हणून बंदोबस्त करता येणे शक्य होते तेवढा कडेकोट बंदोबस्त करून टिप्परेरीतील स्वयंसेवकांनी 'ग्लेनगट हाउस' त्या दिवशी अभेद्य केले होते. आणि तितक्यांतूनही ब्रिटिशांकडून जर आमच्या या विभागाला भेट देण्याचा प्रयत्न झालाच असता तर आतापर्यंत कधी केले नाही इतके आम्ही त्यांचे मोठे स्वागत केले असते. या बाबतीत सर्वांचा आजचा निश्चय विशेष होता. खरोखर जर तसे काही झाले असते, तर आमच्यापैकी प्रत्येकाने ''देह जावो वा राहो'' असा प्रतिकार केला असता.

आदले दिवशी रात्री सीन होगन, डिनी लेसी, मिक् शिहान, सीन फिट्झपेट्रिक आणि इतर अनेक अधिकारी माझ्यासमवेत होते. झोपणे फक्त नावालाच होते. आपल्या तरुण मित्रांच्या विवाहप्रसंगी त्याचे मित्र त्याला जो उपदेश करतील त्या उपदेशाचा भडिमार माझ्यावर चालला होता. जेवढी म्हणून त्याची थट्टामस्करी करता येईल ती सर्व त्या रात्री या माझ्या मित्रांनी करून घेतली. रात्रभर सर्वांचा नुसता धुडगुस चालला होता.

सकाळी उजाडण्याच्या सुमारास आम्ही 'ग्लेनगट हाऊस' येथे येऊन पोचलो. पौरोहित्य करणारे फादर मर्फी हे आमच्याही अगोदर आले होते. सर्व मंत्रतंत्र झाल्यानंतर आणि बायबलमधील पवित्र उतारे वाचल्यानंतर ब्रिगिडबरोबर मी विवाहबद्ध झालो. सीन होगान हा वरपक्षाकडील करवला होता आणि ॲमी मॅलोनने करवलीचे काम केले.

हे विधी संपल्यानंतर जॅक ल्यूबी याचे घरी नंतर सांगोपांग विवाहसमारंभ पार पडला. दुपार, सायंकाळ, रात्र सर्व दिवस भोवतालचे तरुण मुलामुलींनी मनसोक्त बागडण्यात घालविला. नृत्यगायनाच्या कार्यक्रमात सर्वजण रंगून गेले होते. जणू भोवताली युद्ध चालूच नाही; किंबहुना ते संपलेच आहे. अर्थात हे सर्व चालू असताना भोवतालच्या साऱ्या नाक्या नाक्यावर आमचे मित्र डोळ्यात तेल घालून पहारा

करीत दक्ष होते. चाललेल्या करमणुकीत व आनंदात भाग घेण्यास मिळावा म्हणून त्यांची अदलाबदल सारखी चालू होती. शिवाय प्रत्येकजण जरी नृत्यगायनात रंगून गेला असला, तरी त्यांची पिस्तुले प्रसंगाच्या नुसत्या सूचनेची वाट पहात तेथेही जय्यत तयार होती. चकमक नि लढाई हा आम्हां सर्वांचा नित्याचा खेळ झाला होता.

हा समारंभ आटोपल्यावर आम्ही लगेच सोलोहेडबेगजवळील माझ्या गावी गेलो. माझ्या तुकडीचा भूतपूर्व नायक लॅरी पॉवेर याने आमच्या सुरक्षिततेची त्वरित व्यवस्था केली. त्याच्या जागरूकपणाखालीच आम्ही आमच्या मधुचंद्राचे दिवस साजरे केले. जॉन क्वीर्क, पॅडी ओड्वायर, जेम्स रिअन, जॅक ओब्रायन, वगैरे मित्रांची रोजची मेजवानीची बोलावणी असत. आणि कोणाच्याही पाहुणचाराचा अवमान करणे शक्य नव्हते.

आमचा हा विवाहसमारंभ आणि त्यानंतरचा आणि त्यानंतरचा मधुचंद्राचा कार्यक्रम लौकिक रूढीपासून सर्वस्वी निराळा व सर्व समारंभापासून अलिप्त झाला. प्रेमळ नि विश्वासू मित्रांच्या आपलेपणाच्या वागणुकीने त्याची गोडी खरोखरी अवीट होती. इतकी की आमच्या या भाग्याचा आमचे मित्र लटका हेवा करू लागले.

●●●

## २८.उपसंहार

हे आत्मवृत्त आता येथेच थांबवावे. कादंबरीचा शेवट त्यातील कथानायकाचे लग्न होऊन होतो, तद्वत् कादंबरीतल्याप्रमाणेच काहीसे अद्‌भुत पराक्रम ज्याने केले त्या डॅनब्रीनचे आत्मचरित्र त्याला अनुसरून अशा वीररमणीशी त्याचा विवाह झाल्यानंतर थांबवले तर ते अयोग्य होणार नाही. १२ जून १९२१ ला विवाह झाला तोच बातम्या येऊ लागल्या की, तहाचे बोलणे इंग्लंडकडून सुरू झाले आहे. ११ जुलैला युद्धतहकूबी प्रगट करण्यात आली. इंग्लंडचा मुख्य प्रधान लॉइड जॉर्ज याने डी व्हॅलेराला लंडन येथे भेटीस बोलावले. तो जाऊन आल्यावर आयरिश देशभक्तांचे एक मंडळ पक्का तह कोणत्या अटीवर व्हावा हे ठरविण्यासाठी लंडनला गेले. अनेक रीतींनी वाटाघाटी होऊन ६ डिसेंबर १९२१ या दिवशी तहावर सह्या झाल्या आणि आयरिश अधिकारी परत आले. ते परत आले, पण त्यांनी केलेला तह डी व्हॅलेरा आदींना पसंत पडला नाही आणि आयर्लंडमध्ये यादवीस सुरुवात झाली. या यादवीत आयर्लंडला आणि डॅन ब्रीनला काय सोसावे लागले याची मनाला कष्टप्रद हकिकत देऊन एवढ्या वेळचा वृत्तांत वाचून प्रसन्न झालेले मन का विषादयुक्त करा, अशा विचाराने हे आत्मवृत्त येथेच थांबवीत आहोत. हा वृत्तांत लिहिण्याचा हेतूही डॅनब्रीन या व्यक्तीचे चरित्र सांगणे हे नाही. तर ज्या युद्धामुळे आयर्लंडला स्वातंत्र्य मिळाले ते युद्ध कसकसे खेळले गेले हे डॅनब्रीनच्या उदाहरणावरून समजावे हा त्यात हेतू आहे. आमचा देशही 'स्वातंत्र्ययुद्ध कसे जिंकावे' याचे आज धडे घेत असताना हा वृत्तांत आम्हांस निश्चित उपयुक्त होईल असे वाटल्याने तो वरीलप्रमाणे उद्धृत केला आहे.

ज्या अखेरच्या स्वातंत्र्यसंग्रामाने आपले स्वातंत्र्य आयरिशांनी इंग्लंडपासून हिसकावून घेतले, त्या संग्रामास १९१६ च्या ईस्टरमधील बंडाने सुरुवात झाली. १९१४ मधील पहिल्या महायुद्धाबद्दलच्या प्रचाराने आयरिश लोकमत जर्मनीविरुद्ध आणि इंग्लंडचे पक्षपाती बनले होते. इंग्लंडबद्दलच्या या सहानुभूतीचा परिणाम साहजिकच स्वत:च्या स्वातंत्र्याच्या तळमळीची धार कमी होण्यात झाला. १९१४-१५ मध्ये आयर्लंड जवळजवळ इंग्लंडमध्ये विलीन होण्याच्या पंथाला आले होते. आयरिश देशभक्तांच्या पुढे केवळ हाच प्रश्न प्रामुख्याने होता की, जनतेची स्वातंत्र्येच्छा प्रबळ कशी करावी? साम्राज्यातून फुटून स्वतंत्र राष्ट्र अशा वैभवाने नांदण्याची आकांक्षा पुन्हा

जागृत करून, त्यासाठी सर्वस्व पणाला लावावयाचा निश्चय करण्यास आयरिश लोकांना कसे उद्युक्त करावे? इंग्रज-प्रेमाने वेडे झालेले लोक काहीही ऐकावयास तयार होईनात. अखेर परकीय सत्तेविरुद्ध बंड करून स्वात्मार्पण करण्याचा निश्चय आयरिश देशभक्तांनी केला. या बंडाने स्वातंत्र्य मिळणार नाही, हे त्यांना पुरते माहीत होते. हे बंड ते हरणार आणि त्यात त्यांना देहांत प्रायश्चित भोगावे लागणार याबद्दलही त्यांना शंका नव्हती. आणि तरीही ते बंड करून उठले. स्वातंत्र्य हे मूठभर लोकाच्या बंडाने कधी मिळत नाही हे खरेच. सर्व समाजच्या समाज जेव्हा परकीयांच्या प्रतिकाराला उभा ठाकतो आणि सातत्याच्या कसोटीला उतरतो तेव्हा तो स्वतंत्र होतो हेही खरेच. पण अशी कोणती जादूची कांडी आहे की, जिच्यामुळे सर्वच्या सर्व समाज एका क्षणात युद्धोन्मुख होईल? ज्या थोड्या लोकांच्या मनांत ही स्वातंत्र्येच्छा प्रथम प्रगट होते त्यांनी अधिकाधिक लोकसंग्रह करून पारतंत्र्याविरुद्ध लढाई पुकारावी; आपल्या बलिदानाने असंख्य लोकांच्या हृदयांतील स्वतंत्रता जागी करावी; त्या जागृतीतून नव्या कर्तृत्वाचे, नव्या पराक्रमाचे तरुण उदयाला यावेत. त्या तरुणांनी पूर्वींचेपेक्षाही प्रखर असा प्रतिकार, पूर्वीपेक्षा प्रचंड लोकसंग्रह संपादून करावा आणि आपल्या श्रेष्ठ आत्मत्यागाने आपल्या देशबांधवांच्या पुढे नवा आदर्श निर्माण करावा; असे होत होत, सर्व देश जागृत व्हावा, स्वातंत्र्यप्रेमाने प्रस्फुरित व्हावा, अंतिम विजयाच्या विश्वासाने निश्चयी व्हावा, हीच काय ती यक्षिणीची कांडी उपलब्ध आहे.

पारतंत्र्याच्या त्या दंशाचा पहिलाच परिणाम हा होतो की, त्या देशाची प्रतिकारशक्ती विलयास जाते. एवढ्यानेच भागत नाही, तर प्रतिकारबुद्धीही नष्ट होते, आणि तिचे ऐवजी शत्रूबद्दल सहानुभूती, शत्रूंच्या संस्कृतीबद्दल प्रेम, शत्रूच्या सद्गुणांबद्दल आदर आणि शत्रूंच्या सामर्थ्याविषयी भीती हे महाभयंकर विखार घर करून राहतात. जे देशभक्त स्वातंत्र्यसंपादनार्थ सिद्ध होतात, त्यांना पहिली लढाई या विखारांच्या विरुद्ध द्यावी लागते. शिक्षणाने, राष्ट्रैक्य, समता, बंधुता या तत्वांच्या आचरणाने पण मुख्यत: प्रत्यक्ष प्रतिकाराने हे विखार नष्ट होतात. प्रतिकाराचा प्रचंड यज्ञ एकदा का पेटला की, सर्व दोष त्यात जळून खाक होतात. जे बोलण्याने, प्रचाराने आणि म्हटल्याने विधायक कार्यक्रमांनी ५०-५० वर्षे धडपडून तळमळूनही होत नाही, ते प्रत्यक्ष प्रतिकाराच्या आचेने काही अल्पअवधीतही घडते. आंच आणि ती पुरेशी लावल्याविना दोष पूर्णतया जळणार नाहीत, पारतंत्र्याचे विखार नष्ट होणार नाहीत, एकत्र आलेल्या मनांचे राष्ट्रैक्य अभेद्य होणार नाही. दोषनिर्मूलन करावे कसे? राष्ट्रैक्यादी सद्गुणांची स्थापना करावी कशी? प्रतिकारशक्तीची संपादना करावी कशी? या तिन्ही प्रश्नांचे उत्तर इतिहासाने एकच दिले आहे. ते म्हणजे प्रतिकार करून, परकीय सत्तेशी सतत लढाई करून, स्वातंत्र्यार्थ हौतात्म्य स्वीकारून! गतीने ज्याप्रमाणे गती वाढते, त्याचप्रमाणे प्रतिकाराने प्रतिकारशक्ती अधिकाधिक वाढत जाते. हौतात्म्याचे सर्वश्रेष्ठ कार्य हेच की, ते मुळातील गती, प्रेरणा उत्पन्न करते, ती गती वाढविते, आणि वाढवीत वाढवीत तिला विजयशाली करते. जे जे देश स्वतंत्र झाले त्यांतील एकही देश असा नाही की जो पहिल्यानेच केलेल्या लढाईत विजयी होऊन स्वतंत्र झाला आहे. प्रत्येक देशाला दोनदा-चारदा-दहादा अनेक वेळा बंडे करून उठावे लागलेले आहे. ही बंडे जर अंतिम विजयाचे कारण असतील तर त्यांना अयशस्वी असे नाव कोणत्या कारणाने देता येईल! ती सर्व बंडे यशस्वीच आहेत आणि त्यांना यशस्वीच म्हटले पाहिजे. या प्रत्येक बंडात स्वातंत्र्य साठविलेले आहे. मग ते बंड दहांचे असो, हजारांचे असो, लक्षावधीं-कोट्यावधींचे असो वा अगदी एकाचे असो. त्या प्रत्येक बंडाचे नैतिकमूल्य एकच. त्याचा परिणामही निश्चयाने एकच असतो. या बंडांनी जर तत्काळ स्वातंत्र्य मिळणार नाही, तर मग या बंडाची यशस्विता कशात साठविली आहे? या बंडाची यशस्विता यात आहे की ती मूळ प्रेरणा उत्पन्न करतात, प्रतिकार शक्तीच्या संचयाला लागणारी गती उत्पन्न करतात, लोकजागृती करतात, लोकशिक्षण करतात.

हे तत्व आयरिश देशभक्तांना फार काळापासून पुरते माहीत होते. म्हणून १९१४ पासून दोन वर्षे तयारी करून त्यांनी १९१६च्या ईस्टरमध्ये बंड पुकारले. ब्रिटिश लष्कर त्यांच्यावर चालून आले. एवढेच नव्हे तर शत्रूच्या प्रचाराने

मूढ झालेल्या आयरिशांनी या थोर क्रांतिकारकांना विरोध आरंभला. रेल्वे, पूल, पोस्ट, बँका, यांच्यावर पहारे ठेवून क्रांतिकारकांपासून त्यांचे रक्षण करून सरकारला मदत केली. कित्येक ठिकाणी क्रांतिकारकांच्या घरादारांवर, बायका-मुलांवर हल्ले करण्यात आले. ब्रिटिश लष्कराने डब्लिनमध्ये क्रांतिकारकांना चोहोकडून वेढले. आठ दिवसांच्या आत बंड संपुष्टात आले. क्रांतिकारकांना शरणागती पत्करावी लागली. ब्रिटिशांनी लष्करी न्यायालयाकरवी क्रांतिकारकांची चौकशी केली. कित्येकांना हद्दपार केले, कित्येकांना सक्तमजुरीच्या शिक्षा दिल्या आणि बंडाच्या प्रमुख नेत्यांना देहांतशासनाची शिक्षा दिली. हे असे असे होणार हे सर्व त्या नेत्यांना आधीच माहीत होते. बंड जेवढ्या मोठ्या प्रमाणात होईल असे वाटले होते, तेवढ्या मोठ्या प्रमाणात झाले नाही. जितक्या निरनिराळ्या ठिकाणी व्हावे अशी कल्पना होती, तितक्या ठिकाणी ते झाले नाही. तरीसुद्धा या बंडाचा पुढारी टॉम क्लार्क १९१६च्या मे महिन्यात तुरुंगात वधस्तंभासमोर उभ्या असलेल्या ब्रिटिश सैनिकांच्या बंदुकीतून सुटणाऱ्या गोळ्यांच्या वर्षावाची प्रतीक्षा करीत शांतचित्ताने, निर्भयतेने, हसत हसत उभा होता. त्या क्षणी सुद्धा त्याच्या मनात हे बंड पूर्ण यशस्वी झाले याचे समाधान होते. त्या थोर क्रांतिकारकांनी आपले प्राण अर्पण केले आणि आयर्लंडचे देहातून हरपून जाणारे प्राण खेचून परत आणले. इतक्या निर्भयतेने, उदात्ततेने आणि पवित्र मनांनी केलेल्या समर्पणाला योग्य अशी जोड जगाच्या इतिहासात क्वचित सापडेल.

तुरुंगातुरुंगांतून या नेत्यांवर १९१६च्या मे मध्ये ब्रिटिशांनी झाडलेल्या बंदुकींच्या फैरी वाया जावयाच्या नव्हत्या. आयर्लंडात त्यांचे प्रतिध्वनी उमटू लागले. या श्रेष्ठ बलिदानाची थोरवी ध्यानात न येण्याइतके आयरिश लोक कृतघ्न नव्हते. त्यांचे डोळे खाड्कन उघडले. ते विचार करू लागले. इंग्रजांबद्दलचे त्यांचे प्रेम पार जळून गेले आणि त्या ठिकाणी राष्ट्रीय आकांक्षा फुलू लागल्या. हळूहळू हे क्रांतिकारक होते कोण, यांची तत्वे होती काय, त्यांनी मृत्यू का पत्करला, याबद्दल आयरिश लोकांच्या मनात विचार येऊ लागले. क्वचित एखाद्या कोपऱ्यात असे उद्गार निघू लागले की, ते वेडे नव्हते. त्यांचे हेतू शुद्ध आणि कल्पना अत्यंत उदात्त होत्या. मध्येच कोठे वृत्तपत्रात असे आले की, त्यांचे मार्गही चुकीचे नव्हते. आणि होता होता थोड्याच कालात सर्व आयर्लंडमधून निनाद येऊ लागले की, ते महान देशभक्त होते, ते महान योद्धे होते, ते महान त्यागी होते आणि त्यांचा मार्गही अचूक होता. जसजशी १९१६च्या हुतात्म्यांच्याबद्दलची आदराची भावना आयरिशांच्या मनात दृढ होत गेली, तसतसे त्यांचे साम्राज्यप्रेम कमी होत गेले. ब्रिटिश सत्तेबद्दलचा राग आणि द्वेष क्रमाक्रमाने वाढत जाऊन तो पराकोटीला पोचला. आयरिश तरुण क्रांतिकारकांचे पोवाडे गाऊ लागले; त्यांच्या त्यागाचे, देशभक्तीचे, पराक्रमाचे, तत्वनिष्ठेचे ते पूजन करू लागले. ठिकठिकाणी तरुण मंडळे गोळा होऊ लागली. अप्रकटपणे व सावधानतेने लष्करी शिक्षण घ्यावयास त्यांनी सुरुवात केली. नव्या क्रांतीची ते तयारी करू लागले. जेथे हौतात्म्याचे, पराक्रमाचे पूजन होते, तेथे नवकर्तृत्व, नवपराक्रम, नवक्रांती उदयाला न आली तरच नवल! किंबहुना ज्या राष्ट्रात असे होणार नाही ते राष्ट्र कधीच उदयाला येणार नाही. त्या राष्ट्रातील लोक कृतघ्नच असले पाहिजेत. त्यांच्यामध्ये उत्कटता, शौर्य, स्वातंत्र्यभक्ती या सद्गुणांचे बीज कधीच रुजणार नाही. आयरिश लोक असे कृतघ्न नव्हते. देशातल्या प्रत्येक भागात तरुण मंडळी एकत्र येऊ लागली, विचार करू लागली. टिप्परेरीमधील डोनोहिल या खेड्यात डॅन ब्रीनने जमविलेले तरुणमंडळ आयर्लंडभर पसरलेल्या तरुणमंडळांची एक शाखा होते.

१९१६ पूर्वी अनेक वर्षे आयर्लंडमध्ये प्रतिकारबुद्धीच्या जोपासनेचे प्रयत्न चालले होते. 'जे आमच्या राष्ट्राचे तेच आम्हाला प्रिय आहे, आम्हाला आयरिश भाषाच प्रिय आहे, तीच आमची राष्ट्रभाषा आहे;' म्हणून आयरिश भाषेचा अभ्यास करणारी मंडळे ठिकठिकाणी स्थापन करण्यात आली. 'आम्हाला आमचा इतिहास, आमची परंपरा प्रिय आहे,' म्हणून राष्ट्रीय इतिहासाचे अभ्यासास प्रारंभ करण्यात आला. 'आमच्या भाषेत आम्ही नवीन वाङ्मय निर्माण करणार' म्हणून गॅलिक भाषेत नवीन ग्रंथ लिहिण्यात आले. राष्ट्रीय अभिमानाने व स्वदेशप्रेमाने रसरसलेले नवकाव्य गाईले जाऊ लागले. नाट्यगृहांतून

स्वदेशप्रेमाने ओथंबलेल्या नाट्यकृती नटविल्या जाऊ लागल्या. राष्ट्रीय इतिहास ज्यात शिकता येईल, आयरिश संस्कृतीची ज्यातून ओळख होईल असे शिक्षण मुलांना देता यावे म्हणून राष्ट्रीय शाळा काढण्यात आल्या. खेळातसुद्धा 'राष्ट्रीय खेळ खेळले पाहिजेत' या कटाक्षाने राष्ट्रीय व्यायामशाळा स्थापन झाल्या आणि त्यांतून आयरिश तरुणांचे शरीरसंवर्धन कसे होईल याचे प्रयत्न होऊ लागले.

राष्ट्रातील तरुणांमध्ये हे स्फुरण उत्पन्न होत असताना आर्थर ग्रिफिथने सिनफेन पक्षाची स्थापना केली. इंग्लंडच्या कच्छपी लागून होमरूलची भीक मागणाऱ्या आयरिश पार्लमेंटरी पक्षाचे धोरणावर आपल्या वृत्तपत्रातून त्याने हल्ला चढविला. जुना पक्ष ब्रिटिश पार्लमेंटमध्ये जाऊन बसणारा, तर सिनफेन पक्ष ब्रिटिश पार्लमेंटवर बहिष्कार घालणारा! जुना पक्ष आयर्लंडला होमरूल मिळाले म्हणजे पुरे म्हणणारा तर नवा पक्ष 'इंग्लंडपासून संपूर्ण स्वतंत्र व्हावयाचे' हेच ध्येय निश्चित करणारा. जुन्या पक्षाचा मार्ग इंग्लिशांची मनधरणी करण्याचा, तर नव्या पक्षाचा मार्ग आयर्लंडचे स्वतंत्र विधिमंडळ भरवून स्वसामर्थ्यावर स्वतंत्र शासन राष्ट्रात निर्माण करण्याचा. आर्थर ग्रिफिथच्या लिखाणामुळे सिनफेनांच्या राजकीय तत्वज्ञानाची उभारणी झाली.

हे नवविचार व नव राजकीय तत्वज्ञान यांच्या मननाने, आचरणाने, आणि पराक्रम व हौतात्म्य यांच्या पूजनाने आयर्लंडमध्ये कर्तृत्ववान नेते उदयास आले. आर्थर ग्रिफिथ, मिक कॉलिन्स, डी व्हॅलेरा, कॅसल ब्रूघा, ऑस्टिन स्टॅक, लियाम लिंच, मॅक्स्विनी, मॅक कार्टिन इत्यादी अनेक कर्तृत्ववान तरुण मंडळी आपले प्राणसर्वस्व पणाला लावून 'हा देश स्वतंत्र करावा' या अहमहमिकेने खपत राहिली. १९१६ च्या बंडातून ते तावून सुलाखून निघाले. त्यांच्या पुढे जाऊन डॅन ब्रीन, सीन ट्रेसी यांच्यासारखे तरुण सेनानी प्रत्येक परगण्याच्या ठिकाणी स्वातंत्र्यभावनेने वेडावलेल्या तरुणांच्या अग्रभागी उभे राहिले. नुसते योग्य विचार किंवा अचूक तत्वज्ञान आपल्या मागे संघटना उभी करण्यास समर्थ नसते. तर तत्वज्ञान अचूक हवेच, पण या तत्वज्ञानाचे अनुयायी किती मोलाचे आहेत, त्यांचा त्याग कोणत्या मर्यादेचा आहे, त्यांचे कर्तृत्व किती धडाडीचे आहे, त्यांचे नेतृत्व किती प्रगतशील आहे, त्यांचे कार्य किती गतिमान आहे, यांवर त्या त्या तत्वज्ञानाचा विजय अवलंबून असतो. आयर्लंडच्या या तरुण नेत्यांमध्ये हे सर्व गुण होते. या गुणांच्या जोरावर त्यांनी आयर्लंडमध्ये राष्ट्रीय संघटना निर्माण केली. स्वराष्ट्र, स्वभाषा, स्वकीय इतिहास, आणि समाजप्रगती यांचा अभिमान धरणारे तत्वज्ञान, या विचाराने संवर्धन करून विद्यार्थ्यांत कर्तृत्व, महत्वाकांक्षा निर्माण करणाऱ्या राष्ट्रीय शाळा, वाङ्मय-उपासक मंडळे, राष्ट्रीय व्यायामशाळा, याच तत्वज्ञानानुरूप वागणारा राजकीय पक्ष आणि हे तत्वज्ञान प्रत्यक्षात आणणारी तरुणांची लष्करी संघटना ही सर्व त्या महान राष्ट्रीय संघटनेची अंगप्रत्यंगे होती. १९१६च्या बंडानंतर या तरुणांनी या राष्ट्रीय संघटनेच्या शाखा अनेक परगण्यांतून, प्रत्येक मोठ्या गावातून, प्रत्येक महत्वाच्या खेड्यातून स्थापन केल्या. त्या शाखांतून त्यांनी तरुणांना उत्कृष्ट शिक्षण दिले. शाखाशाखांमध्ये योग्य संबंध, शिस्त आणि हुकुमत स्थापन केली. त्यांच्यावर धीराचे अधिकारी नेमले. शस्त्रास्त्रे वापरण्याचे शिक्षण दिले. ठिकठिकाणची शस्त्रास्त्रे गोळा करण्याचा धडाका सुरू केला. लष्करी गणवेश घालून प्रगटपणे लष्करी संचलन करण्यासही प्रारंभ केला. गावांवर हल्ले प्रतिहल्ले कसे चढवावेत याच्या रंगीत तालमी होऊ लागल्या.

एवढी प्रगती होईपर्यंत १९१८ साल उजाडले. ब्रिटिश पार्लमेंटमध्ये आयर्लंडमधून १०५ प्रतीनिधी निवडावयाचे, त्याची धामधूम सुरू झाली. परकीयांबद्दलचा राग आणि क्रांतिकारकांबद्दलचे प्रेम जणू पराकोटीला पोचले. १०५ जागांपैकी ७३ जागा सिनफेनर्सनी जिंकल्या. त्यांनी डब्लिनला जमून आयर्लंडच्या स्वतंत्र पार्लमेंटची 'डेली आयरेन' ची स्थापना केली. आयर्लंडचे स्वतंत्र सरकार त्यांनी स्थापन केले. त्या सरकारचे अध्यक्ष ठरविले. युद्धमंत्री, अर्थमंत्री, परराष्ट्रमंत्री, शेतकीमंत्री इत्यादी खात्यांचे प्रधान नेमण्यात आले. स्थानिक स्वराज्यादी देशातील लोकानुवर्ती सत्ताकेंद्रेही सिनफेनर्सनी निवडणुकी जिंकून आपले हाती घेतली. या स्थानिक स्वराज्यसंस्थांनी स्वतंत्र आयर्लंडचे सरकारला आपली मान्यता दिली. तसेच

आपला कारभार स्वतंत्र आयर्लंडचे आदेशानुसार चालविण्याचा  निश्चय केला.

पण एवढ्यानेच स्वातंत्र्यसंपादना होत नाही. आम्ही निवडणुकी जिंकल्या, आम्ही तुमच्यावर बहिष्कार घातला, आम्ही स्वतंत्र सरकार स्थापन केले आहे आणि 'आता तुम्ही जा' असे म्हटल्याने परकीय सरकार जात नाही. आर्थर ग्रिफिथची कल्पना होती की, शांततेच्या मार्गांनी प्रतिसरकार स्थापन करून स्वातंत्र्य मिळविता येईल. प्रतिकार केल्याने स्वातंत्र्यसंपादनेला लागणारे गुण उत्पन्न होतात यावरही त्याचा विश्वास नव्हता. विधायक कार्यक्रमांनी, समाजसुधारणेने, व्याख्याने, वृत्तपत्रीय लिखाण आदींचा उपयोग करून लोकमत तयार करावे आणि परकीय राजसत्ता बधिर करून टाकावी अशी त्याची कल्पना होती. पण वरील सर्व साधनांचा वर्षानुवर्षे उपयोग करूनही जे साधले नसते ते १९१६चे उठावणीने केवळ वर्षभरात झालेले पाहून आणि लोकांत उत्पन्न झालेला आवेश, कष्ट-हाल सोसण्याची झालेली तयारी, प्रतिकाराची सिद्धता यांचा प्रत्यय आल्याने त्यांचा शांततावाद विराम पावला. नुसते लोकमत तयार केल्याने परकीय  सत्ता नष्ट होत नाही; नुसती परकीय सत्ता बधिर केल्याने परकीय स्वातंत्र्यसंपादना होत नाही, तर स्वत:चे सरकार त्यासाठी स्थापन केले पाहिजे. लोकांनी आपल्या सरकारचे ऐकावे, परकीय सरकारचे ऐकू नये अशी तयारी केली पाहिजे. आपल्या शासनसंस्था स्थापन केल्या पाहिजेत. अखेर परकीय सरकारच्या शासनसंस्था मोडून काढावयाच्या आणि परकीय सैन्याचा राष्ट्रीय सैन्याकरवी पराभव करावयाचा, एवढे केले तरच परकीय सत्ता नाहीशी होण्याची शक्यता उत्पन्न होते.

हे ओळखून आयरिश लोकसत्तेच्या स्वयंसैनिकांनी आपल्या सरकारच्या स्थापनेला, स्वत:च्या शासनाला अत्यंत आवश्यक असे लष्करी सामर्थ्य उभे केले होते. निवडणुकी होऊन सिनफेनर्स डब्लिनला धोरण ठरवीत आहेत तोच डॅन ब्रीनने सोलोहेडबेग येथे दारूगोळ्याच्या गाडीवर हल्ला करून ब्रिटिशांच्या विरुद्ध नव्या युद्धाची तुतारी फुंकली. हळूहळू त्याचे अनुकरण आयर्लंडमध्ये ठिकठिकाणी होऊ लागले. दारूगोळ्यावर हल्ले व्हावेत, पोलिसांवर हल्ले व्हावेत, ब्रिटिश शिपाई लॉऱ्यांतून जाऊ लागले की त्यांच्यावर हल्ले व्हावेत असा धुमधडाका सुरू झाला.

आयर्लंडमधील ब्रिटिश सत्ता मुख्यत: ब्रिटिशांच्या नोकरीत असलेले आयरिश पोलिस, आयरिश गुप्तहेर, न्यायकोर्टे, इंग्लंडच्या नोकरीत असलेले आयरिश सैन्य आणि ब्रिटिश सैन्य यांच्यावर अवलंबून होती. आयरिश लोकसत्तेच्या सैन्याने क्रमाक्रमाने प्रत्येकावर हल्ले करून त्याचा मोड केला. पहिले हल्ले गुप्तहेरखात्यावर झाले. प्रथम त्यांना हे काम त्यांनी करू नये असे सामोपचाराने सांगण्यात आले. तथापि या साध्या निरोपाने ऐकणार कोण? पररकीय सरकारच्या अन्नावर वाढलेले लोक तर कधीच ऐकणार नाहीत. स्वदेश, स्वातंत्र्य या उदात्त कल्पनांचा काडीमात्रही परिणाम त्यांच्यावर होत नाही. कारण त्यांचे रक्षण करण्यास परकीय सरकारचे सामर्थ्य त्यांचे पाठीशी सतत उभे असते. त्यांच्याजवळचा उदात्त विचारांचा झरा पैशाच्या लालचीने आणि अधिकाराच्या दर्पाने आटलेला असतो. आपल्याच स्वदेशबांधवांवर हल्ले करण्यास ते कधीही कचरत नाहीत. कारण त्यांना माहीत असते की केलेल्या अत्याचारांची गंधवार्ताही बाहेर पडू नये याची दक्षता परकीय सरकार घेत असते. काही माहिती बाहेर पडलीच तरी त्याबद्दल त्यांना जाब विचारणारा कोणी असत नाही. जाब विचारलाच तर त्याबद्दल शिक्षा करण्याचे सामर्थ्य लोकांत असत नाही. म्हणून ते सर्व बाजूंनी सुरक्षित असतात. अणि यामुळेच स्वदेशहिताबद्दल बेफिकीर आणि स्वत:च्या संसारात समाधानी असतात. सामोपचाराने सांगून जेव्हा ते ऐकेनात, तेव्हा आयरिश स्वयंसेवकांनी त्यांना धडा शिकविण्याचे ठरविले. गल्लोगल्ली स्वतंत्र आयर्लंडचे सरकारकडून मृत्यूची शिक्षा झालेल्या या गुप्त हेरांची प्रेते सापडू लागली. प्रेतावर चिठ्ठी 'फितुरीचे बक्षिस'; अशी उदाहरणे समोर घडू लागल्याबरोबर गुप्त हेरांच्या मनांत विलक्षण चलबिचल सुरू झाली. त्यांना स्वत:बद्दल, स्वत:च्या संसाराबद्दल सुरक्षितता वाटेना. परकीय सरकार त्यांचे सर्वथा रक्षण करू शकणार नाही हेही त्यांच्या ध्यानात आले आणि त्या असुरक्षित मन:स्थितीमुळे ते विचार करू लागले. त्यांच्या ध्यानात आले की, त्यांची नोकरी म्हणजे

आयर्लंडशी फितुरी आहे. आयर्लंड ही फितुरी कधीही सहन करणार नाही. आपण फितुरी करतो, आपण पाप करतो, या पापाबद्दल होणाऱ्या शिक्षेपासून आपणास कोणीही वाचवू शकणार नाही. ही समज आल्याबरोबर त्यांचे नैतिक धैर्य ढासळले. आपले चुकीचे उद्योग सोडून आपणही स्वदेशप्रेम शिकले पाहिजे असे त्यांच्या मनात येऊ लागले. फितुरीच्या रोगावर आयरिश स्वयंसेवकांनी जणू संजीवनी मात्राच शोधून काढली. या मात्रेचे गुण दुहेरी असतात. फितुरीचा रोग ती मुळातच खुडून काढते; पण रोगमुक्त झालेल्या रोग्यांत स्वातंत्र्यभक्तीचे अभिनव सामर्थ्यही ती उत्पन्न करते. मी मी म्हणणाऱ्या गुप्त हेरांना टिपून देहांत प्रायश्चित्त देण्यात आले. हे समोर घडत असलेले प्रकार पाहताच गुप्तहेर आणि पोलिस यांचे वर्तन सुधारले; आणि थोडक्याच काळात आयरिश क्रांतिकारकांच्या बातम्या ब्रिटिशांना कळण्याचे ऐवजी ब्रिटिशांच्याच बातम्या आयरिशांना कळू लागल्या.

ब्रिटिश हेरखाते अशा प्रकारे पार कोलमडून पडले. त्यांनी हेरखाते उभारण्याचे पुन्हा पुन्हा प्रयत्न केले; पण त्यांत त्यांना यश आले नाही. ब्रिटिशांचे हेर बनण्यास आयर्लंडमध्ये माणसे मिळेनात. ब्रिटिशांची स्थिती त्यामुळे आंधळ्यासारखी झाली. आयर्लंडमध्ये कोठे काय चालले आहे हे त्यांना समजेना. कोठून केव्हा कसा घाला येईल याची शंका त्यांना सतत भेडसावू लागली. ब्रिटिश हेरखाते नष्ट केल्यावर पोलिसांवर हल्ले करण्याचे क्रांतिकारकांनी ठरविले. शहरांपासून दूर असलेल्या पोलिस ठाण्यावर त्यांनी लागोपाठ हल्ले चढविले. ती ठाणी त्यांनी जाळून फस्त केली. त्यात असलेले सशस्त्र पोलिस व लष्करी शिपाई यांना एक तर मृत्यूस तयार व्हावे लागे, अगर शरण येणे तरी भाग पडे. हे हल्ले करताना सुरुंग, बाँब, रायफल्स, रिव्हॉल्व्हर्स यांचा सर्रास उपयोग करीत. पोलिसांवर हल्ले चालू असतानाच ब्रिटिश अधिकाऱ्यांवर हल्ले सुरू झाले.

प्रथम प्रथम हे हल्ले स्वातंत्र्यप्रेमाने वेडावलेले काही तरुण स्थानिक स्वयंसेवकांचे मदतीने करीत. पण ही तुटपुंजी तयारी मोठ्या हालचालींना उपयोगी पडण्याजोगी नव्हती. स्थानिक स्वयंसेवक हे उद्योगधंदा सांभाळूनच येणार त्यामुळे फक्त रात्रीचे वेळी ते उपयोगी पडू शकत. त्यांतच त्यांना लष्करी शिक्षणही फारसे मिळालेले नसायचे. हे दोष घालविण्यासाठी आयरिशांनी भरारी पथकांची स्थापना केली. ही संघटना म्हणजे राष्ट्रीय सैन्याची उभारणीच होती. लढाई हाच यातील तरुणांचा उद्योग. त्यांना पगार नको. पदव्यांचे आमिष नको. स्वातंत्र्याची लढाई आपण खेळत आहोत हेच त्यांना परमभाग्याचे वाटे. या भरारी पथकांच्या जोरावर ठिकठिकाणची पोलिस ठाणी आयरिशांनी फस्त केली. पुढे तर खुद्द ब्रिटिश लष्करावर हल्ले करण्यात आले. आज अमुक ब्रिटिश सेनापतीला पकडले, उद्या खुद्द व्हाइसरॉयवर हल्ला झाला, अशी लढाईची प्रगती होऊ लागली.

हेरखाते मोडले, पोलिसचौक्या जाळल्या; अशा रितीने ब्रिटिश शासनसंस्था मोडून काढत असताना आयरिशांनी स्वत:च्या शासनसंस्था निर्माण केल्या. ब्रिटिश हेरखाते मोडलेच; पण त्याचबरोबर आपले हेरखाते इतके भरभक्कम केले की खुद्द व्हाइसरॉयच्या घरातील बातमीसुद्धा लगोलग कळावी. पोलिसांचे खेड्यांत राहणे असुरक्षित आणि अशक्य झाल्याने ब्रिटिशांनी त्यांना शहरात आणून ठेवले. लगेच त्या खेड्यांत आयरिश लोकसत्तेचे पोलिस नेमण्यात आले. खेड्यांपाड्यांतून ब्रिटिश कोर्टे मोडून काढली तर त्यांचे जागी आयरिश लोकसत्तेची न्यायमंदिरे उभी राहिली. स्थानिक स्वराज्यसंस्था तर आयरिश लोकसत्तेचे म्हणणे ऐकू लागल्याच होत्या. आता आयरिशांनी परराष्ट्रांत आपले वकील पाठविले. निरनिराळ्या युरोपियन राजधान्यांतून आयरिश क्रांतिकारक गेले आणि तेथील राज्यकर्त्यांचे लक्ष आणि सहानुभूती त्यांनी आपल्या स्वातंत्र्ययुद्धाकडे ओढून घेतली. डी व्हॅलेरा स्वत:च ब्रिटिश तुरुंगातून निसटून अमेरिकेला गेला आणि अमेरिकन पैसा व सहानुभूती यांचा पूर त्यांनी आयर्लंडात आणला. अशा रितीने स्वत:ची न्यायमंदिरे, स्वत:चे पोलीस, परराष्ट्रीय सहानुभूतीचा आधार, स्वत:चे विधिमंडळ, निरनिराळ्या खात्यावर कर्तबगार मंत्री, आणि सर्वांना आधारभूत होणारे राष्ट्रीय सैन्य यावर आयर्लंडचे स्वतंत्र शासन आयरिशांनी निर्माण केले. प्रथम काही थोडेच लोक या नव्या राज्यात सामील झाले. पण नंतर अधिकाधिक लोक येता येता बहुतांशी सर्व आयर्लंड या स्वतंत्र राज्याचे शासन मानू लागले. ब्रिटिश

राजसत्तेचे नुसते नाव राहिले. तेसुद्धा ते संगिनीच्या जोरावर जेथे नाचतील त्या ठिकाणी! कोठे काय चालले आहे याची तिला वार्ता कळणार नाही, तिचे कायदे पाळले जाणार नाहीत, तिला माणसे मिळणार नाहीत, तिला पैसा नाही, जेथे तिचे लष्कर जाईल तेथेच तिचे राज्य आणि तेही तितक्या वेळापुरतेच. लष्कर पलीकडे जाताच पुन्हा तेथे आयरिश लोकसत्तेचे राज्य!

आयरिश देशभक्तांचा पाडाव करण्यासाठी ब्रिटिशांनी हरतऱ्हेचे प्रयत्न केले. त्यांनी अनेकांना फरारी ठरविले. पण जेथे सर्वच देशच फरारी ठरविण्याची पाळी आली तेथे फक्त काहींना फरारी ठरविण्याचे काय होय! त्यांनी प्रमुख आयरिश नेत्यांना जिवंत वा मृत पकडून देण्याबद्दल दहा-दहा हजार पौंडांची आमिषे लावली पण आयर्लंडमध्ये इतक्या नीच अंत:करणाचा माणूसच उरला होता कोठे, - की जो या लालचीस बळी पडेल! ब्रिटिश लष्कर मोकाट सुटले; ब्लॅक अँड टॅन्सनी जुलूम आणि अत्याचार यांची परकाष्ठा केली; झडत्यांची सत्रे सुरू झाली; कर्फ्यू ऑर्डर्स आणि मार्शल लॉ या गोष्टी नित्याच्या केल्या. पण आयरिश लोक वाकेनात! आयरिश पुढाऱ्यांच्या मालमत्तेची लूट करण्यात आली; त्यांच्या घरांना आगी लावण्यात आल्या; भरदिवसा त्यांना गोळ्या घालून ठार करण्यात येऊ लागले. नाना अत्याचारांनी त्यांचे प्राण घेतले जाऊ लागले. अखेर कत्तलीही केल्या. पण आयरिश लोक आपल्या स्वातंत्र्ययुद्धापासून रेसभरही मागे हटले नाहीत. आयरिश तरुण राष्ट्रीय सैन्यात दाखल झाले होतेच; आता युवतींनीही आपापली पथके उभारली. त्यांनी लष्करी गणवेश घातले; शुश्रुषापथके उभारली आणि अखेर बंदुकाही उचलल्या. लहान मुली, धर्मोपदेशक, व्यापारी -सर्वच या राष्ट्रीय लढाईत सामील झाले होते. आयरिशांची घरे म्हणजे देशभक्तांची आश्रयस्थाने बनली. ही लढाई दोन वर्षे चालू होती. तथापि आयरिशांचा प्रतिकार कायम होता. त्यांनी जगाला निर्धाराने सांगितले की, एक तर आम्ही निर्वंश होऊ, आमचा देश, आमचे नावसुद्धा जगातून नाहीसे होईल, अजिबात पुसले जाईल, नाहीपेक्षा पडेल ती किंमत देऊन आयर्लंड स्वतंत्र होणार.

सातत्याच्या कसोटीसही आयरिश पूर्णपणे उतरले. अखेर उपाय चालेना म्हणून इंग्लंडला आयर्लंडसमोर शरण येणे भाग पडले. ११ जून १९२१ला युद्धतहकुबी प्रकट करण्यात आली. लंडनला तहाच्या वाटाघाटी सुरू झाल्या. ६ डिसेंबर १९२१ला आयर्लंडचे आणि इंग्लंडचे प्रतिनिधींनी तहाच्या अखेरच्या मसुद्यावर सह्या केल्या. आयर्लंडचे बंडखोर सरकार हेच आयर्लंडचे राष्ट्रीय सरकार ठरले. ज्या लोकांवर नीच, खुनी, मारेकरी इत्यादी शेलक्या विशेषणांचा वर्षाव होत होता, तेच या युद्धांतील यशस्वी योद्धे ठरले. ज्या फराऱ्यांना जिवंत वा मृत कसेही पकडावे म्हणून ब्रिटिश सरकार धडपडत होते, ते उजळ माथ्याने प्रकट होऊ लागले, राष्ट्रवीर, स्वातंत्र्यवीर या पदव्यांनी सन्मानिले जाऊ लागले. बंडखोर सैन्य हे राष्ट्रीय सैन्य या गौरवाभिधानाने गौरविले गेले. बंडखोर न्यायमंदिरे हीच सत्ताधारी न्यायमंदिरे ठरली. इंग्लंडचे सैन्य आयर्लंडमधून काढून घेण्यात आले. डब्लिनचे राजवाड्यावरून युनियन जॅक उतरले गेले आणि तेथे आयर्लंडची स्वातंत्र्यध्वजा अधिष्ठित करण्यात आली. इंग्लंडच्या पराभवाचे काळे तोंड इंग्लंडला लपविता यावे यासाठी आयरिश प्रतिनिधींनी, नामधारी गव्हर्नर जनरल इंग्लंडकडून नेमला जावा; आयरिश विधिमंडळाच्या सभासदांनी इंग्लंडच्या नव्हे, तर आयर्लंडच्या इंग्लंडमध्ये असणाऱ्या राजाशी एकनिष्ठ राहण्याची शपथ घ्यावी; आयर्लंडने दरवर्षी एक ठराविक खंडणी द्यावी, अशा काही अटींना मान्यता दिली. पण १९३१नंतर डेल आयरेनने कायदे करून याही अटी उधळून लावल्या; राजनिष्ठेची शपथ घेणार नाही असे इंग्लंडला बजावले, गव्हर्नर जनरलचा पगार बंद केला; वार्षिक खंडणीही बंद केली आणि अखेरीस आयर्लंड हे संपूर्ण प्रजासत्ताक राष्ट्र आहे, ब्रिटिश साम्राज्याशी त्याचा कोणत्याच प्रकारे संबंध नाही असे उद्घोषित केले.

अशा रितीने हा देश गुलामगिरीतून मुक्त झाला. ३०० वर्षे पारतंत्र्यात असलेले हे राष्ट्र स्वतंत्र झाले. या विजयाबद्दल त्यांना केवढी धन्यता वाटत असेल? आणि हा विजय कोणाविरुद्ध? तर ज्यांच्या साम्राज्यावर सूर्य कधीही मावळत नाही असे म्हणतात, त्या ब्रिटिशांविरुद्ध! सर्व तऱ्हेच्या लष्करी सामर्थ्याने सज्ज असलेल्या इंग्लंडविरूद्ध! राजकारणात अत्यंत कुटिल म्हणून प्रसिद्ध असलेल्या

मुत्सद्यांचे विरुद्ध! नुकताच जर्मनीचा पराभव करून जगात अजिंक्य ठरलेल्या साम्राज्याविरुद्ध! आणि म्हणून पृथ्वीवरील अन्य कोणत्याही विजयापेक्षा याची थोरवी अधिक आहे. तीनशे वर्षे पददलित केलेल्यांचा, पाशवी शक्तीच्या जुलमाविरुद्ध संपादलेला हा विजय आहे, म्हणून तो माननीय आहे, असंख्य अन्यायांविरुद्ध न्यायाने जिंकून आणलेला हा विजय आहे म्हणून तो आदरणीय आहे; खोल रुतविलेल्या अनीतीविरुद्ध नीतीचा हा विजय आहे म्हणून तो सर्वश्रेष्ठ आहे; मूठभर जानपदाने स्वत:च्या निश्चयाच्या आणि करारीपणाच्या जोरावर बहुसंख्य नि शस्त्रसंपन्नाविरुद्ध मिळविलेला हा विजय आहे म्हणून तो अनुकरणीय आहे. अन्य कोणत्याही विजयापेक्षा तो त्रिवार, शतवार, अनंतवार, आणि अनंतपरींनी श्रेष्ठ आहे, महनीय आहे. पवित्र आहे. ज्या वीराग्रणींनी हा विजय संपादला तेही धन्यच होत. त्यांनी आपल्या पराक्रमाने परतंत्र राष्ट्रांसमोर हा आदर्श ठेवला आहे, की जे जे म्हणून परतंत्र राष्ट्र मारू किंवा मरू या निर्धाराने स्वत:चे लष्करी सामर्थ्यावर उभे राहील, आणि या पृथ्वीवरून एकतर आम्ही निर्वंश होऊ, नाहीतर आम्ही स्वतंत्र होणार, असे सतीचे वाण हातात घेऊन परकीय सत्तेचा प्रतिकार करील, त्याला जगातील कोणतीही शक्ती पारतंत्र्यात ठेवू शकणार नाही. मग ती शक्ती कोणतीही असो; कितीही प्रबल असो; तिचे जवळ टॅंक्स असोत, विमाने असोत वा अन्य महाभयंकर अस्त्रे असोत! स्वतंत्र झालेल्या आयर्लंडचा, त्याला स्वतंत्र करणाऱ्या वीरश्रेष्ठांचा हाच संदेश आहे, की राष्ट्रे चिरंजीव आहेत; राष्ट्रे अमर आहेत. पारतंत्र्य हे त्या अनादि अनंत कालौघात क्षणमात्र आहे, स्वातंत्र्य हेच शाश्वत आहे. राष्ट्रे चिरंजीव आहेत, राष्ट्रे अमर आहेत, पारतंत्र्य क्षणमात्र आहे, स्वातंत्र्य हेच शाश्वत आहे या संदेशाचा गोड ध्वनी आमचे अंत:करणात आम्हाला साठवून ठेवूदे. दीडशे वर्षांचे स्मशानशांततेतून, भयानक अंध:कारातून प्रकाशाकडे धावत धावत निघालेल्या आम्हा हिंदूंचे राष्ट्राला तो गोड ध्वनी पुन:पुन्हा: ऐकूदे. ते त्रिकालाबाधित सत्य सांगून आम्हाला आनंदित करणाऱ्या त्या ध्वनीचे आम्हाला फिरूनफिरून मनन करू दे. कसल्याही अंधकारातून मार्ग दाखविण्याचे सामर्थ्य त्यात आहे.

तथापि, आमचे आहे काय आणि आमचे नाही काय, हे आम्ही पुरते ओळखले पाहिजे. गेले कित्येक वर्षे आमचे राष्ट्रैक्य अभेद्य करण्यासाठी आम्ही परिश्रम करीत आहोत. जुन्या भेदांना नि विषमतेला खच्ची करून, बंधुता नि समानता याची स्थापना आम्ही करीत आहोत. जुनाट नाकर्तेपणाची पाळेमुळे खणून काढून प्रयत्नशीलतेचे, कर्तृत्वाचे बीजारोपण समाजाचे सर्व थरांतून आम्ही करीत आहोत. पण आम्ही आमच्या संस्कृतीचे उपासक बनलो पाहिजे आम्ही आमच्या परंपरेवर अधिष्ठित झाले पाहिजे; आमचा भाषेचा अभिमान आम्ही धरला पाहिजे, आमच्या इतिहासातून येणाऱ्या स्फूर्तीच्या जोरावर आमच्या राष्ट्रीय अभिमानाचे व सत्वाचे पोषण केले पाहिजे. पराक्रमाचे नि हौतात्म्याचे नित्य पूजन करण्यास आम्ही शिकले पाहिजे. जे राष्ट्रार्थ हसत हसत प्राणार्पण करतात ते नि:संशय थोर आहेतच. जे राष्ट्रसेवेत कणाकणाने झिजत झिजत मृत्यूचे राज्यात पाऊल टाकतात, तेही हुतात्मेच आहेत. पण जे लोकशिक्षण, लोकसंग्रह आदी कर्मयोग आचरून स्वातंत्र्ययुद्धाचे निर्माते होतात, धैर्याने मृत्यूशी सामना देतात, त्यांचे जीवन उदात्ततम आहे. त्या उदात्त जीवनाकडे आमची दृष्टी खिळलेली असू दे. आमची पितृभू असामान्य कर्तृत्वाची पराक्रमाची जननी आहे. तेथे थोर थोर हुतात्मे जन्म घेतील. त्यांनी केलेल्या लोकजागृतीतून त्यांचे चारित्र्याचे प्रकाशात नवनवी संघटना आम्ही घडवू. या संघटनांचे जोरावर नव्या युद्धांना सुरुवात करू. युद्धामुळे अधिक समाजजागृती, समाजशिक्षण, प्रखर कर्तृत्व आणि पराक्रम यांची निपज होईल. त्यांतून फिरून प्रबलतर प्रतिकारक्षम संघटना निर्माण होईल. असे होत, थोडक्याच अवधीत चाळीस कोटि आम्हा हिंदूचे राष्ट्र 'मारू किंवा मरू' या निर्धाराने अन्यायाचे, अनीतीचे प्रतिकारास उभे ठाकेल. चाळीस कोटि जानपदाला थोपविण्याचे सामर्थ्य, त्याला अडथळा करण्याचे, विलंब लावण्याचे धैर्य कोणात आहे?

आयर्लंड स्वतंत्र झाले. आमचा प्रिय स्वदेश आम्ही स्वतंत्र करणार, वैभवसंपन्नतेस नेणार हाही विधिनियमच आहे.

●●●